# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०८/२०१०** **दिनांक ०७.०८.२०१०**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शनिवार दिनांक ०७.०८.२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-८७२८-२०१०, दिनांक ३० जुलै, २०१० रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक ०७.०८.२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१.मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष
०२. मा.श्री.पांडूरंग गमाजी अभग
०३. मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे
०४. मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव
०५. मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर
०६ मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक
०७. मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा
०८. मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर
०९. मा.श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डये
१०. मा.डॉ.पी.एल.तिवारी
११. मा.सौ.जयश्री विष्णू थोरात

मा.किशोर रा.मोरे
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे, यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत सर्वश्री मा.शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष, मा.ना.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.शैलेश श्रीहरी कुटे, मा.समि खतिब व मा.श्रीमती रिम्पल लोहिया यांनी दूरध्वनीवरुन कळविले आहे, त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**विषय नं.०१** **दिनांक ०४.०७.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६१२** दिनांक ०४.०७.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या-

**०१) निर्णय क्र.५२२-**

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे टिव्ही चॅनेलवर पर्याय १ व २ ची सुविधा बंद करुन, फक्त संपूर्ण दिवसाचे लाईव्ह दर्शन (चारही आरत्यांसह) विविध चॅनेलमार्फत उपलब्ध करुन देणेस व त्याबदल्यास दिनांक ०१/०४/२०१० ते दिनांक ३१/०३/२०११ **या कालावधीत रुपये वीस लाख + सर्व्हिस टॅक्स घेण्यात यावा, असे ठरले.**

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे टिव्ही चॅनेलवर पर्याय १ व २ ची सुविधा बंद करुन, फक्त संपूर्ण दिवसाचे लाईव्ह दर्शन (चारही आरत्यांसह) विविध चॅनेलमार्फत उपलब्ध करुन देणेस व त्याबदल्यास दिनांक ०१/०४/२०१० ते दिनांक ३१/०३/२०११ **या कालावधीत रुपये चोवीस लाख + सर्व्हिस टॅक्स घेण्यात यावा, असे ठरले.** सदरचे दर दिनांक ०१.०४.२०१० ते दिनांक ३१.०३.२०११ या कालावधीत होणाऱ्या नुतनीकृत करण्यात येणाऱ्या करारनाम्यांना तसेच नवीन करारनाम्यांना लागू राहील.

(कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

**०२) निर्णय क्र.५२७ (०६)-**

सिंकदराबाद येथे संस्थानचे गेस्ट हाऊस उभारणेकामी मे.एल.करुणाकर रेड्डी, हैद्राबाद यांचे रुपये ३२,२०,७३४/-मात्र रकमेचे अंतिम बील अदा करणेस मान्यता देणेत आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

सिंकदराबाद येथे संस्थानचे **माहिती केंद्र** उभारणेकामी मे.एल.करुणाकर रेड्डी, हैद्राबाद यांचे रुपये ३२,२०,७३४/-मात्र रकमेचे अंतिम बील अदा करणेस मान्यता देणेत आली.

**हैद्राबाद, दिल्ली, चेन्नई, बँगलोर येथील माहिती केंद्राचे उद्घाटनाबाबत संबंधीत मान्यवरांच्या वेळा घेऊन या माहिती केंद्राच्या उद्घाटनाबाबतची कार्यवाही पूर्ण करावी. याकामी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम प्रमुख/ वशी-०५/जनसंपर्क अधिकारी)

**०३) निर्णय क्र.५३५-**

मा.विश्वस्त व अधिकारी यांनी सादर केलेल्या "अभ्यास व पाहणी दौरा समिती अहवालाची" नोंद घेणेत आली. अहवालात नमुद केलेले निष्कर्ष व अभिप्राय विचारात घेता, श्री साई भक्तांसाठी संस्थानमार्फत उभारणेत यावयाच्या नियोजित आध्यात्मिक व मनोरंजनात्मक बगीचा उभारणीसाठी आधुनिक तंत्रज्ञानावर

आधारीत घटकांचा वापर करणेत यावा. यासाठी आवश्यकता भासल्यास अक्षरधाम, नांदेड आदि ठिकाणच्या प्रकल्पांना मा.विश्वस्तांनी व अधिकाऱ्यांनी भेटी देऊन पहाणी करावी. तसेच या प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार, संस्थांना/ व्यक्तींना मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादरीकरण करणेस, चर्चा करणेसही आमंत्रित करणेत यावे. तसेच, सिंगापूर येथील तांत्रिक सल्लागार मे.मारिस इंटरनॅशनल कन्सल्टींग प्रा.लि., सिंगापूर यांना लेजर शो यंत्रणा उभारणेसाठी तांत्रिक सल्लागार म्हणून खालील अटी व शर्तीवर नेमणूक करण्यात यावी असे ठरले.

०१) मे.मारिस इंटरनॅशनल कन्सल्टींग प्रा.लि., सिंगापूर यांना प्राथमिक चर्चा व सादरीकरण, स्थळनिरिक्षण यासाठी आमंत्रित करणेत यावे. याकामी त्यांना भारतीय रु.५ लाख मात्र युएसए डॉलर्समध्ये रुपांतरीत करुन आदा करणेत यावे. तसेच, याकामी भरावे लागणारे सरकारी कर/सेवाकर आदि संस्थानमार्फत स्वतंत्ररित्या आदा करण्यात यावे.

०२) याकामी मे.मारिस इंटरनॅशनल कन्सल्टींग प्रा.लि., सिंगापूर यांना त्यांचा होणारा प्रत्यक्ष खर्च (उदा. विमानखर्च,जेवण,राहणे इ.) त्यांना बीलानुसार आदा करण्यात यावा.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

मा.विश्वस्त व अधिकारी यांनी सादर केलेल्या "अभ्यास व पाहणी दौरा समिती अहवालाची" नोंद घेणेत आली. अहवालात नमुद केलेले निष्कर्ष व अभिप्राय विचारात घेता, श्री साई भक्तांसाठी संस्थानमार्फत उभारणेत यावयाच्या नियोजित आध्यात्मिक व मनोरंजनात्मक बगीचा उभारणीसाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत घटकांचा वापर करणेत यावा. यासाठी **सर्वश्री मा.विश्वस्त सुरेश गोरक्षनाथ वाबळे, डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी हैद्राबाद,** अक्षरधाम, नांदेड आदि ठिकाणच्या प्रकल्पांना **या** विश्वस्तांनी व अधिकाऱ्यांनी भेटी देऊन पहाणी करावी **व अहवाल सादर करावा.** तसेच या प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार, संस्थांना/ व्यक्तींना मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादरीकरण करणेस, चर्चा करणेसही आमंत्रित करणेत यावे. तसेच, सिंगापूर येथील तांत्रिक सल्लागार मे.मारिस इंटरनॅशनल कन्सल्टींग प्रा.लि., सिंगापूर यांना लेजर शो यंत्रणा उभारणेसाठी तांत्रिक सल्लागार म्हणून खालील अटी व शर्तीवर नेमणूक करण्यात यावी असे ठरले.

०१) मे.मारिस इंटरनॅशनल कन्सल्टींग प्रा.लि., सिंगापूर यांना प्राथमिक चर्चा व सादरीकरण, स्थळनिरिक्षण यासाठी आमंत्रित करणेत यावे. याकामी त्यांना भारतीय रु.५ लाख मात्र युएसए डॉलर्समध्ये रुपांतरीत करुन आदा करणेत यावे. तसेच, याकामी भरावे लागणारे सरकारी कर/सेवाकर आदि संस्थानमार्फत स्वतंत्ररित्या आदा करण्यात यावे.

०२) याकामी मे.मारिस इंटरनॅशनल कन्सल्टींग प्रा.लि., सिंगापूर यांना त्यांचा होणारा प्रत्यक्ष खर्च (उदा. विमानखर्च,जेवण,राहणे इ.) त्यांना बीलानुसार आदा करण्यात यावा. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०४) निर्णय क्र.५३६-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संकेत रोझ नर्सरी, गणेशनगर यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच कामाचे पैसे आदा करणेबाबत सहा-सहा महिन्याचे टप्पे करुन प्रत्येक टप्प्यात १/४ रक्कम देण्यात यावी. तसेच, आंबा व नारळाच्या रोपांचे कोटेशन मा.कार्यकारी अधिकारी यांच्या समोर उघडून निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संकेत रोझ नर्सरी,गणेशनगर यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच कामाचे पैसे आदा करणेबाबत सहा-सहा महिन्याचे टप्पे करुन प्रत्येक टप्प्यात १/४ रक्कम देण्यात यावी. तसेच, नारळाची रोपे शासनाकडून खरेदी केल्यास त्याचे कोटैशन मिळणार नाही,करिता फक्त आंबा रोपांचे कोटेशन खाजगी नर्सरीमध्युन मागवून मा.स्थानिक विश्वस्त व मा.कार्यकारी अधिकारी यांच्या समोर उघडून निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम/बगीचा विभागप्रमुख)

**०५) निर्णय क्र.५४०- मध्ये मे.इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईज,मुंबई यांचे वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये ३९,७०,०००/- ऐवजी रुपये ३९,३५,०००/- वाचण्यात यावे.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**०६) निर्णय क्र.५४६ - मधील शेवटचे वाक्य-**

त्यामूळे त्यांचे दर निम्नतम असूनही त्यांच्या निविदा अपूर्ण असल्याने न्युनतम दराचा विचार न करता मे.पद्माटेक इंजिनीअरींग सिस्टीम, पुणे हे समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी हजर राहील्याने त्यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करुन थर्मिक फ्ल्यूड उभारणीचे काम व २१० लिटर थर्मिक ऑईल पुरविणेसाठी एकत्रित रुपये २,९०,०००/- मात्र त्यांना देण्याचे ठरले. तसेच पंप उभारणीकामी लागणारी वीज संस्थानने मोफत देण्यात यावी, असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**त्यामूळे त्यांचे दर निम्नतम असूनही त्यांच्या निविदा अपूर्ण असल्याने न्युनतम दराचा विचार न करता मे.पद्माटेक इंजिनीअरींग सिस्टीम, पुणे हे समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी हजर राहील्याने त्यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करुन थर्मिक फ्ल्यूड सर्क्युलेशन पंप उभारणीचे काम व २१० लिटर थर्मिक ऑईल पुरविणेसाठी एकत्रित रुपये २,९०,०००/- मात्र त्यांना देण्याचे ठरले. तसेच पंप उभारणीकामी लागणारी वीज संस्थानने मोफत देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रसादालय विभाग )

**०७) निर्णय क्र.५५७-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तांचे निवासी खोल्यांसाठी सुरु करण्यात आलेल्या विशेष स्वरुपाची देणगी योजना नियमावालीस मान्यता देण्यात आली. तसेच दि.३१ मार्च २०१० अखेरच्या प्रतिक्षा यादीतील भक्तांच्या नावांची यादी व्दारावती इमारतीमध्ये लावण्यात यावी असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला. सदर योजनेमध्ये नवीन भक्तनिवास इमारतीसाठी देणगी दिलेल्या भक्तांच्या प्रतिक्षा यादीतील भक्तांचा तसेच रु.५ लाखाची देणगी देणाऱ्या भक्तांचाही समावेश आहे. या सर्व देणगीदार भक्तांना विनामुल्य निवासाची सुविधा देणे सोईस्कर होणेसाठी प्रति आर्थिक वर्षात पुढीलप्रमाणे सुविधा देण्यात यावी.

| अ.नं. | देणगी रक्कम | निवास सुविधा (एका वेळेस कमीत कमी ०१ दिवस व जास्तीत जास्त ०३ दिवस) |
|---|---|---|
| १) | रु.१,९९,९९९/- पर्यत देणगीदारास | १० दिवस |
| २) | रु.२,००,०००/- ते रु.२,९९,९९९/- पर्यत देणगीदारास | १५ दिवस |
| ३) | रु.३,००,०००/- ते रु.३,९९,९९९/- पर्यत देणगीदारास | २० दिवस |
| ४) | रु.४,००,०००/- ते रु.४,९९,९९९/- पर्यत देणगीदारास | २५ दिवस |
| ५) | रु.५,००,०००/- व त्या पुढील देणगीदारास | ३० दिवस |

उपरोक्तप्रमाणे भक्तांचे निवासी खोल्यांसाठी सुरु करण्यात आलेल्या विशेष स्वरुपाचे देणगी योजना नियमावलीस मान्यता देण्यात आली. या योजनेतील देणगीदार भक्तांसाठी विनामूल्य निवास सुविधेचा कालावधी हा १५ वर्षापर्यंत मर्यादित ठेवावा व या योजनेतील सर्व देणगीदार भक्तांना भक्तनिवास प्रोजेक्ट कार्ड पुरविण्यात यावे. तसेच या योजनेअंतर्गत दि.३१.०३.२०१० अखेरपर्यंतच्या सर्व देणगीदार भक्तांच्या नावांची यादी द्वारावती इमारतीमध्ये लावण्यात यावी व त्यांना विनामूल्य निवासाची सुविधा सुरु करण्यात यावी. सदरची सुविधा सुरु करण्यात आल्याबाबतचे पत्र या योजनेतील सर्व देणगीदार भक्तांना पाठविण्यात यावेत, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी,/बांधकाम विभाग प्रमुख/अधिक्षक, द्वारावती भक्तनिवास)

**०८) निर्णय क्र.५८५-**

यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे समाधी भोवती असलेला व पादुकांचे कठाड्याभोवती असलेला सोन्याचा कव्हर संपूर्णपणे काढून घेण्यात येऊन, त्याखाली चांदीची नक्षीकाम केलेली चांदीची पट्टी बसविण्यात आलेली आहे, ती कायम स्वरुपी ठेवण्यात यावी, असें ठरलें.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे समाधी भोवती असलेला व पादुकांचे कठाड्याभोवती असलेला सोन्याचा कव्हर संपूर्णपणे काढून घेण्यात येऊन, **तसेच** त्याखाली चांदीची नक्षीकाम केलेली चांदीची पट्टी बसविण्यात आलेली आहे, ती **देखील काढून घेण्यात यावी व फक्त मार्बलचा नक्षीदार कठडा पादूका व समाधी भोवती ठेवण्यात यावा**, असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,मंदीर विभाग)

**०९) निर्णय क्र.५८६ मध्ये मे.ट्रायकलर कन्सल्टंट, मुंबई याऐवजी ट्रायकलर रिस्क ॲण्ड सिक्युरिटी सोल्यूशन प्रा.लि. मुंबई असे वाचावे.** (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

**१०) निर्णय क्र. ६०५-मधील शेवटचे वाक्य-**

तसेच दि.०५.०७.२०१० पासून श्री साईनाथ रुग्णालयात रिक्त असलेल्या 'डेन्टीस्ट' या पदावर सदर पदासाठी देय असलेल्या वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.५४०० + अनुज्ञेय भत्ते यावर नेमणूक करण्यात यावी, असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**तसेच दि.०५.०७.२०१० पासून श्री साईनाथ रुग्णालयात रिक्त असलेल्या 'डेन्टीस्ट' या पदावर सदर पदासाठी सहाव्या वेतन आयोगानुसार देय असलेल्या वेतनबँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.५४०० + अनुज्ञेय भत्ते यावर नेमणूक करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**११) निर्णय क्र.६११ (०७) मधील शेवटचे वाक्य-**

याकामी आवश्यकता असल्यास मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य मा. श्री. शैलेश कुटे, मा.श्री. सुरेशराव वाबळे, मा.श्री. अशोकराव खांबेकर यांनी या जमिनींची पाहणी करावी. मा. अध्यक्ष महोदय यांनी मांडलेल्या सदरहू विषयांस मान्यता देण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**याकामी मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य मा. श्री. शैलेश कुटे, मा.श्री. सुरेशराव वाबळे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व अशोकराव खांबेकर यांनी या जमिनींची पाहणी करावी. मा. अध्यक्ष महोदय यांनी मांडलेल्या सदरहू विषयांस मान्यता देण्यात आली.** ( कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०२ दिनांक ०५.०७.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.६१३** दिनांक ०५.०७.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या छाननी समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१) औषधे खरेदी बाबत-**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे २०१० - २०११ चे वार्षिक औषधे खरेदी कामी प्राप्त झालेल्या एकूण १५७ निविदा उपसमिती सभा दि.२७/०५/२०१० चे सभेत उघडण्यात आल्या होत्या त्याच दिवशी सर्व निविदा धारकांना चर्चा वाटाघाटी कामी सभेपुढे समक्ष बोलवण्यात आले होते. त्यानुसार दि. २७.०५.२०१० चे सभेपुढे एकूण १११ निविदाधारक उपस्थित होते.

सदर निविदा धारकांना सभेपुढे एकत्रीत बोलावून आपण आपली सिलबंद निविदा सादर केलेली आहे. सदर निविदेमध्ये आपण जे काही दर दिलेले आहे. त्यामध्ये आपण श्री साईबाबा व श्री साईनाथ हे दोन्ही धर्मदाय रुग्णालये असल्याने आपण दिलेल्या मुळ दरावर अजून किती सुट देऊ शकतात ती एका पत्रावर लिहून बंद पाकिटात देण्यात यावी असे सांगण्यात आले. त्यानुसार एकूण १११ निविदा धारकांनी बंद पाकिटात आपली सुट दिलेली होती. तसेच १० निविदाधारकांनी फॅक्स व्दारे सुट दिलेली होती. अशी सर्व पाकिटे व फॅक्स द्वारे प्राप्त झालेली सूट हि एका पाकिटात सिलबंद करुन ती दि.१०/०६/२०१० रोजीचे उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या होत्या.

दि.१०/०६/२०१० चे सभेत ठरल्यानूसार ज्या साहित्याची/ औषधांची किंमत जास्त आहे अशा काही निवडक औषधे / साहित्यासाठी तांत्रीक बाबी, किंमत, नामांकित कंपनी, इ. चा विचार करुन ज्या ठिकाणी त्यांना एक, दोन किंवा तीन किंवा त्यापेक्षा जास्त निविदा धारकांचे दर प्राप्त झालेले असतील अशा ठिकाणी कमीत कमी तिन निविदा धारकांची निवड करुन त्यांना समीतीच्या पुढील सभेपुढे चर्चा / वाटाघाटी साठी बोलावण्यात यावे.

तसेच ज्या ठिकाणी नामांकित कंपनी किंवा तांत्रीक दृष्टया खरेदी करणेस योग्य आहे व तेथे दर देखील निम्नतम प्राप्त झालेले आहे. तेथे त्यांची खरेदीसाठी शिफारस करण्यात यावी. उपरोक्त प्रक्रियेसाठी वैद्यकीय संचालक यांनी मा.विश्वस्त डॉ.ए.भा.गोंदकर यांचे मार्गदर्शन घ्यावे असे ठरले होते.

त्यानूसार प्राप्त झालेल्या सूटीचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असून तो तक्त्यात Rate After Discount on १०/०६/२०१० या कॉलम मध्ये दर्शविण्यात आलेला आहे तसेच याबाबत मा. विश्वस्त डॉ.ए.भा. गोंदकर साहेब यांचे मार्गदर्शन घेण्यात आले आहे. त्यांनी सुचविलेनुसार औषधांची निवड करतांना संबंधीत वापरणारे कन्सलटंट यांना तक्ता दाखवून त्यांना यापूर्वी ज्या साहित्याचा वापर करतांना तांत्रिक अडचणी आल्या किंवा त्याचा दर्जा चांगल्या प्रतीचा वाटला नव्हता, याबाबत संबंधीत कन्सलटंट यांना वैद्यकिय संचालक यांचे समक्ष बोलवून त्यांचा अभिप्राय/सूचना/नामांकित कंपण्या इत्यादी बाबत चर्चा करुन केवळ निम्नतम दरांचा विचार न करता एक किंवा अधिक कंपन्यांची निवड करण्यात आली आहे. तसेच संबंधीत कन्सलटंट यांचेशी चर्चा केल्यानंतर आवश्यक त्याठिकाणी मागणीमध्ये वाढ सुचविण्यात आलेली आहे, याकामी खालील कन्सलटंट यांना बोलविण्यात आले होते.

| | |
|---|---|
| ०१.डॉ. विजय नरोडे (ॲनेस्थेटीक) | ०२. डॉ. अशोक न्यायधीश (पॅथॅलॉजिस्ट) |
| ०३. डॉ. इरा भारद्वाज (पॅथॅलॉजिस्ट) | ०४. डॉ. साबळे (बालरोग तज्ञ ) |
| ०५. डॉ. हरीष बजाज कार्डीओलॉजिस्ट | ०६. डॉ. विद्युत कुमार सिन्हा (कार्डीयाक सर्जन) |
| ०७. डॉ. हेतल शहा ( ऑप्थलमोलॉजिस्ट) | ०८. डॉ. पाटील (बी.टी.ओ) |

**अ-** त्याचप्रमाणे पुरवठा धारकांशी चर्चा/ वाटाघाटी करणेसाठी ज्या ठिकाणी एका औषधांची / साहित्याची एकूण किंमत रु.१,००,०००/- (अक्षरी - एक लाख) पेक्षा कमी आहे परंतु त्यांची सर्व आयटमची एकत्रीत होणारी रक्कम रु.१,००,०००/- (अक्षरी - एक लाख) पेक्षा जास्त होत आहे अशा निविदाधारकांचा एक गट (Group) करण्यात आला असून यामध्ये एकूण ५३ निविदाधारक आहेत.

**ब-** तर ज्या ठिकाणी एका औषधांची/सर्जिकल साहित्याची एकूण किंमत रु.१,००,०००/- (अक्षरी - एक लाख) पेक्षा जास्त आहे अशा औषधांची/सर्जिकल साहित्याची एकूण संख्या ३४६ आहे व निविदाधारकांची संख्या ९६ असा एक गट (Group) करण्यात आलेला आहे.

दोन्ही गटात मिळून एकूण १४९ (अ - ५३ + ब - ९६ = १४९) निविदाधारकांपैकी ५० निविदा धारक हे दोन्ही गटात असल्याने (Common) चर्चा वाटाघाटीसाठी एकूण निव्वळ निविदा धारकांची संख्या ९९ इतकी आहे.

उपरोक्त दोन्ही गटातील निविदाधारकांना अजून सूट मिळणेकामी आजचे सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते, एकूण ९९ निविदा सादर कर्त्यांपैकी ५८ निविदा सादरकर्ते समितीचे सभेपुढे चर्चा/वाटघाटीसाठी उपस्थित होते. प्रत्येक निविदा सादरकर्त्यांस स्वतंत्रपणे सभेपुढे बोलविण्यात येऊन त्यांना श्रीसाईबाबा संस्थान ही धर्मादाय संस्था असल्याने पूर्वी दिलेल्या दरांमध्ये काही सवलत देणार किंवा कसे याबाबत सुधारीत दर दयावे असे सांगण्यात आले होते, त्यास अनुसरुन ३८ निविदा सादर कर्त्यानी आजचे सभेत सूट दिलेली आहे, तसेच २ निविदा सादर कर्त्यांनी फॅक्सव्दारे सुट दिलेली आहे, त्याचा तपशील खालील प्रमाणे :-

| S.N | Name of Supplier | Discount Given | | S.N | Name of Supplier | Discount Given | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **A** Group Costing Less than Rs. 1 Lakh | **B** Group Costing More than Rs. 1 Lakh | | | **A** Group Costing Less than Rs. 1 Lakh | **B** Group Costing More than Rs. 1 Lakh |
| 1 | Ace Medical Technology, urangabad | | Absent | 51 | Biomerieux India Pvt.Ltd., Mumbai | Absent | Absent |
| 2 | Ajinkya Medical Agencies, Ahmednagar | Absent | Absent | 52 | Bioshields, Goa | Absent | Absent |
| 3 | Alkem Laboratories Ltd, Mumbai | Nil | Nil | 53 | Blue Neem Medical Devices Pvt. Ltd., Bangalore | | Itemwise |
| 4 | Allwin Life Care, Mumbai | | Absent | 54 | Cachet Pharmaceuticals Pvt.Ltd., Mumbai | | Absent |
| 5 | Ambica Drug House, Pune | Absent | Absent | 55 | Cadila Pharmaceuticals Ltd., Ahmedabad | | Nil |
| 6 | Austin Healthcare, Pune | Absent | Absent | 56 | Cardiotech, Pune | | Itemwise |
| 7 | B.Braun Medical (India) Pvt. Ltd., Mumbai | Nil | Itemwise | 57 | Chetna Enterprises, Ahmednagar | 1% | 1% |
| 8 | B.L. Lifesciences Pvt.Ltd., New Delhi | Absent | Absent | 58 | Cosmos Enterprises, Mumbai | | Absent |
| 9 | Bard India Healthcare(P) Ltd, Mumbai | Nil | Nil | 59 | Critical Care Systems, Pune | 1% | 2% |
| 10 | Bharat Serum & Vaccinces Ltd., Mumbai | | Absent | 60 | Deva Distributor, Shrirampur | | Absent |
| 11 | Bharat Surgical, Rahuri | | Nil | 61 | G.& G. Medicaid, Ahmednagar | | Nil |
| 12 | Biomedicon Systems (I) Pvt. Ltd., Mumbai | 1.5% | 1.5% | 62 | Gagan Pharma, Mumbai | | Absent |
| 13 | Gandhi Enterprises, Ahmedngar | | Nil | 63 | Munot Medical Agencies, Manmad. | 2% | Itemwise |
| 14 | Guru Agencies, Ahmednagar | | Nil | 64 | N.P. Agencies, Mumbai | | Itemwise |
| 15 | Gurukrupa Agencies, Kopargaon | Absent | Absent | 65 | Namoh Agencies,A.nagar | | Absent |
| 16 | Hansraj Nayyar Medical India, Mumbai | Nil | Itemwise | 66 | Nirmal Agencies, Ahmednagar | 2% | 5% |
| 17 | Hestar Diagnostics Pvt.Ltd., Mumbai | Nil | Nil | 67 | Om Agencies, Aurangabad | Absent | Absent |
| 18 | Hi-Tech Surgical Systems, Mumbai | | Absent | 68 | Om Health Care, Surat | | Itemwise |
| 19 | Icon Meditech Pvt.Ltd.,Nagpur | | Absent | 69 | Om Medical & General Store, Shrirampur | | Absent |
| 20 | Imaging Products Ind. Ltd., Mumbai | | Itemwise | 70 | Omni Lens Pvt.Ltd., Ahmedabad | Nil | Nil |
| 21 | Inter Medics, Mumbai | | Absent | 71 | Panacea Biomedicals, Pune | Itemwise | Itemwise |
| 22 | J.S.P.Surgical, Nashik | Itemwise | Itemwise | 72 | Pankaj Pharma, Pune | 2% by Fax | 2% by Fax |
| 23 | JCPL Pharma Pvt. Ltd., Jalgaon | | 1% | 73 | Pharmacea Link, Pune | Absent | Absent |
| 24 | Johnson & Johnson Limited, Mumbai (Asp Division) | | Absent | 74 | Pharmaco, Pune | 2% by Fax | 2% by Fax |
| 25 | Johnson & Johnson Limited, Mumbai (Ethicon Division) | Nil | 3% | 75 | Pharmaveda (I) Pvt.Ltd., Mumbai | | Nil |
| 26 | Kabra Medicals, Jalgaon | Nil | Nil | 76 | Pioneer Enterprises, Ahmednagar | | Absent |
| 27 | Kaivalyam Surgicals, Shrirampur | | 3% | 77 | Raman & Weil Pvt. Ltd., Mumbai | Nil | Nil |
| 28 | Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune | 1% | Itemwise | 78 | Renuka Surgical Systems, | Absent | Absent |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | Aurangabad | | |
| 29 | Kapil Medicals, Jalgaon | Nil | Itemwise | 79 | Rishab Trading Co, Mumbai | 1% | 1% |
| 30 | Kaustubh Enterprises, Mumbai | | Absent | 80 | Sai Enterprises, Ahmednagar | | 2% |
| 31 | Keps Pharma, Mumbai | Nil | Nil | 81 | Sai Medical Systems, Jalgaon | | Itemwise |
| 32 | Life Care Medical Systems, Pune | | Nil | 82 | Sairaj Agencies Pharamaceuticals Distributors,Kopargaon | | Itemwise |
| 33 | Mahesh Surgical & Pharmaceuticals,Pune | Absent | Absent | 83 | Saitrons Medical Equipment, Loni | Nil | Nil |
| 34 | Maureen Surgical Company, Aurangabad | Nil | Nil | 84 | Sanjay Agencies, Ahmednagar. | Absent | Absent |
| 35 | Mediplus Surgicals, Pune | Itemwise | | 85 | Sanjivani Medical & Gen. Stores, Ahmednagar | | Absent |
| 36 | Mil Laboratories Pvt.Ltd., Mumbai | | 1% | 86 | Sarv Healthcare Pvt.Ltd., Mumbai | | Absent |
| 37 | Milan Enterprises, Ahmednagar | Nil | Nil | 87 | Scimed Technologies Pvt.Ltd., Mumbai | Nil | Nil |
| 38 | MRK Healthcare, Mumbai | | Absent | 88 | Shiddheshwar Medical & General Stores, Ahmednagar | Itemwise | Itemwise |
| 39 | Shivam Trading Company, Mumbai | Nil | Nil | 89 | Swar Enterprises, Pune | | Nil |
| 40 | Shree Enterprises, Pune | 1% | 1% | 90 | Tirupati Enterprises, Pune | | Itemwise |
| 41 | Shreeji Agency, Shrirampur | Itemwise | | 91 | Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai | Absent | Absent |
| 42 | Shreya Enterprises, Ahmednagar | Absent | Absent | 92 | Trimurti Agencies, Nashik | | 1% |
| 43 | Shri Balaji Medical & Pharmaceutical Distributor's, Nashik | | Itemwise | 93 | Trimurti Enterprises, Sillod | Nil | Itemwise |
| 44 | Shriram Distributors, Pune | Itemwise | 1% | 94 | Tyco Healthcare India Pvt. Ltd., Mumbai | | Itemwise |
| 45 | Siddhi Medical Distributors, Aurangabad | Absent | Absent | 95 | Universal Chemicals, Nashik | Nil | Nil |
| 46 | Snehal Enterprises, Nagpur | | Itemwise | 96 | Vascular Concepts Ltd., Mumbai | | Itemwise |
| 47 | Spandan Biotech, Aurangabad. | | Absent | 97 | Vishal Agencies, Ahmednagar. | 2% | Itemwise |
| 48 | Steranco Health Care Pvt.Ltd., Mumbai | | Absent | 98 | Yoga Enterprises, Pune | Absent | Absent |
| 49 | Sunbeam Glass Works, Mumbai | Absent | | 99 | Zenith Surgical Co., Mumbai | Absent | Absent |
| 50 | Surya Surgi Pharma, Nashik | Itemwise | Itemwise | | | | |

यावर चर्चा होऊन उपसमितीने खालीलप्रमाणे ज्या शिफारशी केलेल्या आहेत, त्या अ.नं.०१ ते ०९ शिफारशी मान्य करण्यात आल्या.

०१) गट "अ" मधील निवडलेल्या औषधाकरीता निवड करण्यात आलेल्या कंपनीकरीता जे निविदाधारक आजच्या सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी उपस्थित होते. त्यांनी देऊ केलेली सुट वजावट करुन पुरवठा आदेश देण्यात यावेत तर जे निविदाधारक उपस्थित नव्हते त्यांचे पुर्वीचेच दर अंतिम धरुन पुरवठा आदेश देण्यात यावा.

०२) गट"ब" मधील निवडलेल्या औषधाकरीता निवड करण्यात आलेल्या कंपन्यापैकी निम्नत्तम दर किंवा तांत्रिक बाबी व डॉक्टरांच्या शिफारशी यांचा विचार करुन, ज्या उपस्थित निविदा धारकांनी सुट दिलेली आहे, त्यांची सुट वजावट करुन, जर सुट दिलेली नसेल तर पुर्वीचेच दर अंतिम धरुन पुरवठा आदेश देण्यात यावेत.

०३) ज्या औषधांकरीता / साहित्याकरीता एकाच निविदा धारकाचे दर प्राप्त झालेले आहे, तेथे त्यांनी देऊ केलेली सुट वजावट करुन, जर सुट दिलेली नसेल तर पुर्वीचेच दरानुसार पुरवठा आदेश देण्यात यावा.

०४) ज्या औषधांची एकुण किंमत १ लाखापेक्षा कमी आहे व निविदाधारकाची एकुण आदेशाची रक्कम देखील रु. १ लाखापेक्षा कमी होत आहे तेथे निवड केलेल्या औषधांचा पुरवठा आदेश देण्यात यावा.

०५) ज्या औषधाकरीता / साहित्याकरीता कोणाचेही दर प्राप्त झालेले नाही त्यासाठी आवश्यकतेनुसार शक्यतो थेट कंपनीकडुन किंवा अधिकृत विक्रेते यांचेकडून कोटेशन मागवून खरेदी करण्यात यावीत.

०६) मे.सिध्दी मेडीकल डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद हे आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी उपस्थित नव्हते त्यांनी दि.०३/०७/२०१० रोजीचे फॅक्स पत्रान्वये त्यांनी निविदेमध्ये देऊ केलेल्या Konelab (Thermo) कंपनीचे दर वाढलेले असून त्यांचे सुधारीत दर विचारात घ्यावे असे कळविले आहे. सदरचे पत्र आजचे सभेपुढे दाखविण्यात आले. यावर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयात Konelab (Thermo) कंपनीचे मशिन असल्यामुळे Konelab (Thermo) कंपनीचेच किट वापरावे लागतात व त्यासाठी इतर निविदा धारकांचे दर आलेले नसल्याने वैद्यकिय संचालक व मा. विश्वस्त डॉ.ए. भा. गोंदकर यांनी कंपनीशी / निविदाधारकाशी चर्चा / वाटाघाटी करुन दरात आणखी सुट मिळणेकामी प्रयत्न करावा.

०७) वैद्यकिय संचालक यांनी आजचे सभेपुढे कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमध्ये कार्डीयाक शस्त्रक्रिया करण्याकरीता लागणारे R/O Sponges करीता सदर विभागाने ६ Ply ची मागणी केलेली होती. परंतु कार्डीयाक सर्जन डॉ. विदयुत कुमार यांनी ६ Ply ऐवजी १२ Ply ची मागणी करावी असे सुचित केलेले आहे, असे सांगितले. यावर चर्चा होऊन कार्डीयाक विभागाची लेखी मागणी घेऊन ज्या निविदाधारकांनी ६ Ply चे दर दिलेले आहेत, त्यांचेकडूनच १२ Ply करीता दर मागवून त्यातील नामांकित कंपनीचे / पुर्वीचा अनुभव यांचा विचार करुन R/O Sponges खरेदी करण्यात यावे.

०८) विविध वॉर्ड व प्रयोगशाळा यामध्ये लागणारे ग्लुकोमीटर (Glucometer Active & Sensor) मे. कपिल मेडीकल, जळगाव हे प्रत्येकी १० नग Bayer कंपनीचे मोफत देणार आहे. त्यासाठी लागणारे एका स्ट्रिपची किंमत त्यांनी निविदेमध्ये दर प्रती बॉटल (५० Strip) रु.५२५/- इतके दिले होते. दि. २७/०५/२०१० चे सभेत सुट दिल्यानंतर त्यांचे दर रु. ५००/- प्रती बॉटल असे झालेले आहेत. त्या दराने त्यांचेकडून एका वर्षाकरीता २० ग्लुकोमीटर मोफत स्विकारुन लागणाऱ्या स्ट्रिप त्यांचेकडून खरेदी करण्यात याव्यात.

०९) वाार्षिक मागणी व्यतिरीक्त अजुन काही औषधांची अतिरीक्त गरज भासलेस ती वार्षिक मंजुर दराने मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, अशी या समितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०२) <u>श्री साईबाबा रुग्णालयाकरीता लिनन खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडणेबाबत.</u>**

श्री साईबाबा रुग्णालयातील लिननचा साठा संपत आल्याने रु.५,७६,६००/- इतक्या रकमेचे नवीन लिनन खरेदीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक २७/०१/२०१० चे सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता, त्यावर चर्चा होऊन सदरचे खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यात याव्यात असे ठरले होते, त्यानुसार सदरचे खरेदीकामी महाराष्ट्र टाइम्स, मुंबई व इंडियन एक्सप्रेस, मुंबई या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दिनांक १२/०३/२०१० अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या परंतु जाहिरातीस अनुसरुन मे.वेदांत एंटरप्रायजेस, सोलापुर यांची एकमेव निविदा प्राप्त झाली होती. आपणास कमीत कमी तिन निविदा आवश्यक असल्याने फेर कोटेशन मागविणेकामी मा.व्यवस्थापन सभा दिनांक २२/०५/२०१० अन्वये इकडील पत्र क्रमांक ५७३ दिनांक ०५/०६/२०१० अन्वये एकुण १२ पुरवठाधारकांकडुन दिनांक १७/०६/२०१० अखेर फेरकोटेशन मागवण्यात आले होते त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे तीन कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

| अ.न | पुरवठाधारकांचे नाव | प्राप्त दिनांक |
|---|---|---|
| ०१ | मे. के.सी.एम एन्टरप्रायजेस, जयपुर | १७/०६/२०१० |
| ०२ | मे.सारडा इंटेरियर, अहमदनगर | १८/०६/२०१० |
| ०३ | मे.गिरीसन्स डिस्ट्रिब्युटर्स, पुणे | १८/०६/२०१० |

जाहिरातीस व कोटेशनच्या पत्रास अनुसरुन एकुण चार कोटेशन प्राप्त झाले होते.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त एक निविदा व तीन बंद कोटेशन समक्ष उघडण्यात येऊन त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन तो पुढील मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी निर्णयार्थ ठेवण्यात यावा, अशी या समितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.०२** **दिनांक ०५.०७.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.६१३** दिनांक ०५.०७.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या छाननी समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०३) <u>साईआश्रम भाग ०१ (खोल्या) साईआश्रम भाग ०२ (हॉल) मध्ये ठेवावयाचे पलंग, गाद्या बेडशिट, खुर्च्या, बादल्या इत्यादी खरेदी बाबत.</u>**

श्री साईभक्त श्री के.व्ही.रमणी,चेन्नई यांनी संस्थानला देणगी देऊ केलेल्या साई आश्रम प्रकल्प भाग १ व भाग २ चे बांधकाम लवकरच पुर्ण होत असून सदर इमारतीमधील खोल्या /हॉल हे श्री साईंचे दर्शनासाठी शिरडीस येणा-या साईभक्तांना उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत.

या इमारतीतील खोल्या /हॉल व निवासाची व्यवस्था होणा-या भक्त संख्या इत्यादीची माहिती खालीलप्रमाणे :-

**अ) साई आश्रम :- भाग - I खोल्या (A- Block Bldgs. १२ Nos) :-**

| अ.क्र. | एकूण इमारती | एकूण मजले | प्रत्येक | एकूण | एका खोलीत | निवास क्षमता |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | इमारतीमधील खोल्यांची संख्या | खोल्यांची संख्या | भक्तांची क्षमता | भक्तांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | A Block -१२ इमारती | तळमजला + ३ (G+३) | १२८ खोल्या | १५३६ खोल्या | ३+४ = ७ भक्त | १०,७५२ |

**ब) साई आश्रम भाग :- II हॉल (B- Block - Bldgs-६ Nos) :-**

| अ.क्र. | एकुण इमारती | मजले | प्रत्येक इमारतीमधील हॉलची संख्या | एकूण हॉलची संख्या | एका हॉलमधील भक्तांची क्षमता | निवास क्षमता भक्तांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | B Block - ०६इमारती | तळमजला + ३ (G+३) | ३२ हॉल्स | १९२ हॉल्स | ५+२०= २५ भक्त | ४,८०० भक्त |

उपरोक्त साई आश्रम भाग १ मध्ये अंदाजे १०,७५२ व साई आश्रम भाग २ मध्ये अंदाजे ४,८०० भक्त असे दोन्ही मिळून १५,५५२ इतक्या भक्तांची निवास व्यवस्था होणार आहे.सदर निवासात दैनंदिन वापरासाठी लागणा-या वस्तू उदा .पलंग,गाद्या,बेडशिट,बादल्या,पिण्याचे पाण्याचे जग, ग्लास, इत्यादी ठेवावयाचे असून कार्यालयीन कामकाजासाठी गोदरेज रॅक,कुलूपे,टेबल,खुर्ची इत्यादीची आवश्यकता असून सदर खरेदी विहित (निविदा मागवून) पध्दतीने करावी लागणार आहेत. खरेदी करावयाच्या वस्तूंची यादी परिशिष्ठ अ म्हणून सोबत जोडलेली आहे. ज्या वस्तूची लवकर तूटफूट होत असते त्या वस्तूची खरेदीची संख्या अंदाजे १० % जादा दर्शविलेली आहे.

सोबतचे परिशिष्ट अ मध्ये दर्शविले नुसार खरेदी करावयाचे वस्तूसाठी साई आश्रम भाग १ रुपये ७,१७,०४,०७० व आश्रम भाग २ रुपये २,०९,७६,९७० असे एकुण रुपये ९,२६,८१,०४०/-खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भाग ०१ (खोल्या) साईआश्रम भाग ०२ (हॉल) मध्ये ठेवावयाचे पलंग व गाद्या शिर्डी येथील हॉटेलमध्ये मा.स्थानिक विश्वस्त व मा.कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी यांनी समक्ष पहाणी करुन नमुने निश्चित करावेत तसेच बेडशिट, चादर सोलापूर येथे जाऊन समक्ष पहाणी करुन खरेदी कराव्यात. खुर्च्या, बादल्या इत्यादी मुंबई/पुणे येथे जाऊन प्रत्यक्ष पहाणी करुन खरेदी कराव्यात, याकामी साईआश्रम भाग ०१ (खोल्या) साठी रुपये ७,१७,०४,०७० व आश्रम भाग २ (हॉल) साठी रुपये २,०९,७६,९७० असे एकुण अंदाजे रुपये ९,२६,८१,०४०/- खर्चास मान्यता देण्यात यावी अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,व्दारावती निवासस्थान)

**०४) <u>कोरस इंडिया प्रा.लि. पुणे यांचे एस्कॉन व्हॅसलर कंपनीचे मॉडेल नं. २२० फ्रॅंकींग मशिन चे सन २०१०-११ सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे बाबत.</u>**

मे.कोरस इंडीया प्रा.लि.पुणे यांचे एस्कॅाम व्हॅसलर कंपनीचे मॉडेल नं २२० फ्रॅकींग मशीन प्रशासन शाखा जावक विभागाकडे दैनंदीन पोस्टेज कामासाठी चालू आहे

मागील वर्षाचे दि ०१/०७/२००९ ते ३०/०६/२०१० अखेरचे या कालावधीचे सर्व्हीस कॉन्ट्रॅक मे.कोरस इंडीया प्रा.लि.पुणे यांना रू-२५०००/-+सर्व्हीस टॅक्स १०.३० % रू-२५७५/- अशी एकुण रूपये-२७५७५/- (सत्तावीस हजार पाचशे पंच्याहत्तर मात्र ) इतक्या रक्मेला देण्यात आले होते

दि ३०/०६/२०१० अखेर सदर मशीनचे सर्व्हीस कॉन्ट्रॅकचा कालावधी संपत आलेला आहे मे.कोरस इंडीया प्रा.लि.पुणे यांनी त्यांचे दि १५/०६/१०चे पत्र/ॲग्रीमेंट ने पुढील एक वर्षाच्या दि-०१/०७/२०१० ते ३०/०६/२०११ या कालावधी करीता रू-२५०००/-+सर्व्हीस टॅक्स १०.३० % रू-२५७५/- अशी एकुण रूपये-२७५७५/- (सत्तावीस हजार पाचशे पंच्याहत्तर मात्र ) कळवीले आहे.दि-०१/०७/२०१० ते ३०/०६/२०११ या कालावधी करीता सर्व्हीस कॉन्ट्रॅक करणे गरजेचे आहे सदरच्या फ्रॅकींग मशीनच्या दुरूस्ती देखभाली साठी प्रशासन शाखा मशीनरी सन २०१०-२०११ च्या बजेट मध्ये खर्चाची तरतुद केलेली आहे.

१) दि-०१/०७/२०१० ते ३०/०६/२०११ या कालावधी करीता ऊपरोक्त फ्रॅकींग मशीनचे सर्व्हीस कॉन्ट्रॅक करण्यास व त्या कामी येणाऱ्या रूपये-२७५७५/- (सत्तावीस हजार पाचशे पंच्याहत्तर मात्र ) चे खर्चास तसेच फ्रॅकींग मशीनचे सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट दरवर्षी देणे आवश्यक असल्याने त्यास स्थायी मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा- वशी-११ )

**०५) <u>श्रीसाईबाबा/श्री साईनाथ हॉस्पिटलकडील वैद्यकीय अधिकारी/आर.एम.ओ यांचे नेमणूकीस मान्यता मिळणे बाबत.</u>**

श्रीसाईबाबा व श्रीसाईनाथ हॉस्पीटल मध्ये आवश्यक असणारे वैद्यकिय अधिकारी/आर.एम.ओ.पदे भरणेकामी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात येऊन दि.२९/०५/२०१० रोजी वॉक् इन इंटरव्हयू आयोजित करण्यात आले होते. त्यानुसार सदर दिवशी फिजीशियन या पदासाठी -०१, वरिष्ट भूलतज्ञ पदासाठी -०१,

कनिष्ठ भूलतज्ञ पदासाठी -१, स्त्रीरोग तज्ञ पदासाठी-०५, सीएमओ- पदासाठी -०२, आरएमओ पदासाठी-१० उमेदवार असे उमेदवार मुलाखती साठी हजर होते.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. १६/०३/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. २८३ चे अधिन राहुन उपरोक्त प्रमाणे मुलाखतीसाठी हजर असलेल्या उमेदवारांच्या मा.विश्वस्त डॉ.इ.बी.गोंदकर साो., मा.कार्यकारी अधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी व उपवैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी मुलाखती घेऊन पात्र उमेदवारांच्या निवडी करुन खाली त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे नेमणूक पत्र देण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | वैद्यकिय अधिकारी नांव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश क्र. व हॉस्पीटलचे नांव | दिलेले पदनाम व एकत्रित मानधन /वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१ | डॉ. रश्मी प्र. इंगळे श्रीरामपुर | एम.डी. (मेडीसीन) - ०८ | जा.नं.एसएसएस/वशी-०१/९००/२०१०. दि.१४/०६/२०१०. श्री साईनाथ हॉस्पीटल | मेडीकल ऑफिसर (फिजीशियन) एकत्रित वेतन रु.३५,०००/- |
| ०२ | डॉ. देवश्री चिलके लोणी बु | एमडी (ॲनेस्थेसिया)-०७ | जा.नं.एसएसएस/वशी-०१/९०१/२०१० दिनांक : १४/०६/२०१०. श्री साईबाबा हॉस्पिटल | वरिष्ट भुलरोगतज्ञ, एकत्रित वेतन रु. ३५०००/- |
| ०३ | डॉ रूपाली अविनाश ढाणगे संगमनेर | डीए (ॲनेस्थेसिया)-१० | जा.नं.एसएसएस/वशी-०१/९०२/२०१० दिनांक : १४/०६/२०१०. श्री साईनाथ रूग्णालय | कनिष्ट भुलरोगतज्ञ, एकत्रित वेतन रु. २७०००/- |
| ०४ | डॉ उमा गिरीष किन्नरकर, ठाणे | एमएस (ओबीजीवाय) -०८ | जा.नं.एसएसएस/वशी-०१/९०३/२०१० दिनांक : १४/०६/२०१०. श्री साईबाबा हॉस्पिटल | गायनेकोलॉजिस्ट, एकत्रित वेतन रु. ३५०००/- |
| ०५ | डॉ. मानसी सुर्यवंशी नाशिक | एमबीबीएस०३, डीजीओ-१० | जा.नं.एसएसएस/वशी-०१/९०४/२०१० दिनांक : १४/०६/२०१०. श्री साईबाबा हॉस्पिटल | आरएमओ, एकत्रित वेतन रु. २७०००/- |
| ०६ | डॉ निर्मला मानिकराव रासकर ,राहाता | एमबीबीएस- ०८ | जा.नं.एसएसएस/वशी-०१/९०५/२०१० दिनांक : १४/०६/२०१०. श्री साईबाबा हॉस्पिटल | आरएमओ, एकत्रित वेतन रु. २७०००/- |
| ०७ | डॉ. शितल ओमप्रकाश बागडिया, धुळे | एमबीबीएस-२०००, डीजीओ-०३ | जा.नं.एसएसएस/वशी-०१/९०६/२०१० दिनांक : १४/०६/२०१०. श्री साईनाथ रूग्णालय | आरएमओ, एकत्रित वेतन रु. २७०००/- |
| ०८ | डॉ. खुशबु राधाकीसन दमानी श्रीरामपुर | एमबीबीएस-०८ | जा.नं.एसएसएस/वशी-०१/९०७/२०१० दिनांक : १४/०६/२०१०. श्री साईबाबा हॉस्पिटल | आरएमओ, एकत्रित वेतन रु. २७०००/- |
| ०९ | डॉ अमोल बाजीराव पोकळे, लोणी | एमबीबीएस-०४, डीजीओ-०७ | जा.नं.एसएसएस/वशी-०१/९०८/२०१० दिनांक : १४/०६/२०१०. श्री साईनाथ रूग्णालय | आरएमओ, एकत्रित वेतन रु. २७०००/- |
| १० | डॉ मोसिन ए अत्तार नाशिक | एमबीबीएस-०१, डीपीबी-०९ | जा.नं.एसएसएस/वशी-०१/९०९/२०१० दिनांक : १४/०६/२०१०. श्री साईबाबा हॉस्पिटल | आरएमओ, एकत्रित वेतन रु. २७०००/- |
| ११ | डॉ वृषाली अंबादास भवर, नाशिक | एमबीबीएस-२००७ | जा.नं.एसएसएस/वशी-०१/९१०/२०१० दिनांक : १४/०६/२०१०. श्री साईबाबा हॉस्पिटल | आरएमओ, एकत्रित वेतन रु. २७०००/- |
| १२ | डॉ कुलकर्णी क्रांती नरेश , नाशिक | एमबीबीएस-०४, डीए - ०९ | जा.नं.एसएसएस/वशी-०१/९१४/२०१० दिनांक : १४/०६/२०१०. श्री साईनाथ रूग्णालय | आरएमओ, एकत्रित वेतन रु. २७०००/- |
| १३ | डॉ अव्हाड अभिजीत प्रल्हाद, लोणी बु | एमबीबीएस-०७, डीजीओ-१० | जा.नं.एसएसएस/वशी-०१/९११/२०१० दिनांक : १४/०६/२०१०. श्री साईबाबा हॉस्पिटल | सीएमओ, एकत्रित वेतन रु. २७०००/- |
| १४ | डॉ अतुल प्रकाशचंद नावंदर नांदगाव | एमबीबीएस-०३, डीजीओ-१० | जा.नं.एसएसएस/वशी-०१/९१२/२०१० दिनांक : १४/०६/२०१०. श्री साईबाबा हॉस्पिटल | सीएमओ, एकत्रित वेतन रु. २७०००/- |

उपरोक्त अ नं. ०१ ते १४ वरील उमेद्वारांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे वैद्यकिय अधिकारी / आर.एम.ओ/ सी.एम.ओ. या पदावर करण्यात आलेल्या नेमणूकीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**०६) श्रीसाईबाबा संस्थान रुग्णालयामध्ये विविध पॅरामेडीकल पदे भरतीकरीता घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेचा अहवाल व सदर परिक्षेतील पात्र उमेदवारांच्या मुलाखतीची तारीख निश्चित करणे बाबत.**

दि. ०९/०८/२००९ रोजीची मा. व्यवस्थापन समितीचे मंजुरीनुसार दि. ०५/०१/२०१० रोजीचे दै. सकाळ व दि. ०७/०१/२०१० रोजीचे दै. महाराष्ट्र या वृत्तपत्रात खालीलप्रमाणे जाहीरात प्रसिध्द करणेत आली. सदर जाहीरातीस अनुसरून आलेले २३७ अर्ज व सेवायोजन कार्यालयाकडून आलेल्या ३२ उमेदवारांची यादी असे एकुण २६९ अर्ज प्राप्त झाले. प्राप्त अर्जांची छाननी करून शैक्षणिक पात्रतेनुसार व सेवायोजन कार्यालयाकडील यादीनुसार एकुण १८४ उमेदवारांना आकृतीबंधाच्या अधिन राहुन संबंधीत पदाकरीता आवश्यक असलेले मुलभुत कौशल्य तपासणेसाठी दि. २७/०६/२०१० रोजी ४० गुणांची लेखी परीक्षेकरीता कन्या विद्या मंदीर येथे बोलविणेत आले. सदर परीक्षेकरीता सोशल वर्कर, हिस्टोपॅथ टेक्निशियन, बायोकेमिस्ट, एस टी एच ए फॉर बायोमेडीकल वेस्ट मॅनेजमेंट व कॅथलॅब टेक्निशियन या पदांकरीता उमेदवार बोलविणेत आले होते.

डायलेसिस, पी एफ टी टेक्निशियन व स्ट्रेस/ इको तंत्रज्ञ या पदांसाठी प्राप्त अर्जांमधील एकही उमेदवार पात्र आढळला नाही. सर्व उमेदवारांचा एकत्रित गोषवारा खालील तक्त्यात दिला आहे.

| अ नं | पदाचे नाव | पदसंख्या | | | एकुण अर्ज | | लेखी परीक्षेकरीता बोलविणेत आलेले पात्र उमेदवार | लेखी परीक्षेकरीता उपस्थित असेलेले उमेदवार | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रवर्ग खुला | प्रवर्ग आरक्षीत | | मुदतीत प्राप्त झालेले अर्ज | सेवायोजन कार्यालय पुणे यांचेकडून आलेले उमेदवारांची यादीनुसार आकडेवारी | | प्रवर्ग | | |
| | | | एस सी | एस टी | | | | खुला | एस सी | एस टी |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बायोकेमिस्ट | ०१ | ०० | ०० | १२ | १० | १९ | ०७ | ०० | ०० |
| २ | हिस्टोपॅथ तंत्रज्ञ | ०२ | ०० | ०० | ६३ | १० | २६ | १६ | ०० | ०० |
| ३ | डायलेसिस तंत्रज्ञ | ०१ | ०१ | ०० | ०६ | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ४ | वरिष्ठ पी एफ टी तंत्रज्ञ | ०१ | ०० | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ५ | वरिष्ठ स्ट्रेस / इको तंत्रज्ञ | ०१ | ०० | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ६ | वरिष्ठ कॅथलॅब तंत्रज्ञ | ०१ | ०० | ०० | १० | ०० | ०२ | ०२ | ०० | ०० |
| ७ | समाजसेवक / सोशल वर्कर | ०१ | ०० | ०१ | १२० | ११ | १२० | ७८ | ०० | ०८ |
| ८ | एस टी / एच ए फॉर बायोमेडीकल वेस्ट मॅनेजमेंट | ०१ | ०० | ०० | २२ | ०१ | १७ | १३ | ०० | ०० |
| | | ०९ | ०१ | ०१ | २३७ | ३२ | १८४ | ११६ | ०० | ०८ |
| **एकुण** | | **११** | | | **२६९** | | **१८४** | **१२४** | | |

सदर परीक्षेकरीताचे प्रश्नपत्रिका संच वैद्यकीय संचालक यांचे मार्गदर्शनाखाली तयार करणेत येऊन प्रत्यक्ष टायपिंग व सेंटींगचे काम प्रभारी वैद्यकीय प्रशासक यांचे नियंत्रणाखाली गोपनीय रीत्या करण्यात आले. सदर प्रश्नपत्रिकांच्या उमेदवारांच्या संख्येनुसार मा. विश्वस्त डॉ. एकनाथ गोंदकर यांच्या उपस्थितीत प्रिंटस काढण्यात येऊन त्यांच्या स्वाक्षरीने सदर प्रश्नपत्रिका सीलबंद करण्यात आल्या. सदर प्रक्रियेचे ध्वनीचित्रमुद्रण करण्यात आले आहे.

सर्व १८४ उमेदवारांची बैठकव्यवस्था कन्या विद्या मंदीर मध्ये वेगवेगळ्या ८ ब्लॉकमध्ये झीग झॅग (Zig-Zag) पध्दतीने करण्यात आली होती व सर्व ब्लॉकवर कन्या विद्या मंदीरच्या शिक्षकांनी पर्यवेक्षक म्हणुन काम पाहिले.

प्रत्यक्ष लेखी परीक्षा सुरू होणेपुर्वी सर्व उमेदवारांच्या मुळ प्रमाणपत्रांची वैधता तपासण्यात आली. त्यासाठी रूग्णालय व आस्थापनेवरील कायम १० कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली होती. परीक्षा संपल्यानंतर सर्व उत्तरपत्रिका मा. कार्यकारी अधिकारी व मा. उप कार्यकारी अधिकारी यांचे उपस्थितीत सीलबंद करण्यात आल्या.

सदर परीक्षेदरम्यान मा. कार्यकारी अधिकारी, मा. उप कार्यकारी अधिकारी व वैद्यकीय संचालक तसेच श्री आर एस साबळे, प्रशासकीय अधिकारी, श्री वाघ सो., प्रशासकीय अधिकारी, श्री एन के कुलकर्णी, आस्थापना प्रमुख यांनी स्वत: देखरेख केली.
संपुर्ण परीक्षा कार्यक्रम हा ध्वनीचित्रमुद्रित करण्यात आला.

सीलबंद उत्तरपत्रिका या संस्थानच्या वाहनातुन श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये तपासणीकरीता नेण्यात आल्या. सदर उत्तरपत्रिका तपासणीसाठी डॉ. हरीष बजाज, डॉ. विजय नरोडे, डॉ. गौरव वर्मा, डॉ. किरण गोरे, डॉ. प्रितम जपे, डॉ. राहुल मोदगी, श्री साहेबराव लंके, श्री रविंद्र नवले, श्री विनोद कोते, श्री राजेश वाकडे, श्री अशोक वाळुंज, श्री मच्छिंद्र थोरात यांची तपासणीस म्हणुन नेमणुक करण्यात आली होती.

डॉ. श्रीकांत लासुरे यांनी मॉडेल उत्तरांचे वाचन केले व त्यानुसार उत्तरे पडताळून सर्व तपासणीकांनी उत्तरपत्रिका तपासल्या. श्री आर एस साबळे, प्रशासकीय अधिकारी व श्री जाधवर सा़ो, मुख्य लेखाधिकारी यांनी मॉडरेटर म्हणुन काम पाहिले. श्री कोकणे आर. एन., लिपीक व निलेश चव्हाण, कंत्राटी कर्मचारी यांनी संगणक डेटा एन्ट्री ऑपरेटर म्हणुन काम पाहिले.

तपासणीची संपुर्ण प्रक्रीया मा. उपकार्यकारी अधिकारी यांचे निगराणीखाली पार पाडली. सर्व उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन झालेनंतर पदनिहाय गुणयाद्या तयार करण्यात आल्या. सर्व उत्तरपत्रिका पदांनुसार वेगवेगळ्या लिफाफ्यात सीलबंद करण्यात आल्या तसेच सर्व पदांच्या गुणयाद्या एकत्रित एका लिफाफ्यात मा. उप कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने सीलबंद करण्यात आल्या.

संपुर्ण प्रश्नपत्रिका तपासणी प्रक्रिया ध्वनीचित्रमुद्रित करण्यात आली.

लेखी परीक्षेकरीता पदानुसार उपस्थित असलेल्या उमेदवारांचे गुणांचे विवरण सिलबंद लिफाफ्यात सादर केलेले आहे.

मा. व्यवस्थापन समितीसमोर सिलबंद लिफाफा ऊघडून उमेदवारांना मुलाखतीकरीता बोलविणेकामी लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे किती विद्यार्थ्यांना बोलवावे याबात निर्णय व्हावा व मुलाखतीकरीता तारीख, वेळ निश्चित करून मिळावी ही विनंती.

तसेच मुलाखतीच्या वेळी पॅरामेडीकलचे पदाकरीता खालील तज्ञांच्या उपस्थितीत मुलाखती घ्याव्यात, असे मत आहे.

| अ नं | पदाचे नाव | तज्ञांचे नाव |
|---|---|---|
| ०१ | बायोकेमिस्ट | डॉ. इरा भारद्वाज, पॅथालॉजिस्ट, श्री साईनाथ रूग्णालय |
| ०२ | हिस्टोपॅथ तंत्रज्ञ | डॉ. इरा भारद्वाज, पॅथालॉजिस्ट, श्री साईनाथ रूग्णालय |
| ०३ | वरिष्ट कॅथलॅब टेक्निशियन | डॉ. हरीष बजाज, हृदयरोग तज्ञ, श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ०४ | एस टी एच ए फॉर बायोमेडीकल वेस्ट मॅनेजमेंट | संचालक, बायोक्लिन सिस्टीम, अहमदनगर अथवा विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र, पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, लोणी. |

यावर सविस्तर चर्चा होऊन, सिलबंद लिफाफे उपसमितीसमोर उघडण्यात आले व त्यानंतर पदनिहाय/प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे पहिल्या ५ उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे व दिनांक १३.०७.२०१० रोजी सकाळी १०.०० वाजता शिर्डी येथे मुलाखाती आयोजित करण्यात याव्यात अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०७) श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता वैद्यकीय संचालक,वैद्यकीय प्रशासक व अधिसेविका तसेच श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वैद्यकीय अधिक्षक या पदाच्या मुलाखतीकरीता तारीख निश्चित करणे बाबत.**

दि. १९/०५/२०१० रोजीचे वृत्तपत्रातील श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकरीता वैद्यकीय संचालक, वैद्यकीय प्रशासक, वैद्यकीय अधिक्षक व मेट्रन या पदाची जाहीरात प्रसिध्द करणेत आली असुन अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि. २९/०५/२०१० होती. सदरचे जाहीरातीस अनुसरून खाली दर्शविल्याप्रमाणे संबंधीत पदांकरीता अर्ज प्राप्त झालेले आहेत.

| अ नं | पदाचे नाव | एकुण प्राप्त अर्ज | पात्र अर्ज |
|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकीय संचालक | १५ | ०७ |
| ०२ | वैद्यकीय प्रशासक | ०६ | ०२ |
| ०३ | वैद्यकीय अधिक्षक | ०१ | ०० |
| ०४ | अधिसेविका (मेट्रन) | १२ | ०४ |

सदर पदास पात्र असलेले अर्जदारांना मा. व्यवस्थापन समितीसमोर मुलाखतीस बोलवावे लागेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अधिसेविका (मेट्रन) पद वगळता उर्वरित पदाच्या मुलाखती दिनांक १३.०७.२०१० रोजी सकाळी १०.०० वाजता शिर्डी येथे आयोजित करण्यात याव्यात अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०८) श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगातील व्यवसायरोध भत्ता मंजूर करणे बाबत.**

सदरहू विषयाबाबत निर्णय व्यवस्थापन समितीचे सभेत घेण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**०९) मे.डी.जे ॲण्ड सन्स, पुणे यांचे हिरवी विलायची व हळद पुरवठा दरवाढ मिळणे बाबत.**

प्रसादालयासाठी सन- २०१०-११ करिता वार्षिक दर पध्दतीने दि.०१.०४.२०१० ते दि.३१.०३.२०११ अखेर खालीलप्रमाणे माल पुरविणेकामी मे.डी.जे ॲण्ड सन्स, पुणे यांना इकडील जा.नं.६०७०/ १९.०४.२०१० अन्वये पुरवठा आदेश दिलेला आहे.

| अ.नं. | मालाचा तपशील | परिमाण क्विंटल | मंजुर दर प्रती क्विंटल |
|---|---|---|---|
| ०१ | मैदा | ३५० | १,८७०/- |
| ०२ | हिरवी विलायची बोल्ड | ५० | १,१७,५००/- + ५% व्हॅट |
| ०३ | हळद अखंड | १०० | १४,०००/- + ५% व्हॅट |
| ०४ | कच्चे पोहे | १२ | १,९३०/- |
| ०५ | जीरे-डायमंड कट | ५० | १२,२००/- + ५% व्हॅट |

पुरवठा आदेशाप्रमाणे मागणीनुसार ते मालाचा पुरवठा करीत आहेत. तथापि हिरवी विलायचीचे दर प्रति किलो रु.१५५०/- ते रु.१६००/- पर्यंत वाढल्याचे त्यांनी दि.२९.०५.२०१० चे पत्रान्वये कळविले आहे. तसेच दि.०२.०६.२०१० चे पत्रान्वयेही हिरवी विलायचीचे दरात प्रति किलो रु.४००/- ते रु.५००/- दरवाढ झाल्याने वार्षिक टेंडर दरात रु.५००/- प्रति किलो दरवाढ मिळणेस व हळद अखंडचे दरात प्रती किलो रु.४०/- ते ५०/- दरवाढ झाल्याने दरवाढीचा विचार करणेबाबत विनंती केली आहे. दरवाढीचे पुष्टर्थ त्यांनी त्यांचे देयकाची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

पुरवठा आदेशातील शर्ती/ अट क्र.१३ नुसार माल पुरवठा वर्षाअखेर (दि.०१.०४.२०१० ते दि.३१.०३.२०११) मंजुर दरानेच नमुन्याप्रमाणे माल पुरवठा करणे पुरवठाधारकास बंधनकारक असून मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ दिली जाणार नाही/ मागता येणार नाही. माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास त्यांनी सुरक्षा अनामत रक्कम पुर्णतः/ अंशतः संस्थान जमा करणेत येईल. त्याबाबत संस्थान व्यवस्थापन निर्णय घेईल, अशी तरतूद आहे.

त्यांचे मागणीप्रमाणे भाववाढ द्यावयाची झाल्यास खालीलप्रमाणे वाढीव खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | मालाचा तपशील | अंदाजे परिमाण क्विंटल | वाढीव मागणीप्रमाणे दर प्रती क्विंटल | मंजुर दर प्रती क्विंटल | फरक दर प्रती क्विंटल | शेकडा दर वाढ | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | हिरवी विलायची | ४५ | १,६७,५००/- + व्हॅट | १,१७,५००/- + व्हॅट | ५०,०००/- | ४२% | २२,५०,०००/- |
| ०२ | हळद अखंड | ९० | १८,०००/- | १४,०००/- | ४,०००/- | २८% | ३,६०,०००/- |

मे.डी.जे ॲण्ड सन्स, पुणे यांनी दि.१५.०६.२०१० रोजीचे फॅक्स पत्रान्वये दि.०१.०६.२०१० पासून हळदी वरील व्हॅट रद्द झाल्याचे कळविले आहे. तसेच दि.१४.०६.२०१० रोजी संस्थानला किराणा माल

पुरवठा करणाऱ्या घाऊक पुरवठाधारकांकडे सदर मालाचे दराविषयी विचारणा केली असता त्यांनी पुढील प्रमाणे दर कळविले आहेत.

| अ.नं. | मालाचा तपशील | सोनदुर्ग सन्स, वाशी दर प्रती क्विंटल | पुखराज रामनिवास, जळगाव दर प्रती क्विंटल | बाफना बाजार, नाशिक दर प्रती क्विंटल | सरासरी दर प्रती क्विंटल | मंजुर दरावर शेकडा दर वाढ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | हिरवी विलायची | १,६५,०००/- + ५% व्हॅट | २,००,०००/- + ५% व्हॅट | २,००,०००/- + ५% व्हॅट | १,८८,३००/- + ५% व्हॅट | ४२% |
| ०२ | हळद अखंड | १८,१००/- | २२,०००/- | १९,५००/- | १९,९००/- | २८% |

पुरवठा आदेशातील शर्ती/ अटीनुसार त्यांना भाववाढ देता येणार नाही. तरीही सदर मालांच्या दरामध्ये झालेली अनुक्रमे ६०% व ४२% दरवाढ पाहाता, त्यांनी मागणी केलेप्रमाणे अनुक्रमे ४२% व २८% दरवाढीबाबत त्यांच्या विनंती पत्राचा विचार होऊन निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसादालयासाठी सन- २०१०-११ करिता वार्षिक दर पध्दतीने हिरवी विलायची व हळद अखंड पुरविणेकामी निविदा सादर केलेल्या निविदा सादरकर्त्यांना दिनांक १३.०७.२०१० रोजी समितीची सभेपूढे चर्चा/वाटाघाटीसाठी बोलावून अंतिम निर्णय घेण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**१०) श्री साईबाबा कन्या विद्या मंदिराचे स्टोअर रुममध्ये इग्लिश मिडीयमचे के.जी वर्गासाठी वर्गखोल्या तयार करणेबाबत.**

संस्थानचे श्री साईबाबा इंग्लिश मिडीअमचे के.जी. वर्गांमधील चालू वर्षी विद्यार्थांची संख्या वाढलेली आहे. सदरचे शैक्षणिक संकुलाचे इमारतीमध्ये कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल हे संयुक्त रित्या भरविण्यात येते. यावर्षी के.जी.चे विद्यार्थांची संख्या वाढलेली असलेकारणाने के.जी. चे क्लासेल शिफ्टमध्ये भरविण्यात येतात. दि.२९/०६/२०१० रोजी मा. विश्वस्त डॉ. गोंदकर सो., यांनी कळविले की, कन्या विद्यामंदिराचे स्टोअर ताब्यात घेऊन त्यामध्ये के.जी. चे वर्ग सुरु करावेत व कन्याविद्यामंदिरासाठी वरच्या माळ्यावर पॅसेजमध्ये पार्टीशन टाकून चेजींग रुम व स्टोअर तयार करुन दयावे. दि. ०१/०७/२०१० रोजी साईटवर मा. प्र.अ. श्री साबळे सो., यांचेसमवेत प्रत्यक्ष राउंड घेण्यात आला. त्यांनी कन्याविद्यामंदिर, आय.टी.आय. व इंग्लिश मिडीअम ची समक्ष पाहणी केली. त्यावेळी त्यांनी मा. विश्वस्त डॉ. गोंदकर सोा यांचे सूचनेप्रमाणे कन्या विद्यामंदिराचे ताब्यात असलेल्या स्टोअर मध्ये पार्टीशन टाकून इंग्लिश मेडीयमचे के.जी. वर्गांसाठी वापरण्याचे सूचविले.

त्यानुसार कन्या विद्या मंदिराचे तळमाळ्याचे स्टोअरची मापे घेण्यात आली त्याठिकाणी विट बांधकाम करुन पार्टिशन टाकता येईल. त्यासाठी अंदाजपत्रकानुसार रुपये ३२,२५२.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**११) मंदिर परिसरातील ध्यान मंदिर येथे सुरक्षा साहित्याचे सेंट्रलाईज कंट्रोल रुम करणेकरीता ॲल्युमिनियम पार्टीशन करणे बाबत.**

मंदिर व परिसर तसेच श्रीं च्या दर्शनाकरीता येणारे भक्तांचे सुरक्षिततेसाठी मे. व्हेंटेज सिक्युरीटी सोल्युशन, नोईडा या कंपनीमार्फत सुमारे ४.५ कोटी रुपयांचे सुरक्षा साहीत्य (सी. सी. टीव्ही, कॅमेरे, डोअर फ्रेम, मेटल डिटेक्टर, बॅग स्कॅनर इ.) बसविणेत येणार असुन त्यावर नियंत्रण ठेवणेसाठी व यंत्रणा व्यवस्थीत कार्यान्वीत राहावी याकरीता पुढील ५ वर्षाचे कालावधीसाठी सदर कंपनीमार्फत कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यात सुरक्षा साहीत्य बाबतचे प्रशिक्षण सुरक्षा कर्मचाऱ्यांना देण्यात येणार आहे. करीता त्यासाठी तयार करावी लागणारी स्वतंत्र कंट्रोल रुम मंदिर परिसरातच मध्यवर्ती ठिकाणी आवश्यक असल्याने गुरुस्थान मंदिराचे समोर असलेल्या तळघराच्या (ध्यान मंदिर) हॉलमधील जागेत कंट्रोल रुम तयार करण्याचे मा. कार्यकारी अधिकारी सोा, श्री. प्रणव वर्मा, मालक, व्हेंटेज सिक्युरीटी सोल्यु. ट्रायकलर सोल्यु. कन्स्लटंटचे प्रतिनीधी कर्नल, दिपानकर यांचे राउंडमध्ये ठरले आहे. करीता सदर ठिकाणी स्टोअर रुम व कंट्रोल रुम असे दोन वेगवेगळे भाग करुन कट्रोल रुम तयार करुन मिळणेबाबत संरक्षण विभाग यांनी कळविले आहे.

याकरीता प्रस्तावित कंट्रोल रुम करीता करावयाचे ॲल्यु. पार्टीशनसाठी मा. कार्यकारी अधिकारी सोा यांनी जागा निश्चिती केली असून, त्याप्रमाणे एकुण १७.६१ चौ. मी. कलर ॲनोडाईज्ड ॲल्यु. पार्टीशन व ५.८६ चौ. मी. कलर ॲनोडाईज्ड ॲल्यु. दरवाजा (दोन नग) करणेकरीता अंदाजपत्रकानूसार रुपये १,७४,८८६/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेता येईल.

तरी याकामी आवश्यक ॲल्यु. पार्टीशन व दरवाजा तयार करणेकरीता येणारे अंदाजे रुपये १,७४,८८६/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमा खर्च तक्ता माहे जुन२०१०**

**(ब) माहे जुन, २०१०मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे जुन, २०१० मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे जुन २०१०मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(A) माहे जुन,२०१० मधील जमा रु. २०,१६,०२,८३१/- आणि खर्च रुपये १७,३९,४९,८५४/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील जुन,२०१० रुपये ३,१७,८१६/- चा तक्ता, दिनांक ३०.०६.२०१० अखेर संस्थानची गुंतवणूक रुपये ४४३,७१,७५,८७३/- चा तक्ता, माहे जुन,२०१० या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या एकूण रुपये ८,९५,८९,४६७/- देणगीचा तक्ता, माहे जुन, २०१० मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा रुपये १,९६,०५७/- चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६१४ नोंद घेण्यात आली.**

---

**०२.श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये जुन, २०१० या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

B) श्री साईबाबा रुग्णालयात माहे जुन, २०१० मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रुपये २१,३३,१२९/- देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६१४ नोंद घेण्यात आली.**

---

**०३. श्री साईनाथ रुग्णालयात माहे जुन, २०१० या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

(C) श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे जुन, २०१० मध्ये रुपये ३८,६७,१७५/- देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६१४ नोंद घेण्यात आली.**

---

**०४.श्री साईनाथ रुग्णालयात माहे जुन, २०१० मध्ये गरीब रुग्णांना बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

(D) साईनाथ रुग्णालयात माहे जुन, २०१० मध्ये रुग्णांना अंतररुग्ण रुपये ५४,६९७/- बाह्य रुग्ण रुपये ४७,३४३/- थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ६१,७५०/- वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६१४ नोंद घेण्यात आली.**

---

**०५. माहे माहे जुन, २०१० मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(E) माहे जुन, २०१० संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ४५,२६० कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६१४ नोंद घेण्यात आली.**

---

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.६१४ नोंद घेण्यात आली.**

---

**०७.पाणी तपासणी अहवाल**

(G) माहे जुन,,२०१० मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६१४ नोंद घेण्यात आली.**

---

**विषय नं.०४ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय स्वच्छताकामी आऊट सोर्सिंग पध्दतीने कामे करुन घेणेकरीता प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाची स्वच्छता उच्च दर्जाची, मशिनरीद्वारे व्हावी याकरीता स्वच्छतेचे काम आउट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेसाठी दि.२७/०१/२०१० मा.व्यवस्थापन समिती चे सभेत ठरलेप्रमाणे वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निवीदा मागविणेस मान्यता मिळालेली आहे.

यानुसार निवीदा मागविणेकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. दि.०९/०५/२०१० ते १५/०५/२०१० या विक्री कालावधीत खालीलप्रमाणे ०५ एजन्सींनी निवीदा खरेदी केलेल्या आहेत.

१. आय.एस.एस. फॅसिलिटी सर्व्हीस प्रा.लि. मुंबई
२. बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे
३. कल्पतरु हॉस्पिटॅलिटी ॲन्ड फॅसिलीटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस. प्रा. लि. मुंबई
४. प्रॉपर्टी सोल्युशन्स (इं) प्रा. लि. पुणे
५. संजय मेंटेनन्स सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे

निवीदाधारकांना निवीदा फॉर्ममध्ये काही अडचणी असल्यास व प्रत्यक्ष कामाची माहीती मिळावी म्हणून दि.१८/०५/२०१० रोजी प्री-बीड मिटींग घेण्यात आलेली असून निवीदाधारकांचे शंकेचे निरसन केलेले आहे. निविदाधारकांनी प्रत्यक्ष काय काम करावयाचे आहे याची माहिती दिली तसेच प्रत्यक्ष श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे ठिकाणी जावुन पहाणी करुन चर्चेतील आठ मुद्दे विचारात घेवुन निविदा भरण्यास सांगितले त्यानुसार दि.२४/०५/२०१० या विहीत मुदतीपर्यंत उपरोक्त १ ते ५ एजन्सींपैकी खालील ४ एजन्सींनी निविदा सादर केलेल्या आहेत. (प्राईज बीड व टेक्निकल बीड)

१. बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे
२. कल्पतरु हॉस्पिटॅलिटी ॲन्ड फॅसिलीटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस. प्रा. लि. मुंबई
३. प्रॉपर्टी सोल्युशन्स (इं) प्रा. लि. पुणे
४. संजय मेंटेनन्स सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे

दिनांक ०५/०६/२०१० रोजी वरील ०१ ते ०४ निविदातील टेक्नीकल बीड उघडण्यात आलेल्या आहेत. निविदेमध्ये नमूद केलेली पात्रता व निविदा सादरकर्त्यांनी कळविलेली पात्रता (टेक्नीकल बीड) याचा अभ्यास करुन तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं | निविदासादरकर्त्यांचे नांव | निविदेतील दर रुपये (दरमहा रुपये ) | चर्चेअंती देऊ केलेले दर (दरमहा रुपये) |
|---|---|---|---|
| ०१ | बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे | १५,६८,३४०/- | ९,२५,०००/- |
| ०२ | कल्पतरु हॉस्पिटॅलिटी ॲन्ड फॅसिलीटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस. प्रा. लि. मुंबई | ८,३३,०००/- + पेस्टकंट्रोल चार्जेस दरमहा रु.७०००/- व रुग्णासंबंधी स्वच्छता चार्जेस दरमहा रु.४०,०००/- सर्व करांसह एकूण रुपये ८,८०,०००/- | ७,८७,६००/- |
| ०३ | प्रॉपर्टी सोल्युशन्स (इं) प्रा. लि. पुणे | ९,०४,३५९/- | ८,१३,९२४/-+S.T.Extra |
| ०४ | संजय मेंटेनन्स सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे | ९,१३,०००/- सेवा कर वेगळा | ६,००,०००/-सर्व करांसहीत |

**निर्णय क्र.६१५ यावर सविस्तर चर्चा होऊन, संजय मेंटेनन्स सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे यांची निम्नतम दराची निविदा रु.६,००,०००/- मात्र सर्व करांसह स्विकारणेत येऊन त्यांना एक वर्षाकरीता कार्यादेश देण्यात यावा. तसेच त्यांचेकडून विहीत पध्दतीने करारनामा करुन घेण्यात यावा. त्यांचेकडून सुरक्षा रक्कम म्हणून दोन महिन्याची देय रक्कम रुपये १२,००,०००/- संस्थान जमा ठेवण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०५ साईभक्तांसाठी घेतलेल्या सामुहिक अपघाती विमा पॉलीसीचे नुतनीकरणाबाबत आलेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** देशांतर्गत अतिरेकी कारवाया वाढल्याने सर्वच जनतेच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली आहे. देशातील सर्व प्रमुख प्रसिध्द धार्मिक देवस्थानांना अतिरेक्यांनी लक्ष्य बनविलेलेचे पार्श्वभुमीवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६ सप्टेंबर, २००६ रोजीचे सभेत, साईमंदिरास भेट देणा-या साई भक्ताची सुरक्षितता व भविष्यात दुर्दैवाने अशी घटना घडल्यास मुत्यूमुखी पडणा-या साईभक्तांच्या वारसास व जखमींना संस्थानमार्फत काही आर्थिक मदत व्हावी या उद्देशाने राष्ट्रीयीकृत विमा कंपन्याकडून माहिती मागविण्यात यावी, असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला होता.

उपरोक्तप्रमाणे साईभक्तांचे संरक्षणासाठी जास्तीत जास्त जोखीम स्विकारणा-या व द्यावी लागणारी आर्थिक मदतीसाठी दिनांक ०९ ऑगस्ट, २००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रमांक ६९० नुसार युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कंपनी लि.शाखा शिर्डी यांचे

प्रतिनीधींने सभेपुढे सादर केलेला प्रस्तावानूसार, कोणत्याही वयाचे स्त्री-पुरुष भक्तास एखादया दुर्घटनेत अपघाती वा घातपाती मुत्यू, कायम स्वरुपी अपंगत्व तसेच अपघात झाल्यामुळे होणारा दवाखाना खर्च आदीसाठी एका वर्षासाठी जास्तीत जास्त २५ साईभक्तांसाठी प्रत्येकी किमान रक्कम रुपये ०५ लक्ष मात्र नुकसान भरपाई मिळू शकेल अशी विमा पॉलिसी घेणेबाबत ठरविण्यात आले. सदरचे पॉलिसीसाठी रक्कम रुपये ११,११,०००/- मात्र एवढा प्रिमियम आदा करण्यात आलेला आहे. सदर पॉलिसीची मुदत दिनांक ११ ऑगस्ट, २०१० रोजी संपत आहे. सदरहु कालावधीत संस्थानचे निर्धारीत केलेल्या परिसरात एकही दुदैवी घटना घडलेली नाही.

तरी उपरोक्तप्रमाणे साईभक्तांचे संरक्षणासाठी दि. १२ ऑगस्ट, २०१० ते ११ ऑगस्ट, २०११ या एक वर्षाच्या कालावधीसाठी जास्तीत जास्त जोखीम स्विकारणा-या व द्यावी लागणारी आर्थिक मदतीसाठी खालील चारही राष्ट्रीयीकृत विमा कपंनीकडून विमा पॉलिसी घेणेसाठी त्यांचे प्रतिनिधिंना बंद पाकीटात निविदा घेउन मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चेसाठी उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

०१. युनायटेड इंडिया इंशुरन्स कंपनी, शाखा शिर्डी ०२. ओरीएंटल इंशुरन्स कंपनी, शाखा संगमनेर,
०३. दि यू इंडिया एश्योरन्स कंपनी,शाखा श्रीरामपूर, ०४. नॅशनल इंशुरेस कंपनी लि.,कोपरगांव

तरी दि. १२ ऑगस्ट, २०१० ते ११ ऑगस्ट, २०११ या एक वर्ष कालावधीसाठी घ्यावयाचा विमा पॉलीसासाठी चारही राष्ट्रीयीकृत विमा कपंनीकडून मागविण्यात आलेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर रुपये |
|---|---|---|
| ०१. | युनायटेड इंडिया इंशुरन्स कंपनी, शाखा शिर्डी | ११,११,१११/- |
| ०२. | ओरीएंटल इंशुरन्स कंपनी, शाखा संगमनेर, | ११,५१,९८९/- |
| ०३. | दि यू इंडिया एश्योरन्स कंपनी,शाखा श्रीरामपूर, | ११,६५,०००/- |
| ०४. | नॅशनल इंशुरेस कंपनी लि.,कोपरगांव | ११,९०,०००/- |

**निर्णय क्र.६१६ यावर सविस्तर चर्चा होऊन, युनायटेड इंडिया इंशुरन्स कंपनी, शाखा शिर्डी यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.०६ श्रीसाईनाथ रुग्णालयाच्या जिन्यातील ग्रील तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाच्या जिन्यातील ग्रील तयार करुन बसविणेकामी व येणा-या रक्कम रुपये १,३४,६६३/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव दि. २२-०५-२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्य करण्यात आला आहे. या कामासाठी येणा-या खर्चास व याकामी कोटेशन्स मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस / विद्युत / ७७४७ / २०१० दिनांक ११-०६-२०१० अन्वये कोटेशन्स मागविण्यात आली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन्स प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव |
| ०२ | मे.ऋषिकेश फॅब्रिकेशन, मु.पो.साकुरी, ता.राहाता |
| ०३ | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, मु.पो.साकुरी, राहाता. |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाच्या जिन्यातील ग्रील तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेली कोटेशन आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशनसादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | कोटेशनमधील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | १,३२,२८८/- | अनुपस्थित |
| ०२ | मे.ऋषिकेश फॅब्रिकेशन, साकुरी, ता.राहाता | १,४३,२१२/- | अनुपस्थित |
| ०३ | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर,साकुरी, राहाता. | १,३६,६८८/- | १,२९,८५३.६० |

**निर्णय क्र.६१७ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर,साकुरी,राहाता यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०७ श्री साईनाथ रुग्णालयाकरीता कॉलेप्सीबल गेट तयार करुन घेणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाकरीता कॉलेप्सीबल गेट तयार करुन बसविणेकामी व येणा-या रक्कम रुपये ५२,१२१/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव दिनांक २२-०५-२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्य करण्यात आला आहे. या कामासाठी येणा-या खर्चास व याकामी कोटेशन्स

मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस/विद्युत/७७४८/२०१० दि. ११.०६.२०१० अन्वये कोटेशन्स मागविण्यात आली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन्स प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव |
| ०२ | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, मु.पो.साकुरी, राहाता |
| ०३ | मे.ऋषिकेश फॅब्रिकेशन, मु.पो.साकुरी, ता.राहाता |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाकरीता कॉलेप्सीबल गेट तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेली कोटेशन आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशनसादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | कोटेशनमधील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | ४८,६५३/- | ४६,२२०/- |
| ०२ | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर,.साकुरी, राहाता | ५५,९३५/- | ५३,१३८/- |
| ०३ | मे.ऋषिकेश फॅब्रिकेशन,साकुरी, ता.राहाता | ५७,२०६/- | अनुपस्थित |

**निर्णय क्र.६१८ यावर सविस्तर चर्चा होऊन,मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०८ श्री साईनाथ रुग्णालय बील भरणा, गोळ्या औषध वाटप, ओ.पी.डी केसपेपर येथे स्टेनलेस स्टिल रेलींग तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालय बील भरणा, गोळया औषध वाटप, ओ.पी.डी.केसपेपर येथे स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेकामी व येणा-या रक्कम रुपये ४,८८,९३६/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव दिनांक २२-०५-२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय क्र.३७ निर्णय क्र.४८२ अन्वये मान्य करण्यात आला आहे. या कामासाठी येणा-या खर्चास व याकामी कोटेशन्स मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस / विद्युत / ८०८० / २०१० दिनांक ३०-०६-२०१० अन्वये कोटेशन्स मागविण्यात आली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे ०४ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.रवि ट्रेडींग कंपनी, पुणे. |
| ०२ | मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक |
| ०३ | मे.आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक |
| ०४ | मे.शुभम स्टील रेलींग्ज ॲण्ड फर्निचर, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालय बील भरणा, गोळया औषध वाटप, ओ.पी.डी.केसपेपर येथे स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेली कोटेशन आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशनसादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | कोटेशनमधील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.रवि ट्रेडींग कंपनी, पुणे. | ५,२७,८५०/- | ५,००,०००/- |
| ०२ | मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक | ५,३४,२६२/- | ५,०७,५४९/- |
| ०३ | मे.आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | ५,११,३१३/- | अनुपस्थित |
| ०४ | मे.शुभम स्टील रेलींग्ज ॲण्ड फर्निचर, नाशिक | ४,८०,०००/- | ४,७५,०००/- |

**निर्णय क्र.६१९ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.शुभम स्टील रेलींग्ज ॲण्ड फर्निचर, नाशिक यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०९ श्री साई दैनंदिनी व श्री साईबाबा दिनदर्शिका ०१ पानी -लहान व मोठ्या आकारात छपाई कामाच्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६.०३.२०१० चे सभेतील निर्णय २७६ (४७) नुसार श्री साई दैनंदिनी ३ लाख प्रती व श्री साई दिनदर्शिका ५ लाख प्रती छपाई करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यास अनुसरुन श्री साई दैनंदिनी व श्री साईबाबा दिनदर्शिका १ पानी - लहान व मोठ्या आकारात छपाई करुन विक्रीसाठी छपाई करुन उपलब्ध देणेकामी २५ निवडक प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/ वशी/ ८०२१ दि.२६.०६.२०१० अन्वये दरपत्रकाचे विहीत फार्म पाठविण्यात येऊन ती दि.१०.०७.२०१० अखेर जमा करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार खालील १८ प्रेसधारकांची दरपत्रके प्राप्त झाली आहेत.

| अ.नं. | निवडक प्रेसधारक यादी | अ.नं. | निवडक प्रेसधारक यादी |
|---|---|---|---|
| ०१ | मे.ऑस्कर ऑफसेट प्रायव्हेट लि.,मुंबई | १० | मे.लाव्हीश प्रिंटर्स,मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | मे.साई सिक्यूरिटी प्रिंटर्स लि, बंग्लोर | ११ | मे.कल्याणी कार्पोरेशन,पुणे |
| ०३ | मे.सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि.,मुंबई | १२ | मे.मेग्ना ग्राफिक्स ( इंडिया) लि.,मुंबई |
| ०४ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर | १३ | मे. टॅको व्हीजन्स् प्रा.लि.,मुंबई |
| ०५ | मे.प्रेमिअर प्रेस,सिंकदराबाद | १४ | मे. निट प्रिंटर्स,अहमदनगर |
| ०६ | मे.न्यू राधारमण प्रिटींग प्रेस,मुंबई. | १५ | मे. सकाळ पेपर्स लि.,कोल्हापूर |
| ०७ | चॅमेलॉन इंक.,मुंबई | १६ | मे.ओरिएंट प्रेस लि.,मुंबई |
| ०८ | मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि.,मुंबई | १७ | मे. कमर्शियल बुक बायडिंग वर्क्स,मुंबई |
| ०९ | मे. अजय ऑफसेट प्रा.लि,पुणे | १८ | शिवम ऑफसेट प्रा.लि., कोल्हापूर |

उपरोक्त १८ प्राप्त प्रेसधारकांचे पाकिट क्र. १ " तांत्रिक निविदा " ( Technical Bid) व पाकिट क्र.२ "दरपत्रक" (Commercial Bid) आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशनसादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अ.नं.** | **निवडक प्रेसधारकाचे नाव** | **श्रीसाई दैनंदिनी-२०११** | **श्रीसाई दिनदर्शिका-२०११ एक पानी लहान** | **श्रीसाई दिनदर्शिका-२०११ एक पानी मोठी** |
|---|---|---|---|---|
| | **छपाई संख्या-** | **३ लाख** | **२.५० लाख** | **२.५० लाख** |
| **०१** | **मे.ऑस्कर ऑफसेट प्रायव्हेट लि.,मुंबई** | | | |
| | निविदेतील दर रुपये | --- | १२.३९ | १५.५१ |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | --- | अनुपस्थिती | अनुपस्थित |
| **०२** | **मे.साई सिक्यूरिटी प्रिंटर्स लि, बंग्लोर** | | | |
| | निविदेतील दर रुपये | --- | **४.००** | **९.००** |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | --- | अनुपस्थित | अनुपस्थित |
| **०३** | **मे.सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि.,मुंबई** | | | |
| | निविदेतील दर रुपये | --- | १३.१६ | २१.०४ |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | --- | १२.२७ | २०.४५ |
| **०४** | **मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर** | | | |
| | निविदेतील दर रुपये | ५६.९७ | ९.३६ | १६.७४ |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | ५१.५० | ९.३६ | १६.७४ |
| **०५** | **मे.प्रेमिअर प्रेस,सिंकदराबाद** | | | |
| | निविदेतील दर रुपये | ५३.७५ | ११.०० | १४.७५ |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | ५३.०० | ११.०० | १४.७५ |
| **०६** | **मे.न्यू राधारमण प्रिटींग प्रेस,मुंबई.** | | | |
| | निविदेतील दर रुपये | ८८.२० | ११.५५ | १८.०६ |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | ५८.०० | १०.२५ | १६.०० |
| **०७** | **चॅमेलॉन इंक.,मुंबई** | | | |
| | निविदेतील दर रुपये | ८५.०० | १५.०० | २४.०० |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | ८३.०० | १४.२५ | २३.०० |
| **०८** | **मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि.,मुंबई** | | | |
| | निविदेतील दर रुपये | ५७.७५ | ११.२० | १७.०० |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | ५४.८६ | ११.२० | १७.०० |
| **०९** | **मे. अजय ऑफसेट प्रा.लि,पुणे** | | | |
| | निविदेतील दर रुपये | ७२.०० | ८.९३ | १५.०९ |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | ७२.०० | ८.९० | १५.०५ |
| **१०** | **मे.लाव्हीश प्रिंटर्स,मुंबई** | | | |
| | निविदेतील दर रुपये | १०८.६७ | १४.२२ | २३.२८ |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | ९७.८० | १३.५१ | २०.९५ |
| **११** | **मे.कल्याणी कार्पोरेशन,पुणे** | | | |
| | निविदेतील दर रुपये | ५२.७५ | १४.२० | २१.५९ |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | ५१.५० | १४.२० | २१.५९ |
| **१२** | **मे.मेग्ना ग्राफिक्स ( इंडिया) लि.,मुंबई** | | | |
| | निविदेतील दर रुपये | ५६.०० | ९.५० | १६.३५ |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | ५५.६० | ९.५० | १६.३५ |
| **१३** | **मे. टॅको व्हीजन्स् प्रा.लि.,मुंबई** | | | |
| | निविदेतील दर रुपये | ५५.०० | १०.५० | १७.०० |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | **५१.००** | ८.०० | १५.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **१४** | **मे. निट प्रिंटर्स,अहमदनगर** | | | |
| | निविदेतील दर रुपये | ५६.६० | ११.४२ | १७.९० |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | ५२.०० | १०.८५ | १७.०० |
| **१५** | **मे. सकाळ पेपर्स लि.,कोल्हापूर** | | | |
| | निविदेतील दर रुपये | ५३.३९ | १७.४८ | २६.८८ |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | **५१.००** | १२.७५ | १९.२६ |
| **१६** | **मे.ओरिएंट प्रेस लि.,मुंबई** | | | |
| | निविदेतील दर रुपये | ६०.०० | ९.५० | १६.७० |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | ५३.०० | ९.०० | १५.८६ |
| **१७** | **मे. कमर्शियल बुक बायडिंग वर्क्स,मुंबई** | | | |
| | निविदेतील दर रुपये | ६०.४० | --- | --- |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | ५७.०० | --- | --- |
| **१८** | **शिवम ऑफसेट प्रा.लि., कोल्हापूर** | | | |
| | निविदेतील दर रुपये | ५४.९० | ५.९० | ११.९० |
| | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | ५२.१५ | ५.६० | ११.३० |

**निर्णय क्र.६२० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा दैनंदिनी- २०११ छपाई कामी मे.सकाळ पेपर्स लि., कोल्हापूर व मे. टॅको व्हीजन्स् प्रा.लि.,मुंबई यांचे निम्नतम दर प्रति नग रु.५१/- स्विकारणेत येऊन, त्यांना प्रत्येकी १ लाख श्रीसाईबाबा दैनंदिनी-२०११ छपाईकामी आदेश देण्यात यावा. तसेच, उर्वरित १ लाख दैनंदिनी आवश्यकतेनुसार छपाई करणेत यावी व दैनंदिनीची विक्री किंमत रु.५५/- मात्र ठेवण्यात यावी.**

**तसेच श्रीसाईबाबा दिनदर्शिका-२०११ एक पानी लहान व एक पानी मोठे छपाईकामी मे.साई सिक्यूरिटी प्रिंटर्स लि, बंग्लोर यांचे निम्नतम दर अनुक्रमे एक पानी लहान दिनदर्शिकेसाठी प्रति नग रु.४/- व एक पानी मोठे दिनदर्शिकासाठी प्रति नग रु.९/- मात्र स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा व एक पानी लहान दिनदर्शिकेची विक्री किंमत रु.५/- आणि एक पानी मोठे दिनदर्शिकेची विक्री किंमत रु.१०/- मात्र ठेवण्यात यावी. असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने)

---

**विषय न १० श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागासाठी आर्थोपेडील इन्स्ट्रूमेंट व शॅडोलेस लॅम्प खरेदीकामी प्राप्त तांत्रिक बाबींच्या (Technical Bid) निविदा उघडणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात सन २००६ साली ऑर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभाग कार्यान्वीत करण्यात आलेला आहे. त्या वेळेस सदर विभागात शस्त्रक्रियांसाठी लागणारे वेगवेगळया कंपनीचे इन्स्ट्रुमेंट खरेदी करण्यात आलेली होते, तीच इन्स्ट्रुमेंट सध्या वापरात आहेत. परंतु रुग्णांच्या सततच्या वाढणाऱ्या संख्येमुळे सध्या असलेली काही इन्स्ट्रुमेंट ही वापरुन खराब झालेली आहे, तर काही विशिष्ट प्रकारच्या शस्त्रक्रियासाठी विशिष्ट इन्स्ट्रुमेंटची आवश्यकता आहे. त्यामुळे ऑर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाने दि. ०८/१२/२००९ चे पत्रान्वये त्यांना लागणाऱ्या इन्स्ट्रुमेंटची तातडीने मागणी केलेली आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १८/०४/२०१० रोजीचे सभेत श्री साईबाबा रुग्णालयातील ऑर्थोपेडीक थिएटर हया विभागासाठी लागणारे इन्स्ट्रुमेंट खरेदी कामी येणाऱ्या अंदाजे रु. १६,३९,२११/- चे खर्चास व सदरचे खरेदीकामी विहीत पद्धतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागविण्यास मान्यता मिळालेली आहे.

सदरच्या खरेदीची रक्कम जास्त असल्याने जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात इंडियन एक्सप्रेस - मुंबई, सकाळ - पुणे, लोकमत - नागपूर या इंग्रजी वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली होती, तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा टाकण्यात आली होती.

निविदा विक्रीची मुदत दि. १०/०५/२०१० ते २२/०५/२०१० पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकरण्याची अंतिम मुदत दि. २५/०५/२०१० अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण २६ उत्पादक कंपन्या / पुरवठा धारक यांना इकडील पत्र क्र. ७००५ दि. ०६/०५/२०१० अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन मुंबई कार्यालयात १० निविदा तर शिर्डी येथील कार्यालयात ०७ निविदा अशा एकूण १७ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr. No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Aarya Enterprises, Pune | 24.05.2010 |
| 2 | M/s. Ashish & Company, Delhi.<br>(2 Sealed Envolope) | 24.05.2010 Technical Bid & 26.05.2010 Commercial Bid |
| 3 | M/s. Biomed Healthtech Pvt. Ltd., Mumbai | 24.05.2010 |
| 4 | M/s. Biomedicon Systems (I) Pvt. Ltd., Mumbai | 25.05.2010 |

| | | |
|---|---|---|
| 5 | M/s. Dalvi & Sons, Mumbai (2 Sealed Envolope) | 24.05.2010 |
| 6 | M/s. Eagle Medical Systems Pvt. Ltd., New Delhi | 26.05.2010 |
| 7 | M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai | 24.05.2010 |
| 8 | M/s. Everest Medical Technologies Pvt. Ltd., Mumbai | 25.05.2010 |
| 9 | M/s. Inor Medical Products Ltd., Mumbai | 25.05.2010 |
| 10 | M/s. Kalelker Surgicals Pvt. Ltd., Mumbai | 25.05.2010 |
| 11 | M/s. Maruti Surgical, Mumbai | 24.05.2010 |
| 12 | M/s. Medical Development & Engg., Pune | 25.05.2010 |
| 13 | M/s. Qualisurge Surgicals Pvt. Ltd., Pune | 25.05.2010 |
| 14 | M/s. S.H. Pitkar Orthotools Pvt. Ltd., Pune | 24.05.2010 |
| 15 | M/s. Sairam Biomedics, Mumbai | 25.05.2010 |
| 16 | M/s. Spectravision Meditech, Pune | 25.05.2010 |
| 17 | M/s. Zenith Surgical Company, Mumbai | 25.05.2010 |

वरीलपैकी अ.नं. ०६ यांची निविदा रजिस्टर पोस्टाव्दारे दि. २६/०५/२०१० रोजी प्रशासन शाखेकडून प्राप्त झालेली असून ती देखील विचारात घ्यावी असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या १७ तांत्रिक बाबींच्या सिलबंद निविदा समक्ष उघडण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६२१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या १७ तांत्रिक बाबींच्या सिलबंद निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलानात्मक तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.११ गुंतवणूकीबाबत निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** माहे ऑगस्ट,२०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | ०४/०८/२०१० | १,७०,००,०००.०० |
| ०२ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | ०५/०८/२०१० | ६५,००,०००.०० |
| ०३ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | ०५/०८/२०१० | ६२,००,०००.०० |
| ०४ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | ०५/०८/२०१० | १,३२,००,०००.०० |
| ०५ | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ०७/०८/२०१० | ५,७४,८१,९६६.०० |
| ०६ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | १०/०८/२०१० | १,४२,२५,०००.०० |
| ०७ | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १५/०८/२०१० | ५,७४,८१,९६६.०० |
| ०८ | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १९/०८/२०१० | १७,२४,४५,९००.०० |
| ०९ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | २१/०८/२०१० | ३,००,००,०००.०० |
| १० | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २३/०८/२०१० | ३,४४,८९,१८०.०० |
| ११ | दैनंदिन खर्च वजा जाता माहे ऑगस्ट २०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | ५,००,००,०००.०० |
| | **एकूण रक्कम -** | | **४५,९०,२४,०१२.००** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. ४५.९० कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
२) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
३) आंध्र बँक, शिर्डी
४) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
५) बँक ऑफ बरोडा, कोपरगांव
६) बँक ऑफ बरोडा, नासिक
७) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
८) विजया बँक, शिर्डी
९) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
११) कॅनरा बँक, शिर्डी

तरी वरील अ.नं. १ ते ११ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.४५.९० कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत मान्यता मिळावी.

**निर्णय क्र.६२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.नं. ०१ ते ११ या बँकांकडून जसजशी गुंतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे वरीलप्रमाणे अ.नं.०१ ते ११ बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.४५.९० कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यात यावी, पूर्वीची परकीय चलनातील गुंतवणुकीची रक्कम परकीय चलन बचत खात्यात वर्ग करावी, तसेच आंध्र बँक, शिर्डी येथील संस्थानच्या नित्य अन्नदान योजना या बचत खात्यातील साठलेली रक्कम प्रचलित दराने आंध्र बँकेकडेच गुंतविण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१२.** **सोने-चांदी कस लावून तपासणे कामी सराफाची (Gold Valuer) नेमणूक मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** संस्थानला दक्षिणापेटीव्दारे मिळणाऱ्या व लेखाशाखेत वेळोवेळी देणगी येणां-या सोने-चांदी वस्तु अलंकाराचा कस लावून तपासणी करणे, बाजारभावा प्रमाणे किमंत लावणे याकामी, सराफ (Gold Valuer) म्हणून श्री. कमलाकर हरीभाऊ खरोटे, मनमाड ( शासनमान्यता प्राप्त मुल्यांकनकार ) तसेच श्री. रघुनाथ माधव नागरे, शिरडी यांची मानद तत्वावर नेमणूकीस मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीच्या दि. १५ नोव्हेंबर, २००८ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय क्र. ८३९ अन्वये श्री. रघुनाथ माधव नागरे, यांची मानद तत्वावर दरमहा रू. २,५००/- (दोन हजार पाचशे मात्र) मानधनावर दि. ०१ जानेवारी, २००९ ते ३१ डिसेंबर, २०१० या कालावधीसाठी नेमणूकीस मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तथापि, श्री. रघुनाथ नागरे यांचेकडील दि. ०३.०२.२०१० रोजीचे अर्जान्वये त्यांनी अशी विनंती केलेली होती की, वृध्दपकाळामुळे मला सदरचे काम करणे अवघड जाते. माझा नातु चि. गणेश दत्तात्रय नागरे यांचे देखील सुवर्णकला प्रशिक्षण केंद्र, अहमदनगर येथे सोनार कामाचे प्रशिक्षण झालेले आहे. त्यास या कामाची चांगली माहीती असून अनुभवही आहे. तरी त्यास येथुन पुढे संस्थानचे दक्षिणापेटीतील सोने-चांदी व दैनदिन सोने-चांदी व इतर मौल्यवान वस्तुंचे मुल्यांकनाचे काम करणेची संधी द्यावी. यासंदर्भात श्री. रघुनाथ नागरे यांचे नातु श्री गणेश दत्तात्रय नागरे यांनीही दि. ०३.०२.२०१० रोजीच्या विनंती अर्जावरून मला संस्थानला दक्षिणापेटीव्दारे मिळणाऱ्या व लेखाशाखेत वेळोवेळी देणगी येणाऱ्या सोने-चांदी वस्तु अलंकाराची कस लावून तपासणी करणे, इ. मौल्यवान वस्तुंचे मुल्यांकनाचे काम करण्याची संधी द्यावी अशी विनंती केलेली होती.

श्री. रघूनाथ माधव नागरे यांची विनंती व श्री गणेश नागरे यांचे अर्जास अनुसरुन, मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ मार्च, २०१० चे सभेतील निर्णय क्रमांक २७६ अन्वये श्री. गणेश द. नागरे यांना दिनांक ०१ मे, २०१० पासून तीन महीने कालावधीसाठी दरमहा रुपये २,५००/- ( रुपये दोन हजार पाचशे ) मात्र मानधनावर नेमणुक करण्यात आलेली आहे. श्री. गणेश नागरे यांना सोने-चांदी मुल्यांकनासाठी आवश्यक असणारा शासन परवाना ३ महीन्यात संस्थानला सादर करणे बाबत आदेश करण्यात आला आहे. परंतु श्री गणेश नागरे यांनी सोने-चांदी मुल्यांकनासाठी आवश्यक असणारा शासन परवाना अद्याप सादर केलेला नाही. त्यांचे नेमणुकीची मुदत दिनांक ३१ जुलै, २०१० पर्यत आहे. श्री गणेश नागरे यांनी श्री संत नरहरी महाराज सुवर्णकार शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळ, अहमदनगर यांचे सुवर्णकला प्रशिक्षण प्रमाणपत्र सादर केले आहे. संस्थानला दक्षिणापेटीव्दारे प्राप्त होणां-या सोनेचांदी वस्तुंच्या संख्येत तसेच लेखाशाखेत देणगीरुपाने दैनंदिन प्राप्त होणा-या सोने-चांदीच्या वस्तुंमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. समाधि मंदिर व परिसरातील दक्षिणापेटी मोजणीकामी श्री. गणेश नागरे स्वत: नियमित उपस्थित असतात. लेखाशाखेकडे आलेल्या सोने-चांदी वस्तुंचे मुल्यांकन श्री गणेश नागरे यांच्याकडून करुन घेण्यात येते. दुसरे मुल्यांकनकार श्री. खरोटे हे मनमाड येथे कायम वास्तव्यास असल्याने दररोज उपलब्ध नसतात. तसेच श्री रघुनाथ नागरे वयोमानानुसार काम करु शकत नाहीत. सबब, संस्थान कामाची निकड लक्षात घेता श्री. गणेश नागरे यांना आहे त्या मानधनावर दिनांक ०१ ऑगष्ट,२०१० पासुन पुढील दोन वर्षासाठी तूर्त मुदतवाढ द्यावी असे मत आहे.

**ब)** दिनांक १६ सप्टेंबर,२००६ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रमांक ६८४ अन्वये श्री. कमलाकर खरोटे, मनमाड (शासन मान्यता प्राप्त मुल्यांकनकार) यांना दिनांक ०१ ऑक्टोबर, २००६ पासून दोन वर्ष कालावधीसाठी दरमहा रुपये २,५००/- ( रुपये दोन हजार पाचशे ) मात्र मानधनावर नेमणुक करण्यात आलेली आहे. त्यानंतर त्यांना दोन वर्षे मुदतवाढ देण्यात आलेली असून त्यांचे नेमणुकीची मुदत दिनांक ३० सप्टेबर, २०१० पर्यत आहे. संस्थानला दक्षिणापेटीव्दारे प्राप्त होणां-या सोनेचांदी वस्तुंच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. संस्थान कामाची निकड लक्षात घेता श्री. खरोटे

यांची आहे त्या मानधनावर दिनांक ०१ ऑक्टोबर,२०१० ते ३० सप्टेबर,२०१२ या दोन वर्षासाठी पुन्हा नेमणुकीस मुदतवाढ देण्यात यावी, असे नम्र मत आहे.

**निर्णय क्र.६२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, "अ"मध्ये प्रस्तावित केलेप्रमाणे संस्थान कामाची निकड लक्षात घेता श्री. गणेश नागरे यांना आहे त्याच मानधनावर दिनांक ०१ ऑगष्ट,२०१० पासुन पुढील दोन वर्षासाठी व "ब" मध्ये प्रस्तावित केलेप्रमाणे श्री. खरोटे यांची आहे त्याच मानधनावर दिनांक ०१ ऑक्टोबर,२०१० ते ३० सप्टेबर,२०१२ या दोन वर्षासाठी पुन्हा नेमणुकीस मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी )

---

**विषय नं.१३ मयत कु.धनश्री देहडराय यांचे बाबत**

**प्रस्ताव-** श्री प्रशांत प्रकाश कुलकर्णी, पत्रकार, शहा, सिन्नर (कु. धनश्री हिचे मामा) यांचे दि. १५.०३.२०१० रोजीच्या पत्रान्वये कु. धनश्री सुनिल देहाडराय हिचा उपचारा दरम्यान मृत्यु झाला, याबाबत संस्थानकडून मयताच्या कुटूंबास आर्थिक मदत मिळावी अशी संदर्भीय पत्रान्वये विनंती केली आहे.

कु. धनश्री सुनिल देहाडराय वय - २ वर्षे या रुग्णाची संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये दि. १८.०८.२००६ ते दि. २०.०८.२००६ आयोजित नेत्र शिबीरामध्ये नाव नोंदणीनुसार दि. १९.०९.२००६ रोजी बॉम्बे हॉस्पिटलचे नेत्ररोग तज्ञ डॉ. कपूर आर. के. यांनी भुलतज्ञ डॉ. रेठे यांचे सहाय्याने नेत्र शस्त्रक्रिया पार पाडली. तद्नंतर तिची तब्बेत नाजुक झालेने तिला अतिदक्षता विभागात दि. २१.०९.२००६ पर्यंत ठेवण्यात आले, तरीही तिच्या प्रकृतीत सुधारणा न झाल्याने तिला नाशिक येथील संजीवनी रुग्णालयात दि. २१.०९.२००६ रोजी दाखल केले, मात्र सदर रुग्णाचा उपचारा दरम्यानच दि. २३.०९.२००६ रोजी मृत्यु झाला.

यापुर्वी श्री प्रशांत प्रकाश कुलकर्णी (कु. धनश्री हिचे मामा) यांनी वेळोवेळी पत्राद्वारे मयताचे कुटूंबास आर्थिक मदत मिळणेबाबत इकडील कार्यालयास विनंती अर्ज सादर केले होते. याबाबत हॉस्पिटल प्रशासनातर्फे चौकशी करुन अहवाल सादर करण्यात आला होता. सदर अहवालावर मा. व्यवस्थापन समितीचे दि. २८.०७.२००७ चे सभेत सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. ५१४/२० नुसार मा. ना. श्री विखे साो. यांनी संबंधीताशी चर्चा करुन नुकसान भरपाई बाबत निर्णय घ्यावा असे ठरले होते. श्री कुलकर्णी यांनी या संदर्भात वेळोवेळी दुरध्वनी करुन विविध मान्यवरांना वारंवार भेटून या मागणीबाबत तगादा लावला असूनही प्रशासनाला अद्याप त्याचे नेमके उत्तर शक्य झाले नसल्याने सदरचा विषय दि. २४.०५.२००८ च्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे फेर सादर करणेत आला होता, सदरहु विषय तुर्त स्थगित करण्यात यावा असे निर्णय क्र. ५३० नुसार ठरले.

तसेच दि. १८.०४.२०१० रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सदरचा विषय ठेवणेत आला होता, यावर सविस्तर चर्चा होऊन, संबंधितांना व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलावुन अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले. त्यानुसार दि. १५.०५.२०१० रोजीच्या जा.क्र. एसएसएस/एसएसबीएच/३७/२०१० रोजीच्या पत्रान्वये श्री प्रशांत प्रकाश कुलकर्णी, पत्रकार, सिन्नर यांना कळविणेत आले होते.

तरी संबंधितास मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलविले असुन सदर विषयावर निर्णय होणेकामी सविनय सादर.

**निर्णय क्र.६२४ सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१४ अपोलो फर्मासीमधून महाग जीवनावश्यक औषधे सवलतीच्या दरात विक्री करणेस अपोलो फार्मसीला परवानगी देणे बाबत**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयान्वये अपोलो फार्मसीच्या माध्यमातुन दि.०९/०५/२०१० रोजी पासून श्री साईबाबा हॉस्पिटलच्या आवारात औषधी दुकान सुरु झाले आहे. सदर दुकान २४ तास सुरु राहत असलेने तसेच ते रुग्णालयाच्या आवारातच असलेने अनेक रुग्णांना त्याचा लाभ होत आहे.

श्री साईबाबा रुग्णालयात सुपरस्पेशालिटी सेवा उपलब्ध असलेने या ठिकाणी मेडीसीन, सर्जरी, कार्डियाक व न्युरो विभागांतील गंभीर रुग्ण तसेच गंभीर अपघातग्रस्त रुग्ण प्रामुख्याने भरती असतात. यात गरीब प्रवर्गातील दारिद्रयरेषेखालील व दुर्बल घटकांतील रुग्णांचा मोठया प्रमाणावर भरणा असतो. अतिदक्षता विभागातील गंभीर रुग्णांना दररोज हजारो रुपयांची औषधी बाहेरुन आणावी लागतात. यात अनेक महाग जीवनावश्यक औषधांचा समावेश असतो. उपरोक्त प्रवर्गातील रुग्णांना नियमानुसार अल्प अनामत रकमेमध्ये भरती केले जाते. अशा रुग्णांना बाहेरील औषधांचा हा खर्च पेलवणे अवघड जाते.

अपोलो फार्मसीमध्ये सध्या जवळजवळ २४०० प्रकारचे विविध औषधे उपलब्ध आहेत. यामध्ये अनेक महागडया जीवनावश्यक औषधांचा समावेश आहे. यामधील काही औषधांची खरेदी किंमत व विक्री किंमत यामध्ये मोठी तफावत असून ३० % पासून ते ८० % पर्यंत काही कंपन्या

किरकोळ विक्रेत्यास मार्जीन (नफा) ठेवतात. अपोलो फार्मसीमधून नियमाप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीमध्ये झालेल्या ठरावानुसार किरकोळ कमाल किमतीतच (MRP) औषधे विकली जातात.
अपोलो फार्मसीबरोबर झालेल्या करारानुसार सदर फार्मसीचा देखभालीचा खर्च वगळता उर्वरीत नफा हा श्री साईबाबा संस्थानकडेच देणगीस्वरुपात वर्ग केला जातो.

जी औषधे जीवनावश्यक असून महाग आहेत, ज्यावर ३०% पासून ते ८०% पर्यंत नफा आहे, अशा औषधांवर बाहेरील औषध विक्रेतेही ग्राहकांना आकर्षित करणेसाठी काही प्रमाणात सवलत देतात, असे समजते (नमुन्यादाखल अशा एका कच्च्या औषधी बिलाची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे). MRP पेक्षा कमी किंमतीत विकल्यामुळे अशा औषधांचे हे दुकानदार कधीही पक्के बिल देत नाहीत. अपोलो फार्मसीला ग्राहकास पक्के बिल देणे हे बंधनकारक असलेने MRP पेक्षा कमी किंमतीत तांत्रिकदृष्टया ते औषधे विकु शकत नाहीत.

त्यामुळे सवलतीच्या दरात औषधे विकणे परवडत असूनही सवलतीपासून अनेक गरजु गरीब रुग्ण वंचित राहतात. वॉर्डमध्ये भरती असलेल्या अनेक गरीब रुग्णांच्या नातेवाईकांकडे वेळेवर पुरेसे पैसे नसतात, अशावेळी कधी कधी अशा रुग्णांना सवलतीत औषधे मिळावीत म्हणून वॉर्डमधील डॉक्टर, सिस्टर यांचेकडून कळत नकळत बाहेरुन औषधे खरेदीसाठी सल्ला दिला जातो. त्यामुळे त्यांच्या विषयी अपोलोचालकांचा गैरसमज होऊन तशा प्रकारच्या तक्रारीही हॉस्पिटल प्रशासनाकडे येत आहेत. तसेच काही रुग्ण सध्दा ही तफावत लक्षात आलेनंतर तक्रार करतात. समाजातील इतर व्यक्तींच्याही ही बाब लक्षात आल्याचे निदर्शनास येत आहे. उदाहरणादाखल श्री. संजय काळे, कोपरगाव यांचा याच मुद्दयाच्या अनुषंगाने " अपोलो फार्मसी ना नफा ना तोटा या तत्त्वावर काम करीत नाही " या विषयान्वये तक्रार अर्ज नुकताच प्राप्त झाला आहे.

तरी उपरोक्त सर्व बाबींचा सांगोपांग विचार करता काही जीवनावश्यक औषधांवर ग्राहकांना सवलत देणे हे न्याय्य होईल, असे वाटते.

सोबत अशा निवडक ३३ औषधांची यादी जोडलेली असून, परिशिष्ट ' अ ' मध्ये ज्या औषधांच्या किंमती जास्त असून खप जास्त आहे, तसेच जी औषधे सर्वसाधारणपणे समाजातील गरीब प्रवर्गातील लोकांना होणा-या दुर्धर आजारांवर वापरली जातात, अशा औषधांवर जास्तीची सवलत सुचविलेली आहे.

तसेच सोबत परिशिष्ट ' ब ' मध्ये सदर ३३ औषधांवर सरसकट २० % नफा ठेवुन उरलेला नफा हा सवलतीच्या रुपात रुग्णांना द्यावा, असे सुचविलेले आहे.
सदर प्रस्तावाबाबत अपोलो चालकांचा अभिप्राय सोबत जोडलेला आहे.

तरी उपरोक्तपैकी कोणत्या परिशिष्टाप्रमाणे सवलत दयावी, याबाबत सदर प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त औषधे मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांना दाखवून अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

---

**विषय नं.१५** **हेलिपॅडवर रुग्णवाहिका तैनात करणे व त्याचे दर निश्चितीबाबत**

**प्रस्ताव-** उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये संस्थानच्या वतीने मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थान मालकीच्या गट नं.१९५ मध्ये हेलिपॅड तयार करण्यात आलेला आहे. सदर हेलिपॅडचा वापर खाजगी संस्था/व्यक्ती/सार्वजनिक संस्था यांना उपलब्धतेनुसार सशुल्क करुन देण्यात येतो. सदरची परवानगी ही हेलिकॉप्टर लँडींगसाठी आवश्यक असणा-या सर्व शासकीय कार्यालयांच्या परवानगी घेणे व हेलिपॅडवर अग्निशामक, रुग्णवाहिका आदी व्यवस्था संबंधित एव्हिएशन कंपनीने करण्याच्या अटीवर देण्यात येते. परंतु दरम्यानच्या काळात मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी हेलिपॅडवर हेलिकॉप्टर उड्डाण / लॅडींग करतेवेळी अग्निशामक वाहन व रुग्णवाहिका ठेवणे क्रमप्राप्त असल्याचे कळविलेले आहे व त्या अनुषंगाने रुग्णवाहिका हेलिपॅडवर तैनात ठेवणेबाबतचा निर्णय झालेला असून रुग्णवाहिकेचे दर किती व कसे आकारावेत याची माहिती जनसंपर्क कार्यालयास देणेबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविलेले आहे.

सध्या राज्य व केंद्रशासनाचे मंत्री, महत्वाचे राजकीय नेते, पदाधिकारी यांना दरवेळी मागणीनुसार हेलिपॅडवर मोफत कर्डियाक अॅब्युलन्स पुरविली जाते. तसेच गंभीर अत्यावश्यक रुग्णांना सदर अॅम्बुलन्समधील जीवनरक्षक प्रणाली वापरुन रुग्णालयात घेऊन जाणे, व्ही.आय.पी तसेच मा. विश्वस्तांच्या विनंतीवरुन बाहेरील रुग्णालयातुन गंभीर रुग्ण दुसऱ्या रुग्णालयात घेऊन जाणे अथवा आपल्या रुग्णालयात उपचारासाठी घेऊन येणे यासाठी सध्या कार्डीयाक अॅम्बुलन्सचा वापर केला जातो. कार्डीयाक अॅम्बुलन्सच्या सज्जतेसाठी आतील वैद्यकीय उपकरणांबरोबरच, एक डॉक्टर, एक स्टाफ

नर्स व एक वॉर्ड बॉय यांची आवश्यकता असते. तसेच सर्व जीवनावश्यक औषधांचा साठा रुग्णवाहिकेमध्ये उपलब्ध ठेवावा लागतो.

उपरोक्त संदर्भिय पत्रात म्हटल्याप्रमाणे हेलिपॅडवर प्रत्येक लँडींग व उड्डाणावेळी रुग्णवाहिका सज्ज ठेवावयाची आहे. शिर्डी हे आंतरराष्ट्रीय किर्तीचे देवस्थान असलेने या ठिकाणी नेहमीच शासकीय, प्रशासकीय प्रमुख, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे मालक, अधिकारी, सिनेक्षेत्रातील कलाकार, संपुर्ण देशातील विधानसभा, लोकसभा, राज्यसभा यांचे सदस्य, कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री, केंद्रीय मंत्री, महामंडळचे अध्यक्ष, न्यायाधिश, सचिवालयातील अधिकारी, उद्योगपती, अनेक खाजगी संस्था, सार्वजनिक संस्थाचे अधिकारी, पदाधिकारी इत्यादी उच्चपदस्थ, विशिष्ट, अतिविशिष्ट व्यक्तींची नेहमीच वर्दळ असते.

हवाई कंपन्यांमधील तीव्र अंतर्गत स्पर्धेमुळे हवाई वाहतुकीचे दर दिवसेंदिवस घसरत आहेत व मध्यमवर्गीयांच्याही आवाक्यात येऊ लागले आहेत. सध्याही शिर्डीत येणाऱ्या हेलिकॉप्टरच्या फेऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. आर्थिक सुबत्ता व वेळेची कमतरता यामुळे तथाकथित विशिष्ट, अतिविशिष्ट व्यक्तींचे हेलिकॉप्टरने शिर्डीला येण्या-जाण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. काही कंपन्या लवकरच मुंबई-शिर्डी अशी हेलिकॉप्टरची शटल सेवा सुरु करणार असल्याच्याही बातम्या आहेत.

हेलिकॉप्टरच्या उड्डाण / लॅडींगच्या वेळा जरी आधी घोषित केल्या जातात तरी विविध तांत्रिक, मानवीय अथवा नैसर्गिक (खराब हवामान वगैरे) कारणांमुळे यामध्ये बऱ्याच वेळा बदल व विलंब होतो.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये आर.एम.ओ डॉक्टरांचा नेहमीच तुटवडा असतो. तसेच स्टाफ नर्सेस व वॉर्डबॉय यांची संख्याही अतिरिक्त नाही. श्री साईबाबा रुग्णालयातील रुग्णांची, त्यातही गंभीर रुग्ण तसेच मा. विश्वस्त व परिसरातील प्रतिष्ठीत व्यक्तींच्या संबंधातील रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यामुळे कार्डियाक ॲम्ब्युलन्सची मागणीही दिवसेंदिवस वाढतच आहे. प्रत्येक मागणीवेळी कार्डियाक ॲम्ब्युलंन्सवर डॉक्टर, स्टाफ नर्स, वॉर्डबॉय यांचे दैनंदिन कामकाजाचे वेळापत्रक सांभाळून व्यवस्था करणे तारेवरची कसरत ठरत आहे. कधीकधी ग्राहय कारणांमुळेही कार्डियाक ॲम्ब्युलंन्सच्या सज्जतेसाठी थोडाफार विलंब झाल्यास मा. विश्वस्त किंवा संबंधित प्रतिष्ठित व्यक्तींची नाराजी पत्करावी लागत आहे.

हेलिपॅडवरील हेलिकॉप्टरच्या प्रत्येक लँडींग/ उड्डाण वेळी काडियॅाक ॲम्ब्युलन्स तैनात करण्याच्या अंतिम निर्णया प्रत येण्याआधी उपरोक्त सर्व बाबींचा यथासांग विचार करावा लागेल, असे वाटते.

सदर प्रकरणी अंतिम निर्णय झाल्यास, त्याचा रुग्णसेवेवर काही प्रमाणात विपरित परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अतिरिक्त मनुष्यबळाचा अभाव असलेने हेलिपॅडवर रुग्णवाहिका तैनात केल्यास दैनंदिन कामकाजात अतिरिक्त ताण येऊ शकतो.तसेच एखादया रुग्णास सदर रुग्णवाहिकेतुन दुसऱ्या ठिकाणी न्यावयाचे झाल्यास त्यास प्रतिक्षेत राहण्याचीही वेळ येऊ शकेल. व सदर रुग्ण मा. विश्वस्त अथवा एखादया प्रतिष्ठीत व्यक्तीच्या संबंधीत असेल तर वस्तुस्थिती माहिती नसलेने, रुग्णालय प्रशासनाविषयी नाहक गैरसमज निर्माण होतील, असे प्रामाणिकपणे वाटते.

तसेच रुग्णवाहिका तैनात करणेचा अंतिम निर्णय झाल्यास कार्डीयॅाक ॲम्बुलन्सचे सर्व उपकरणे व औषधांचे शुल्क, डॉक्टर, स्टाफ नर्स, वॉर्डबॉय यांना दयावा लागणारा वेळ, वेळोवेळी हेलिकॉप्टरच्या लँडींग व उड्डाणाच्या वेळेत होणारा विलंब व त्या अनुषंगाने सदर स्टाफ अडकून पडलेने त्याचा रुग्णसेवेवर होणारा परिणाम या सर्वांचा एकत्रीत विचार करता खाजगी व्यक्ती/संस्था यांना रु.५०००/- प्रति तास इतके व्यापारी दर आकारावेत, तसेच सदर सेवेचा हॉस्पिटल रुग्णांशी प्रत्यक्ष संबंध येत नसल्याकारणाने सदर रकमेची वसुली ही संस्थानच्या वाहन विभागामार्फतच करण्यात यावी, असे वाटते. परंतु रुग्ण वाहिकेसाठी दर निश्चिती हा आर्थिक विषय असलेने सदर दर मा.व्यवस्थापन समितीसमोर चर्चा करुन ठरवावेत, असे मत आहे.

तरी उपरोक्त बाबींचा विचार करुन हेलिपॅडवर रुग्णवाहिका तैनात करावी किंवा कसे? व त्याचे दर निश्चितीबाबत सदर प्रस्तावावर चर्चा होऊन योग्य तो निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६२६ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकरीता एक रुग्णवाहिका खरेदी करुन, सध्या वापरात असलेली रुग्णवाहिका हेलिपॅडवर तैनात करण्यात यावी. याकामी प्रती तास रुपये १०००/- इतका आकार घेण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी/वाहन विभागप्रमुख/ वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१६ श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन व गाद्या खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाने दैनंदिन वापरासाठी लागणा-या विविध प्रकारच्या लिननची व गादयांची दिनांक ०४/०५/२०१० रोजीचे मागणीपत्राअन्वये मागणी केलेली आहे. मागणीपत्रात त्यांनी बेडशीट १२०० नगाची मागणी केली आहे, सदरचे बेडशीट मा.व्यवस्थापन सभा दिनांक ०७/११/०९ चे सभेतील मंजुरी अन्वये बजाज हॅन्डलुम इंडस्ट्रि, पानिपत यांचेकडुन सदर बेडशीट खरेदी केले असुन उर्वरीत लिनन व गादयांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशील | कापडाचा प्रकार | रंग | साईज | खरेदी दिनांक | एकुण नग | शिल्लक | एकुण आवश्यक नग | अंदाजे किंमत | अंदाजे एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गादया | फोम | | ३६"x७७" | ५/१/२००५ | १०० | निरंक | ३०० नग | रु.३००० | ९,००,०००.०० |
| २ | पिलो | फोम | | १५"x२२" | २३/१/२००६<br>१३/०१/२००७ | ५०<br>१५० | निरंक | ६०० नग | रु.२००/- | १,२०,०००.०० |
| ३ | पिलोकव्हर | कॉटन | फिक्क्ट आकाशी रंग | १५"x२२" | २३/१/२००६<br>४/१/२००७<br>२७/८/२००७ | १५०<br>३००<br>१०० | १०६ | ६०० नग | रु.४८/- | २८,८००.०० |
| ४ | सोलापुरी चादर | जाडमध्ये | | ६०"x९०" | २५/०९/२००१ | २०० | २९ | १०००नग | रु.१९६/- | १,९६,०००.०० |
| ५ | लेडीज पेशंट ब्लाऊज | कॉटन | चॉकलेटी रंग | स्टँडर्ड साईज<br>लार्ज साईज | २३/०२/२००६ | ५०० | १८० | २५० नग<br>२५० नग | रु.१६०/- | ८०,०००.०० |
| ६ | लेडीज पेशंट परकर | कॉटन | चॉकलेटी रंग | स्टँडर्ड साईज<br>लार्ज साईज | २३/०२/२००६ | ५०० | १५६ | २५० नग<br>२५० नग | रु.६०/- | ३०,०००.०० |
| ७ | जेन्टस पेशंट शर्ट/पॅन्ट | कॉटन | हिरवा रंग | स्टँडर्ड साईज<br>लार्ज साईज | शर्ट २३/०१/२००६<br>पॅन्ट २३/१/२००६ | २००<br>२०० | निरंक<br>९ | २५० नग<br>२५० नग | रु.३२८/- | १,६४,०००.०० |
| ८ | मॅकीनटोस/ रबर (रेक्झीन) | | चॉकलेटी रंग | | -- | -- | निरंक | ६०० मीटर | रु.१२५/- | ७५,०००.०० |
| ९ | मोठे होलशीट | कॉटन | हिरवा रंग | ७५"x६०" | २३/१/२००६<br>१३/१/२००७<br>२४/०२/२०१० | १५०<br>३००<br>१५० | १५०<br>३०० | २००० नग | रु.१२०/- | २,४०,०००.०० |
| १० | लहान होलशीट | कॉटन | हिरवा रंग | ५०"x४०" | २३/०१/२००६ | १५० | १५० | १००० नग | रु.७५/- | ७५,०००.०० |
| ११ | प्लेनशीट (ड्रॉशीट) | कॉटन | हिरवा रंग | ८०"x६०" | -- | --- | निरंक | १००० नग | रु. ८३/- | ८३,०००.०० |
| १२ | ऑपरेशन गाऊन | कॉटन | हिरवा रंग | स्टँडर्ड साईज | २३/०१/२००६<br>३/१/२००७<br>१३/१/२००७ | २००<br>७८<br>२०० | निरंक | २००० नग | रु.२०३/- | ४,०६,०००.०० |
| १३ | डॉक्टर शर्ट/पॅन्ट | कॉटन | निळा रंग | स्टँडर्ड साईज<br>लार्ज साईज | शर्ट-२६/६/२००१<br>पॅन्ट-२६/१/२००१ | १००<br>५० | २०<br>२३ | १५० नग<br>१५० नग | रु.२२६/- | ६७,८००.०० |
| १४ | नर्सेस शर्ट/पॅन्ट | कॉटन | गुलाबी रंग | स्टँडर्ड साईज<br>लार्ज साईज | शर्ट-२३/१/२००६<br>०९/३/२००९<br>पॅन्ट-२३/१/२००६<br>०९/३/२००६ | ४५०<br>५०<br>४५०<br>५० | ७०<br><br>१०० | १०० नग<br>१०० नग | रु.१९८/- | ३९,६००.०० |
| १५ | आय टॉवेल | कॉटन | हिरवा रंग | २२"x२२" | २३/१/२००६<br>२४/०२/२०० | १५०<br>५० | निरंक | १०० नग | रु.३६/- | ३,६००.०० |
| १६ | कॉटन गादया | कॉटन | | १० किलो | -- | | निरंक | ५० नग | रु.७००/- | ३५,०००.०० |
| | | | | | | | | | **एकुण रु.** | **२५,४३,८००/-** |

उपरोक्त लिनन खरेदीस साधारणतः रु.२५,४३,८००/- खर्च अपेक्षीत आहे. श्री साईनाथ रुग्णालयाच्या बजेटकरीता रु.५,००,०००/- इतका खर्च मंजुर आहे, परंतु प्रत्यक्षात सदरचे खरेदीकामी रु.२५,४३,८००/- इतका खर्च येणार आहे.

**निर्णय क्र.६२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन व गाद्या निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २५,४३,८००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

---

**विषय नं.१७** **सन २००९-१० या वार्षिक निविदेतील मंजूर दराने Hexabrix कॉन्ट्रास्ट खरेदीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे कॅथलॅब विभागासाठी लागणाऱ्या Hexabrix कॉन्ट्रास्ट करीता सन २००९-२०१० या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने M/s. Neutron Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांना इकडील पत्र क्र. ५३८९ दि. ०५/०५/२००९ अन्वये खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

| Sr. No. | Description | Make | Brand Name | Qty. | Rate Per | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | PTCA CONTRAST MEDIA (SODIUM & MEGLUMINE LOXAGLATE) FOR ANGIOPLASTY ५० ML | GUERBET | HEXABRIX | ३८ | ८९२.३२ | ३३९०८.१६ |
| | | | | | **Total -** | **३३९०८.१६** |

त्यानुसार M/s.Neutron Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे उपरोक्त कॉन्ट्रास्टचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. सध्या सदरचे कॉन्ट्रास्ट औषध भांडारात साठा शिल्लक नसून ते कॅथलॅबसाठी अत्यंत आवश्यक असते.

कॅथलॅबमध्ये रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे सदरचा खप वाढलेला आहे. त्यामुळे तुर्तास अंदाजे ३ महिने पुरु शकेल इतका साठा खरेदी करावा लागणार आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Make | Brand Name | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PTCA CONTRAST MEDIA (SODIUM & MEGLUMINE LOXAGLATE) FOR ANGIOPLASTY 50 ML | GUERBET | HEXABRIX | 15 | 892.32 | 13384.80 |
| | | | | | Total - | **13384.80** |

वरीलप्रमाणे M/s.Neutron Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांचे वार्षिक मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु.१३,३८५/- इतका खर्च येणार आहे. दि.१७/०५/२००९ निर्णय क्रमांक ३८१ (A) अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा. व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे.

तरी M/s. Neutron Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून वरीलप्रमाणे उपरोक्त कॉन्ट्रास्ट १५ नग वार्षिक मंजुर दराने खरेदी करण्यात आले असून सदरचे खरेदीकामी रु.१३,३८५/- इतका खर्च आलेला आहे.

**निर्णय क्र.६२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे M/s. Neutron Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून कॉन्ट्रास्ट १५ नग वार्षिक मंजुर दराने खरेदी करण्यात आले असून सदरचे खरेदीकामी रु.१३,३८५/- इतका खर्च आलेला त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१८** **श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता आय.पी.डी फाईल छपाईबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील बिलींग विभागाने आय पी डी फाईल्स छपाई करणेकामी डी.पी.नं. १५०१, दि.०७.०६.२०१० रोजी इकडील कार्यालयास कळविले आहे. सदरच्या फाईल हया रुग्ण दाखल करते वेळेस व नंतर रुग्ण डिसचार्ज झाल्यानंतर रेकॉर्ड सुस्थितीत जता करुन ठेवणेकामी सदर फाईल्स वापरली जाते.

सदर आय पी डी फाईल्स पेशंटच्या गर्दीनुसार साधारणतः एका दिवसाला ३० ते ३५ लागतात सदर आय पी डी फाईलचा साठा १३०० नग आहे व तो साधरणतः एक ते दीड महिना पुरेल, त्यामुळे पुढील फाईल छपाई करणे गरजेचे आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | फाईल्सचा प्रकार | रंग | एका फाईलचे वजन | साईज | शिल्लक साठा | मागणी |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | आय.पी.डी. फाईल | हिरवा | ०.४० ग्रॅम | १४"x २२" चार रिबीट व लेससह | १३०० नग | १३,००० नग |

उपरोक्तप्रमाणे एका फाईलची अंदाजे किंमत प्रिंटींगसह रु. ५ /- इतकी आहे. त्यानुसार एकूण १३,००० नग फाईल्स करिता अंदाजे रु. ६५,००० /- (अक्षरी रु. पासष्ट हजार ) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे. सदर छपाई ही विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त आवश्यक साठया प्रमाणे छपाई करुन मिळणेस तथा याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये ६५,००० /- (अक्षरी रु. पासष्ट हजार पर्यंत ) चे खर्चास व विहीत पध्दतीने छपाई करुन घेणेस मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.६२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता आवश्यक असणाऱ्या १३,००० आय.पी.डी फाईल विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६५,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१९** **संस्थान रुग्णालयामध्ये विविध ठिकाणी फर्निचर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध विभागांमध्ये काही फर्निचर तयार करणे आवश्यक आहे. श्री साईबाबा रुग्णालयातील औषध भांडार विभाग यांनी दि.२८/११/२००९ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, त्यांचे सध्याचे पार्टीशन हे जुन्या मटेरीअल मधून केले आहे. तेथे रुग्णालयाचे प्रशासकीय कार्यालयाप्रमाणे फर्निचर बनवण्यात यावे जेणे करुन तेथील कर्मचाऱ्यांचे बैठक व्यवस्थेत सुनियोजीतपणा येईल व औषध भांडारात जास्त औषधे ठेवणेसाठी जागा मिळेल. तसेच श्री साईबाबा रुगणालयातील बायोमेडीकल विभागात कर्मचाऱ्यांचे बैठकीसाठी कामकाजाच्या दृष्टीने सोयीचे होईल अशा प्रकारे अंतर्गत रचना करणेस कळविले आहे. त्यांचे महत्तवाचे साहित्य ठेवणेसाठी कपाट आवश्यक आहे. तसेच दंत विभाग व कॉन्फरंस हॉल मधेही काही फर्निचर तयार करणे आवश्यक आहे.

श्री साईनाथ रुग्णालयातील केसपेपर विभाग धर्मशाळा विभागाचे कार्यालयाचे इमारतीत स्थलांतरीत करणेत आले आहे. केसपेपर ठेवणेसाठी त्यांचे पुर्वीपासुनचे जुने लाकडी रॅक आहेत. सध्याचे रॅकमुळे तिथल्या कर्मचाऱ्यांना काम करणेस अडचण येते. तसेच क्ष किरण विभागात काही महत्वाचे क्ष-किरण व रेकॉर्ड व्यवस्थित रित्या ठेवणेसाठी कपाटांची आवश्यकता आहे. तसेच बिलींग विभागातील जुने टेबल बदलून तेथे कॅश काऊंटर सारखे नविन टेबल करावे लागणार आहेत. उपरोक्त विभागांना फर्निचर करणेकामी संस्थानचे आर्किटेक्ट पॅनल वरील आर्किटेक्ट शितल जोशी ॲण्ड असोसिएटस् यांचेकडून अंदाजपत्रक, नकाशे व नविदा तयार करुन घेता येतिल. याकरीता प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रक्कम रु.७,००,०००.०० मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील औषध भांडार विभाग व बायोमेडीकल विभाग व श्री साईनाथ रुग्णालयातील केसपेपर विभाग व क्ष - किरण विभागात आवश्यक फर्निचर करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु.७,००,०००.०० लक्ष मात्रचे अपेक्षीत खर्चास, तसेच याकमी आर्किटेक्ट शितल जोशी ॲण्ड असो. श्रीरामपूर यांचेकडून अंदाजपत्रक, नकाशे व निविदा अर्ज तयार करुन वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेस मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील औषध भांडार विभाग व बायोमेडीकल विभाग, दंत विभाग, कॉन्फरन्स हॉल व श्री साईनाथ रुग्णालयातील केसपेपर विभाग बिलींग विभाग व क्ष - किरण विभागात आवश्यक फर्निचर करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु.७,००,०००/- मात्रचे अपेक्षीत खर्चास, तसेच याकमी आर्किटेक्ट शितल जोशी ॲण्ड असो. श्रीरामपूर यांचेकडून अंदाजपत्रक, नकाशे व निविदा फॉर्म तयार करुन वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२०** **संस्थानचे वाहन विभागासाठी शिर्डी सर्व्हे क्र.१०९ मधील गौरी शेडचे पूर्वेकडील जागेत वाहन विभागासाठी सुविधा उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम प्रकल्पाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पाचे मंजूर रेखांकनानुसार ओव्हर हेड व भुमीगत आर.सी.सी. पाण्याच्या टाक्या वाहन विभागाचे जागेत प्रस्तावीत आहेत. सदर प्रकल्पाचे परिसर विकासाचे काम ठेकेदार मे. शापुरजी पालोनजी ॲण्ड कंपनी लि; नाशिक यांचेमार्फत करण्यात येत आहे. वाहन विभाग गौरीशेडचे नविन जागेत स्थलांतरीत करण्यात आले असून सध्या वाहन विभागाचे जागेमध्ये साई आश्रम प्रकल्पाचे ओव्हर हेड टॅंक, आर.सी.सी. भूमीगत पाण्याची टाकी व डी. जी. रुमचे काम शापुरजी पालोनजी ॲण्ड कंपनी यांचेमार्फत दि.२४/०६/२०१० पासुन सुरु करण्यात आले आहे. दि.१८/०४/२०१० रोजी मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३५७(७) अन्वये वाहन विभाग नविन जागेत स्थलांतरीत करणेकामी येणारे रु.७,५६,१९८.०० मात्रचे खर्चास व काम ठेकेदार शापुरजी पालोनजी ॲण्ड कं., लि, नाशिक यांचेकडून अंदाजपत्रकातील दराने करुन घेणेस मान्यता देण्यात आली. तसेच दि. १८/०४/२०१० रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३५७(२८) अन्वये वाहन विभागासाठी पत्रे खरेदी करणेकामी येणोर रु.१,७८,८७५.०० मात्रचे खर्चास व ठेकेदार शापुरजी पालोनजी ॲण्ड कं., लि., नाशिक यांचेकडून मजुरी काम करुन घेणेस मान्यता देणेत आलेली आहे. वाहन विभाग

यांनी दि. ०९/०६/२०१० रोजीचे परिपत्रकान्वये आवश्यक ती वाढीव कामे इकडील विभागामार्फत करुन मिळणेबाबत कळविले आहे.

तसेच दि.२४/०६/२०१० रोजी साईटवर मा. कार्यकारी अधिकारी व मा. उप कार्यकारी अधिकारी यांनी समक्ष पहाणी केली असता त्यांनी काही शेडची रुंदी वाढविणेस व चेनलींक जाळीचे कंपाउंड करण्याचे सूचना दिल्या आहेत. त्यानुसार वाहन विभागाचे कार्यालय बांधकाम, स्टोअर रुम, कार वॉशर शेड चेनलींक कंम्पाऊंड, काही शेडची रुंदी वाढविणे या कामांसाठी सोबतचे अंदाजपत्रकानुसार रु.१०,११,८६८.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

वरीलपैकी रु.३,१८,१५१.०० मात्र खर्चाचे कार्यालयाचे बांधकाम हे वाहन विभागाचे कामकाजासाठी लवकरात लवकर पूर्ण करणे आवश्यक असल्याने सदरहू काम खात्यामार्फत मटेरीअल खरेदी करुन मजुरी ठेकेदारामार्फत करुन घेता येईल. त्यासाठी मंजुरी मिळणेस विनंती. तसेच उर्वरित कामांसाठी वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे निविदा मागविता येतिल.

तरी वरीलप्रमाणे करावयाच्या नियोजीत कामांसाठी येणारे एकूण अंदाजे रु.१०,११,८६८.०० मात्रचे खर्चास व त्यापैकी कार्यालय बांधकामाचे रु.३,१८,१५१.०० मात्र खर्चाचे काम खात्यामार्फत मटेरीअल खरेदी करुन मजुरी ठेकेदारामार्फत करणेस व उर्वरित रु.६,९३,७१७.०० मात्र खर्चाचे नियोजीत कामासाठी वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेसाठी मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे वाहन विभागासाठी शिर्डी सर्व्हे क्र.१०९ मधील गौरी शेडचे पूर्वेकडील जागेत वाहन विभागासाठी सुविधा उभारणे कामांसाठी येणारे एकूण अंदाजे रु.१०,११,८६८/- मात्रचे खर्चास व त्यापैकी कार्यालय बांधकामाचे रु.३,१८,१५१/- मात्र खर्चाचे काम खात्यामार्फत मटेरीअल खरेदी करुन मजुरी ठेकेदारामार्फत करणेस व उर्वरित रु.६,९३,७१७/- मात्र खर्चाचे नियोजीत कामासाठी वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२१** **श्रीसाईबाबा साठवण बंधारे बांधकामांना मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयानुसार व शासन निर्णयानुसार कोहकी व पिंपळवाडी परिसरातील श्री साईबाबा साठवण बंधारे एकूण ०४ चे दगडी बांधकाम करणेसाठी खाली नमूद केलेल्या बांधकाम ठेकेदारांना बांधकामाचा कार्यादेश देणेत आलेला आहे :

**तक्ता क्रमांक ०१**

| अ.नं. | साठवण बंधारा क्रमांक | बांधकाम ठेकेदाराचे नांव (कार्यादेश क्रमांक / दिनांक ) | बांधकामाची अंतिम मुदत | बांधकामाची सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|
| ०१ | बंधारा क्रमांक १० (कोहकी) | पी.बी.जाधव, संगमनेर (१०५३९ / दि. २२.०८.०९) | ०४ महिने दि.२७.०२.१० | दगडी भिंतीचे बांधकाम गेट लेव्हलपर्यन्त पूर्ण. |
| ०२ | बंधारा क्रमांक ११ (कोहकी) | अभिजीत एम. जावळे, कोळपेवाडी (१०५३८ / दि.२२.०८.०९) | ०४ महिने दि.२७.०२.१० | दगडी भिंतीचे बांधकाम गेट लेव्हलपर्यन्त पूर्ण. |
| ०३ | बंधारा क्रमांक १२ (कोहकी) | के.के.थोरात,संगमनेर (१०९२९ / दि.२९.०८.०९) | ०४ महिने दि.२७.०२.१० | दगडी भिंतीचे बांधकामासह इतर कामे पूर्ण. |
| ०४ | बंधारा क्रमांक १३ (पिंपळवाडी) | पी.बी.जाधव, संगमनेर (१०५४० / दि.२२.०८.०९) | ०६ महिने दि.२४.०६.१० | दगडी भिंतीचे बांधकाम पूर्ण |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या अ.क्र. ०१, ०२ व ०४ चे बंधाऱ्यांची खालील कामे सर्वसाधारणपणे अपूर्ण आहेत :

०१. बंधारा क्रमांक १० व ११ चे गेट फ्रेम व गेट नीडल बसविणे.

०२. बंधारा क्रमांक १० व ११ चे फ्लँक वॉल व कि वॉलचे बांधकाम अपूर्ण.

०३. बंधारा क्रमांक १० व ११ चे अपस्ट्रीम साईडला प्लॅस्टर करणे व डाऊन स्ट्रीम साईडला पॉईटींग करणे.

०४. बंधारा क्रमांक १० व ११ चे दगडी भिंतींचे आतील व बाहेरील बाजूस रिफिलिंग करणे.

०५. बंधारा क्रमांक १०, ११, १२ व १३ चे बंधाराचे बाजूचे भरावास दगडी पिचिंग करणे.

उपरोक्त अपूर्ण कामे पूर्ण करणेसाठी बांधकाम ठेकेदारांनी मुदतवाढ मिळावी म्हणून विनंती केलेली आहे, त्यानुसार मा. कार्यकारी संचालक, गणेश सहकारी साखर कारखाना, गणेशनगर यांचेकडेस दिनांक ०५ जून, २०१० चे पत्रानुसार बंधाऱ्यांचे बांधकामाविषयी प्रगती व मुदतवाढीबाबत अभिप्राय कळविणेबाबत कळविण्यात आलेले होते :

**(ब)** त्यानुसार, मा. कार्यकारी संचालक, गणेश सहकारी साखर कारखाना, गणेशनगर यांनी त्यांचेकडील दिनांक १८ जून, २०१० रोजीचे पत्रानुसार, " .. .. बंधाऱ्यांची उपरोक्त कामे पूर्ण लवकरात लवकर पूर्ण होणे आवश्यक आहे. कामे पूर्ण झालेनंतर भरावाचे काम हाती घेण्यात येईल. सध्या कारखान्याचा

बुलडोझर नादुरुस्त असून, तो दुरुस्त केल्यानंतर भरावाचे काम पूर्ण करुन देण्यात येईल. तोपर्यन्त बंधाऱ्यांची उर्वरित कामे दिनांक १५ ऑगष्ट, २००८ पर्यन्त पुर्ण करण्यात यावी व तोपर्यन्त बांधकाम ठेकेदारांना मुदतवाढ देणेस शिफारस करणेत येत आहे " असे इकडील कार्यालयास कळविले आहे.

उपरोक्त पत्रात नमुद केलेप्रमाणे, जोपर्यन्त कारखान्यामार्फत भरावाचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यन्त भरावास दगडी पिचिंगचे काम बांधकाम ठेकेदार यांना पूर्ण करता येणार नाही. त्यामुळे ०४ ही बंधाऱ्यांच्या उपरोक्त बांधकाम ठेकेदारांना दिनांक १५ ऑगष्ट, २०१० अखेर मुदतवाढ देणेबाबत कारखान्याने शिफारस केली आहे, ही बाब लक्षात घेऊन बांधकाम ठेकेदार यांना साठवण बंधाऱ्यांचे बांधकाम पूर्ण करणेस दिनांक १५ ऑगष्ट, २०१० अखेर मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.६३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा साठवण बंधारे बांधकामाचे ठेकेदार यांना साठवण बंधाऱ्यांचे बांधकाम पूर्ण करणेस दिनांक १५ ऑगष्ट, २०१० अखेर मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२२** **संस्थानचे रुग्णालये व इतर विभागाचे स्क्रॅप मटेरिअल ठेवणेसाठी पत्र्याचे शेड उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय या दोन्हीही रुग्णालयातील विविध प्रकारची मशिनरी, उपकरणे, किरकोळ साहित्य वापरुन निकामी होत असतात. त्यामुळे सदरच्या वस्तु दोन्ही रुग्णालयाचे संबंधीत विभाग अथवा वार्ड यांचेकडून पुढील विल्हेवाट लावणेकामी स्टोअरकडे जमा केल्या जातात. निकामी झालेल्या वस्तु ठेवण्यासाठी दोन्हीही रुग्णालयात जागा उपलब्ध नाही. तसेच उपरोक्त वस्तु एकाच वेळी निकामी होत नाहीत. सदर वस्तुंचा एक संच (लॉट) तयार करुन तो डेड स्टॉकमधून वजा केल्यानंतर स्क्रॅप केल्या जातात त्यासाठी २०'x२०' या आकाराचे एक पत्रा शेड तयार करुन मिळावे, अशी मागणी मा. वैद्यकीय संचालक यांनी दि.०८/०५/२०१० रोजीचे टिपणीव्दारे केली आहे.

संस्थानचे स.नं. १२४/१ अ मधिल नविन मध्यवर्ती भांडार परिसरातील मोकळ्या जागेत आग्नेय कोपऱ्यात शेड उभारता येईल. तसेच संस्थानचे इतरही विभागातील स्क्रॅप मटेरीअल ठेवता येईल. त्यासाठी १५०'x३०' या मापाचे पत्राशेड तयार करणे आवश्यक आहे. यामध्ये प्रामुख्याने डबर बांधकाम, पी.सी.सी., ३ फुट उंची पर्यंत विट बांधकाम तसेच त्याचे वरचे भागात सभोवताली जी.आय. पत्रे, पाईपचा सांगाडा, आणि पत्र्याचे छत इ. बाबींचा समावेश आहे. याकामी इकडील प्राथमिक ढोबळ अंदाजपत्रकानुसार रु.१३,५०,०००.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. विषयांकीत बांधकामासाठी सुधारीत अंदाजपत्रकामध्ये तरतूद करता येईल.

विषयांकित कामासाठी अपेक्षीत अंदाजे रु.१३,५०,०००.०० मात्रचे खर्चास आणि याकामी सविस्तर निविदा तयार करुन वर्तमान पत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती. तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे संस्थानचे रुग्णालये व इतर विभागाचे स्क्रॅप मटेरिअल ठेवणेसाठी पत्र्याचे शेड उभारणे करणेस व याकामी अंदाजे रु.१३,५०,०००/- मात्रचे खर्चास आणि सदर कामासाठी सविस्तर निविदा तयार करुन, वर्तमान पत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२३** **साईटेक प्रकल्पाकरिता केबल टाकणे,चेंबर बांधकाम व इतर सिव्हील कामाचे खर्चास मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०३/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. २९३ अन्वये साईटेक प्रकल्पासाठी श्री साई प्रसादालयाचे उत्तरेकडील पहिल्या माळ्यावरील हॉलमध्ये डाटा सेंटर व इतर अनुषंगीक सुविधा करणेकामी येणारे रु.३२/- लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळाली आहे. त्यापैकी सिव्हील वर्कची रक्कम रु.६,७०,२१०/- मात्रची कामे करणेकामी इकडील विभागामार्फत सिलबंद निविदा मागविण्यात आल्या आहेत. संस्थानचा आय.टी. विभाग व Cognizant Technology Solution, Pune यांचेशी चर्चा व विचारविनिमय करुन, तसेच त्यांच्या गरजा विचारात घेवून सदर निविदा तयार करण्यात आल्या आहेत. यामध्ये Light Weight Brick मध्ये बांधकाम करणे, भिंतींना जिप्सम प्लास्टर करणे, स्ट्रक्चरल सिलींग व आर्मस्ट्रॉंग फॉल्स सिलींग करणे, रंगकाम तसेच केबल टाकणे करीता नाली खोदाई चेंबर बांधकाम व इतर कामांचा समावेश करणेत आला आहे.

उपरोक्त पैकी सिव्हील कामाकरीता मागविण्यात आलेल्या निविदेतील दर जास्त स्वरुपाचे असल्याने सदरहू निविदा रद्द करण्यात आल्या. उपरोक्त कामांपैकी Light Weight bricks मध्ये भिंत बांधकामासाठी इकडील विभागामार्फत मटेरीअल खरेदी करुन मजुरी ठेकेदारामार्फत काम करुन घ्यावे. तसेच, फॉल्स सिलिंग, जिप्सम प्लास्टर, दरवाजे, पेंटींग, इंटेरीअर कामांसाठी मटेरीअलसह कोटेशन्स

मागवून काम करणेस व त्यासाठी येणारे सर्वसमावेशक खर्चास दि.१८/०४/२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ३६३ अन्वये मान्यता देणेत आली आहे.
त्यानुसार खालील ठेकेदारांकडून मजुरी दराने / मटेरीअलसह काम करुन घेणेत येत आहे.

१. सिव्हील काम :- सदरचे काम करणेकरीता मजुरी दराचे ठेकेदारांकडून कोटेशन मागवून निम्नतम दर देणारे ठेकेदार महेंद्र आर. टाटीया, श्रीरामपूर यांचेकडून मजुरी दराने सदरचे काम करुन घेणेत आले आहे.

२. Light Weight Bricks :- श्री साईप्रसादालय इमारतीचे स्ट्रक्चरल कन्सलटंट यांचे सल्यानुसार डाटा सेंटर बनविणे कामी Light weight Bricks मध्ये बांधकाम करणेसाठी Citadel, Sipore व Enviro Build Resources pvt. Ltd; या कंपन्यांकडून विट पुरवठा करणेसाठी कोटेशन घेणेत आले होते. निम्नतम दर व योग्य टेक्निकल स्पेसिफिकेशन असल्याने Citadel - Eco-build pvt ltd. यांचे निम्नतम दरात विट खरेदी करणेत आली असून त्यानुसार बांधकाम करणेत आले आहे. त्याकरीता रु.१,९६,४४६/- मात्र खर्च आला आहे.

३. जिप्सम प्लास्टर :- सदर कामाकरीता अशा प्रकारचे काम करणाऱ्या ठेकेदारांकडून कोटेशन मागवून निम्नतम दराचे ठेकेदार अकबर अली, इंटेरीअर, मुंबई यांचेकडून करुन घेणेत आले आहे. त्यासाठी रु.१,९३,०५०/- मात्र रक्कमेच्या कामाचा कार्यादेश देणेत आला असून ठेकेदार यांनी काम पूर्ण केले आहे.

४. Armstrong False Ceiling :- CTS यांचे मागणी नुसार डाटा सेंटर बरोबर असणाऱ्या Electrical & UPS Room, Spare Room, MU Room, इ. रुम मधे Armstrong False Celing करणेसाठी अशा प्रकारचे काम करणाऱ्या ठेकेदारांकडून कोटेशन मागविणेत आले असून वेव इंटेरीअर, प्रा.लि., नाशिक यांनी दिलेल्या निम्नतम दरात सदरचे Flase Celing चे काम करुन घेणेत आले आहे. त्यासाठी रु.८०,७६७/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

५. साईटेक प्रकल्पाचे केबल लाईन टाकणेकामी नाली खोदणेकामी जे.सी.बी. धारकांकडून व मजुर ठेकेदारांकडून मागविण्यात आले असून निम्नतम दराचे ठेकेदारांकडून काम सुरु आहे.

I) जे.सी.बी. व्दारे खोदकाम करणे :- एकूण २५०० मी. लांबीचे नालीचे जे.सी.बी. चे खोदकाम करणेकामी ७५ तासांकरीता ०६ जे.सी.बी. धारकांचे कोटेशन प्राप्त होऊन साई त्रिमुर्ती जे.सी.बी. सर्व्हिस पिंपळवाडी यांचे निम्नतम दर ४९५ प्रती तास या दरानुसार कार्यादेश देऊन काम सुरु करण्यात आले आहे.

II) ब्रेकरचे साहयाने खोदकाम करणे :- परिसरातील कॉंक्रीट रोड, पार्किंगचे या ठिकाणचे कॉंक्रीटीकरण ब्रेकरचे साहयाने खोदकाम करणेकामी तीन ठेकेदारांचे कोटेशन प्राप्त होऊन श्री पांडूरंग एकनाथ आहेर, निमगांव यांचे निम्नतम दर रु.४००/- प्रती तास दोन ब्रेकर या दराप्रमाणे कार्यादेश देणेत आला आहे.

६. साईटेक प्रकल्पाचे संगणक केबल टाकणेसाठी केबल लाईनवरील चेंबर बांधकाम करणेसाठी आवश्यक मटेरीअलचा पुरवठा करणेकामी कोटेशन मागविण्यात आले आहे.

I) विटा :- संगणक केबल लाईनवरील एकूण १०० नग चेंबरचे बांधकाम करणेकामी विटाचा पुरवठा करणेकामी एकूण ४ पुरवठाधारकांचे कोटेशन प्राप्त होऊन गुरुदत्त विट सप्लायर्सचे श्री लक्ष्मण तुरकणे, पिंपळवाडी यांचे २६०० प्रती हजार या निम्नतम स्वरुपाचे दरानुसार ३३,५०० नग विटाचा पुरवठा करणेकामी कार्यादेश देऊन विट खरेदी करण्यात आल्या आहे.

II) खडी :- चेंबरचे बांधकामासाठी पी.सी.सी. करणेकामी खडीचा पुरवठा करणेकामी एकूण ४ पुरवठधारकांचे कोटेशन प्राप्त होऊन श्री. गणेश रेवगडे, सावळीविहीर यांचे निम्नतम दर १८००/- प्रती ब्रास या दरानुसार ०८ ब्रास खडी खरेदी करणेकामी पुरवठा आदेश देणेत येऊन खडी खरेदी करण्यात आली आहे.

III) वाळू :- चेंबर बांधकामासाठी आवश्यक १५ ब्रास वाळूचा पुरवठा करणेकामी एकूण चार पुरवठाधारकांचे कोटेशन प्राप्त होऊन श्री बापु बाबुराव गायके, शिर्डी यांचेकडून १६००/- प्रती ब्रास या निम्तनम दरानुसार वाळुचा पुरवठा आदेश देणेत येऊन वाळू खरेदी करण्यात आली आहे.

IV) मजुरी दराने चेंबरचे बांधकाम करणे :- साईटेक प्रकल्पाचे केबल लाईनवरील एकूण १०० नग १'-६"x३'-०" या साईजचे चेंबरचे बांधकाम मजुरी दराने करणेकामी मजूर ठेकेदारामार्फत कोटैशन मागविण्यात येऊन एकूण तीन कोटेशन प्राप्त झाली १'-६"x३'-०" खोली ३०", २४",१८" या सरासरी दोन फुट उंचीचे चेंबर बांधकामासाठी श्री हनुमंत विठ्ठल भुरे, शिर्डी यांचेकडून निम्नतम दर (सरासरी ) ४१६.६७ प्रती चेंबर याप्रमाणे कार्यादेश देऊन काम सुरु करणेत आले आहे.

**ब)** डाटा सेंटरच्या कामातील केबल टाकणेसाठी नाली खोदाई व चेंबर बांधकामाचे काम प्रगतीपथावर असून सिव्हील वर्क (फॉल्स सिलींगसह) चे काम पूर्ण झाले असून उर्वरीत फर्निचर व ॲल्युमिनीअम पार्टीशन करणेसाठी CTS यांचे सल्ल्यानुसार नकाशे व अंदाजपत्रक तयार करणेत आले आहेत. त्यानुसार

सिव्हील वर्क करणे कामासाठी अंदाजे रु.१,५०,०००/- ॲल्यु. पार्टीशन करणेकरीता १,००,०००/- व फर्निचरचे कामासाठी रु.२,५०,०००/- मात्र मिळून एकुण रु.५,००,०००/- मात्र खर्च जास्त येणार आहे.

तरी ॲल्युमिनीअम पार्टीशन व मॉड्युलर फर्निचर करुन घेणेकरीता मटेरीअलसह कोटेशन्स मागवून काम करुन घेणेस येणारे रु.५,००,०००/- मात्रचे वाढीव खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साईटेक प्रकल्पाकरिता केबल टाकणेसाठी नाली खोदाई, चेंबर बांधकाम व इंटेरीअरचे कामातील ॲल्युमिनीअम पार्टीशन व मॉड्युलर फर्निचर करुन घेणेकरीता मटेरीअलसह कोटेशन्स मागवून काम करुन घेणेस व याकामी येणारे रु.५,००,०००/- मात्रचे वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२४** **जुने प्रसादालय परिसरातील जनरेटर रुमसमोर पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर परिसराचे जनरेटर कक्ष जुने प्रसादालय परिसरात आहे. सदर जनरेटर कक्ष वर्कशॉपच्या पूर्व बाजूस व कॉईल कुलींग सिस्टिमचे खाली पूर्ण भागात फरशी किंवा पेव्हींग ब्लॉक बसविणे व तेथील आर्थिंग चेंबर बांधणेबाबत विद्युत विभाग यांनी कळविले आहे.

विद्युत विभगाचे मागणीनुसार सुमारे २६० चौ.मी. पेव्हींग ब्लाक बसविणे अपेक्षीत आहे. याकामी खोदाई करणे, मरुम भरणे, लेव्हल करणे, पेव्हींग ब्लॉक बसविणे, चेंबर बांधकाम करणे याकामी डी.एस.आर. नुसारे रु.१,७२,९२६.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. याकामी सदरचा खर्च सन २०१०-२०११ चे वार्षीक अंदाजपत्रकीय तदतुदी मधील इमारत व देखाभाल खर्च रुपये ९५.०० लक्ष मात्रचे रकमेतून करता येईल.

तरी याकामी डी.एस.आर. नुसार येणारे अंदाजे रु.१,७२,९२६.०० मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जुने प्रसादालय परिसराचे विस्तारीकरण करावयाचे असल्याने जुने प्रसादालय परिसरातील जनरेटर रुमसमोर पेव्हींग ब्लॉक बसविण्याऐवजी आवश्यक तेथे फरशी बसविण्यात यावी. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२५** **शिर्डी शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेअंतर्गत परिसरात लावणेसाठी रेलिंग तयार करण्यात आलेले रेलिंगचे खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी शहरातील अतिक्रमण काढण्याचे काम दि. २१/०६/२०१० पासून शिर्डी नगरपंचायत यांचेमार्फत हाती घेण्यात आले होते. शहरातील नगर- मनमाड रस्ता, पिंपळवाडी रस्ता इ. ठिकाणी सदरची मोहिम हाती घेण्यात आली होती. शिर्डीमध्ये श्री साईंचे दर्शनासाठी साईभक्त येत असतात. अतिक्रमण काढतेवेळी शिर्डी मधील नागरीकांना व साईभक्तांना रस्त्याने जातांना- येतांना काही इजा होऊ नये तसेच अतिक्रमण काढतेवेळी स्थानीक नागरीकांनी अडथळा निर्माण करु नये म्हणून अतिक्रमण काढण्याचे ठिकाणी व मंदिर परिसराजवळ रेलिंग लावणे आवश्यक होते.

सदरहू कामासाठी दि. २१/०६/२०१० रोजीचे टिपणी अन्वये नविन २०० फुट रेलींग तयार करणेकामी येणारे रुपये ८५०००.०० मात्रचे खर्चास व याकामी स्थानीक ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागवून काम करुन घेण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार स्थानीक ठेकेदार यांचेकडून समक्ष कोटेशन घेण्यात आली.

सदरची प्राप्त झालेली तिन दरपत्रके मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समोर दिनांक २२/०६/२०१० रोजी उघडण्यात आली असून त्याचा तुलनात्मक तक्ता सादर करण्यात आला व निम्नतम ठेकेदार रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर यांना कार्यादेश देण्यात आला असून ठेकेदार रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर यांनी १६ रेलिंगचे (९६'-०" फुट एकूण वजन ४७५.०० किलो) काम पूर्ण करुन दिले असून त्याचे त्यांनी रुपये ३४,९१२.५० मात्रचे बिल सादर केले आहे.

मुंबई येथील दि. २७/०१/२०१० रोजी झालेल्या बैठकीत (मंत्रालयात) शिर्डी शहरातील अतिक्रमणे काढणेस आवश्यक ती मदत करणेबाबत ठरले आहे. तरी शिर्डी शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमे अंतर्गत परिसरात लावणेसाठी रेलींग तयार करण्यात आली आहे. सदर रेलींग मुव्हेबल असल्यामुळे आपणास गर्दीच्या वेळेस वा उत्सव कालावधी मध्ये वापर करता येईल. नुकत्याच झालेल्या गुरुपौर्णीमा उत्सवात सदर रेलींगचा वापर पिंपळवाडी रस्त्यावरील गर्दी नियंत्रणासाठी वापरण्यात आले. तरी रेलींग तयार करणेकामी आलेल्या रु. ३४,९१२.०० मात्रचे खर्चास तसेच ठेकेदार यांचे बिल अदा करणेस कार्योत्तर मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६३६** **उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२६** **व्यायाम शाळेसाठी पत्रा शेडचे बांधकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथिल नांदुर्खी रस्त्यालगत असलेल्या श्री साईनाथ हायस्कूलचे आवारात उत्तर बाजूस संस्थानची व्यायमशाळा आहे. शिर्डी-नांदुर्खी रस्ता हा विकास योजनेत १८ मीटर रुंदीची होणार आहे. या रस्त्याचे प्रस्तावित १८ मी. रुंदीत उपरोक्त व्यायामशाळा शेडचा ८.२३ मी.x६.१०मी. मापाचा भाग येत असल्याने, शिर्डी नगरपंचायत यांनी दि.२४/०६/२०१० रोजी शेडचा प्रस्तुत भाग काढून जागेचा ताबा घेतला आहे. त्यामुळे संस्थानचे संरक्षण अधिकारी यांनी व्यायामशाळेच्या पूर्व कडील असलेल्या मोकळ्या जागेत शेड वाढविण्यात येऊन एका बाजूस शौचालय बांधून व्यायामशाळेचे मुख्य प्रवेश गेट उत्तर बाजुने करुन मिळणे बाबत विनंती केली आहे.

नगरपंचायत यांनी व्यायाम शाळेच्या जागेचा ताबा घेण्यापुर्वी व्यायाम शाळेची पूर्व-पश्चिम लांबी १८.३० मी. आणि रुंदी ८.२३ मी. इतकी होती. त्यापैकी पश्चिम बाजुचे ६.१० मी. इतकी पत्राशेडची जागा शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी रस्त्याचे विकासासाठी ताब्यात घेतली आहे. त्यावेळी बांधकाम विभाग आणि विद्युत विभाग यांनी मटेरीअलचे नुकसान होऊ नये यासाठी पत्रे व सांगाडा खोलून घेतला आहे. त्यामुळे पूर्वेकडील बाजू ओपन झाल्यामुळे इकडील विभागामार्फत तातडीने बांधकाम करुन घेतले आहे. तसेच विद्युत विभाग यांनी फॅब्रिकेशनचे काम केल्यानंतर पत्रे लावून बंदिस्त केले आहे. त्यामुळे व्यायामशाळेची साईज कमी होऊन साहित्य व उपकरणे यासाठी पुरेशी जागा राहीलेली नाही. त्यामुळे सध्या संरक्षण विभाग यांनी व्यायमशाळा बंद ठेवलेली आहे. व्यायामशाळा चालू असतांना या ठिकाणी सुमारे ३५० ते ४०० युवक व्यायामासाठी येत असत. अशा प्रकारे स्थानिक युवकांना व्यायामासाठी असलेली सुविधा बंद पडल्याने, व्यायामाशाळा शेडचे तातडीने विस्तारीकरण करणे आवश्यक आहे.

व्यायामशाळा शेडचे पूर्व बाजूस बांधकाम करुन शेड वाढविणेसाठी करणेसाठी तसेच जुन्या भिंतींना प्लास्टर करणे आणि एक स्वच्छता गृहाचे बांधकाम करणेसाठी इकडील विभागाचे अंदाजपत्रकानुसार रु.१,४२,६५०.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. या अंदाजपत्रकामध्ये टयुबूलर स्ट्रक्चर व पत्रे यांचा समावेश नाही. सदरहू टयुबूलर स्ट्रक्चर आणि पत्रे पुर्वीचेच (जुने) वापरता येतील. वरीलप्रमाणे विषयांकीत काम तातडीचे असल्यामुळे सदर काम खात्यामार्फत मटेरीअल खरेदी करुन, मजुरी ठेकेदारामार्फत सुरु करण्यात आले आहे.

सदर कामामध्ये प्रामुख्याने प्लीन्थपर्यंत डबर बांधकाम करणे, साडे सहा फुट उंचीचे कॉंक्रीट ब्लॉक बांधकाम करणे, जुन्या व नवीन ब्लॉक बांधकामास अतिल व बाहेरील बाजुने प्लास्टर करणे, कोटा फ्लोअरींग करणे या कामांचा समावेश आहे. तरी विषयांकित बांधकाम करणेसाठी इकडील अंदाजपत्रकानुसार रु.१,४२,६५०.०० मात्रचे खर्चास तसेच खात्यामार्फत मटेरीअल खरेदी करुन मजुरी दराचे ठेकेदारामार्फत काम करुन घेणेस मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे व्यायाम शाळेसाठी पत्रा शेडचे बांधकाम खात्यामार्फत मटेरिअल खरेदी करुन मजूरी दराचे ठेकेदारामार्फत काम करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,४२,६५०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी संस्थानने श्री.दिगंबर निवृत्ती जगताप यांचेकडून खरेदी केलेल्या मौजे कनकुरी गट नं.१३४ मधील जागेत स्वीमिंग पुलसह अद्यायावत व्यायामशाळा बांधणेकामी सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२७ मंदीर परिसरातील गुरुस्थान समोरील तळघरात सुरक्षा साहित्याची सेंट्रलाईज कंट्रोलरुम तयार करणेकरिता इंटेरिअरचे काम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांनुसार, समाधी मंदिरासह संस्थान परिसराचे व भक्तांचे सुरक्षेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत अंदाजे रक्कम रुपये ४.५ कोटी मात्र खर्चाची सुरक्षा यंत्रणा प्रणाली उभारण्यात येत आहे. सदर सुरक्षा यंत्रणा उभारणीपासून यंत्रणेचे पुढील ०५ वर्षाचे देखभालीचे काम संबंधीत कंपनीमार्फत करण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने, संरक्षण विभागाने दिनांक २१ एप्रिल, २०१० रोजीचे पत्रानुसार, सदर सुरक्षा यंत्रणेच्या नियंत्रणासाठी व देखभालीसाठी समाधी मंदिर परिसरातील, गुरुस्थान मंदिरासमोरील ध्यान मंदिरात नियंत्रण कक्ष व साहित्य साठवण कक्ष तयार करुन मिळावे म्हणून कळविले होते. त्यानुसार, मा. व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे दिनांक ०५ जुलै, २०१० रोजीचे सभेत नियंत्रण कक्षासाठी १७.६१ चौरस मीटर चे अल्युमिनिअम पार्टीशनचे दोन कक्ष तयार करणेसाठी रक्कम रुपये १,७४,८८६/- मात्रचे अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली होती. त्यानुसार विहीत पध्दतीने अशा प्रकारची काम करणाऱ्या ठेकेदारांकडून दरपत्रके मागवून, निम्नतम दरधारक मे. रविंद्र रबद प्रॉडक्ट ॲण्ड फॅब्रिकेशन, श्रीरामपूर यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे.

दरम्यानचे कालावधीत, सुरक्षा यंत्रणेचे पुरवठादार तसेच तांत्रिक सल्लागार यांचेसह मा. कार्यकारी अधिकारी यांनी नियंत्रण कक्ष तयार करण्याचे ठिकाणी समक्ष भेट देऊन पाहणी केली असता, सदर नियंत्रण कक्षातील यंत्रणेचे साहित्य ठेवणेसाठी, ते नियंत्रित करणेसाठी योग्य आकाराच्या रॅकस्, टेबल, खुर्च्या तसेच

या संगणकीकृत यंत्रणेसाठी स्वतंत्र कक्ष, कक्षातील छताला फॉल सिलींग, पुरेशी विद्युत व्यवस्था आदिसाठी सोयी असाव्यात, असे ठरले.

**(ब)** त्यानुसार, नाशिक येथील त्रिमिती इंटेरिअर्स यांचे प्रतिनिधी आर्किटेक्ट अमोल चौधरी यांचेकडून नियंत्रण व साठवण कक्षाचा प्राथमिक आराखडा तयार करुन घेण्यात आलेला आहे. यामध्ये यंत्रणेसाठी टेबल, यंत्रणा नियंत्रण करणाऱ्यांसाठी टेबल-खुर्ची, मॉनिटर्स ठेवणेसाठी पॅनल्स, स्वतंत्र संगणक कक्ष, स्वतंत्र साहित्य साठवण कक्ष आदिचे नियोजन करण्यात आलेले आहे. या आराखडयानुसार, जिप्सम बोर्ड व काचेचे पार्टिशनसह सिलींग, आवश्यक फर्निचर, रंगकामासह अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणेसाठी नियंत्रण कक्षासह साहित्य साठवण तयार करणेसाठी अंदाजित पूर्णांकित रक्कम रुपये २.८४ लाख मात्र पर्यन्त खर्च येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे मंदिर परिसरातील ध्यान मंदिरामध्ये इंटेरिअर आर्किटेक्ट यांनी तयार केलेल्या बांधकाम आराखडयाप्रमाणे अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणेसाठी मध्यवर्ती नियंत्रण कक्षासह साहित्य साठवण कक्ष तयार करणेस, त्यासाठी येणारे अंदाजित खर्च रक्कम रुपये २.८४ लाख मात्रपर्यन्तचे खर्चास व त्यासाठी अशा प्रकारची कामे करणाऱ्या ठेकेदारांकडून विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून काम पूर्ण करुन घेणेस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.६३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मंदिर परिसरातील बेसमेंट हॉल (ध्यान मंदिर) मध्ये इंटेरिअर आर्किटेक्ट यांनी तयार केलेल्या बांधकाम आराखडयाप्रमाणे अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणेसाठी मध्यवर्ती नियंत्रण कक्षासह साहित्य साठवण कक्ष तयार करणेसाठी येणारे अंदाजित खर्च रक्कम रुपये २.८४ लाख मात्रपर्यन्तचे खर्चास तसेच, बेसमेंट हॉलचे संपूर्ण रंगकाम, मार्बल पॉलिसींग व इतर अनुषंगीक कामांसाठी येणाऱ्या योग्य खर्चास व व त्यासाठी अशा प्रकारची कामे करणाऱ्या ठेकेदारांकडून विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून काम पूर्ण करुन घेणेस मान्यता देण्यात आली. एल.सी.डी. डिस्प्लेचे काम विशिष्ट प्रकारचे असल्याने ते स्वतंत्र एजन्सीमार्फत करुन घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२८** **विविध विकास प्रकल्पांचे उद्‌घाटन व भूमिपूजन समारंभ कार्यक्रमासाठी आलेल्या खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेतर्फे राबविणेत येणाऱ्या खालील विविध विकास प्रकल्पांचा उद्‌घाटन, भूमिपूजन समारंभ दिनांक २३.०६.२०१० रोजी महाराष्ट्र शासनाचे विविध खात्यांचे मंत्री महोदयांच्या शुभहस्ते व प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता.

०१. संस्थान, शिर्डी नगरपंचायत व राहाता नगरपरिषद यांचे संयुक्त विद्यमाने उभारण्यात आलेल्या **घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाचा उद्‌घाटन समारंभ**

०२. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे करीता संस्थान निधीतून विकसित करण्यात आलेल्या **नवीन पिंपळवाडी रस्त्याचा उद्‌घाटन समारंभ**

०३. शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेंतर्गत संस्थान निधीतून विकसित करण्यात यावयाच्या **रस्त्यांचे कामाचा भूमिपूजन समारंभ**

०४. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेकरीता संस्थान निधीतून विकसित करण्यात यावयाच्या **शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकामाचा भूमिपूजन समारंभ.**

सदरचे कार्यक्रमासाठी मंडप, स्टेज व्यवस्थेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून निम्नतम दराचे दर सादरकर्ते रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर यांना रुपये ५०,३२०/- मात्र रकमेस मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेचे काम करुन देणेकामी कार्यादेश देणेत आला होता. त्यानूसार रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर यांचे मार्फत मंडपाचे बरेचसे काम पूर्ण करण्यात आले होते. तसेच आवश्यक असणाऱ्या ०३ नग कोनशिला पैकी पोतदार आर्टस, नाशिक यांचेकडून ०२ नग (नविन पिंपळवाडी रस्ता उद्‌घाटन व शिर्डी शहर एकात्मिक रस्ते) व जाधव मार्बल, नाशिक यांचेकडून ०१ नग (घनकचारा प्रक्रीया प्रकल्प) कोनशिला तयार करुन घेण्यात आल्या. तथापी सदरहू कार्यक्रम काही अपरिहार्य कारणास्तव पुढे ढकलण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी खालील प्रमाणे खर्च आलेला आहे.

| अ. नं. | कामाचे ठिकाण / तपशिल | परिमाण / एकक | दर | रक्कम | साईटवर केलेले प्रत्यक्ष कामानुसार देय होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | **शिर्डी बसस्थानक येथे.** | | | | |
| ०१ | शिर्डी बसस्थानकाचे आवारामध्ये बांबू व बल्या वापरुन छताकरीता प्लास्टीक ताडपत्री टाकुण आतिल बाजूने सुशोभित एकसारख्या रंगाचे कापड बांधून ५४'x८०' साईजच्या कापडी मंडपाची उभारणी करुन संपूर्ण मंडपामध्ये मॅटीन टाकणे. मंडपाचे खांबास खांबोळी बांधणे इ. सह मंडप | ४३२०.०० चौ.फुट | ६.०० प्र. चौ. फुट प्र. दि. | २५९२०.०० | २३७६०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | उभारणी करणे. | | | | |
| ०२ | उपस्थीत मान्यवरानां बसणेकामी ४०० नग फायबर खुर्च्या पुरविणे व जागेवर व्यवस्थीत मांडणी करणे. | ४०० नग | ७.०० प्र. नग प्र. दि. | २८००.०० | -- |
| ०३ | २०'x३०' साईजचे स्टेज, ३' उंचीचे स्टेज, स्टेजवर मॅटीन, स्टेजचे मागील बाजूस पडदा, स्टेजचे वरिल बाजूने ताडपत्री बसवून स्टेज तयार करणे व आतिल बाजूने सुशोभित कापड बांधणे, व स्टेजचे तिन बाजूने साईडपट्टी लावणे , स्टेजवर जाणेकामी जिना, इ. सह भक्कम अशी स्टेज व्यवस्था. | ६००.०० चौ. फुट | १५.०० प्र. चौ. फुट प्र. दि. | ९०००.०० | ८४००.०० |
| ०४ | भुमिपूजन कार्यक्रमाचे ठिकाणी (कोनशिलेजवळ) १५'x२०' साईजचा कापडी मंडप उभारणे | ३००.०० चौ. फुट | ६.०० प्र. चौ. फुट प्र. दि. | १८००.०० | -- |
| **सर्व्हे नं. ३४१ व ३४८ राहाता- पिंपळवाडी रस्ता, राहाता येथे :-** | | | | | |
| ०१ | भुमिपूजन कार्यक्रमाचे ठिकाणी (कोनशिलेजवळ) २०'x३०' साईजचा कापडी मंडप बिछायतीसह उभारणे | ६००.०० चौ. फुट | ६.०० प्र. चौ. फुट प्र. दि. | ३६००.०० | ३६००.०० |
| **शिर्डी नगरपंचायत, शिर्डी कार्यालयाजवळ :-** | | | | | |
| ०१ | भुमिपूजन कार्यक्रमाचे ठिकाणी (कोनशिलेजवळ) २०'x३०' साईजचा कापडी मंडप बिछायतीसह उभारणे | ६००.०० चौ. फुट | ६.०० प्र. चौ. फुट प्र. दि. | ३६००.०० | ३६००.०० |
| **नविन पिंपळवाडी रस्ता श्री हरी कॉम्पलेक्स जवळ :-** | | | | | |
| ०१ | भुमिपूजन कार्यक्रमाचे ठिकाणी (कोनशिलेजवळ) २०'x३०' साईजचा कापडी मंडप बिछायतीसह उभारणे | ६००.०० चौ. फुट | ६.०० प्र. चौ. फुट प्र. दि. | ३६००.०० | -- |
| | | | **एकुण** | ५०३२०.०० | ३९,३६०.०० |
| | **एकुण अदा करावयाची रक्कम रुपये.** | | | | **३९,३६०.००** |

वरिल प्रमाणे मंडप व इतर व्यवस्था करुन घेणेत आली असून, त्याचे ठेकेदार रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर यांनी करुन दिली असून, त्याचे त्यांनी एकुण रुपये ४३,९२०/- मात्रचे बिल सादर केले आहे. करीता ठेकेदार यांनी उपरोक्त प्रमाणे साईटवर केलेले प्रत्यक्ष कामाचे मोजमापानूसार त्यांना एकुण रुपये ३९,३६०/- मात्र रक्कम देय होते.

तसेच सदरहू कार्यक्रमासाठी आवश्यक असणाऱ्या ०३ नग कोनशिला पोतदार आर्टस, नाशिक यांचेकडून ०२ नग (नविन पिंपळवाडी रस्ता उद्‌घाटन व शिर्डी शहर एकात्मिक रस्ते) व जाधव मार्बल, नाशिक यांचेकडून ०१ नग (घनकचारा प्रक्रीया प्रकल्प) तयार करुन आणल्या असून, त्याचे त्यांनी एकुण रुपये २३,४४६/- मात्र रकमेची बिले सादर केली आहेत. असे एकुण रुपये ६२,८०६/- मात्र इतका खर्च आलेला आहे.

**ब)** त्यानंतर वरीलप्रमाणे समारंभ दिनांक २९.०७.२०१० रोजी आयोजित करणेत आला. उपरोक्त कार्यक्रमाची पूर्व तयारी म्हणून खालील प्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करून घेणेत आली असून, यासाठी खालील तपशिलानूसार खर्च आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था :-**

| अ. नं. | कामाचे ठिकाण / तपशिल | परिमाण / एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| **शिर्डी बसस्थानक येथे.** | | | | |
| ०१ | शिर्डी बसस्थानकाचे आवारामध्ये बांबू व बल्या वापरुन छताकरीता प्लास्टीक ताडपत्री टाकुण आतिल बाजूने सुशोभित एकसारख्या रंगाचे कापड बांधून ५४'x८०' साईजच्या कापडी मंडपाची उभारणी करुन संपूर्ण मंडपामध्ये मॅटीन टाकणे. मंडपाचे खांबास खांबोळी बांधणे इ. सह मंडप उभारणी करणे. | ४३२०.०० चौ.फुट | ६.०० प्र. चौ. फुट प्र. दि. | २५९२०.०० |
| ०२ | उपस्थीत मान्यवरानां बसणेकामी ४०० नग फायबर खुर्च्या पुरविणे व जागेवर व्यवस्थीत मांडणी करणे. | ४०० नग | ७.०० प्र. नग प्र. दि. | २८००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | १६'x२८' साईजचे स्टेज, ३' उंचीचे स्टेज, स्टेजवर मॅटीन, स्टेजचे मागील बाजूस पडदा, स्टेजचे वरिल बाजूने ताडपत्री बसवून स्टेज तयार करणे व आतिल बाजूने सुशोभित कापड बांधणे, व स्टेजचे तिन बाजूने साईडपट्टी लावणे , स्टेजवर जाणेकामी जिना, इ. सह भक्कम अशी स्टेज व्यवस्था. | ४४८.०० चौ. फुट | १५.०० प्र. चौ. फुट प्र. दि. | ६७२०.०० |
| **सर्व्हे नं. ३४१ व ३४८ राहाता- पिंपळवाडी रस्ता, राहाता येथे :-** | | | | |
| ०१ | भुमिपूजन कार्यक्रमाचे ठिकाणी (कोनशिलेजवळ) २०'x३०' साईजचा कापडी मंडप बिछायतीसह उभारणे | ६००.०० चौ. फुट | ६.०० प्र. चौ. फुट प्र. दि. | ३६००.०० |
| **शिर्डी नगरपंचायत, शिर्डी कार्यालयाजवळ :-** | | | | |
| ०१ | भुमिपूजन कार्यक्रमाचे ठिकाणी (कोनशिलेजवळ) २०'x३०' साईजचा कापडी मंडप बिछायतीसह उभारणे | ६००.०० चौ. फुट | ६.०० प्र. चौ. फुट प्र. दि. | ३६००.०० |
| **नविन पिंपळवाडी रस्ता श्री हरी कॉम्पलेक्स जवळ :-** | | | | |
| ०१ | भुमिपूजन कार्यक्रमाचे ठिकाणी (कोनशिलेजवळ) २०'x३०' साईजचा कापडी मंडप बिछायतीसह उभारणे | ६००.०० चौ. फुट | ६.०० प्र. चौ. फुट प्र. दि. | ३६००.०० |
| | | | **एकुण रुपये..** | **४६२४०.००** |

**स्वागत कमानी उभारणे :-**

| **अ. नं.** | **कामाचे ठिकाण / तपशिल** | **परिमाण / एकक** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| ०१ | शिर्डी बसस्थानकाचे प्रवेश व्दारासमोर तसेच सर्व्हे नं. ३४१ व ३४८ राहाता- पिंपळवाडी रस्ता, राहाता येथे २'x२' साईजची व ६ मीटर रुंदीच्या बॉक्स टाईप स्वागत कमाणी उभारणे | ०२ नग | १५००/- | ३०००.०० |
| | | | एकुण रुपये | ३,०००.०० |

**बोर्ड बॅनर तयार करणे :-**

| **अ. नं.** | **कामाचे ठिकाण / तपशिल** | **परिमाण / एकक** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| ०१ | शिर्डी बसस्थानक, नविन पिंपळवाडी, घनकचरा व रस्ते कार्यक्रमासाठीचे बोर्ड / बॅनर तयार करुन बसविणे. | ०६ नग (३९० चौ. फुट) | १२/- प्रति चौ. फुट | ४६८०.०० |
| | | | एकुण रुपये | ४६८०.०० |
| | | | एकुण खर्च अ+ ब रुपये.. | ५३९२०.०० |

वरिल ' अ ' प्रमाणे मंडप व इतर व्यवस्थेकामी यापूर्वी दि. २३.०६.२०१० रोजी ठरलेल्या कार्यक्रमासाठी इकडील जा. नं. ८०८९/२०१० दि. २१.०६.२०१० रोजीचे कार्यादेशानूसार ठेकेदार रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर यांचेकडून त्यांचे मंजूर दराने तसेच ' ब ' नूसारचे ०२ नग स्वागत कमानी उभारणीचे काम रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर यांचेकडून व सदरहू कार्यक्रमासाठी आवश्यक असणारे बोर्ड / बॅनर हेमंत आर्टस्, शिर्डी यांचेकडून करुन घेणेत आले असून, यासाठी एकुण रुपये ५३,९२०/- मात्र खर्च आलेला आहे.

तरी उपरोक्त उद्घाटन / भुमिपूजन कार्यक्रमासाठी वरिल प्रमाणे आलेले एकुण रुपये १,१६,७२६/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन व भूमिपूजन समारंभ कार्यक्रमासाठी आलेल्या एकुण रुपये १,१६,७२६/- मात्र व इतर अनुषंगिक सर्वसमावेशक खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच, कोणत्याही कार्यक्रमाचे नियोजनाबाबत अगोदर आठ दिवस स्थानिक विश्वस्तांना सांगणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२९** **शिर्डी कनकुरी रोडच्या कामात येणारी पिण्याचे पाण्याची पाईपलाईन शिफ्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे आर्थिक सहाय्यातून, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांचे माध्यमातून व शिर्डी नगरपंचायत, शिर्डी या अंमलबजावणी यंत्रणेमार्फत श्री क्षेत्र शिर्डी येथे शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना राबविण्यांत येत आहे. मा.व्यवस्थापन समितीच्या विविध निर्णयांनुसार, सदरहू प्रकल्प राबविणेबाबत मरारविम, नगरपंचायत व संस्थान यांचेमध्ये दि.१५/१०/२००६ रोजी झालेल्या समझोता करारनाम्यानुसार, या प्रकल्पांतर्गत शिर्डी शहर व परिसरातील

विविध एकूण २५ रस्ते तीन प्राधान्य गटात विकसित करण्यात येणार आहेत. त्यापैकी प्रथम प्राधान्यगटातील ५ रस्ते श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आर्थिक सहाय्यातून, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई विकसित करणार आहे. सदर रस्त्यांचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| रस्ता क्र. | तपशील |
|---|---|
| ०१ | शिर्डी निमगांव शिव रस्ता (न.म. रोड ते पुर्वेस ७७० मी. लांबी व ७.५० मी. रुंदीचा कॉंक्रीट रस्ता पदपथासह एकूण रुंदी- १०.१५ मी.) |
| ०२ | शिर्डी रुई दक्षिणोत्तर रस्ता (६२०मी. लांबी व ३ मी. रुंदीचा कॉंक्रीट रस्ता पदपथासह एकूण रुंदी- ६मी.) |
| ०४ | कनकुरी रस्ता (न.म.रस्ता ते पुनमनगरपर्यन्त - १०७० मीटर व ७.५ मी. रुंदीचा कॉंक्रीट रस्ता पदपथासह एकूण रुंदी- १२मी) |
| १० | गावठाण हद्दीतील विकास योजनेतील व्दारकामाई ते ताजीमखान बाबा चौकापर्यन्त ०९ मीटर रुंदीचा दक्षिणोत्तर ७५ मीटर लांबीचा पेव्हर ब्लॉक रस्ता. |
| ११ | गावठाण हद्दीतील विकास योजनेतील ०६ मीटर रुंदीचा दक्षिणोत्तर पालखी रस्ता ते नवीन पिंपळवाडी रस्ता ) ३० मीटर लांबीचा पेव्हर ब्लॉक रस्ता. |

उपरोक्त कामास रस्ते विकास महामंडळामार्फत सुरुवात करण्यात आलेली असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांनी शिर्डी नगरपंचायत व संस्थानला अग्रेषित केलेल्या त्यांचे पत्र क्र.१९६३, दि.२०/०७/२०१० अन्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

"सदर प्रकल्पातील शिर्डी -कनकुरी रस्त्याची खोदाई करतांना चेनेज ७०० ते ९०० मध्ये रस्त्याच्या मध्यापासून २ मी. व २.७ मी. अंतरावर जीवन प्राधिकरणाने टाकलेल्या ४०० मीमी व २५० मीमी व्यासाच्या पाईपलाईन्स टाकल्याचे आढळुन आले आहे. महामंडळाच्या धोरणानुसार सर्व वाहिन्या वाहकमार्गाच्या (७.५ मी.रुंदीच्या) बाहेर पेव्हरब्लॉकचे खाली असाव्यात, जेणेकरून भविष्यात काही बिघाड झाल्यास पाईपलाईन्स दुरुस्तीचे काम रस्त्याची तोडफोड न करता येईल. करीता सदरच्या पाईपलाईन्स हलविण्यात याव्यात."

याबाबत शिर्डी नगरपंचायत यांनी जा.क्र.५४६/१०, दि.२८/०७/२०१० अन्वये, सदर कामाच्या बाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाशी चर्चा केली असता सदर पाईप लाईन स्थलांतर करण्याचे काम करण्यास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ तयार आहे. तथापी त्यासाठी लागणारा निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी देणे आवश्यक आहे. तसे पत्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास मिळाल्यास पाईप लाईन स्थलांतराच्या कामास त्वरीत सुरुवात करता येईल. सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने रस्त्याचे काम बंद ठेवलेले आहे. तरी दि.१५/१०/२००६ रोजी झालेल्या करारनाम्यानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास सेवा वाहीन्या हलविण्यासाठी निधी देण्यात येईल याबाबत पत्र देण्यास विनंती आहे, असे कळविले आहे.

दि.१५/१०/२००६ रोजी संस्थान, नगरपंचायत व रस्ते विकास महामंडळ यांचे दरम्यान झालेल्या समझोता करारातील ARTICLE-II खालिल अट क्र.२ अन्वये जमीनीवरील अथवा जमीनीखालिल सेवा वाहीन्या निविदा मागविण्यापुर्वी स्थलांतरीत करण्याची तसेच नव्याने सेवा वाहीन्या टाकण्याची व्यवस्था नगरपंचायतीने करावी. त्यासाठी येणारा खर्च संस्थानने करावा अशी तरतुद करारनाम्यात आहे.

रस्ते विकास महामंडळामार्फत चालू करण्यात आलेले रस्त्याचे काम विहीत मुदतीत पुर्ण करावयाचे असल्यामुळे सदरचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे माध्यमातुन करता येईल. तथापी सदर कामासाठी संस्थानतर्फे निधी उपलब्ध करणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ अन्वये शासनाची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील.

तरी वरीलप्रमाणे सेवावाहीन्या स्थलांतरीत करणेसाठी आवश्यक तो निधी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांचेकडे वर्ग करणेसाठी मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.६४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रस्तावाबाबत सविस्तर माहिती देतांना आजचे सभेत सांगितले की, विषयांकित रस्ता विकसित करण्याचे काम मरारविम यांचे बांधकाम ठेकेदारामार्फत प्रत्यक्षात सुरु झालेनंतर, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे या रस्त्यांमध्ये जलवाहिनी येत असल्याचे निदर्शनास आल्याने, मरारविम व त्यांचे ठेकेदारांनी सदरहू जलवाहिनी स्थलांतरीत करणेबाबत संस्थान व नगरपंचायतीस कळविले. वास्तविक पहातां, मरारविम यांचेशी करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार, विकसित करण्यात यावयाच्या रस्त्यांमधील विविध सेवावाहिन्या स्थलांतरीत करण्याची कार्यवाही व जबाबदारी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी पार पाडावयाची होती. यासाठी येणारा खर्च संस्थानमार्फत आदा करणेत येणार होता. तथापि नगरपंचायतीने सदरहू काम केलेले नाही. मरारविम व त्यांचे बांधकाम ठेकेदार यांनी सदरहू बाब लक्षात आणून दिलेनंतर नगरपंचायतीचे व मरारविम यांचे अधिकाऱ्यांशी याबाबत सविस्तर चर्चा करणेत आली. या चर्चेचे दरम्यान, सदरहू काम मरारविम यांनी त्यांचे बांधकाम ठेकेदार यांचेकडून**

**त्यांचे पर्यवेक्षणाखाली पूर्ण करुन घ्यावे व त्यांचे अभिप्रायाप्रमाणे सदर कामाची होणारी रक्कम संस्थानकडून आदा करणेत येईल, असे सुचित करणेत आले. तथापि, याबाबत मरारविम यांचे प्रतिनिधींनी जलवाहिन्या स्थलांतरीत करणे अशा प्रकारची कामे ते दुसऱ्या सक्षम तांत्रिक संस्थेच्या सहाय्याने व पर्यवेक्षणाखाली नेहमी करुन घेतात, तसेच त्यांचे माध्यमातून विहीत पध्दतीने सदर काम करणेस, मोठा कालावधी लागण्याची शक्यता आहे, असे सांगितले. तसेच कार्यकारी अभियंता, मरारविम, पुणे यांनी त्यांचेकडील दिनांक ०४ ऑगष्ट, २०१० रोजीचे पत्राने, रस्त्यांची कामे जलद गतीने पूर्ण होण्याचे दृष्टीने सर्व प्रकारच्या सेवावाहिन्या स्थलांतरीत करण्याची कार्यवाही तातडीने करावी, असे कळविले आहे.**

**थोडक्यात, मा. कार्यकारी अधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी, वरिष्ठ मुख्य अभियंता, नगरपंचायतीचे व मरारविम अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत व चर्चेत, मरारविम हे त्यांच्या अखत्यारीत व जबाबदारीत जलवाहिन्या स्थलांतरीत करण्याचे काम करणार नाहीत, असे स्पष्ट झाले. त्यामुळे विषयांकित प्रस्ताव आजचे सभेपुढे सादर करणेत आलेला आहे.**

**मा. कार्यकारी अधिकारी यांनी निवेदन केलेल्या वस्तुस्थितीवर आजचे सभेत सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत प्रथम प्राधान्य गटातील संस्थानमार्फत थेट विकसित करण्यात यावयाच्या ०६ रस्त्यांचे काम नुकतेच, म्हणजे दिनांक ०४ जुलै, २०१० रोजीचे सभेतील निर्णयानुसार मे. रोमन टारमॅट लि.,नवी मुंबई यांना देणेत आलेले आहे. विषयांकित रस्त्याचे कामात येणाऱ्या जलवाहिन्या मरारविम यांचे काम जलद गतीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने तातडीने स्थलांतरीत करणे गरजेचे आहे. मरारविम यांनी सदर काम त्यांचे अखत्यारीत घेण्यास असमर्थता दर्शविल्याने, अशा प्रकारचे काम करण्याचा मोठया प्रमाणावर अनुभव असलेल्या संस्थेकडून म्हणजेच मे. रोमन टारमॅट लि., नवी मुंबई यांचेकडून करुन घेणे योग्य व उचित राहील. यासाठी मे. रोमन टारमॅट लि., मुंबई यांचेकडून दर पृथःक्करणासह सविस्तर प्रस्ताव घेणेत यावा. मे. रोमन टारमॅट लि.,नवी मुंबई यांना पुर्वी देण्यात आलेल्या कार्यादेशाच्या अटी शर्तीस अधिन राहून, विषयांकित रस्त्याच्या जलवाहिन्या स्थलांतरीत करण्याचे काम पुरवणी आदेश म्हणून त्यांना देणेत यावे. तथापि, सदर कामासाठीचे दर व त्यानुसार येणारा खर्च प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे यांचेकडून प्रमाणित करुन घ्यावा. दिनांक १५ ऑक्टोबर, २००६ रोजीचे समझोता करारनाम्यातील अटी शर्तीनुसार विषयांकित रस्त्यातील जलवाहिन्या स्थलांतरीत करण्यासाठी संस्थानमार्फत रक्कम आदा करण्यात यावी. यासाठी अंदाजित रक्कम रुपये ६० लाख मात्र पर्यन्तचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्ते विकसित करणेसाठी येणारा सर्व खर्च संस्थानमार्फत करण्यात येणार आहे व त्यासाठी शासनाकडे या प्रकल्पाच्या रक्कम रुपये ८८ कोटी मात्रच्या वाढीव व सुधारीत खर्चाच्या मान्यतेसाठी यापूर्वीच प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर प्रस्तावात वाढीव खर्चाचा अंतर्भाव आहे. सदर रुपये ८८ कोटी मात्रच्या खर्चाचे प्रस्तावास शासन मान्यता मिळणेसाठी वरिष्ठ स्तरावरुन पाठपुरावा करावा, दरम्यानचे कालावधीत काम प्रगतीत व सुरु ठेवावे, असे ठरले.** (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.३०** **फर्निचर खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** संस्थानचे विविध विभागांसाठी नेहमीच टेबल, खुर्ची, कपाट यांची आवश्यकता भासत असते, त्यानुसार याबाबत सर्व विभागांना लागणारे आवश्यक असणारे फर्निचरबाबत खरेदी विभागाकडे दाखल झालेली मागणी परिपत्रकान्वये एकत्रित करण्यात आलेली आहे.

विभागांची असणारी मागणीचे परिशिष्ठ सोबत जोडले आहे. त्यानुसार नामंकित कंपनीचे (गोदरेज, निलकमल इ.) फर्निचर खरेदीसाठी अंदाजे रु. २४,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर फर्निचरबाबत स्वतंत्रपणे निविदा तयार करुन वर्तमानपत्रात जाहिर निविदा सुचना प्रसिद्ध करुन नामांकित कंपनींच्या अधिकृत वितरकांकडून फर्निचर खरेदी करता येईल. सर्व विभागांची फर्निचर खरेदीचा एकत्रित तपशिल (समरी) खालीलप्रमाणे-

| अ.नं. | फर्निचर मागणी तपशिल | मागणी संख्या | अंदाजे एकुण किमंत |
|---|---|---|---|
| ०१. | रिव्हॉलव्हींग खुर्ची हाताची | ५२ | ५,२०,०००/- |
| ०२. | रिव्हॉलव्हींग खुर्ची बिगर हाताची | १५ | ९०,०००/- |
| ०३. | स्टील कपाट | ४१ | ४,९२,०००/- |
| ०४. | टेबल | ५८ | ६,९६,०००/- |
| ०५. | प्लॅस्टिक खुर्ची हाताची | ७८६ | ३,९३,०००/- |
| ०६. | प्लॅस्टिक खुर्ची बिगर हाताची | ५० | १५,०००/- |
| ०७. | वेटींग खुर्ची | २०० | ६०,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०८. | लॉकर कपाट | ४ | ८०,०००/- |
| | | **अंदाजे एकुण किमंत** | **२३,४६,०००/-** |
| | | **एकुण पुर्णांकित किमंत** | **२४,००,०००/-** |

तरी सदर खरेदीकामी एकुण अपेक्षित अंदाजे रु.२४,००,०००/- (रक्कम रु.चोवीस लाख) मात्रचे खर्चास व जाहिर निविदा सुचना तयार करुन ती वर्तमानपत्रात जनसंपर्क कार्यालयामार्फत प्रसिद्ध करणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६४१ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे फर्निचर खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहीर निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २४,००,०००/-चे खर्चास मान्यता देण्यात आली. सदर फर्निचरची स्थानिक विश्वस्तांनी समक्ष पहाणी करावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग/जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.३१ सन २०१०-११ वार्षिक पाणीपुरवठा,ध्वनीक्षेपन, आरोग्य व बगीचा विभाग साहित्य व कार्यालयीन स्टेशनरी खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१०-११ सालामध्ये संस्थानचे पाणीपुरवठा, ध्वनीक्षेपण, बगीचा व आरोग्य विभागाचे दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक साहित्य तसेच कार्यालयीन व संगणक स्टेशनरी खरेदी करावयाची आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१. | पाणीपुरवठा विभाग | रु. १९,६६,१४५.०० |
| ०२. | ध्वनीक्षेपण विभाग | रु. ०८,३०,५०६.०० |
| ०३. | आरोग्य विभाग | रु. १५,२३,२८०.०० |
| ०४. | बगीचा विभाग | रु. ५५,२४०.०० |
| ०५. | कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी साहित्य | रु. १०,००,०००.०० |
| | एकुण | रु.५३,७५,१७१.०० |
| | **पुर्णांकित रक्कम** | **रु.५४,००,०००.००** |

उपरोक्तप्रमाणे सदर खरेदीस अंदाजे पुर्णांकित रु.५४,००,०००/-पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ कलम १७ मध्ये समितीचे कर्तव्ये व अधिकार दिलेले असून त्यातील पोटकलम २ (झ) तरतुदीनुसार सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद केलेले आहे. त्यानुसार वरीलप्रमाणे साहित्य खरेदीकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत येईल.

०१. पाणीपुरवठा विभागासाठी आवश्यक असणारे हार्डवेअर साहित्य, प्लंबींग व मेंटेनन्स साहित्यासाठी स्वतंत्रपणे निविदा मागणी करणेत येईल.

०२. ध्वनीक्षेपण विभागासाठी आवश्यक असणारे हार्डवेअर साहित्य व मेंटेनन्स साहित्यासाठी स्वतंत्रपणे निविदा मागणी करणेत येईल.

०३. आरोग्य विभागासाठी आवश्यक असणारे साहित्य औषधे व किटकनाशके साहित्यासाठी एकत्रित निविदा मागणी करता येईल.

०४. बगीचा विभागासाठी आवश्यक असणारे साहित्य, खते, औषधे व किटकनाशके साहित्यासाठी एकत्रित निविदा मागणी करता येईल.

०५. कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी साहित्य तसेच झेरॉक्स मशीनसाठी आवश्यक असणारे टोनर इंक, ओपीडी डम व डेव्हलपर हे (श्रीसाईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल वगळता) निविदेत समाविष्ट करुन एकत्रित निविदा मागणी करणेत येईल.

उपरोक्त प्रमाणे सन २०१०-११ साठी आवश्यक असणारे वार्षिक साहित्याचे खरेदीसाठी अंदाजे रक्कम रु.५४,००,०००/- पर्यंत अपेक्षित खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे तत्वतः मान्यतेनंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागणी करणेत येईल. त्यानंतर संबंधितांशी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये चर्चा तथा वाटाघाटी करुन खरेदीबाबत निर्णय घेता येईल.

तरी वरीलप्रमाणे वार्षिक खरेदीस तत्वतः मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सन २०१०-११ साठी आवश्यक असणारी वार्षिक पाणीपुरवठा, ध्वनीक्षेपन, आरोग्य व बगीचा विभागासाठी साहित्य व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५४,००,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.३२ हिरवी विलायची व हळद अखंड खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** प्रसादालयासाठी सन २०१०-११ करिता वार्षिक दर पद्धतीने दि.०१.०४.२०१० ते दि.३१.०३.२०११ अखेर खालीलप्रमाणे माल पुरविणेकामी मे.डी.जे.ॲण्ड सन्स, पुणे यांना इकडील जा.नं.६०७०/१९.०४.१० अन्वये पुरवठा आदेश दिलेला आहे.

| अ.नं. | मालाचा तपशिल | परिमाण क्विंटल | मंजुर दर प्रती क्विंटल |
|---|---|---|---|
| ०१. | मैदा | ३५० | १,८७०/- |
| ०२. | हिरवी विलायची बोल्ड | ५० | १,१७,५००/- + ५% व्हॅट |
| ०३. | हळद अखंड | १०० | १४,०००/- + ५% व्हॅट |
| ०४. | कच्चे पोहे | १२ | १,९३०/- |
| ०५. | जीरे-डायमंड कट | ५० | १२,२००/- + ५% व्हॅट |

तथापि त्यांनी दि.२९.०५.१० चे पत्रान्वये हिरवी विलायचीचे दर प्रति किलो रु.१५५०/- ते १६००/- पर्यंत वाढल्याचे कळविले आहे. तसेच दि.०२.०६.१० चे पत्रान्वयेही हिरवी विलायचीचे दरात प्रति किलो रु.४००/-ते ५००/- दरवाढ झाल्याने वार्षिक टेंडर दरात रु.५००/- प्रती किलो दरवाढ मिळणेस व हळद अखंडचे दरात प्रती किलो रु.४०/-ते ५०/- दरवाढ झाल्याने दरवाढीचा विचार करणेबाबत विनंती केली आहे. त्याप्रमाणे मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.०४.०७.२०१० रोजीचे सभेत उपरोक्त विषय मान्यतेसाठी ठेवणेत आला असता, मा. विश्वस्तांनी हिरवी विलायची व हळद अखंड खरेदी करणेबाबत नियमित पुरवठाधारकांकडून त्यांचे लेटर हेडवर दरपत्रक व नमुने मागविण्यात यावे असे कळविले.

त्यानुसार इकडील जा.नं.एसएसएस/खरेदी/८२०२/१० दि.०६.०७.१० नुसार नियमीत पुरवठाधारकांकडून दरपत्रक व नमुने मागणी करण्यात आली. मुदतीअंती खालीलप्रमाणे पुरवठाधारकांचे दरपत्रक व नमुने प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | रामनाथ जगन्नाथ, नाशिक |
| ०२. | डी.जे.ॲण्ड सन्स, पुणे |
| ०३. | सुरेश पुनमचंद बागमार, पुणे |
| ०४. | बाफणा बाजार, नाशिक |
| ०५. | संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव |
| ०६. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक |
| ०७. | सोनदुर्ग सन्स, वाशी |

उपरोक्त प्रमाणे पुरवठाधारकांना मा.व्यवस्थापन मंडळाचे उप समितीचे दि.१३.०७.२०१० रोजीचे सभेत चर्चा व वाटाघाटीसाठी आमंत्रित करण्यात आले होते. मा.विश्वस्तांनी प्राप्त नमुने निवडून पुरवठाधारकांशी समक्ष चर्चा वाटाघाटी करुन दर व नमुने यांचा विचार होऊन सोबतच्या परिशिष्ठात दर्शविल्याप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे. तसेच मे.डी.जे.ॲण्ड सन्स, पुणे यांनी इकडील जा.नं.६०७०/१९.०४.१० अन्वये देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार दरवाढ देत येत नाही. पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा न केल्यास त्यांची देय सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याची तरतूद आहे. तथापि हिरवी विलायची व हळद या मालाचे बाजारभावत अनुक्रमे ४२% व २८% दरवाढ झाल्याने दरवाढीबाबत तसेच त्यांनी दरवाढ झालेली असतांनाही आजपावेतो मालाचा पुरवठा चालु ठेवलेला आहे याचा विचार होऊन त्यांची देय सुरक्षा अनामत रक्कम जप्त न करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

तरी मे.डी.जे.ॲण्ड सन्स यांचेकडून हिरवी विलायची ४० क्विंटल, प्रती क्विंटल रु.१,५५,०००/-+ ५% व्हॅट या दराने व हळद अखंड ८० क्विंटल, प्रती क्विंटल रु.१६,०००/- दराने खरेदी करणेस व त्यांची देय सुरक्षा अनामत रक्कम जप्त न करणेबाबत मान्यता मिळणेसाठी सादर.

**निर्णय क्र.६४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मे.डी.जे.ॲण्ड सन्स यांचेकडून हिरवी विलायची ४० क्विंटल, प्रती क्विंटल रु.१,५५,०००/-+ ५% व्हॅट या दराने व हळद अखंड ८० क्विंटल, प्रती क्विंटल रु.१६,०००/- दराने खरेदी करण्यात यावी तसेच त्यांची देय सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊ नये असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.३३ श्री साईबाबा हॉस्पिटलच्या सर्व सेंट्रल ए.सी.प्लांटचे एअर फिल्टर खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये विविध ठिकाणी सेंट्रल ए.सी.प्लांट बसवून कार्यरत आहेत. सदरचे सर्व प्लांट सातत्याने कार्यरत असतात. रिकव्हरी वॉर्ड व सर्व ऑपरेशन थिएटर्समध्ये हृदय विकारावरील अत्यंत महत्त्वाच्या शस्त्रक्रिया करण्यात येतात. अशा सर्व ठिकाणी व्हेन्टीलेशन किंवा तापमान नियंत्रित राहावे, यासाठी ए.सी.प्लांट विनाखंडीत कार्यरत ठेवावे लागतात. ए.सी.प्लांटव्दारे ऑपरेशन थिएटरमध्ये होणारे हवेचे व्हेन्टीलेशन बॅक्टेरिया विरहित होण्याकरीता सदर प्लांटला १० व ५ मायक्रॉनचे एअर फिल्टर बसविण्यात आलेले आहे. वेळोवेळी केल्या जाणा-या सर्व्हिसिंग, साफसफाई व ते जुने झाल्याने सदर

फिल्टर खराब होऊन बॅक्टेरिया विरहित हवेचे व्हेन्टीलेशन सध्या ए.सी. प्लांटव्दारे होत नाही. त्यामुळे Air Exposure Possitive येत असल्याचे उपरोक्त संदर्भान्वये कळविण्यात आलेले आहे.

सर्व ऑपरेशन थिएटर्स मध्ये शस्त्रक्रिया करत असतांना अथवा शस्त्रक्रिया झाल्यानंतर सदर ठिकाणी वातावरणातील हवा वावरु नये, याकरीता सर्व ए.सी.प्लांटचे एअर फिल्टर बदलविणे गरजेचे आहे. बदलाव्या लागणा-या एअर फिल्टरचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | Description | Qty | Unit Cost | Total Cost |
|---|---|---|---|---|
| 01) | 10 Micron Filters of Air handling Unit, Size :- 610 x 610 x 150 | 09 Nos. | 4,000.00 | 0,36,000.00 |
| | Size :- 610 x 610 x 50 | 02 Nos. | 2,000.00 | 0,04,000.00 |
| | Size :- 610 x 305 x 150 | 01 Nos. | 2,000.00 | 0,02,000.00 |
| 02) | 5 Micron Filters of Air handling Unit, Size :- 610 x 610 x 300 | 09 Nos. | 7,500.00 | 0,67,500.00 |
| | Size :- 610 x 610 x 150 | 02 Nos. | 4,500.00 | 0,09,000.00 |
| | Size :- 610 x 305 x 300 | 01 Nos. | 5,500.00 | 0,05,500.00 |
| | | | Total :- | 1,24,000.00 |
| | | | + Vat 12.5% | 0,15,500.00 |
| | | | Total Rs. :- | 1,39,500.00 |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटलच्या सर्व सेंट्रल ए.सी.प्लांटचे एअर फिल्टर खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये १,३९,५००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

सदरचे एअर फिल्टर कोटेशन मागवून खरेदी करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटलच्या सर्व सेंट्रल ए.सी.प्लांटचे एअर फिल्टर कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,३९,५००/-चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.३४ साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ प्रकल्पाचे विद्युतीकरण कामाचे अर्थिंग वायरिंग करणे बाबत**

**प्रस्ताव-** साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ प्रकल्पाचे बांधकाम व इमारतीच्या आतील विद्युतीकरणाचे काम ठेकेदार मे.पार्श्वनाथ डेव्हलपर्स प्रा.लि. यांचे मार्फत चालू आहे.या प्रकल्पाचे आर्कीटेक्ट मे.डि.ओ.निकम, पुणे यांनी टेंडरमधील वायरींग कामामध्ये लाईट पॉईंट व फॅन पॉईंट करीता अर्थिंग करण्याच्या कामाचा समावेश केलेला नाही.

लाईट व फॅन पॉईंट करीता अर्थिंग वापरली गेली नसल्यास टयुब फिटींग किंवा फॅन फिटींग उपकरणामध्ये दोष निर्माण झाल्यास उपकरणाची बॉडी विद्युत प्रवाही बनते. अशा परिस्थितीत उपकरण कंट्रोलकरीता वापरण्यात आलेले RCCB + ELCB आपोआप बंद व्हायला हवेत. परंतू उपकरणाला अर्थिंग जोडली गेलेली नसल्यामुळे RCCB + ELCB Trip होणार नाहीत परिणामी उपकरण खराब झाल्यानंतर नकळत कोणी भक्ताने या उपकरणांना हात लावला तर या भक्तांना तसेच उपकरण दुरुस्त करणारा टेक्निशियन कर्मचारी यांना काम करतेवेळी शॉक बसून प्राणघातक अपघात होण्याची शक्यता आहे. याकरीता सुरक्षितता म्हणून प्रत्येक लाईट पॉईंट व फॅन पॉईंट यांना अर्थिंग करणे गरजेचे आहे.

मे.डॉर्च कन्सल्टंट (इंडिया) प्रा.लि., मुंबई यांनी प्रकल्पांचे सर्व रुम व हॉलमध्ये अर्थिंग काम करणेकरीता रक्कम रुपये १५,७७,३५५/- इतका जादा खर्च येणार असल्याचे कळविले आहे.

लाईट व फॅन पॉईंटकरीता अर्थिंग करणे कामाचा समावेश टेंडरमध्ये नसल्यामुळे या कामाचा खर्च संस्थानला करावा लागणार आहे. या जादा कामाची रक्कम साईआश्रम प्रकल्पाचे ठेकेदार मे.पार्श्वनाथ डेव्हलपर्स यांना आदा करावी लागेल. लाईट पॉईंट व फॅन पॉईंटला अर्थिंग करुन घेण्याच्या वायरींग कामाकरीता रक्कम रुपये १५,७७,३५५/- मात्र खर्च येणारा आहे.

**निर्णय क्र.६४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम इमारतीचे देणगीदार श्री.रमनीसर हे या कामासाठी येणारा खर्च परस्पर संबंधित ठेकेदारास आदा करणार असल्याने सदरहू विषय मागे घेण्यात आला.**

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख/बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३५ सन २०१०-११ करीता ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** पाणी पुरवठा विभागाचे कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुध्दीकरणांसाठी ब्लीचिंग पावडर विक्रम (ग्रासीम) ब्रँड डी.सी.एच.(डी.एस.सी.एल.) आय.एस.आय. मार्क ३४ % क्लोरीन उपलब्ध,फेरीक ॲलम-१६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध व क्लोरीन गॅस सिलेंडर (१०० किलोचे) यांची दैनंदिन आवश्यकता भासते. मागील वर्षी आपण मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार वार्षिक खरेदीमध्ये निविदा मागवून नियमानुसार खरेदी केलेली आहे. सदरच्या मटेरियलचा झालेला खर्च तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | मागणी कालावधी | मागणी | जुन २०१० अखेर खर्च | शिल्लक येणे बाकी |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | ब्लीचिंग पावडर. | ०१-०७-२००९ ते ३०-०६-२०१० | ३५ टन. | २७ टन. | ०८ टन. |
| ०२. | फेरीक ॲलम. | ०१-०७-२००९ ते ३०-०६-२०१० | ६० टन. | ४७ टन. | १३ टन |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०३. | क्लोरीन गॅस सिलेंडर. | ०१-०७-२००९ ते ३०-०६-२०१० | ४० सिलेंडर. | २४ सिलेंडर. | ११ सिलेंडर. |

पुढील वर्षासाठी सन २०१०-२०११ करीता नविन निविदा मागवून मटेरियल खरेदी करणे आवश्यक आहे. त्यात खालील प्रमाणे मटेरियलची आवश्यकता आहे.

| अ.नं. | तपशिल | आवश्यकता | अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | **ब्लीचिंग पावडर.** विक्रम (ग्रासीम) ब्रँड डी.सी.एच. (डी.एस.सी.एल.) आय.एस.आय. मार्क ३४ % क्लोरीन उपलब्ध. | ३५ टन. | रु.१८,०००/- प्रती टन. १२.५ % वॅटसह. | ६,३०,०००.०० |
| ०२. | **फेरीक ॲलम.** (१६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध) | ६० टन. | रु.८,०००/- प्रती टन. १२.५ % वॅटसह. | ४,८०,०००.०० |
| ०३. | क्लोरीन गॅस सिलेंडर. (प्रत्येकी १०० किलोचे) | ४० सिलेंडर. | रु.५०००/- प्रती सिलेंडर ४ % वॅटसह. | २,००,०००.०० |
| | | | **अंदाजे एकुण खर्च -** | **१३,१०,०००.००** |

संस्थानमध्ये पाण्याचा दैनंदिन वापर वाढल्यामुळे तसेच तळयात येणारे गाळ मिश्रीत पाणी सेटलींग टँकमध्ये जादा वेळ सेटल न होता फिल्टरमध्ये जमा होत असल्याने पाण्याची क्वॉलीटी खराब येत आहे. त्यामुळे पाण्याचा वास येत असल्याने वाढीव ॲलम, ब्लीचिंग व क्लोरीन गॅसचा वापर करावा लागत आहे. त्यामुळे मागील वर्षाप्रमाणेच ॲलम, ब्लीचिंग व क्लोरीन गॅस सिलेंडरची मागणी करण्यात आलेली आहे.

तरी वरील प्रमाणे पाणी शुध्दीकरणांकरीता लागणारे मटेरियल विहित पध्दतीने खरेदी विभागामार्फत कोटेशन मागवून खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणा-या अंदाजे रु. १३,१०,०००/- मात्रचे खर्चास मंजुरी मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.६४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे पाणी शुध्दीकरणकरणेकामी सन २०१०-११ करीता आवश्यक असणारे ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर इ. विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रु. १३,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.३६ लॉण्ड्रीकरीता केमिकल्स/डिटर्जंट खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील लॉण्ड्रीमध्ये निवासस्थाने, साईनाथ रुग्णालय, साईबाबा रुग्णालय, मंदिर, वाहन इ. विभागाकडील चादर, बेडशीट, रग, गादी कव्हर, उशीकव्हर, लिनन, ॲप्रन, बसेसचे शीट कव्हर, आदी कपडे धुवून इस्त्री करुन देण्यात येतात. याकामी लॉण्ड्रीकडे कामकाज दोन पाळयांमध्ये करण्यात येत आहे. सदरचे कपडे धुण्याचे कामी २ युनिट (दोन मशिनरी) कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. त्याद्वारे प्रतिदिवशी साधारणपणे १५०० नग कपडे धुवून इस्त्री केले जातात.

लॉण्ड्रीकडे कपडे धुण्यासाठी सध्या केमिकल / डिटर्जंट, लिक्वीड मे. मिनीटेक, ५५, शलाका, डि. एन नगर, अंधेरी (वेस्ट) मुंबई यांचेकडील वापरण्यात येत आहे. त्याची माहे जानेवारी -२००९ ते डिसेंबर-२००९ या एक वर्षाचे कालावधीकरीता जा.नं.एसएसएस-वशी/खरेदी-साभनि/२९०३/२००९ दि.१७/०३/२००९ रोजीचे पुरवठा आदेशाने मागणी करण्यात आलेली होती त्याप्रमाणे त्याचा पुरवठा खालील तपशीलाप्रमाणे करण्यात आलेला आहे.

**अ)**

| अ.नं. | तपशील | किलो.ग्रॅम /लिटर | प्रति कि.लो /लिटर दर रुपये | एकुण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | नॉक्स -१०० | ६५० कि.ग्रॅ | ८८ प्रति कि.ग्रॅ | ५७,२००/- |
| ०२ | नॉक्स- बुस्ट | १३०० कि.ग्रॅ | ४६ प्रति कि.ग्रॅ | ५९,८००/- |
| ०३ | नॉक्स- सोर | ३२५ कि.ग्रॅ. | ४८ प्रति कि.ग्रॅ. | १५,६००/- |
| ०४ | नॉक्स लिक्वीड ब्लिंच | ५५० लिटर | २२ प्रति लिटर | १२,१००/- |
| | | | एकुण रक्कम रु. | १,४४,७००/- |

उपरोक्त मालाचा वापर दि.१९/०७/२००९ पासुन केलेला असुन सध्या साईबाबा भक्तनिवासस्थान लॉण्ड्री विभागाकडे खालीलप्रमाणे साठा शिल्लक आहे.

| **अ.नं.** | **तपशील** | **किलो.ग्रॅम/ लिटर** | **प्रति कि.लो /लिटर दर रुपये** | **एकुण रक्कम रुपये पैसे** |
|---|---|---|---|---|
| **०१** | नॉक्स -१०० | २५८.२२५ ग्रॅम | ८८ प्रति कि.ग्रॅ | २२,७२३-८० |
| **०२** | नॉक्स- बुस्ट | ५२६.२०० ग्रॅम | ४६ प्रति कि.ग्रॅ | २४,२०५-२० |
| **०३** | नॉक्स- सोर | १६६.१७५ ग्रॅम | ४८ प्रति कि.ग्रॅ. | ७,९७६-४० |
| **०४** | नॉक्स लिक्वीड ब्लिंच | ४२८.४५० लिटर | २२ प्रति लिटर | ९,४२५-९० |
| | | | एकुण रक्कम रुपये | ६४,३३१-३० |

वरीलप्रमाणे साठा शिल्लक असुन तो साधारणपणे माहे जुन-२०१० पर्यत पुरु शकेल.

माहे जुलै-२०१० ते माहे जुन-२०११ या एक वर्षाचे कालावधीकरीता मे. मिनिटेक, अंधेरी, मुंबई यांचेकडील केमिकल्स/डिटर्जंट खरेदी करावयाचे झाल्यास अंदाजे खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| **अ.नं.** | **तपशील** | **किलो.ग्रॅम** | **अंदाजे प्रति कि.लो /लिटर दर रुपये** | **एकुण रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| ०१ | नॉक्स १०० | ७०० किलो | १०१/- | ७०,७००/- |
| ०२ | नॉक्स बुस्ट | १४०० किलो | ५३/- | ७४,२००/- |
| ०३ | नॉक्स सोर | ३५० किलो | ५५/- | १९,२५०/- |
| ०४ | नॉक्स लिक्वीड ब्लिंच | १०० लिटर | २५/- | २,५००/- |
| | | | एकुण रक्कम रुपये | १,६६,६५०/- |
| | | | पुर्णांकित रुपये | १,७०,०००/- |

वरील केमिकल्स /डिटर्जंट खरेदी केल्यास त्यास अंदाजे रुपये १,७०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख सत्तर हजार ) मात्र खर्च अपेक्षित आहे.

**<u>किंवा</u>**

**ब)** मे. डिलक्स क्लिनींग सिस्टीमस प्रा. लि. प्लॉट नं.५ व ६ आणि एल. आय. सी. कॉलनी, प्रशांत नगर, नवीपेठ, पुणे, यांचेकडे सिंगापुर (परदेशी बनावटीचे) लॉण्ड्री केमिकल उपलब्ध आहे. परदेशी बनावटीचे लॉण्ड्री केमिकल पुरवठा करणारे हे एकमेव पुरवठादार आहेत. जा.नं.एसएसएस/वशी-साभनि/१३०६०/२००९ दि.२४/१०/२००९ ने त्यांचेकडुन प्रायोगिक तत्त्वावर एक महिना पुरेल एवढे लॉण्ड्री केमिकल खालीलप्रमाणे खरेदी करुन वापरुन पाहिले आहे.

| अ.नं. | तपशील | किलो.ग्रॅम | प्रति कि.लो/लिटर दर रुपये | एकुण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | क्लेन अल्कली | ४८ किलो | १८६-०० | ८९२८-०० |
| ०२ | क्लेन प्राईम | ३९ किलो | १६९-०० | ६५९१-०० |
| ०३ | क्लेन एक्स्ट्रा | १० लिटर | २९४-०० | २९४०-०० |
| ०४ | क्लेन सोर | १३ किलो | २२२-०० | २८८६-०० |
| | | | एकुण | २१,३४५-०० |
| | | | Vat@ १२.५% | २६६८-०० |
| | | | एकुण रक्कम | २४,०१३-०० |

दोन ठिकाणचे केमिकल्स पुरवठादारांची नावे वेगळी आहेत, त्यापैकी मे. डिलक्स क्लिनींग सिस्टीमस प्रा. लि.पुणे यांचे दर अधिकचे आहे त्यामुळे हे केमिकल महाग आहे परंतु त्यांचे वापराचे प्रमाण कमी स्वरुपाचे आहे. कपडयातुन निघणा-या मळाचे प्रमाणही बरे आहे.

सदरचे परदेशी बनावटीचे केमिकल्सची खालीलप्रमाणे खरेदी करावयाची झाल्यास त्याचा अंदाजे खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| **अ.नं.** | **तपशील** | **किलो.ग्रॅम** | **प्रति कि.लो/लिटर दर रुपये** | **एकुण रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| ०१ | क्लेन अल्कली | ६३६ किलो | २१४/- | १,३६,१०४/- |
| ०२ | क्लेन प्राईम | ५१६ किलो | १९४/- | १,००,१०४/- |
| ०३ | क्लेन एक्स्ट्रा | १३२ लिटर | ३३८/- | ४४,६१६/- |
| ०४ | क्लेन सोर | २१६ किलो | २५५/- | ५५,०८०/- |
| | | | एकुण रक्कम रु. | ३,३५,९०४/- |
| | | | **Vat@ १२.५%** | ४२,०००/- |
| | | | एकुण रक्कम रु. | ३,७७,९०४/- |
| | | | पुर्णांकित रुपये | ३,८०,०००/- |

या खरेदीसाठी अंदाजे रुपये.३,८०,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख ऐंशी हजार मात्र) पर्यत खर्च अपेक्षित आहे.

सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये धुलाई व गणवेश खर्च या बाबीकरीता रु. ६,००,०००/- मात्रची तरतुद आहे.

तरी उपरोक्त अ व ब मध्ये नमुद केलेले केमिकल्स / डिटर्जंट विहीत पद्धतीने खरेदी करण्यास व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६४७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे लॉण्ड्रीकरीता आवश्यक असणारे केमिकल्स/डिटर्जंट विहित पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६,००,०००/-चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवासस्थान विभाग/ अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.३७ Cognizant Technology Solutions, Pune यांचे प्रतिनिधींना ए.सी. रुम उपलब्ध करुन देणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांनुसार साईटेक प्रकल्पाची कार्यवाही Cognizant Technology Solutions, Pune यांचे मार्फत चालू आहे. त्यांचे प्रतिनिधींना शिरडी येथे आल्यानंतर राहण्याची सोय होणेसाठी व्दारावती निवासस्थानातील एक एसी रुम सहा महिन्यांचे कालावधीसाठी मिळणेस व त्याबदल्यात मासिक भाडे रुपये १५,०००/- मात्र देण्यास तयार असलेबाबत ई-मेल व पत्र. आवक नं. १६४११ दिनांक १६/०६/२०१०, आवक नं. १७७३५ दि. २९/०६/२०१० कळविलेले आहे.

त्यास अनुसरुन जा.नं.एसएसएसटी/आयटी/३५१३/२०१० दिनांक २३/०६/२०१०पत्रानुसार Cognizant Technology Solutions, Pune यांचे प्रतिनिधींना एस एसी रुम देणेस व त्याबदल्यात घ्यावयाचे सेवा आकाराबाबत लेखी अभिप्राय मागविण्यात आला होता. त्यानुसार त्यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दिनांक ०३/०१/२००९ रोजीचा आयत्या वेळचा विषय नं. ११ निर्णय नं. ७० अन्वये व्दारावती इमारतीमधील नॉन एसी रुमकरीता २४ तासासाठी रुपये ५००/- व एसी रुम २४ तासासाठी रुपये १०००/- व प्रत्येक जादा व्यक्तीसाठी रुपये ५०/- आकरणी करण्यात यावी असे ठरलेले आहे व त्यानुसार कार्यवाही करता येईल. असा अभिप्राय व्दारावती निवासस्थान विभागाने दिलेला आहे.

त्यास अनुसरुन, एका एसी रुमकरिता संस्थानचे सध्याच्या नियमाप्रमाणे एक महिन्यासाठी (३० दिवसाकरीता) रुपये ३०,०००/- मासिक भाडे होते. परंतु ई-मेल व पत्र आवक नं. १६४११ दिनांक १६/०६/२०१०, आवक नं. १७७३५ दि. २९/०६/२०१० नुसार Cognizant Technology Solutions, Pune यांनी एक एसी रुमसाठी १५,०००/- मासिक भाडे घेण्यात यावे, अशी विनंती केली आहे. तथापि, साईटेक प्रकल्पाची कार्यवाही जलद गतीने होणेच्या व कामकाजावर नियंत्रण राहणेच्या दृष्टीने सदर कंपनीचे प्रतिनिधींना संस्थान परिसरात रुम देणे गरजेचे वाटते, असे नम्र मत आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, Cognizant Technology Solutions, Pune यांचे प्रतिनिधींना व्दारावती निवासस्थानातील एक एसी रुम सहा महिन्यांच्या कालावधीसाठी देणेच्या व त्यासाठी योग्य ते मासिक सेवा आकार घेणेच्या योग्य त्या निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.६४८ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे, Cognizant Technology Solutions, Pune यांचे प्रतिनिधींना व्दारावती निवासस्थानातील एक ए.सी रुम सहा महिन्यांच्या कालावधीसाठी देणेस व त्यासाठी योग्य तो मासिक सेवा आकार घेणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

---

**विषय नं.३८ चहा,कॉफी दूध वेडींग मशिनबाबत**

**प्रस्ताव-** संस्थानचे मुख्य चहा कॅन्टीन अंतर्गत नविन भक्तनिवास चहा कॅन्टीन (५०० रुम), द्वारावती चहा कॅन्टीन, धर्मशाळा चहाकॅन्टीन, भक्तनिवास दर्शनरांगेतील चहा कॅन्टीन, साईप्रसाद नं.०२ माळयावरील चहा कॅन्टीन इत्यादी चहा कॅन्टीन भक्तांच्या सोयीसाठी कार्यरत आहेत.

मिरा एन्टरप्राईज, अहमदनगर यांनी दि.२१.०५.२०१० रोजी संस्थानला पत्र पाठवून संस्थान परिसरात चहाचे वेंडींग मशिन लावणेबाबत परवानगी मागितली असून चहा, कॉफी व दूधाची भक्तांसाठी दर रु.२.५० पैसे प्रति कपाप्रमाणे विक्री करणार असून संस्थानला प्रतिकप ०.५० पैसे कमिशन देण्यास तयार आहेत. त्यांना लाईट, पाणी, जागा द्यावयाची आहे.

परंतु सदर कंपन्यांनी यापूर्वीही संस्थानला प्रात्यक्षिक दाखविले असता हाताने बनविलेला चहा व मशिनच्या चहाच्या चवीत फरक आढळून आला होता. मशिनचा चहा दर्जाहिन वाटला. हाताने बनविलेल्या चहात आपण गाय दूधाचा वापर करतो व मशिनला दूधपावडर वापरतात. गॅस भट्टयावर बनविलेला चहा कडक, रुचकर व स्वादिष्ट लागतो, साईभक्त प्रसाद म्हणून आवडीने चहा पितात. तसा मशिनचा चहा दर्जाहीन व बेचव लागतो. मशिनला चहा देण्यास विलंब लागतो. मशिनच्या चहाबाबत भक्तांच्या निराशाजनक प्रतिक्रिया उमटल्या होत्या. शिवाय मशिनची साफसफाई वेळेवर होत नव्हती, त्यामुळे मशिनभोवती दुर्गंधीयुक्त वास येत होता. कॅन्टीनमध्ये हाताने बनविलेल्या चहामध्ये आपण आले (आद्रक) दळलेल्या वेलचीचा वापर करतो त्यामुळे चहाची चव व क्वालिटी चांगली मिळते.

संस्थान भक्तांना चहा रु.१/-, कॉफी रु.१.५० पैसे व दूध रु.१.५० पैसे असे पुरवितो. मशिन २.५० रुपयात चहा, कॉफी, दुध पुरविणार आहे.

तरी मंदिर परिसरात भक्तांसाठी कॅन्टीनमार्फत चहा पुरविला जातो. तीच पध्दत योग्य वाटते. असे मत आहे.

**निर्णय क्र.६४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांचे सोयीसाठी संस्थानमार्फत प्रायोगिक तत्वावर ०३ चहा-कॉफी- दूध वेंडींग मशिन्स विकत घेऊन, तीन इमारतींना बसविण्यात याव्यात, असें ठरलें.**

(कार्यवाही-अधिक्षक,कॅन्टीन विभाग/ अधिक्षक, खरेदी विभाग )

---

**विषय नं.३९** **श्री साईश्रध्दा ग्रामिण मुकबधीर विद्यालय, शिर्डी यांना सवलतीचे दरात सशुल्क भोजन घेऊन जाणे न पेलवणे बाबत**

**प्रस्ताव-** शिर्डी परिसरातील खालीलप्रमाणे अंध, अपंग, मुकबधीर, मतीमंद, अनाथ व धार्मिक (वारकरी) शिक्षण संस्था, शाळेतील विद्यार्थी व वृध्दाश्रमातील वृध्द व्यक्तींना मोफत व सवलतीचे दरात प्रसाद भोजन पुरविणेत येत होते.

| अं. नं. | संस्थेचे /विद्यालयाचे नांव | निर्णय क्रं. व तारीख | भोजन सुविधा प्रकार | संख्या सकाळ | रात्रौ |
|---|---|---|---|---|---|
| १) | ह.भ.प.काशिनाथ महाराज सेवाभावी ट्रस्ट, निमगांव संचलित श्री साईबाबा वारकरी शिक्षण संस्था, निमगांव/शिर्डी | ४१७ १४/०९/२००३ | मोफत | ४२ | ४२ |
| २) | पद्मश्री डॉ.वि.ए.विखे पाटील विद्यालय, बाभळेश्वर, अंध व कर्णबधीर युनिट | १५- १६/१०/२००२ | मोफत | १०० | ५० |
| ३) | व्दारकामाई (सेवा ट्रस्ट,वृध्दाश्रम) कनकुरी रोड, शिर्डी | २२- २३/११/२००३ | मोफत | ०० | २५ |
| ४) | आधार शिक्षण व ग्रामीण विकास मंडळ नांदुरी दुमाला ता.संगमनेर संचलित साईसेवा मतीमंद मुला मुलींची शाळा ,शिर्डी | ६२२ ०२/१०/२००५ | मोफत | २५ | २५ |
| ५) | श्री साईश्रध्दा ग्रामीण मुकबधीर विद्यालय, शिर्डी | ४२७ ०६/०८/२००५ | सशुल्क (सवलतीचे दरात रु.१३५/- दरमहा) दोन वेळचे भोजन | ७५ | ७५ |

दि.०१/०३/२०१० पूर्वी संस्थान कर्मचा-यांना रु.१३५/- या सवलतीचे दरात दोन वेळेचे मासिक प्रसाद भोजन देण्यात येत होते. मा.व्यवस्थापन समिती दि.०६/०८/२००५ चे सभेतील निर्णय क्र.४२७ नूसार श्री साईश्रध्दा ग्रामीण मुकबधीर विद्यालय, शिर्डी यांना रु.१३५/- या दराने दोन वेळचे भोजन देण्यात येत होते. मा.व्यवस्थापन समिती दि.२७/०१/२०१० चे सभेतील निर्णय क्र.२३३ अन्वये संस्थान कर्मचा-यांसाठी मासिक प्रसाद भोजनाचे दर खालीलप्रमाणे झालेले आहेत.

एक वेळ भोजनासाठी मासिक दर रु. २२५/-

दोन वेळ भोजनासाठी मासिक दर रु. ४५०/-

मा.व्यवस्थापन समिती दि.१०/०१/२०१० चे सभेतील निर्णय क्र.६१ नुसार स्थानिक विश्वस्त यांनी परिसरातील अंध, अपंग, मुकबधीर, मतीमंद, अनाथ, शाळा, वारकरी शिक्षण संस्था व वृध्दाश्रम येथे समक्ष जावून पहाणी केलेली आहे व त्यानुसार दि.१७/०२/२०१० चा पाहणी अहवाल मा.व्यवस्थापन समिती दि.०६/०३/२०१० चे सभेपुढे विचारार्थ ठेवणेत आलेला होता.

स्थानिक विश्वस्त यांचे पहाणी अहवालाचा विचार होऊन मा.व्यवस्थापन समिती दि.०६/०३/१० चे सभेतील निर्णय क्र.३०६ व १८/०४/२०१० चे सभेतील निर्णय क्र.३५६(१) अन्वये श्री साईश्रध्दा ग्रामीण मुकबधीर विद्यालय, शिर्डी या संस्थेतील ९७ विद्यार्थ्यांसाठी सवलतीचे दरात (सशुल्क) भोजन पुरविण्यात यावे असा निर्णय झालेला आहे. मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार जा.नं.एसएसएस-वशि/ प्रसादा/ ७३७०/ १० दि.१९/०५/२०१० चे पत्रान्वये प्रति विद्यार्थी रु.४५०/- प्रति महिण्याप्रमाणे एकूण ९७ विद्यार्थ्यांना सवलतीचे दरात (सशुल्क) दोन वेळचे भोजन घेऊन जाणेबाबत कळविलेले आहे.

श्री साईश्रध्दा ग्रामीण मुकबधीर विद्यालय, शिर्डी यांनी दि.१६/०६/२०१० चे विनंती पत्राद्वारे कळविलेले आहे की, आमच्या विद्यालयामध्ये ५ ते १६ वर्ष वयोगटातील ११५ विद्यार्थी प्रवेशित आहेत. पैकी अंदाजे १०५ विद्यार्थी निवासी राहतील तसेच नुतन शैक्षणिक वर्षात प्रवेश देणे चालू आहे.

संस्थेच्या विद्यालयातील ७५ निवासी विद्यार्थ्यांसाठी प्रति विद्यार्थी दरमहा रु.६३५/- प्रमाणे आर्थिक वर्षात १० महिण्यासाठी परिपोषण अनुदान मिळते. सदर मिळणा-या अनुदानात विद्यार्थ्यांसाठी भोजन, चहा, नाष्टा, मेडीकल, आंथरुण-पांघरुण, गणवेश, दैनंदिन स्वच्छता साहित्य व इतर आवश्यक बाबींचा समावेश असतो. प्रत्यक्षात प्रति निवासी विद्यार्थ्यांसाठी दरमहा रु.८५०/- ते ९२५/- इतका परिपोषण खर्च होतो. त्यामुळे शासनाकडून मिळणारे अनुदान व प्रत्यक्ष होणारा खर्च यातील येणा-या तुटीच्या रकमेचा खर्च खालीलप्रमाणे दाखविलेला आहे.

| अ.नं. | तपशिल | प्र.वि.प्र.म. अनुदान | प्रति महिना प्रत्यक्ष येणारा खर्च | प्र.वि.प्र.म.तुट रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | भोजनशुल्क पुर्वीचे मंजूर दराप्रमाणे रु.१३५/- | ६३५/- | ९००/- १३५/- + ७६५/- | २६५/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२. | सुधारीत मंजूर दराप्रमाणे रु.४५०/- | ६३५/- | १२१५/-<br>४५०/- + ७६५/- | ५८०/- |
| ०३ | विनंती मागणी दराप्रमाणे रु.२११/- | ६३५/- | ९७६/-<br>२११/- + ७६५/- | ३४१/- |

वरीप्रमाणे येणारा वाढीव खर्च व विना अनुदान विद्यार्थ्यांसाठीचा होणारा खर्च संस्था स्वत: दानशूर व्यक्तींकडून मदत घेऊन आपल्या भोजनालयातील अल्पभोजन शुल्क व विना अनुदान विद्यार्थ्यांना आपल्याकडून मिळणारे मोफत भोजन याव्दारे भागविला जातो.

दुसरे असे की- संख्या विद्यार्थी, पालकांना कोणत्याही प्रकारची फी न आकारता विद्यार्थ्यांना निशुल्क प्रवेश देण्यात येवून सर्व सोई सुविधा मोफत पुरविल्या जातात.

वरील तपशीलाचा विचार करता जा.नं.एसएसएस/वशि/प्रसादा/७३७०/१० दि.१९/०५/२०१० चे पत्रानूसार कळविलेली भोजन शुल्क दर (रु.४५०/-) व विना अनुदानीत विद्यार्थ्यांचे भोजन शुल्क (रु.४५०/-) हे आम्हास न पेलवणारे आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करुन आमचे विद्यालयातील निवासी विद्यार्थ्यांना लागू केलेले भोजन दर कमी करण्यात येऊन ते प्रतिमहा प्रति विद्यार्थ्यास रु.२११/- याप्रमाणे करण्यात येऊन विनाअनुदानीत विद्यार्थ्यांना पुर्वीप्रमाणे मोफत भोजन देण्यात यावे अशी विनंती केलेली असून विद्यार्थ्यांची जन्मतारखेसह वयानूसार यादी कळविलेली आहे. सदर यादीचे अवलोकन केले असता चालू आर्थिक वर्षामधील एकूण ९४ विद्यार्थ्यांपैकी ५८ विद्यार्थी १० वर्षापेक्षा मोठे असून ३६ विद्यार्थी १० वर्षापेक्षा लहान आहेत.

श्री साईश्रध्दा ग्रामीण मुकबधीर विद्यालय, शिर्डी यांचे विद्यार्थ्यांसाठी सवलतीचे दरात सशुल्क भोजन पुरविण्याचा निर्णय मा.व्यवस्थापन समिती दि.०६/०३/१० व १८/०४/१० चे सभेमध्ये झालेला असून सदर संस्थेने दि.१६/०६/२०१० चे विनंती अर्जाव्दारे उपरोक्त निर्णयावर पुर्नविचार होणेबाबत विनंती केलेली आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साईश्रध्दा मुकबधीर विद्यालय, शिर्डी यांचे दिनांक १६/०६/२०१० चे अर्जानूसार ७५ अनुदानीत विद्यार्थ्यांसाठी भोजनाचे दर दोन वेळसाठी रु.४५०/- ऐवजी रु.२११/- एवढी आकारणी करावी व विनाअनुदानीत विद्यार्थ्यांसाठी मोफत भोजन मागणीबाबत फेरविचारार्थ सादर.

**निर्णय क्र.६५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईश्रध्दा मुकबधीर विद्यालय, शिर्डी यांचे दिनांक १६/०६/२०१० चे अर्जानूसार ७५ अनुदानीत विद्यार्थ्यांसाठी भोजनाचे दर दोन वेळसाठी रु.४५०/- ऐवजी रु.२११/- एवढी आकारणी करावी व विनाअनुदानीत विद्यार्थ्यांसाठी मोफत भोजन मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.४०** **श्री साई की आरतीयाँ ( लता मंगेशकर) ऑडीओ सी.डी २०% सवलतीचे दराने विक्री करणे बाबत**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे ०६.०९.२००८ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२६ निर्णय क्र.७४४ नुसार गान सम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या आवाजातील 'श्री साई की आरतीयाँ ' ऑडीओ सी.डी. ची खरेदी मे. टाईम्स म्युझीक, मुंबई यांचेकडून 'श्री साई की आरतीयाँ ' ऑडीओ सी.डी. २०,००० नग दर रु.१५०/- प्रमाणे रुपये ३०,००,०००/- इतका खरेदी करणेकामी खर्च आला आहे. त्याची प्रती नग विक्री किंमत रु.२२५/- ठेवण्यात आली आहे.

'श्री साई की आरतीयाँ' ऑडीओ सी.डी. ०३.११.२००८ ते दि.३०.०६.२०१० अखेर ६०४ दिवसात (२० महिन्यात) ५,३५४ नगांची विक्री झाली आहे. म्हणजे सरासरी विक्री खप प्रती महिना २६७ नगांचा आहे. दि.३०.०६.२०१० अखेर १४,६४६ नग शिल्लक आहेत. सदरचा ऑडीओ सी.डी.चा शिल्लक स्टॉक ५५ महिने पुरेल इतका शिल्लक आहे. शिल्लक स्टॉक विचारात घेता १४,६४६ नग दर रु.१५०/- प्रमाणे रु.२१,९६,९००/- एवढी रक्कम गुंतून पडली आहे. त्यामुळे सदरहू ऑडीओ सी.डी. २०% या सवलतीचे दराने साईभक्तांना विक्री करणे गरजेचे आहे.

सबब 'श्री साई की आरतीयाँ ' ऑडीओ सी.डी. विक्री दर रु.२२५/- वर २०% या सवलतीचे दराने रु.१८०/- प्रमाणे विक्री करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे 'श्री साई की आरतीयाँ ' ऑडीओ सी.डी. विक्री दर रु.२२५/- वर २०% या सवलतीचे दराने रु.१८०/- प्रमाणे विक्री करणेस मान्यता देण्यात आली. सदरहू ऑडीओ सी.डी. ची विक्री झाल्यानंतर पुन्हा सदरहू सी.डी.ची संस्थानमार्फत निर्मिती करण्यात येऊ नये असे ठरले.** (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

---

**विषय नं.४१** **रुग्णवाहिकाचे सेवाआकार दर वाढविणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयात गरीब व गरजू रुग्णाकरिता मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद इ. ठिकाणी पुढील उपचाराकरिता पाठविणे कामी टाटा४०७

रुग्णवाहिका-०२, मारुती रुग्णवाहिका-०२, कार्डीयाक रुग्णवाहिका-०१ अशी ०५ व शववाहीनी-०१ अशी एकूण ०६ वाहने वापरात आहेत.

दि.२५/०२/२००३ चे मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्रं.६६ नुसार, सदर वाहनांचे वापरासाठी खालील प्रमाणे दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | वाहन प्रकार / इंधन | सेवाआकार दर (प्रति कि.मी.) | दर निश्चिती वेळीचे इंधन दर (प्रति लिटर) |
|---|---|---|---|
| ०१. | टाटा४०७- डिझेल | रु.३.०० | रु.२५.३० |
| ०२. | मारुती - पेट्रोल | रु.४.०० | रु.३६.७९ |

तसेच दि.२७/१२/२००४ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.१८९ अन्वये, कार्डीयाक रुग्णवाहीकेचे दर खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहे.

| अ.नं. | वाहन प्रकार / इंधन | सेवाआकार दर (प्रति कि.मी.) | दर निश्चिती वेळीचे इंधन दर (प्रति लिटर) |
|---|---|---|---|
| ०१. | कार्डीयाक- डिझेल | रु.५.०० | रु.३१.६४ |

सन २००६-०७ या वर्षाचे लेखापरिक्षण अहवालात इंधन दर व वाहनांचे वापराचा मिळणारा सेवाआकार यामध्ये तफावत दिसत असलेने रुग्णवाहिकांचे सेवाआकार दरामध्ये वाढ करण्याचे सुचीत करण्यात आले होते.

त्यामुळे रुग्णवाहिका सेवाआकार दर वाढविणे बाबतचा प्रस्ताव दि.१०/०१/२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला होता. त्यानुसार सभेत प्रस्तुत संदर्भात चर्चा होउन, निर्णय क्रं.९५ अन्वये संस्थान रुग्णालयातील रुग्णवाहिकांचा वापर गरीब व गरजू रुग्णांना होत असल्याने रुग्णवाहिकांचा सेवाआकार वाढविण्यात येउ नये असे ठरले होते.

तथापि, सदरचे निर्णयानुसार, आजपर्यंत इंधन दरामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाल्यामुळे वाहनाचे वापरापोटी संस्थानला मिळणारा सेवाआकाराची रक्कम व इंधन खर्चाची रक्कम यामधील तफावत दिवसेंदिवस वाढतच आहे.

दि.२५/०२/२००३ रोजी ठरविण्यात आलेला प्रति किलोमिटर सेवाआकार, तसेच त्यावेळचा इंधन दर आणी सध्याचा इंधन दर व झालेली वाढ यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.नं. | वाहन प्रकार / इंधन | सेवाआकार दर (प्रति कि.मी.) | दर निश्चिती वेळीचे इंधन दर (प्रति लिटर) | आज रोजीचा इंधन दर | झालेली टक्केवारी वाढ |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | टाटा४०७- डिझेल | रु.३.०० | रु.२५.३० | रु.४१.१२ | ६२.५२ % |
| ०२. | मारुती- पेट्रोल | रु.४.०० | रु.३६.७९ | रु.५३.८९ | ४६.४८ % |
| ०३. | कार्डीयाक-डिझेल | रु.५.०० | रु.३१.६४ | रु.४१.१२ | २९.९६ % |

सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रं.जिरूफो१०००/प्र.क्र.९०/२०००/आरोग्य-३ मंत्रालय, मुंबई दि.१० जुलै २००१ या शासन निर्णया प्रमाणे रुग्णवाहिका शुल्क प्रति कि.मी. रु.५/- तसेच प्रतिक्षा शुल्क (८ तासापुढे) रु.३०/- प्रति तास असा आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे इंधन दरात वेळोवेळी झालेली वाढ, तसेच शासन निर्णयानुसार (प्रतिक्षा शुल्काचा विचार न करता) रुग्णवाहिकेच्या सेवाआकार दरात खालील प्रमाणे वाढ करणे योग्य होईल, असे मत आहे.

डिझेल रुग्णवाहिके करीता प्रति कि.मी. रु.५/-
पेट्रोल रुग्णवाहिके करीता प्रति कि.मी. रु.६/-
कार्डीयाक रुग्णवाहिके करीता प्रति कि.मी. रु.७/-

तरी उपरोक्त प्रमाणे इंधन दरात झालेली वाढ विचारात घेउन रुग्णवाहीकांचे वापराचे सेवाआकार मध्ये वाढ करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयातील रुग्णवाहिकांचा वापर गरीब व गरजू रुग्णांना होत असल्याने रुग्णवाहिकांचा सेवाआकार वाढविण्यात येऊ नये असे ठरले.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.४२** **शरीर सोष्ठत्वासाठी डाएट खर्च व वेळ मिळणेबाबत श्री नारायण पाडेकर, वर्ग-४ कर्मचारी यांचे अर्जाबाबत**

**प्रस्ताव-** श्री नारायण रावसाहेब पाडेकर-वर्ग ०४ कर्मचारी यांनी सादर केलेल्या अर्जाने च्श्री.साईबाबा संस्थान व्यायाम शाळेत व्यायाम करीत असुन मी संस्थान मार्फत राज्यस्तर, राष्ट्रीय स्थरावर स्पर्धा खेळुन बक्षिसे मिळविलेली आहेत. उल्लेखनिय बाब म्हणजे माझे नाव आंतरराष्ट्रीय स्पर्धे करीता नामांकित करण्यात आलेले आहे. पुढील स्पर्धेची तयारी करीत असताना माझा सन २००८ मध्ये अपघात झाला पण त्या परीस्थितीतुन सावरुन मी महत्वकांक्षा जिवंत ठेवलेली आहे. शरीर सौष्टव, पावर लिफ्टींग स्पर्धेकरीता तसेच त्याची पुर्व तयारी करणेकामी भरपुर खर्च लागणार आहे. माझी आर्थिक स्थिती नाजुक असल्याने मला संस्थान कडुन आवश्यक ती मदत व वेळ मिळावा हि विनंती.

श्री पाडेकर यांचे सदरचे अर्जावर मा.ना.श्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री परीवहन, बंदरे आणि विधी व न्याय महाराष्ट्र राज्य यांनी संस्थेच्या मार्फत अशा होतकरु तरुणांना प्रोत्साहन दिल्याने संस्थानचा नावलौकीक वाढेल.संस्थान मार्फत दत्तक घेऊन आंतर राष्ट्रीय स्थरावर सहभागाकरीता प्रोत्साहन द्यावे ही विनंती. असे अभिप्राय दिलेले आहेत.

तसेच संस्थानचे मा.उपाध्यक्ष श्री.कोल्हे साो यांनीही श्री पाडेकर यांचे अर्जा बाबत ''सदर अर्ज संस्थानच्या मा.विश्वस्त मंडळाच्या मिटींग पुढे ठेवुन नियमानुसार मंजुरी घेण्यासाठी शिफारस आहे. असे अभिप्राय दिलेले आहे.

श्री पाडेकर यांनी त्यांचे नाव अंतराष्ट्रीय स्पर्धेकरीता नामांकित करण्यात आल्याचे त्यांचे अर्जात नमुद केलेले आहे.तथापी त्याबाबतचे कागदपत्र त्यांनी सादर केलेले नाहीत.शरीर सौष्ठत्व स्पर्धेत सहभाग व प्रात्याक्षिके याबाबतची खालील कागदपत्रे त्यांनी सादर केली आहेत.

- उत्तर महाराष्ट्र श्री २००८ जि.नाशिक (जिल्हा स्तर)
- जिल्हा स्तरिय शरीर सौष्टत्व स्पर्धा २००९ शिर्डी जि.अ.नगर (जिल्हा स्तर)
- सॅन्डो भिमसेन श्री २००९ जि.अ.नगर (जिल्हा स्तर)
- जळगाव महापौर श्री २००८ जि.जळगाव (राज्य स्तर)
- महाराष्ट्र बॉडी बिल्डर असोशिएन २००९ वाई,जि.सातारा (राज्य स्तर)
- मा.आ.चैनसुखजी संचेती २००८ मलकापुर (राज्य स्तर)
- मिस्टर युनिव्हर्स २००९ नाशिक (आंतरराष्ट्रीय स्तर)
- मिस्टर इंडिया २०१० वाराणसी (राष्ट्रीय स्तर)

तसेच श्री पाडेकर यांनी डाएट बाबत येणाऱ्या खर्चाचा तपशिल महाराष्ट्र बॉडी बिल्डर असोशिएन, औरंगाबाद यांचे मार्फत खालील प्रमाणे सादर केलेला आहे.

| तपशिल | प्रति दिनी येणारा खर्च | प्रति महिना खर्च | वार्षीक खर्च |
|---|---|---|---|
| दुध २ लीटर (सकाळी १ लि.रात्री १ लि.) | ६०/- | १८००/- | २१,६००/- |
| काजु,बदाम,खजुर,चिज प्रत्येकी २५० ग्रॅम पनीर ५०० ग्रॅम | २५०/- | ७५००/- | ९०,०००/- |
| सालाड स्वरुपात (गाजर,काकडी, टॉमेटो मूळा बीट इ.व इतर सर्व पालेभाज्या) | १५०/- | ४५००/- | ५४,०००/- |
| सर्व प्रकारची सिजोबल फळे व ज्युस | ३००/- | ९०००/- | १,०८,०००/- |
| मोड आलेले मठ ,सोयाबीन,मसुर दाळ,राजमा अरहर इतर दाळी प्रत्येकी २५० ग्रॅम | १२५/- | ३७५०/- | ४५,०००/- |
| व्हेज प्रोटीन पावडर (जास्तीत जास्त कॅलरीज मिळणे कामी आवश्यक ) | ४३३/- | १३,०००/- | १,५६,०००/- |
| **एकुण रुपये** | **१,३१८/-** | **३९,५५०/-** | **४,७४,६००/-** |

श्री.पाडेकर यांना डाएट खर्चासाठी प्रतिवर्षाला रुपये ४,७४,६००/- एवढा खर्च लागणार असुन हा खर्च ५ ते ६ वर्षासाठी मिळावा अशी त्यांची मागणी आहे. पाच वर्षासाठी त्यांचे मागणी प्रमाणे डाएटसाठी संस्थान कडुन एकुण रुपये २३,७३,०००/- (तेवीसलाख त्र्याहत्तर हजार मात्र) एवढा खर्च अपेक्षित आहे.तसेच सरावासाठी सकाळी ०६.०० ते ११.०० (पाच तास) त्या नंतर आराम व सायंकाळी १७.०० ते २०.०० वाजेपर्यंत (तिन तास) अशी प्रतिदिवशी एकुण आठ तास वेळेची त्यांची मागणी आहे.

जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय स्थरावर वेगवेगळया ठिकाणी अयोजित होणाऱ्या शरीर सौष्ठत्व स्पर्धेत भाग घेण्यासाठी इच्छुक असलेल्या संस्थानचे व्यायामशाळेतील सभासदांना स्पर्धेस जाण्यासाठी प्रवस, निवास,भोजन इत्यादीसाठी येणारा खर्च संस्थानमार्फत देण्यात येतो.

सन २००३ ते सन२०१० या कालावधीत अशा शरीर सौष्ठत्व स्पर्धेमध्ये विविध ठिकाणी सहभागी घालेल्या सभासद संख्येचा व त्यांचेसाठी संस्थानकडून खर्च केलेल्या रककमेचा तपशिल व सहभागी सभासदांच्या नावाची यादी अवलोकानार्थ सोबत सादर केली आहे.

श्री.पाडेकर यांना शरीर सौष्ठत्व स्पर्धेसाठी आर्थिक सहाय्य द्यावयाचे झाल्यास संस्थान व्यायामशाळेतील इतर सभासद उमेदवारांकडून यापूढे अशा कारणांसाठी मागणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी श्री पाडेकर यांनी केलेल्या मागणी प्रमाणे शरीर सौष्ठत्वासाठी ०५ वर्ष कालावधीसाठी त्यांना लागणारा डायट खर्च रुपये २३ लाख ७३ हजार व सरावासाठी दैनदिन ०८ तास वेळ मंजुर होणे बाबतचे त्यांचे अर्जावर विचार होऊन निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.६५३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाबाबत सविस्तर अभ्यास करुन फेर प्रस्ताव निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.४३** **श्री मोहन एकनाथ उपासनी, बडतर्फ वरिष्ठ लिपिक, प्रशासनशाखा यांना पूर्ववत कामावर रुजू करुन घेणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री.मोहन एकनाथ उपासनी, वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा, हे दि.१४-०६-१९८९ पासून संस्थान सेवेत कार्यरत होते. श्री.उपासनी हे दि.१३-११-२००७ रोजी सकाळी ७.३० वाजेपासून कॅश काऊंटींग हॉल येथे कॅश काऊंटींगसाठी हजर होते. सदर दिवशी सकाळी ८.४५ वाजेच्या दरम्यान श्री.उपासनी हे बाथरूमचे कारणांसाठी कॅश काऊंटींग हॉल मधून बाहेर जात असतांना तेथील सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांची तपासणी केली. त्यावेळी श्री.उपासनी यांचे रूमालातुन प्रथम एक हजारची एक नोट व रूमाल झटकल्यानंतर एक हजार रूपयाच्या १९ नोटा खाली पडल्या. सदर रूपये एक हजारच्या २० नोटांचा रितसर पंचनामा करून, शिरडी पोलीस स्टेशन, शिरडी येथे श्री.उपासनी यांचे विरूध्द तक्रार दाखल करणेत आली होती. सदर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.उपासनी यांना दि.१३-११-२००७ रोजीचे आदेशान्वये खातेचौकशीकामी सेवा निलंबीत करण्यात येऊन, त्यांना जा.नं. एसएसएस/वशी-७ए/३४२१/२००७ दि.२०-१२-२००७ अन्वये आरोपपत्र देण्यात आले होते. सदर आरोप पत्राची खातेनिहाय चौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, चौकशी अधिकारी यांनी पुर्ण करुन, त्यांचा दि.११-०५-२००९ रोजीचा खाते चौकशी निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केला होता. त्यात श्री.उपासनी यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोप पत्रातील आरोप खाते चौकशीत सिध्द झाले असून, श्री.उपासनी हे दोषी आहेत असा चौकशी अधिकारी यांनी निष्कर्ष काढला होता. म्हणून सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७-०५-२००९ रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता. सदर सभेतील निर्णय क्र.४६५नुसार श्री.उपासनी यांना जा.नं. एसएसएस/वशी-७ए/ १६१६/ २००९ दि.१८/०५/२००९ अन्वये संस्थान सेवेतून बडतर्फ (Dismiss) का करण्यात येऊ नये? अशी सेकंड शोकॉज नोटीस बजावण्यात आली होती.

उपरोक्त सेकंड शोकॉज नोटिसी संदर्भात श्री.उपासनी यांनी संस्थान विरूध्द मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे तक्रार (यु.एल.पी)क्र.३०/२००९ ही कोर्ट केस दाखल केली आहे. त्यात च्श्री.उपासनी यांनी दि.१८-०५-२००९ रोजीचा तक्रारदाराबाबत बडतर्फी विषयक कारणे दाखवा नोटीस आदेश बेकायदेशीर, अयोग्य, नैसर्गिक न्यायाविरूध्द असल्याचे जाहिर करून रद्द करण्याचे आदेश जाब देणार संस्थान यांना व्हावेत, तक्रारदाराचे निलंबन काळातील पुर्ण वेतन तक्रारदारास आदा करण्याचे आदेश जाब देणार संस्थान यांना व्हावेत. दरम्यानचे काळात दि.१८-०५-२००९ चा तक्रारदाराचे बडतर्फी विषयक कारणे दाखवा नोटीस आदेश मुळ तक्रारीच्या सुनावणीच्या काळात स्थगित करून तक्रारदारास बडतर्फ न करण्याविषयक आदेश जाब देणार यांना व्हावेत.छअशी मागणी केलेली आहे. त्यानंतर सदर कोर्ट केसमधील निशाणी क्र.२ मनाई हुकूम मिळणे संदर्भातील अर्जाचे निर्णयापर्यंत सध्य स्थितीत स्टेटस्को (जैसे थे परिस्थिती) ठेवावी असे आदेश मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी दि.२६-०५-२००९ रोजी दिले होते. सदर स्टेटस्को आदेशाची मुदत मा.कामगार न्यायालयाने दि.१८-०६-२००९ रोजीचे ॲड इंटेरियम आदेशान्वये वाढविली होती.

त्यानंतर मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी निशाणी-२ मनाई हुकूमाचे अर्जावर सुनावणी घेवून, उभयपक्षाचे म्हणने विचारात घेऊन, दि.३०-१२-२००९ रोजी खालीलप्रमाणे आदेश देवून श्री.उपासनी यांचा मनाई हुकूमाचा अर्ज डिसमिस करून निकाली काढला आहे.

**ORDER**

1. Interim relief application Exh. U-2 is hereby dismissed.
2. Consequently, ad-interim order dated 18-06-2009 passed below Exh.C-7 which came to be extended till the date of this order is hereby quashed and set aside.
3. Application Exh.U-2 is accordingly disposed off.

Ahmednagar
Date:-30-12-2009

(K.B.Wagh)
Judge,
2nd Labour Court, Ahmednagar

उपरोक्तप्रमाणे श्री.उपासनी यांचा मनाई हुकूम मिळणेबाबत निशाणी नं.-२ चा अर्ज दि.३०-१२-२००९ रोजी डिसमिस झाले नंतर तसेच मा.कामगार न्यायालयाचा दि.१८-०६-२००९ रोजीची ॲड-इंटेरिम ऑर्डर (स्टेटस्को ऑर्डर) व्हॅकेट झालेनंतर संस्थान ॲडव्होकेट यांचे दुरध्वनीवरील सुचनेस अनुसरून, श्री.उपासनी यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४६२८/२००९ दि.३१-१२-२००९ रोजीचे आदेशान्वये संस्थान सेवेतून दि.०१-०१-२०१० पासून कायम स्वरूपी बडतर्फ (डिसमिस) करणेत आलेले आहे.

दरम्यानचे काळात श्री.उपासनी यांनी मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांचे तक्रार (यु.एल.पी.) क्र.३०/२००९ मधील दि.३०-१२-२००९ रोजीचे आदेशा संदर्भात संस्थान विरूध्द मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.२/२०१० ही कोर्ट केस दि.०४-०१-२०१० रोजी दाखल केलेली आहे.त्यात त्यांनी खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

**१)** तक्रार (यु.एल.पी.) क्र.३०/२००९ मा.कामगार न्यायालय, अहमदनगर क्र.२ अंतिम अंतरिम आदेश दि.३०-१२-२००९ हे रद्द करून, बदल करून, अर्जदाराबाबत अंतिम कारणे दाखवा नोटीस दि.१८-०५-२००९ काढून अर्जदाराबाबत सामनेवाले यांनी प्रथम दर्शनी कामगार विषयक अनुचीत प्रथांचा अवलंब केलेचे जाहिर करून, मुळ तक्रारीच्या सुनावणीच्या काळात अंतिम कारणे दाखवा नोटीस स्थगित ठेवणे विषयक, अर्जदारास बडतर्फ न करणेबाबत आदेश सामनेवाले यांना व्हावेत.

**२)** अर्जदारास आवश्यक असल्यास त्याच्या हुद्दयाप्रमाणे पैशाच्या व्यवहारा व्यतिरिक्त इतर काम मुळ तक्रारीच्या सुनावणीच्या काळात निलंबन रद्द करून देण्याचे आदेश व्हावेत.

श्री.उपासनी यांनी संस्थान विरूध्द मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे उपरोक्तप्रमाणे दाखल केलेली तक्रार (यु.एल.पी.) क्र.३०/२००९ तसेच त्यांनी संस्थान विरूध्द मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे दाखल केलेले रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.०२/२०१० हया दोन्हीही कोर्ट केसेस सध्या मा.न्यायालयात न्यायप्रविष्ट असून प्रलंबीत आहे.

त्यानंतर श्री.उपासनी यांनी दि.०४-०६-२०१० रोजीचे अर्ज सादर केले असून, त्यात त्यांनी "माझ्यासारखेच गैरशिस्त वर्तन घडलेले श्री.रामदास शंकर सोनवणे, वरिष्ठ लिपिक, प्रकाशने विभाग यांची खातेचौकशी पूर्ण करणेत येऊन, त्यांना दि.३१-०५-२०१० चे आदेशान्वये चार दिवस निलंबीत करून, दि.०४-०५-२०१० पासून पुर्ववत सेवेत रूजू करून घेण्यात आलेले आहे. श्री.सोनवणे यांचेवर माझ्यासारखाच गैरशिस्त वर्तनाचा आरोप आहे. मला कामावर हजर करून घेण्यात आलेले नाही. माझ्याबाबत असा भेदभाव करणेत आलेला आहे. मी लेबर व इंडस्ट्रियल कोर्टात दाखल केलेली केस त्वरीत मागे घेण्यास तयार आहे. मला नोकरीशिवाय उदरनिर्वाहाचे दुसरे कोणतेही साधन नाही. माझा एक मुलगा इ.१२ वीत व छोटा इ.६ वीमध्ये शिक्षण घेत आहे, त्यांचे भविष्य अंधारमय होईल, माझे वृध्द वडिल माझ्याकडेच राहात असून त्यांची सांभाळण्याची व औषधोपचाराचे खर्चाची जबाबदारी माझ्यावरच आहे. तरी माझ्या अर्जाचा सहानुभूतीपुर्वक विचार करून, मला श्री.सोनवणे यांचे प्रमाणेच संस्थान सेवेत पुर्ववत हजर करून घेण्यात यावे ही नम्र विनंती." असे म्हटलेले आहे. सदर अर्जावर डॉ.गोंदकर सो., विश्वस्त यांनी "श्री.उपासनी यांचा अर्ज व्य.मं.समोर विचारार्थ ठेवण्यास हरकत नाही. मानवतावादी दृष्टीकोन ठेऊन निर्णय घेणे क्रमप्राप्त राहील. तरी सदर विषय चर्चेत ठेवावा. चर्चेला श्री.उपासनी यांना बोलावून घेण्यात यावे." अशी शिफारस केलेली आहे.

त्याचप्रमाणे श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी श्री.मोहन एकनाथ उपासनी, निलंबीत कर्मचारी यांना कामावर घेणेबाबत जा.क्र.२८/१० दि.११-०६-२०१० रोजीचे पत्र पाठविले असून, त्यात त्यांनी "श्री.उपासनी यांनी संस्थानचे कोणतेही आर्थिक नुकसान व स्थावर मालमत्तेचे नुकसान केलेले नसून, कोणत्याही प्रकारचा आर्थिक गैरव्यवहार केलेला नाही. त्यांनी कोर्टात दाखल केलेली केस ते मागे घेण्यास तयार आहे. श्री.उपासनी यांची आर्थिक परिस्थिती नाजूक असून, त्यांना नोकरीशिवाय उदरनिर्वाहाचे दुसरे कोणतेही साधन नसून, त्यांच्या मागे दोन लहान मुले व वृध्द वडिल त्यांच्याकडेच राहतात. त्यांना सांभाळण्याची व त्यांच्या औषधोपचाराची जबाबदारी त्यांचेवरच आहे. तरी त्यांनी जून-१९८९ पासून केलेली संस्थान सेवा विचारात घेऊन एक संधी दयावी व त्यांना कामावर घेणेबाबत आदेश होणेस विनंती." असे म्हटलेले आहे.

सबब, श्री.मोहन एकनाथ उपासनी, बडतर्फ वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा यांचे दि.०४-०६-२०१० रोजीचे अर्जाबाबत तसेच श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांचेकडील जा.क्र.२८/१० दि.११-०६-२०१० रोजीचे पत्राबाबत सहानुभूतीपुर्वक विचार करून, श्री.उपासनी यांचे बडतर्फीबाबत फेर विचार होऊन, त्यांना कोर्ट केसेस संबंधीत न्यायालयातून काढून घेणेचे अटीवर पुन्हा फ्रेश नेमणूक देऊन, सेवेत रूजू करून घ्यावयाचे किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६५४ यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री.मोहन एकनाथ उपासनी यांनी आर्थिक गैरव्यवहार केला असल्याने त्यांचे बडतर्फी बाबत फेर विचार करण्यात येऊ नये,असें ठरलें.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.४४ श्री मधूकर पंढरीनाथ बारसे, मदतनीस (सध्या निलंबित) यांना पूर्ववत कामावर हजर करुन घेणे बाबत.**

**निर्णय क्र.६५५ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.४५ श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को. ऑप सोसायटी यांना गुरुस्थानचे दक्षिण बाजूस असलेले जागेत कॅमेरा क्लोकरुमसाठी परवानगी देणे बाबत**

**प्रस्ताव-** शिर्डी येथे येणा-या साईभक्तांचे मोबाईल कॅमेरा मंदीर परिसराच्या बाहेर ठेवणेसाठी संस्थानने श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी यांना आदेश देवून त्यांचे मार्फत श्री साईनाथ छाया इमारतीमधील गाळयात मोबाईल कॅमेरा ठेवणेची व्यवस्था केलेली आहे. त्यासाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज केडीट को-ऑप सोसायटीकडून एकत्रित ५ गाळयांची ( क्षेत्रफळ ६५७.२१ चौ.फुट एकत्रीत )

एकुण रक्कम रुपये ६०५०/- मासिक फी आकारण्यात येते. सदर व्यवस्थेबदल्यात सोसायटी भक्तांकडून प्रती मोबाईल , कॅमेरा ( एका नगास ) रु. २ आकारण्यात येतात .

मंदीराच्या दक्षिणेस श्री शंकर नाथा गोंदकर यांनी संस्थानला जी मिळकत बक्षीस पत्राने दिलेली आहे, त्या मिळकतीमध्ये देखील भक्तांचे गर्दीमुळे सोयीचे दृष्टीने मोबाईल कॅमेरा क्लोकरुम व्यवस्था नव्याने सुरु करणेत आलेली आहे. सदरची व्यवस्था संस्थानने सुचीत केले प्रमाणे मोबाईल, कॅमेरा क्लोकरुम व्यवस्था दि. २०/०२/२०१० पासून सुरु करण्यात आलेली आहे. सोसायटीने सदर व्यवसायास पुढील ५ वर्षासाठी चालविणेस परवानगी मिळणेबाबत त्यांचे पत्रात विनंती केली आहे.

सोसायटीचे दि. ०१/०७/२०१० रोजीचे पत्राने, सदर क्लोकरुमचे माध्यमातून दरमहा संस्थेस सरासरी रु. ३५,०००/- ते रु. ३६,०००/- इतका भरणा जमा होत असून, कामगार पगार, स्टेशनरी, व लाईट बील खर्च वजा जाता मिळणा-या उत्पन्नाचा विचार करता सदर जागेसाठी रु. १५००/- ते रु. २०००/- इतकी मासिक परवाना फी घेवून सदर गाळा चालविणेस परवानगी देण्याची विनंती केलेली आहे.

साईभक्तांचे सोईसाठी प्रस्तुत व्यवस्था संस्थानने पतपेढीमार्फत सुरु केलेली आहे. सदर बाबींचा विचार करता श्री गोंदकर यांनी बक्षीसपत्राने संस्थानला दिलेला गाळा संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटीस चालविण्यास द्यावयाचा झाल्यास इतर गाळ्यांचे अटी शर्ती प्रमाणे अटी शर्ती व मिटर रिडींग प्रमाणे वेगळे इलेक्ट्रीक बील आकारुन मासीक परवाना फी साधारणपणे रु. ३,०००/- ते रु. ४,०००/- इतकी आकारणी करुन सदरचा गाळा एक वर्षे कालावधीसाठी सोसायटीस चालविण्यास द्यावा असे मत आहे.

**निर्णय क्र.६५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.शंकर नाथा गोंदकर यांनी बक्षीसपत्राने संस्थानला दिलेला गाळा संस्थान एम्प्लाईज क्रेडीट को-ऑप. सोसायटीस इतर गाळयांचे अटी-शर्तीप्रमाणे मासिक परवाना फी रु.४०००/- + इलेक्ट्रीक बील याप्रमाणे आकारणी करुन एक वर्ष कालावधीसाठी चालविण्यास देण्यात यावा. त्यासाठीचा नियमानुसार करारनामा करुन घेण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.४६** **रिट पिटीशन नं. १७०४/२००९ सय्यद रतनभाई सय्यद व इतर तसेच इतर ३ रिट पिटीशन्स नं. १७०५/२००९, २९५२/२००९, ५४५१/२००९ दिनांक ५.०७.२०१० रोजीचा निकाल सर्व्हे नं. ०१ मधील दूकानदारांना कॉम्पेनसेशन (नुकसान भरपाई ) आदा करणे बाबत**

**प्रस्ताव-** **१)** मौजे शिर्डी येथील स.नं. १ ( मंदिर परिसराचे दक्षिणेकडील ) पैकी ३० गुंठे जागा शासनाने संस्थानला देण्याचे ठरविले. त्यानंतर त्या जागेतील दुकानदारांनी सन १९७६ साली रे.मु.नं. ६००/७६ सय्यद रतनभाई सय्यद व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन , यांचे विरुध्द दावा दाखल केला. सन १९७४ चे अगोदर पासून या जागेत दुकानदारांची दुकाने आहेत. ग्रामपंचायतीस जागेचा कर दिला जातो व जागा कायदेशीररीत्या त्यांचे ताब्यात आहे, त्यांचेकडून जागेचा ताबा घेऊ नये, असे त्यांचे म्हणणे होते. प्रस्तुत दाव्यात संस्थान सामील झाले. मात्र दि. २०/०८/१९७९ रोजी वादी व प्रतिवादी महाराष्ट्र शासन, संस्थान यांचे मध्ये प्रस्तुत जागा व त्यामधील दुकानांचे संदर्भात सुलेनामा करण्यात आला. त्याप्रमाणे सरकारी स.नं. १ मध्ये ४५ दुकानदारांना सर्व्हे नं. १ मध्ये संस्थानकडून दुकाने बांधून देणेत यावीत ; वरील मजल्यावर बांधकाम करणेस दुकानदारांची हरकत रहाणार नाही. तसेच संस्थानने बांधलेले स.नं. १७० मधील ३१ दुकानदारांची सोय होईल व उर्वरीत २५ दुकानदारांना मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत जागा देण्यात येईल अशा आशयाचा सुलेनामा झाला. परंतू सदर ३१ दुकानगाळ्यांमध्ये दुकानदार गेले नाहीत त्याच प्रमाणे स.नं. १ मध्ये देखील संस्थानकडून दुकाने बांधणेत आलेली नाहीत. त्यानंतर संस्थानने सुलेनाम्या प्रमाणे अंमलबजावणी व्हावी, यासाठी कोपरगांव येथील मे.सिव्हील जज्ज सिनिअर डीव्हीजन यांचे कोर्टात दरखास्त नं. १/१९९० दाखल केली. त्याचप्रमाणे दुकानदारांमार्फत याच सुलेनाम्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी दरखास्त अर्ज नं. ५/१९९० दाखल करण्यात आला. शिर्डी येथे नगरपंचायत झाली, डेव्हलपमेंट प्लॅन लागू झाला. जागेवरील आरक्षणाचा विचार करता दुकानदारांचे मागणीचा विचार करता येणार नाही. सुलेनामा निरर्थक झाला आहे. अशी भुमिका संस्थानने दरखास्त क्र.५/९० मध्ये घेतली.

नगरपंचायतीला जागा विकसित करावयाची असल्याने ३१ गाळे पाडणेस परवानगी मिळणेसाठी मा. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कडे दरखास्त नं. ५/१९९० मध्ये तसा अर्ज केला, त्याबाबत संस्थानने हरकत घेतली होती. दुकानदारांनी ना हरकत दिली, परंतू मा.कोर्टाने नगरपंचायत अधिनियमाप्रमाणे कार्यवाही करणेस मोकळीक दिली. त्यानंतर नगरपंचायतीमार्फत संस्थानने बांधलेले स.नं. १७० मधील गाळे पाडण्यात आले.

२) उपरोक्त दरखास्तमध्ये सन २००४ मध्ये दुकानदारांनी त्यांची दुकाने काढुन टाकू नयेत, असा अर्ज दाखल केला. त्यामध्ये मा.कोर्टाने स.नं.१ मधील ४५ दुकानदारांसाठी पर्यायी जागा दिलेशिवाय काढुन टाकता येणार नाही, परंतू ५६ दुकानदारांनी त्यांचेसाठी बांधणेत आलेले गाळे पाडणेस ना हरकत दिली.

या कारणाने त्यांचेसाठी सुलेनाम्याची अंमलबजावणीसाठीचा त्यांचा हक्क संपुष्टात आला आहे. अशा अर्थाचा दि. २१/०५/२००४ रोजीचा आदेश केला. सदर निकालाचे नाराजीने रिट पिटीशन नंबर ३८१३/ २००४ तसेच स्पेशल लिव्ह पिटीशन नं. २०९८/२००५ अन्वये संबंधीत दुकानदारांनी मा.सर्वोच्च न्यायालयापर्यंत प्रकरणे दाखल केली, परंतू ते फेटाळेणेत आले. प्रस्तूत सर्व्हे नं. १ मधील उर्वरीत ४५ दुकानदारांचे संदर्भात त्यांचे विरुध्द महाराष्ट्र शासनाने रिट पिटीशन नं. ५८३९/२००४ दाखल केले. परंतू मा.उच्च न्यायालयाने सदर प्रकरणी मा. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन कोपरगांव यांचेमार्फत मुळ दरखास्तीचे सुनावणी व्हावी, असा निकाल दि. ३१/०७/२००७ रोजी दिला आहे.

मा. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन कोपरगांव यांचेकडे त्यानंतर दोन्ही दरखास्तीची चौकशी झाली, दरखास्त नं. १/९० संस्थानने मागे घेतली तर दरखास्त नं. ५/९० मध्ये दि. ०९/०३/२००९ रोजी मा. कोर्टाने डिक्री एक्झीक्युट होत नसलेबाबत निकाल (दुकानदारांचे विरुध्द) दिला. सदर निकालाचे नाराजीने दुकानदारांनी मा.उच्च न्यायालयात खालीलप्रमाणे रिट पिटीशन्स दाखल केले.

| **अ.नं.** | **रिट पिटीशन नं.** | **वादी/प्रतिवादी** |
|---|---|---|
| ०१. | १७०४/२००९ | चॉंदमल गोपाळदास लोकचंदानी विरुध्द महाराष्ट्र शासन, संस्थान |
| ०२. | १७०५/२००९ | सय्यद रतनभाई सय्यद विरुध्द महाराष्ट्र शासन, संस्थान |
| ०३. | २९५२/२००९ | गंगाधर तुरकणे विरुध्द महाराष्ट्र शासन, संस्थान |
| ०४. | ५४५१/२००९ | सोमनाथ कोळपकर विरुध्द महाराष्ट्र शासन, संस्थान |

उपरोक्त ४ रिट पिटीशन मध्ये मा.कोर्टाने ( श्री किनगांवकर सो.) दि. ०५/०७/२०१० रोजी निकाल दिला आहे. निकालपत्रात खालीलप्रमाणे उहापोह करणेत आलेला आहे.

**१)** संस्थानने स.नं. १ मधील त्रिकोण जागेत संस्थानने दुकान संकुलाचे बांधकाम केलेले नाही. सुलेनाम्यातील परिशीष्ट ब ४५ दुकानदारांची व्यवस्था संस्थान नगर मनमाड रोडकडील त्रिकोण जागेत करु शकले नाही. विकास आराखडा व नियमाप्रमाणे हायवे नियंत्रण रेषेपासून ३७ मिटर व ४० मिटर ठेवणे आवश्यक आहे. याबाबीचा विचार करता शॉपींग कॉम्प्लेक्स चे काम करणे आता अशक्य आहे. तसे करणे बेकायदेशीर ठरेल संस्थानने स्विकारलेली व संस्थान मार्फत करावयाचे कर्तव्यपुरती कोर्ट डिक्रीची अंमलबजावणी होऊ शकत नाही. संस्थानने सर्व्हे नं. १७० मध्ये सन १९९० मध्ये दरखास्त दाखल केल्या आहेत. शॉपींग कॉम्प्लेक्स बांधले होते. सन १९९० पर्यंत दुकानदारांनी किंवा सामनेवाले यांनी दरखास्त अर्ज दाखल केलेला नाही.

**२)** नगरपालीकेने दि. २७/१०/२००२ चे अर्जाने सर्व्हे नं. १७० मधील दुकान गाळे पाडणेसाठी मा.कोर्टाची परवानगी मागीतली त्यास दुकानदारांनी ना हरकत दिली त्यामुळे सुलेनाम्या प्रमाणे दुकानदारांस ३१ गाळे प्राप्त झाले नाहीत. तसेच उर्वरीत २५ दुकानदारांनाही मोकळी जागा प्राप्त झालेली नाही. ग्रामपंचायत किंवा नगरपंचायत डिक्रीमध्ये पक्षकार नाहीत. दुकानदार , संस्थान, व शासनाने हुकूमाची अंमलबजावणी करावयाची होती. सर्व्हे नं. १७० मध्ये ५६ दुकानदारांची ( परिशीष्ट अ मधील ) व्यवस्था करणेबाबत शासनाने कबुल केले होते. शिर्डी विकास आराखडा तयार केला त्यामध्ये त्रिकोण जागेचा जवळ जवळ १/२ हिस्सा बगीचासाठी दाखविणेत आला आहे. पालखी रोड बाबत भू-संपादन करणेत आलेल्या जागेमध्ये परिशीष्ट ब मधील दुकाने पाडण्यात आलेली आहेत.

**३)** उपरोक्त प्रमाणे मध्यंतरीचे काळात झालेले डेव्हलपमेंटस मुळे सुलेनाम्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. अनेक कारणांमुळे सुलेनाम्याची अंमलबजावणी होत नाही हे माहित असूनही त्याबाबत वादी प्रतिवादीने एकमेकांवर दोष - प्रत्यारोप केलेले आहेत. रस्त्याचे मध्यापासून विशीष्ट अंतरावरच बांधकाम करता येते या अडचणीमुळेही दुकानदारांना ( परिशीष्ट ब ) शिफ्ट करता आलेले नाही. परिशीष्ट क्र. १ मधील दुकानदारांचे काहीसे उदासीनतेमुळे तसेच काहीसे संस्थान व सरकार यांनी पुढाकार न घेतल्यामुळे सुलेनामा परिशिष्ट अ मधील दुकानदारांचे स्थलांतर झालेले नाही. संस्थानने बांधलेले ३१ गाळ्यांमध्ये स्थलांतर होणारे दुकानदारांचे यादी तयार करणेचे कामकाज झालेले नाही. मोकळी जागा प्राप्त होणारे २५ दुकानदारही ओळख होवू शकत नाही. दुकानदारांनी सर्व्हे नं. १७० मधील गाळे पाडून टाकले परंतू सदरची बाब २००२ मधील आहे. त्यामुळे दुकानदारांनी त्यांचा गाळ्याचा हक्क सोडून दिला असे म्हणता येणार नाही. सदर दुकानदारांनी दरखास्त नं. ५/९० मागे घेतलेली नाही. रेकॉर्ड वरुन या दुकानदारांना गाळे देणेचे कबुल केले होते. ३१ गाळे खराब झालेले व निरोपयोगी झालेले असल्याचे दिसून येते. हुकूमनाम्याची अंमलबजावणी न होणेसाठी परिशिष्ट अ मधील दुकानदार जबाबदार असल्याबाबत रिट पिटीशन नं. ३८१३/२००४ चा निकाल मा.कोर्टाने ग्राह्य धरला आहे. परंतू सदर आदेश अंतरीम होता. दरखास्तचा निकाल नव्हता पालखी रोड मध्ये बाधीत होणारे दुकानदारांना स्वतंत्र जागा दिली जाईल, असे अंडरटेकींग मा.कोर्टात देणेत आले होते. त्यामुळे नगरपंचायतीने बांधलेले दुकान संकुलात प्रस्तुत दुकानदारांचे स्थलांतर होवू शकत नाही. सर्व्हे नं. १ मध्ये व सर्व्हे नं. १७० मध्ये सुलेनाम्याप्रमाणे दुकानदारांची व्यवस्था करता येणे अशक्य झालेली आहे. व सुलेनामा हुकूमनाम्याची अंमलबजावणी होऊ शकत नाही अशा अर्थाचे विवेचन मा.कोर्टाने त्यांचे दि. ०५/०७/२०१० चे आदेशात दिलेले आहेत.

**४)** न्यायाचे दृष्टीने तसेच दाव्याचे कामकाज कमी होणेचे दृष्टीने तसेच उभय पक्षकारांचे हक्क राखनेसाठी मा.कोर्टाने Subsequent event " नंतर झालेल्या घटना " विचारात घेता येतात. त्याचप्रमाणे पक्षकारांना जिथे हक्क आहे. तिथे न्याय मार्ग आहे. हे कायद्याचे तत्व पक्षकारांकडून झालेल्या चुका दुरुस्त करण्यासाठी मा.कोर्टाने त्यांचे अधिकार वापरणे आवश्यक आहे. प्रस्तुतच्या केस मध्ये नगरपंचायतने बांधलेल्या दुकान गाळयांमध्ये दुकानदारांना गाळे देता येतील काय याबाबत तपास करण्यात आला. संस्थानने व शासनाने दुकानदारांना दिलेले आश्वासन पुर्तता होणेसाठी काही पर्यायी जागा देता येईल का ?

याबाबत मा.जिल्हाधिकारी यांचा अहवाल मागविण्यात आला. प्रस्तुतचे दुकानदार हे अतिक्रमणधारक आहेत. असे शासनाने दाखविण्याचा प्रयत्न केला. परंतू ते अतिक्रमणधारक नाहीत. असे मा.कोर्टाचे आदेशात नमुद करणेत आलेले आहे.

अर्जदार व सामनेवाले (दुकानदार व संस्थान व शासन ) या दोन्हींचेही Failure मुळे हुकूमनाम्याची अंमलबजावणी कर्तव्य पार पाडू शकलेले नाही, अशी विशेष गुणधर्म असलेली वैशिष्ट्यपुर्ण केस आहे. असे मा.न्यायालयाने आदेशात नमुद केले आहे.

संस्थानने मंदिराचे जवळील अतिक्रमणे हटविणेसाठी तीन कोटी रुपये दिले आहे. परंतू त्यामुळे संपूर्णतः संस्थान जबाबदारी मुक्त कार्यमुक्त झाले असे नाही. कारण ह्या सर्व घटना हुकूमनाम्याची अंमलबजावणी साठी प्रकरण दाखल केले नंतरच्या आहेत.

**५)** सामान्यतः अर्जदार सामनेवाला यांनी मा.कोर्टाकडे मागणी केलेल्या न्यायदाद व्यतिरिक्त इतर रेलीफ मदत करत नाही. परंतू सदरची केस ही वैशिष्ट्यपुर्ण आहे. व अशा केस मध्ये ऐकमेकास दिलेली अश्वासने कोणीही पाळू शकले नाही. त्यामुळे हुकूमनामा निरर्थक झाला आहे. बदलत्या काळाचे ओघात मा.कलेक्टर, तहसिलदार त्याचप्रमाणे संस्थान यांचा डिक्री एक्झीक्युट न होण्यामध्ये सहभाग आहे. या प्रत्येकाचा अंशतः यामध्ये भाग आहे. असे रेकॉर्ड वरुन दिसून येते दुकानांची संख्या त्यांना पर्यायी जागा उपलब्ध होत नसलेची परिस्थीती तसेच सुलेनाम्याची अंमलबजावणी निरर्थक झालेली आहे. त्यांची अंमलबजावणी होत नाही. याबाबींचा विचार करता दुकानदारांना योग्यती नुकसान भरपाई देणे आवश्यक आहे. त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन संपुष्टात आल्याने दुकानांचे क्षेत्राचा व परिसराचा विचार करता त्याचप्रमाणे दुकानदारांने देखील हुकूमनाम्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी तातडीचे पाऊल अचललेले नाही. यासर्व बाबींचा विचार करता मोठ्या आकाराचे दुकान , हॉटेल्स , स्विटमार्ट , शॉप्स , मोठे दुकाने ( १६ X ११ ) यांना रक्कम रु. ३,००,०००/- (अक्षरी रु. तीन लाख मात्र ) या दराने रक्कम अदा करणे तसेच टपऱ्या , फुल प्रसाद, लहानदुकाने होती त्यांना रक्कम रु. २,००,०००/- (अक्षरी रु. दोन लाख मात्र ) निश्चीत करणे योग्य आहे, असे मा.कोर्टाने निकालपत्रात म्हटले आहे. सदरची नुकसान भरपाईची रक्कम महाराष्ट्र शासन ५०% व संस्थानने ५०% याप्रमाणे महाराष्ट्र शासन व संस्थान यांनी दुकानदारास व ते हयात नसलेस त्यांचे वारसास सदरची नुकसान भरपाईची रक्कम द्यावी. नागरीकांचे हिताचे संरक्षण करणेचे दृष्टीने सतत दक्ष राहाणे हे मा.कोर्टाचे कर्तव्य आहे. दाव्यांची संख्या कमी व्हावी यासाठी पक्षकाराने मागितलेल्या न्याय मागणी मध्ये बदल करणसाठी प्रस्तुतची केस ही पात्र आहे. असेही मा.कोर्टाने निकाल पत्रात नमुद केलेले आहे.

**६)** सर्व्हे नं. १ मधील दुकानांचे मुल्यांकन ६७,६,९० ते ५०,५०,५० असे आहे. पी.डब्ल्यु. डि. चे रेकॉर्ड प्रमाणे आहे. प्रत्येक दुकानदारास द्यावयाची नुकसान भरपाई ठरवावी लागेल. अर्जदार दुकानदार यांचे केसचा विचार केवळ राज्य घटनेच्या २२७ कलमा खाली न करता कलम २२६ खाली देखील विचार करावा लागेल. न्यायालयीन खटला कमी करणेचे दृष्टीने न्यायाचे पालन होणेचे दृष्टीने मा.कोर्टाचे विशेष अधिकार वापरणे आवश्यक आहे. तसेच

सिव्हील प्रोसिजर कोड कलम १५१ अन्वये न्यायालयास दिलेले अंगभूत हक्काचा ( Inherent ) वापर, हक्क देखील न्यायाचे पालन करणेचे दृष्टीने योग्य राहील दुकानदार सहजा सहजी मंदीराच्या जवळील जागा सोडणेस तयार नव्हते करीता शासनाने व संस्थानने दुकानदारांसाठी पर्यायी जागा उपलब्ध करणेबाबत पहिले पाऊल उचलावयाचे होते. हॉटेल्स , स्विटमार्ट , शॉप्स , मोठे दुकाने ( १६' X ११' ) व फुल प्रसाद यांचेसाठी ( छोटे दुकाने ) आहे. असे परिशिष्ट अ व परिशिष्ट ब मधील दुकानदारांना देणेसाठी सदरची रक्कम खालचे ( Executing Court ) कोर्टात निकाल तारखेपासून ६ आठवड्याचे आत जमा करावी अशा आशयाचा निकाल मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. ५/०७/२०१० रोजी दिलेला आहे.

सर्व्हे नं. १ मधील ३० गुंठे जागे मध्ये सुलेनाम्याप्रमाणे १४ हॉटेल्स मोठे दुकाने व ८७ लहान दुकाने आहेत. त्याकामी खालील प्रमाणे रक्कम डिपॉझीट करावी लागेल असे मत आहे.

१) मोठी दुकाने ३,००,००० X १४ = ४२,००,०००/-

२) छोटी दुकाने २,००,००० X ८७ = १, ७४,००,०००/-

--------------------------------

एकुण रक्कम रु. - २, १६ ,००,००० /-

उपरोक्त प्रमाणे १०१ दुकानदारांचे २,१६,००,०००/- (अक्षरी रु. दोन कोटी सोळा लाख मात्र ) इतकी रक्कम होते. त्यापैकी ५०% रक्कम रु. १,०८,००,०००/- ( अक्षरी रु. एक कोटी आठ लाख मात्र) संस्थानला मा.कोपरगांव येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात जमा करणेबाबत मंजूरी साठी व पुढील विचारार्थ सादर.

उपरोक्त १०१ दुकानांमध्ये संस्थानने २ दुकाने सुचवावयाची होती. त्याची रक्कम वजा केली तर रु. १,०४,००,०००/- (अक्षरी रु. एक कोटी चार लाख मात्र) एवढी रक्कम मा.कोपरगांव कोर्टात जमा करावी लागेल.

शिर्डी विकास आराखड्यात सर्व्हे नं.१ मधील १५ गुंठे क्षेत्रफळ बगीचासाठी व १५ आर क्षेत्रफळ दुकान केंद्रासाठी आरक्षित आहे. शासनाकडील २७/०३/२००३ चे निर्देशाप्रमाणे सुधारित विकास योजना शिर्डी स.नं.१ मधील सुमारे १५ गुंठे आ.क्र.१(अ) बगीचा क्षेत्र वगळून आ.क्र. १३ ब दुकान केंद्रामध्ये समाविष्ट करणेसाठी व समुचित प्राधिकरण शिर्डी नगरपंचायत दर्शविणेसाठी कार्यवाही करणेबाबत निर्देश आहेत. संस्थानने शासनाकडे १५ गुंठे जागा मिळणेसाठी ०१/०१/२००८ रोजीचे पत्राने मागणी केलेली आहे.

दि.०५/०७/२०१० चे निकालाच्या नाराजीने संस्थानने एल.पी.ए. ( लेटर पेटंट अपिल ) मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करणेबाबत तजविज केलेली आहे. सदर केसचे निकालास आधिन राहून रक्कम रु. १,०८,००,०००/- ( अक्षरी रु. एक कोटी आठ लाख मात्र ) मा.कोपरगांव कोर्टात संस्थान वकीलांचे मार्गदर्शना खाली अर्ज देऊन जमा करता येईल.

दुकानदारांस नुकसान भरपाई दिलेस संस्थानचे मंदिर परिसराचे दक्षिणेकडील भाग पालखी रस्त्याची जागा शासन/ संस्थान/नगरपंचायत यांचेकडे येऊन भक्तांना व आम जनतेसाठी वापरणेत येऊ शकते. तसेच सध्याचे दुकानदारांचे दुकानाऐवजी मंदिर परिसराजवळ निट निटकेपण येऊ शकते, सदर बाब विचारात घेऊन ही रक्कम अदाईबाबत पुढील मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर.

**निर्णय क्र. ६५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १ (मंदीर परिसराचे दक्षिणेकडील) ३० आर जागेमधील दुकानदारांना नुकसान भरपाई देणेबाबत मा.ना हायकोर्टाने आदेश केलेला आहे. सद्यपरिस्थितीत सदरचे ३० आर जागेपैकी १५ आर क्षेत्रात आरक्षण क्र.१३ "अ" असुन त्यावरती नगरपंचायतीचे बगीचे साठीचे आरक्षण असून श्रीसाईबाबा संस्थान ही विकसन यंत्रणा आहे. उर्वरित १५ आर क्षेत्रात आरक्षण क्र.१३ "ब" असून त्यावरती दुकान केंद्राचे आरक्षण आहे.**

**उपरोक्त सर्व क्षेत्र ७/१२ प्रमाणे ३० आर (आरक्षण "अ" व " ब") हे श्रीसाईबाबा संस्थान यांचे भक्तांचे सुविधेसाठी वापरणेस राज्य शासनाकडून मा.जिल्हाधिकारी यांचेमार्फत मिळणेबाबत कार्यवाही करावी असें ठरलें. तसेच आरक्षण १३ "ब" दुकानक्षेत्र बदलुन श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे वापरासाठी असा बदल नगरपंचायत शिर्डी यांनी करुन घेऊन सर्व क्षेत्राचा (३० आर) ताबा श्रीसाईबाबा संस्थान यांना देण्यात यावा.**

**मा.ना.हायकोर्ट यांचे आदेशप्रमाणे ५० % रक्कम संस्थान व ५० % रक्कम शासन यांचा वाटा संपूर्ण श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेने मा.कोपरगाव कोर्टात भरणा करुन याबाबतची कार्यवाही करावी.**

**सदर रकमेबाबत मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर यांनी दि.६.०४.२०१० चे पत्रान्वये प्रत्येक दुकानदारास द्यावयाची रक्कम निश्चित केली असून, त्याप्रमाणे (संस्थान हिस्सा १,०९,५०,००० + शासन हिस्सा १,०९,५०,०००) अशी एकूण रक्कम रुपये २,१९,००,०००/- कोर्टात जमा करण्यात यावी.**

**तसेच सदर जागेचे आरक्षण व ताबा संस्थानला मिळणेबाबत पाठपुरावा करावा,असें ठरलें.**

(कार्यवाही-विधी अधिकारी/बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४७ श्रीसाईबाबा व श्रीसाईनाथ हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगातील व्यवसायरोध भत्ता मंजूर करणे बाबत**

**प्रस्ताव-** शासन निर्णय क्र.मभवा ११०४/प्र.क्र.५/सेवा-९ मंत्रालय मुंबई दि.१९ जुलै २००४ व मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/३०२८/२००४ दि.२७/१०/२००४ अन्वये संस्थान कर्मचा-यांना त्यांच्या मूळ वेतनावर देय असणा-या एकूण महागाई भत्यापैकी मूळ वेतनाच्या ५० टक्के एवढा महागाई भत्ता त्यांच्या मूळ वेतनामध्ये विलीन करुन त्यानुसार वेतन देण्यात आले होते. मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाचे अधिन राहून शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक संकिर्ण-१००४/प्र.क्र.०५/सेवा-५ मंत्रालय दि. १४ जानेवारी २००५ व जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३९५/२००५ दि.२०/०६/२००५ अन्वये संस्थानचे श्री साईबाबा व साईनाथ हॉस्पीटलचे सेवेत असलेले वैद्यकिय अधिकारी यांना व्यवसाय रोध भत्त्याची परिगणना मूळ पगार व डीपी एकत्रित करुन त्यावर करण्यात यावी

या आदेशानुसार संस्थानचे हॉस्पीटल मध्ये सेवेत असलेले वैद्यकिय अधिकारी यांना सध्या व्यवसाय रोध भत्ता देण्यात येत आहे.

आता सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत असणा-या वैद्यकिय अधिका-यांना ०६ व्या वेतन आयोगातील व्यवसायरोध भत्ता मंजूर करण्यातबाबत शासन निर्णय म.वै.अ-१००९/२३३/ प्र.क्र.४५५/ ०९/ सेवा३ मंत्रालय मुंबई दि.०१ एप्रिल २०१० झालेला असून त्यात पुढील प्रमाणे नमूद करण्यात आले आहे.

०१. ०६ व्या वेतन आयोगानुसार सार्वजनिक आरोग्य विभागात कार्यरत असलेल्या संचालक आरोग्य सेवा यांच्यासहीत सर्व पात्र वैद्यकिय अधिका-यांना ०६ व्या वेतन आयोगातील मूळ वेतन अधिक ग्रेड वेतन यांच्या २५ टक्के प्रमाणे व्यवसाय रोध भत्ता मंजूर करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. परंतु त्यांना मिळणारे एकूण वेतन अधिक व्यवसाय रोध भत्ता यांची एकत्रित रक्कम दरमहा रु.८५,०००/- पेक्षां जास्त नसावी.

०२. सदर व्यवसाय रोध भत्ता शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू होईल.

०३. सुधारित दराने देय ठरणारा व्यवसाय रोध भत्ता हा अशाच वैद्यकिय पदांना अनुज्ञेय करण्यात यावा की, ज्यावरील नेमणूकीसाठी इडियन मेडीकल कौन्सील ॲक्ट १९५६ किंवा डेंन्टीस्ट ॲक्ट १९४८ मध्ये विहीत केलेली आवश्यक शैक्षणिक अर्जतेची आवश्यकता आहे आणि ज्या पदांना व्यवसायरोध भत्ता सध्या अनुज्ञेय ठरविण्यात आला आहे. तसेचया विभागाचे नियंत्रणाखाली असलेले आयुर्वेद पदवीधारक अधिकारी ज्यांना व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय आहे. असे वैद्यकिय अधिकारी सुध्दा या भत्यासाठी पात्र असतील.

०४. व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असणा-या वैद्यकिय अधिका-यांना कोणत्याही प्रकारे खाजगी, स्वतंत्र व्यवसाय करता येणार नाही व तसे आढळल्यास ते कारवाई पात्र ठरतील.

०५. व्यवसाय रोध भत्त्यांच्या अनुषंगाने असे सुचित करण्यात येते की, सदरचा व्यवसायरोध भत्ता हा निवृत्ती वेतनासाठी आणि शासकिय निवासस्थानासाठी आकारण्यात येणा-या सेवा शुल्कासाठी हिशोबाबत धरण्यात यावा. या व्यतिरिक्त प्रवास भत्ता, दैनिक भत्ता, घरभाडे भत्ता , शहर भत्ता वेतन निश्चिती इत्यादीसाठी तो हिशोबात धरण्यात येऊ नये. असे नमूद करण्यात आलेले आहे.

शासन परिपत्रक वेपूर -१२०९/प्र.क्र.६९/सेवा -९ मंत्रालय मुंबई दि.२९/०४/२०१० व मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०५/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४६४ नुसार संस्थान कर्मचा-यांना राज्य शासनाचे कर्मचा-यांप्रमाणे ०६ वा वेतन आयोग व भत्त्यातील सुधारणा लागू करण्यात येऊन जा.नं.एसएसएस/वशी-०१/२०४४/२००९ दि.२५/०६/२००९ अन्वये दि.०१/०६/२००९ पासून त्यानुसार वेतन देण्यात येत आहे.

शासकिय वैद्यकिय अधिका-यांना ०६ व्या वेतन आयोगातील व्यवसायरोध भत्ता मंजूर करणेबाबत झालेल्या शासन निर्णयाप्रमाणे संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलकडे सेवेत असलेल्या वैद्यकिय अधिका-यांना व्यवसाय रोध भत्ता देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६५८ यावर सविस्तर चर्चा होऊन, शासकिय वैद्यकिय अधिका-यांना ०६ व्या वेतन आयोगातील व्यवसायरोध भत्ता मंजूर करणेबाबत झालेल्या शासन निर्णयाप्रमाणेच संस्थानचे श्रीसाईबाबा व श्रीसाईनाथ हॉस्पीटलकडे सेवेत असलेल्या वैद्यकिय अधिका-यांना व्यवसाय रोध भत्ता देण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

---

**विषय नं.४८ डॉ.नानासाहेब सारंगधर म्हस्के, उपवैद्यकीय संचालक यांचे मुदत व मानधनवाढीबाबत**

**प्रस्ताव-** डॉ. श्री नानासाहेब सारंगधर म्हस्के, यांची जा. नं. एसएसएस/वशी-०१/१२२२३/२००७ दिनांक ०४/०८/२००७ अन्वये संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डीकडे उपवैद्यकिय संचालक या पदावर प्रतिमहा रुपये ३०,०००/- एकत्रित मानधनावर एक वर्षाचे कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार ते दिनांक ०६/०८/२००७ रोजी कामावर हजर झाले होते.

डॉ. म्हस्के यांची एक वर्ष कालावधीची मुदत संपुष्टात आल्यानंतर त्यांना मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २०/०९/२००८ रोजीचे सभेतील निर्णयानुसार जा. नं. एसएसएस/वशी-१/३०४२/२००८ दिनांक ११/१०/२००८ अन्वये त्यांची मुदत दिनांक ०६/०८/२००८ पासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी वाढविण्यात येऊन त्यांना प्रतिमहा रुपये ३०,०००/- ऐवजी प्रतिमहा ४५,०००/- एकत्रित मानधन करण्यात आले.

त्यांची एक वर्ष वाढविण्यात आलेली मुदत दिनांक ०५/०८/२००९ रोजी संपुष्टात आल्याने, त्यांना मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९/०७/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६४९ नुसार जा.नं. एसएसएस/ वशी-०१/२७२०/२००८ दिनांक १०/०८/२००९ अन्वये दिनांक ०६/०८/२००९ ते दिनांक ०५/०८/२०१० अखेर एक वर्षाचे कालावधीसाठी मुदत वाढ देण्यात आलेली आहे.

हॉस्पिटलचे तत्कालीन वैद्यकिय संचालक डॉ. श्री. सी. एस. बोबडे यांना दिनांक ०५/०४/२०१० पासून सेवामुक्त करण्यात आल्याने, दिनांक ०५/०४/२०१० पासून डॉ. म्हस्के यांचेकडे वैद्यकिय संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.

डॉ. एन.एस. म्हस्के, उपवैद्यकिय संचालक (सध्या इनचार्ज वैद्यकिय संचालक) यांना देण्यात आलेली मुदतवाढ दिनांक ०५/०८/२०१० रोजी संपुष्टात येत असल्याने, त्यांनी दिनांक १७/०७/२०१० रोजीचे अर्जान्वये सेवा पुढे चालु ठेवून पूर्वीचे मासिक मानधनात रुपये २०,०००/- मात्र एवढी वाढ करावी, अशी विनंती केली आहे. डॉ. म्हस्के यांची जन्म तारीख ०३/०६/१९४३ असून, त्यांचे वय आज मितीस ६७ वर्ष ०१ महिना इतके आहे.

तरी, डॉ. एन.एस.म्हस्के, उपवैद्यकिय संचालक- श्री साईबाबा हॉस्पिटल यांना दिनांक ०६/०८/२०१० पासून पुढील कालावधीसाठी मुदतवाढ व मानधनात वाढ देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६५९ यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.एन.एस. म्हस्के, उपवैद्यकीय संचालक यांना दि.०६.०८.२०१० पासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी. तसेच त्यांना प्रतिमाह रु.४५,०००/- मानधनाऐवजी प्रतिमाह रु.५५,०००/- एकत्रित मानधन देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना विभाग)

---

**विषय नं.४९ श्री.वैभव विलास पंडीत,ज्यु.बायोमेडिकल इंजिनिअर यांचे मुदतवाढीबाबत व शैक्षणिक पात्रतेनुसार वर्ग-०४ पदावर नेमणूक देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री वैभव विलास पंडीत, ज्यू.बायोमेडीकल इंजिनीअर यांचे मुदतवाढीबाबतचे दि.१५/१०/२००९ चे गोपनिय अहवालात " त्यांचे तांत्रिक ज्ञान व वैद्यकीय यंत्र सामुग्री बाबतचे ज्ञान अपूर्ण आहे. त्यांना नेहमी उशीराने कामावर येण्याची सवय आहे. त्यांना वेळेवर कामावर येणेबाबत ताकीद देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांना पुढील मुदतवाढ / वेतनश्रेणी देणेबाबत योग्य तो निर्णय व्हावा." असे नमूद केले आहे.

श्री वै.वि.पंडीत यांचे नेमणूकीबाबत तसेच मुदतवाढीबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

श्री वैभव विलास पंडीत, श्रीरामपूर यांनी दि.०४/०१/२००६ रोजी अर्ज सादर करुन बायोमेडीकल इंजिनीअर या पदावर नेमणूक करावी अशी विनंती केलेली आहे. त्यांच्या अर्जावर मा.अध्यक्ष महोदय यांनी या संबंधी मा.डॉ.पी.एल.तिवारी यांचेशी चर्चा करुन निर्णय घ्यावा असे म्हटले आहे.त्यानुसार वैद्यकीय प्रशासक रुग्णालये यांनी दि.०७/०२/२००६ रोजी टिपणी सादर करुन त्यात "डॉ.तिवारी साहेब यांचेशी दि.२४/०१/२००६ रोजी चर्चा होऊन उमेदवार योग्य असल्यास पूढील कार्यवाही करावी असे आदेश दिले होते.त्यानुसार श्री पंडीत यांची दि.३१/०१/२००६ रोजी वरिष्ठ प्रशासक रुग्णलये डॉ. टाकळकर यांनी श्री पंडीत यांची मुलाखत घेऊन श्री पंडीत हे कनिष्ठ अभियंता बायोमेडीकल या पदावर योग्य असल्याचे असे नमूद केलेले आहे " त्यानुसार

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०३/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१५८ नुसार श्री पंडीत यांना संदर्भ क्र.१ अन्वये ज्यू.बायोमेडीकल या पदावर रु. ८०००/-एकत्रित वेतनावर सहा महिने कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांची नेमणूक हि सदर पदांसाठी आवश्यक असलेली त्यांची शैक्षणिक पात्रता व इतर तदनुशंगीक कागदपत्रांची सत्यप्रती तपासून करण्यात येईल असे नमूद केलेले आहे.

२) सदर्भ क्र.३ नुसार त्यांना दि.१८/१०/२००६ ते दि.१७/१०/२००७ अखेर ०१ वर्ष मुदतवाढ देण्यात आली

३) संदर्भ क्र.४ नुसार त्यांना दि.१८/१०/२००७ ते दि.१७/१०/२००८ अखेर ०१ वर्ष मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

दि.१८/०४/२००६ ते दि. १७/१०/२००९ अखेर त्यांची एकूण सेवा ३ वर्ष ६ महिने झालेली आहे.

नेमणूक पत्रातील अट क्र.०५ नुसार श्री पंडीत यांना वेळोवेळी त्यांचे ओरीजनल कागदपत्रे इकडील कार्यालयास पाठविण्याबाबत तोंडी व फोनवरुन वारंवार कळविण्यात आलेले होते. मात्र वेळोवेळी त्यांनी कागदपत्र सादर करण्यात टाळाटाळ कली आहे परंतु सदर कालावधीमध्ये त्यांचा नेमणूक कालावधी संपल्यानंतर त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार उपरोक्तप्रमाणे मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

त्यांचे शैक्षणिक व अनुभवाबाबतचे प्रमाणपत्रांचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ. क्र. | प्रमाणपत्र सादर केल्याची तारीख | प्रमाणपत्राचा तपशील | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अर्ज तारीख दि. ०४/०१/०६ | मॉडर्न हायस्कूल श्रीरामपूर येथील बोनाफाईड दि.२०/०२/२००२ | सन १९९७-९८ मध्ये १० वीत शिक्षण घेत असल्याचे नमूद केलेले आहे. |
| | दि.०९/१०/२००८ रोजीचा कायम करणेबाबत अर्ज | न्यू इंग्लिश स्कूल शिरसगांव येथील शाळा सोडल्याचा दाखला दि.११/०६/१९९९ | जन्म तारखेत खाडाखोड तसेच जन्म स्थळ उंदीरगांव व १० वी उत्तीर्ण सन १९९९ |
| ३ | दि.०९/१०/२००८ रोजीचा कायम करणेबाबत अर्ज | नगरपालिका शिक्षण मंडळ श्रीरामपूर येथील शाळा सोडल्याचा दाखला दि.२२/०३/२००० | जन्मस्थळ जामखेड इ.०२ री |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | दि. ०९/०२/२००९ चा अर्ज पर्सनल फाईलला कागदपत्रे लावणेबाबत | पूर्व तयारी शिक्षणक्रम (Preparatory Programme) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ सप्टें - २००७ | यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची पदवी इतर विद्यापीठाच्या पदवीशी समकक्ष आहे. तथापी श्री पंडीत यांनी सदरची पदवी प्रदान केलेली नाही. |
| ५ | दि. ०९/०२/२००९ चा अर्ज पर्सनल फाईलला कागदपत्रे लावणेबाबत | एफ.वाय.बी.ए यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ मे - २००८ | ..........."" ........... |
| ६ | दि.१०/११/२००८ चा अर्ज फाईला कागदपत्रे लावणेबाबत | साऊथ इंडीया सर्जिकल कंपनी लि. यांचे Dip in Instrumentation Engineering चे प्रमाणपत्र | सदरचे प्रमाण पत्र मान्यता प्राप्त विद्यापीठाचे नाही. कंपनीचे आहे. |
| ७ | दि. २०/०८/२००९ चा अर्ज पर्सनल फाईलला कागदपत्रे लावणेबाबत | मुंबई हिंदी विद्यापीठ हिन्दी उत्तमा परिक्षा (मॅट्रीक हिन्दी स्तर) | इ. १० वी पास झाल्याचे प्रमाणपत्र दि.१९/०१/२००९ |
| ८ | दि. २०/०८/२००९ चा अर्ज पर्सनल फाईलला कागदपत्रे लावणेबाबत | झेवीअर टेक्निकल ट्रेनिंग सेंटर, श्रीरामपूर | दोन वर्षाचा हॉस्पीटल मेंन्टेनन्स ट्रेनिंग |

श्री साईबाबा हॉस्पीटल कर्मचारी आकृतीबंधास मान्यतेबाबतचा शासन निर्णय क्र.सासंवि २००५/३१७/(१०३) का.सोळा मंत्रालय मुं.दि.१३/०६/२००७ नुसार श्री साईबाबा हॉस्पीटल कर्मचारी आकृतीबंधामध्ये ज्यू. बायोमेडीकल या पदाची शैक्षणिक पात्रता B.E. / Dip In Bio Medical Engineereing / Electronics From Any Govt. Recognized Univercity ; Exp ०३ Yrs अशी दर्शविण्यात आली आहे. (B.E. / Dip In Bio Medical Engineers / Electronics) अशी अभिप्रेत आहे.

श्री साईबाबा संस्थान कर्मचारी आकृतीबंधास मान्यते बाबतचा शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का. सोळा,मंत्रालय मुं.दि.०७/०८/०९ मध्ये कर्मचारी नेमणूकी संदर्भात खालीलप्रमाणे तरतूदी आहेत.

**अट क्र.** **तपशिल**

(०३) सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

(१०) तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

(११) आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचाऱ्यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरुवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.

उपरोक्त तरतूदी तसेच वरिल परिस्थिती विचारात घेता श्री वैभव पंडीत यांचे बाबत खालील बाबी निर्देशनास येत आहेत.

१) सदर पद भरतांना विस्तृत प्रसिध्दी देऊन स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नेमणूक झालेली नाही. (तथापी सदर आकृतीबंध हा नेमणूकीनंतर मंजूर झालेला आहे. )

२) सदर पदासाठी आकृतीबंधात नमूद केलेली शैक्षणिक पात्रता त्यांचेकडे नाही.

३) श्री वैभव विलास पंडीत, ज्यू.बायोमेडीकल इंजिनीअर यांचे मुदतवाढीबाबतचे दि.१५/१०/२००९ चे गोपनिय अहवालात " त्यांचे तांत्रिक ज्ञान व वैद्यकीय यंत्र सामुग्री बाबतचे ज्ञान अपूर्ण आहे. त्यांना नेहमी उशीराने कामावर येण्याची सवय आहे. त्यांना वेळेवर कामावर येणेबाबत ताकीद देण्यात आलेल्या आहेत. त्यांना पुढील मुदतवाढ / वेतनश्रेणी देणेबाबत योग्य तो निर्णय व्हावा." असे नमूद केले आहे.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता श्री. पंडीत यांना आहे त्याच मानधनावर दि.१८/१०/२००९ पासून पुढे दि.३१/०८/२०१० अखेर मुदत वाढ देणेबाबत व शासन मान्य श्री साईबाबा हॉस्पीटल कर्मचारी आकृतीबंधात सदर पदासाठी नमूद करण्यात आलेली शक्षणिक पात्रता (बी.ई/डिप्लोमा (बायो मेडीकल/ इलेक्ट्रॉनिक्स) श्री. पंडीत यांचेकडे नाही. ते ज्यु.बायोमेडीकल इंजिनियर या पदावर नेमणूक देणेस पात्र ठरत नाहीत.

तथापी त्यांनी सादर केलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव याबाबतची कागदपत्रे पाहीली असता श्री साईबाबा हॉस्पीटल चे कर्मचारी आकृतीबंधामध्ये मंजूर असलेले वर्ग-०४ चे कर्मचारी (वॉर्ड बॉय ) या पदावर स्थानापन्न करणेबाबत चे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.वैभव विलास पंडित, यांचेकडे ज्युनिअर बायोमेडिकल इंजिनियर या पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता नसल्याने त्यांना श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे कर्मचारी आकृतीबंधामध्ये मंजूर असलेले वर्ग-०४ चे कर्मचारी (वॉर्ड बॉय) या पदावर स्थानापन्न करण्यात यावे, असें ठरलें.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

---

**विषय नं.५०** **१०० बिंदू नामावलीनुसार प्र-वर्गातील उमेदवार उपलब्ध न झालेमुळे ११ महिने तात्पुरते कालावधीसाठी नेमणूक केलेल्या परिचारिकांचे मुदत वाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा हॉस्पिटलसाठी आवश्यक असलेल्या परिचारक/परिचारीकांची ७५ पदे भरणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने विविध वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करुन जाहिरातीनुसार आलेल्या अर्जांची छाननी करुन पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या होत्या. त्यास अनुसरुन, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८/१०/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७६२ अन्वये १०० बिंदू नामावलीनुसार एकूण ३७ उमेदवारांना ०१ वर्ष परिवीक्षाधीन कालावधीसाठी नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. तसेच १०० बिंदू नामावलीनुसार प्रवर्गातील पुरेसे उमेदवार न मिळाल्याने मुलाखतीत पात्र ठरलेल्या एकूण २५ उमेदवारांना माहे जुलै, ०८ ते डिसेंबर,०९ या कालावधीत ११ महिन्याकरीता पहिल्यांदा नेमणूक आदेश देण्यात आलेले होते.

त्यानंतर या २५ परिचारक / परिचारिका यांची मुदत संपुष्टात आल्याने, मा. व्यवस्थापन समितीच्या दि. ०९/०८/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७१० अन्वये त्यांचे नेमणूकीस पहिल्यांदा ११ महिने कालावधीकरीता मुदत वाढ देण्यात आलेली आहे. आता २५ परिचारक/परिचारीका पैकी खालील १४ परिचारक/परिचारीकांची मुदत रकाना क्र. ०६ मध्ये दर्शविलेप्रमाणे माहे जुलै ते आक्टोबर २०१० या कालावधीत संपुष्टात येत आहे.

| अ नं | नाव | पहिली नेमणूक ११ महिने | | पहिल्यांदा मुदतवाढ ११ महिने | |
|---|---|---|---|---|---|
| | | हजर तारीख | मुदत संपुष्टात आलेची दिनांक | हजर तारीख | मुदत संपुष्टात येत असलेची दिनांक |
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| १ | श्रीमती. कुंभार सुनिता शिवशंकर | २३/०९/०८ | २२/०८/०९ | २५/०८/०९ | २४/०७/१० |
| २ | श्री काळे चांगदेव पंढरीनाथ | २४/०९/०८ | २३/०८/०९ | २६/०८/०९ | २५/०७/१० |
| ३ | श्री कुलकर्णी विशाल निळकंठ | २६/०९/०८ | २५/०८/०९ | २८/०८/०९ | २७/०७/१० |
| ४ | कु. कोळगे प्रतिमा रामचंद्र | २६/०९/०८ | २५/०८/०९ | २८/०८/०९ | २७/०७/१० |
| ५ | कु. मुन्तोडे रिटा मॅन्युएल | २७/०९/०८ | २६/०८/०९ | २९/०८/०९ | २८/०७/१० |
| ६ | कु सदाफुले आशुमती संपत | २९/०९/०८ | २८/०८/०९ | ३१/०८/०९ | ३०/०७/१० |
| ७ | कु. आवारे मनिषा स्टिफन | २९/०९/०८ | २८/०८/०९ | ३१/०८/०९ | ३०/०७/१० |
| ८ | कु. शिंदे कांचन विनायक | ०१/१०/०८ | ३०/०८/०९ | ०२/०९/०९ | ०१/०८/१० |
| ९ | श्रीमती महागडे वैशाली भगवान | ०१/१०/०८ | ३०/०८/०९ | ०२/०९/०९ | ०१/०८/१० |
| १० | श्रीमती बनसोडे सारीका फकीरा | ०३/१०/०८ | ०२/०९/०९ | ०५/०९/०९ | ०४/०८/१० |
| ११ | श्री. सुर्यवंशी आशिष शरद | ०४/१०/०८ | ०३/०९/०९ | ०६/०९/०९ | ०५/०८/१० |
| १२ | कु. कावळे आशा दत्तात्रय | २२/१०/०८ | २१/०९/०९ | २४/०९/०९ | २३/०८/१० |
| १३ | श्री. ओहोळ राहुल प्रकाश | ०७/११/०८ | ०६/१०/०९ | ०९/१०/०९ | ०८/०९/१० |
| १४ | कु. शिनगारे मनिषा बन्सी | ०१/११/०८ | ३०/०९/०९ | ०३/१०/०९ | ०२/०९/१० |

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८/०४/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४११ नुसार संस्थान आस्थापनेवरील ११ महिन्यांसाठी नेमलेल्या परिचारिकांना दरमहा रुपये १०,०००/- एकत्रित वेतन व संस्थान कंत्राटदाराकडील कंत्राटी परिचारिकांना दरमहा रुपये ८,०००/- एकत्रित वेतन देण्यात यावे, असा निर्णय झालेला आहे.

त्यास अनुसरुन, ११ महिन्यांचे कालावधीसाठी नेमणूक केलेल्या उपरोक्त परिचारक / परिचारिका यांना सध्या दरमहा रुपये १०,०००/- एकत्रित वेतन देण्यात येत आहे. संबधीत परिचारक / परिचारिका यांची ११ महिन्यांचे नेमणूकीची मुदत माहे- जुलै, २०१० ते आक्टोबर २०१० अखेर संपुष्टात येत आहे.

दोन्ही रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना अत्यावश्यक व तातडीने वैद्यकिय सेवा देणेकामी सदर परिचारक / परिचारिका यांचे सेवेची आवश्यकता आहे. त्यामुळे आवश्यकता विचारात घेवून, सदर पदे भरण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत यावी असे मत आहे.

(१) १०० बिंदु नामावलीप्रमाणे प्रवर्गातील पदे भरण्यासाठी वर्तमानपत्रात जाहीरात देवून अर्ज मागणी करणे.

(२) जाहीरात देवून प्रवर्गातील पदे भरण्यासाठी काहीसा कालावधी लागणार असल्याने जाहीरातीनुसार पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत हॉस्पिटल कामाची खोटी होऊ नये म्हणून सध्या ११ महिने कालावधीसाठी सेवेत असलेल्या परिचारीकांना त्यांची मुदत संपलेपासून ४ महिने कालावधीसाठी सध्याचे आहे त्याच अटी-शर्तीवर दरमहा रु.१०,०००/- एकत्रित वेतनावर मुदतवाढ देणे.

(३) जाहीरातीनुसार मिळणाऱ्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना नियमानुसार नेमणूक पत्र देऊन प्रवर्गातील उमेदवार प्राप्त न झालेल्या उर्वरीत पदांवर पुन्हा ११ महिने कालावधीसाठी सध्या सेवेत असलेल्या आवश्यक तेवढया परिचारीकांना दरमहा रु.१०,०००/- एकत्रित वेतनावर नेमणुका देणे अथवा त्यांना कंत्राटदारामार्फत दरमहा रु.८,०००/- एकत्रित मानधनावर कामांस घेणे याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**निर्णय क्र.६६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, १०० बिंदू नामावलीप्रमाणे प्रवर्गातील व इतर वर्गवारीमधील दोनही हॉस्पिटलमधील परिचारकांची रिक्त पदे भरण्यासाठी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन अर्ज मागणी करणेत यावी.**

**जाहीरातीनुसार पदे भरण्यास काहीसा कालावधी लागणार असल्याने सद्या ११ महिने कालावधीसाठी नेमणूक केलेल्या परिचारक/ परिचारीकांना त्यांची मुदत संपलेपासून ६ महिने अथवा जाहीरातीनुसार पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत सध्याचेच अटी/ शर्तीवर दरमहा रु.१०,०००/- एकत्रित वेतनावर नेमणूका देण्यात याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/अधिक्षक,आस्थापना)

---

**मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **दिनांक १३.०७.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या निवड समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६६२** दिनांक १३.०७.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या निवड समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

उपसमितीचे दिनांक ०५.०७.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक समितीचे सभेत ठरलेनुसार श्री साईबाबा हॉस्पीटलकडील खालील रिक्तपदाच्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

| अ नं | पदाचे नाव | पदसंख्या | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकिय संचालक | ०१ | खुला |
| ०२ | वैद्यकिय प्रशासक | ०१ | खुला |
| ०३ | वैद्यकिय अधिक्षक | ०१ | खुला |
| ०४ | बायोकेमिस्ट | ०१ | खुला |
| ०५ | हिस्टोपॅथ तंत्रज्ञ | ०२ | खुला |
| ०६ | वरीष्ठ कॅथलॅब तंत्रज्ञ | ०१ | खुला |
| ०७ | समाजसेवक/ सोशल वर्कर | ०२ | ०१ खुला<br>०१ एस टी |
| ०८ | एस टी / एच ए फॉर बायोमेडीकल वेस्ट मॅनेजमेंट | ०१ | खुला |

वरील अ.नं.०१ या वैद्यकीय संचालक या पदासाठी दोन उमेदवार उपस्थित होते व अ.नं.०२ वैद्यकीय प्रशासक व ०३ वैद्यकीय अधिक्षक या पदास उमेदवार उपस्थित नव्हते. अ.नं.०१ पदासाठी आलेले दोन्हीही उमेदवार पदास योग्य न वाटल्याने उपरोक्त तीनही पदांच्या फेर जाहीरात दयावी असे ठरले व जाहिरातील वरील तीनही पदाचे मुलाखतीसाठी येणा-या पात्र उमेदवारांना जाणे-येण्याचा खर्च ( विमान,रेल्वे, एस टी भाडे) देण्यात यावा.

तसेच वरील अ. नं.०१ व ०३ या पदासाठी उमेदवारास किमान रुपये ५००००/- इतके सध्याचे मासिक वेतन असावे तसेच त्यांना अधिक जाणे-येण्याचा खर्च तसेच अ.नं.०२ साठी सुद्धा जाणे-येण्याचा खर्च विमान,रेल्वे प्रमाणे देण्यात यावा असे ठरलें.

त्याचप्रमाणे दि०५.०७.२०१० रोजीच्या मा. स्थानिक समितीसमोर दि.२७.०६.२०१० रोजी चे अ.नं.४ ते ८ या पदासाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेचे सिलबंद करण्यात आलेल्या गुणपत्रक व गुणयादया उघडण्यात आल्या. लेखी परिक्षेच्या गुण यादीतील प्रथम आलेले पहिले पांच उमेदवारांना (एका पदासाठी पांच उमेदवार) दि.१३.०७.२०१० रोजी मा.व्यवस्थापन समिती समोर तोंडी मुलाखतीसाठी बोलवावे असे ठरले. तांत्रिक पदांसाठी Practical ज्ञान तपासणेकरीता परिक्षा घेण्यात येऊन त्याच दिवशी तोंडी मुलाखतीही त्या क्षेत्रातील तज्ञांसमारे घेण्यात आल्या.

तोंडी मुलाखत १० गुणांची घेण्यात आली. त्यामध्ये सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या खालील उमेदवारांची मा. व्यवस्थापन समिती सदस्यांनी शिफारस केलेली आहे. या उमेदवारांना मंजुर आकृतीबंधानुसार नेमणूक आदेश देण्यात यावेत,असें ठरलें.

| अ नं | पदाचे नाव | पदसंख्या | प्रवर्ग | उमेदवारांचे नाव | तोंडी मुलाखतीत मिळालेले गुण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | बायोकेमिस्ट | ०१ | खुला | श्री शिंदे दिलीप धोंडीबा | ६.२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०२ | हिस्टोपॅथ तंत्रज्ञ | ०२ | खुला | श्री शेख रसीद रज्जाक<br>श्रीमती ललगे कमल जनार्दन | ७.६<br>७.२ |
| ०३ | वरीष्ठ कॅथलॅब तंत्रज्ञ | ०१ | खुला | श्री थेटे रविंद्र पांडुरंग | ८.६७ |
| ०४ | समाजसेवक / सोशल वर्कर | ०२ | ०१ खुला<br>०१ एस टी | कु जयश्री साहेबराव ससे<br>कु सोनल भिमराज नागपुरे | ९.४<br>१० |
| ०५ | एस टी / एच ए फॉर बायोमेडीकल वेस्ट मॅनेजमेंट | ०१ | खुला | श्री कासार महेश रावसाहेब | ८.६ |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/अधिक्षक,आस्थापना)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२ डिफिब्रीलेटर मशिनचे दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे अतिदक्षता विभाग व ऑपरेशन थिएटर्समध्ये अत्यवस्थ रुग्णांना डिफीब्रीलेशन करणेकामी वापरले जाणारे Life Pack २० डिफीब्रीलेटर मशिन खरेदी करणेत आले आहेत. सदर डिफीब्रीलेटर्स दि. २०/०२/२००७ रोजी कार्यान्वीत करणेत आले असुन कंपनीने सदर मशीन्सकरीता दिलेला एक वर्षांचा वॉरंटी कालावधी संपला आहे. पुढील कालावधीत मशीन्सचे दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीकडे दि. ०१/०४/२०१० ते दि. ३१/०३/२०११ या कालावधीकरीता वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले आहे. सदर कालावधीत दुरुस्तीकरीता आवश्यक असणाऱ्या स्पेअर पार्टची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या सी. आर. यु. क्र. ०२ विभागातील डिफीब्रीलेटर मशीन पॉवर सप्लायमधील फ्लक्च्युएशन्समुळे नादुरुस्त झाले आहे. कंपनीचे इंजिनीअरने सदर मशीनची तपासणी करुन मशीनचा Main PCB खराब झाल्यामुळे बदलणेची आवश्यकता असल्याचे कळविले आहे. तसेच सदरकामी कंपनीने त्यांचे पत्र क्र. LCMS / FD / २०१०-११ / ०१२१ दि. १८/०६/२०१० अन्वये सर्व करांसहीत एकुण रु. ८१,७५९/- (अक्षरी रु. एक्याऐंशी हजार सातशे एकोणसाठ मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले असुन सदर रकमेची आगाउ मागणी केली आहे. परंतु कंपनी प्रतिनीधींशी झालेल्या प्रत्यक्ष चर्चेनंतर कंपनीने उपरोक्त रक्कम मशिनचे दुरुस्तीनंतर अदा होणेस स्विकृती दिली आहे. सदर Main PCB हा स्पेअर पार्ट हा मोनोपॉली ॲटम या प्रकारचा असल्याने मे. लाईफ केअर मेडीकल सिस्टीम्स, मुंबई यांचेकडुनच खरेदी करावा लागणार आहे. कंपनी सदर Main PCB करीता सहा महिन्याची वॉरंटी देत आहे.

तरी डिफीब्रीलेटर मशीनचा Main PCB मे. लाईफ केअर मेडीकल सिस्टीम्स, मुंबई यांचेकडुन बदलुन घेणेस व सदर कामी येणाऱ्या एकुण रु. ८१,७५९/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६६३ यावर सविस्तर चर्चा होऊन, डिफीब्रीलेटर मशीनचा Main PCB मे. लाईफ केअर मेडीकल सिस्टीम्स, मुंबई यांचेकडुन बदलुन घेणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रुपये ८१,७५९/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ साईटेक प्रोजेक्टकरीता ए.सी. यंत्रणा उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे सर्व विभाग संगणकीकृत करुन संस्थानचा कार्यभार सुरळीत व अधिक सक्षमतेने चालविण्याकरीता साईटेक्ट प्रोजेक्ट राबविण्यात येत आहे.

साईटेक प्रोजेक्टचे डाटा सेंटर हे श्री साई प्रसादालय १ ला माळा याठिकाणी तयार करण्यात येत असून या ठिकाणी Data Centre, MUX Room No.1 , MUX Room No.2 आणि UPS Room कक्ष तयार करण्यात येत आहेत. याठिकाणी अत्याधुनिक व संवेदनशील मशिनरी ( Main Server, Data storage Racks, Tape Library, Power Edge Server व आणखी ) बसविण्यात येणार असल्याने येथील या मशिनरी विशिष्ट व स्थिर तापमानाला थंड ठेवाव्या लागतात. या मशिनरी विशिष्ट व स्थिर तापमानाला थंड ठेवणेकरीता विशिष्ट प्रकारची वातानुकुलीत यंत्रणा उभारावी लागणार आहे. याकरीता प्रेसिजन टाईपची ए.सी. यंत्रणा वापरावी लागते.

डाटा सेंटरसाठी स्पेशल टाईपचे प्रेसिजन ए.सी.च वापरावे लागतात.

साध्या ए.सी.तील व प्रेसिजन ए.सी.तील सर्वसाधारण फरक खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | साधारण ए.सी. | | अ.क्र. | प्रेसिजन ए.सी. |
|---|---|---|---|---|
| ०१) | हे ए.सी. टेम्परेचर कॉन्स्टंट ठेवू शकत नाही. | | ०१) | हे ए.सी. टेम्परेचर ०.०५ % पर्यंत टेम्परेचर कॉन्स्टंट ठेवत असल्याने डाटा खराब होण्याची शक्यता नसते. |
| ०२) | ह्या ए.सी.द्वारे ह्युमिडिटी कन्ट्रोल होत नाही. जेणेकरुन डाटा सर्व्हर मधील महत्त्वाच्या डिस्कमध्ये वॉटर व्हेपर जाऊन डाटा खराब होतो. | | ०२) | हे ए.सी. ह्युमिडिटी कन्ट्रोल करतात. त्यामुळे डाटा सर्व्हरमध्ये सर्व डाटा सुरक्षित राहतो. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३) | हे ए.सी. हिट लोड फॅक्टर फक्त ७०% पर्यंत सहन करतात. | | ०३) | या प्रकारचे ए.सी. हिट लोड फॅक्टर ९५% पर्यंत सहन करतात. |
| ०४) | हे ए.सी.नेटवर्कमध्ये जोडता येत नाही | | ०४) | हे ए.सी.नेटवर्कमध्ये घेता येतात. |
| ०५) | हे ए.सी. डस्ट कन्ट्रोल करु शकत नाहीत. जेणेकरुन डाटा सर्व्हरमध्ये डस्ट जाऊन अडचणी येऊ शकतात. | | ०५) | हे ए.सी. डस्ट कन्ट्रोल करु शकतात. त्यामुळे डाटा सर्व्हररुममध्ये डस्ट जात नाही व डाटा सुरक्षित राहतो. |

मशिनरी विशिष्ट व स्थिर तापमानाला थंड ठेवणेकरीता वातानुकुलीत यंत्रणा उभारणेकरीता साईटेकचे काम करणारे मे.कॉग्निझंट यांचे सल्ल्यानुसार प्रेसिजन एसी.चे उत्पादक मे.ब्लू स्टार, पुणे यांचेकडून संस्थान जा.क्र.एसएसएस/विद्युत/८४९०/२०१०दिनांक१९.०७.२०१०नुसार दरपत्रक मागविण्यात आले. आता मे.ब्लू स्टार लिमिटेड, पुणे यांनी मे.कॉग्निझंट यांचे इंजिनिअर श्री.माधव यांचेशी चर्चा करून खर्चाचे कोटेशन सादर करीत असल्याचे लेखी कळवून येणा-या खर्चाचे कोटेशन पाठविले आहे.

हे कोटेशन तपासणीसाठी मे.कॉग्निझंट यांचेकडे संस्थानचे आय.टी.विभागामार्फत विद्युत विभागाने जा.क्र.४१६८ / २०१० दिनांक ०३-०८-२०१० नुसार पाठविले होते. त्यावर मे.कॉग्निझंट यांनी मे.ब्लू स्टार यांनी दिलेले कोटेशन हे डाटा सेंटर एरीयासाठी व्यवस्थित असून त्यानुसार पुढील कार्यवाही करणेस हरकत नसल्याचे आय.टी.विभागाच्या दिनांक ०५-०८-२०१० च्या लेखी पत्रानुसार कळविले आहे.

साईटेक प्रोजेक्टच्या डाटा सेंटरकरीता ए.सी.यंत्रणा उभारणी करणेकामी त्यांनी रक्कम रुपये ४२,३६,२१८/- इतका खर्च कळविला आहे.

प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६४** **दि.०७.०८.२०१० रोजी सकाळी ०९.०० वाजता यासंबंधी मा.व्यवस्थापन समिती सभेचे अगोदर साईटेक प्रकल्पाचे अध्यक्ष श्री. रमणी यांचे अध्यक्षतेसाठी साईटेक प्रकल्पाच्या प्रगतीच्या आढावासंबंधी मिटींग झाली. या मिटींगमध्ये उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. या मिटींगमध्ये ब्ल्यु स्टार, मुंबई यांचे प्रतिनिधींनी उपस्थित राहून सर्व प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली व शंका निरसन केले. उपरोक्त नमुद केलेल्या दरात लॅनकार्ड दराचा उल्लेख नसल्याने याबाबत ब्ल्यु स्टार, मुंबई यांना विचारणा केली असता त्यांनी या सिस्टीम करिता लागणारे लॅनकार्ड (मार्केट किंमत अंदाजे रु.७५,०००/-) विनामुल्य बसवून देऊ तसेच त्यांनी नमुद केलेल्या दरात ३ टक्के दर कमी करु म्हणून सांगुन लेखी पत्रही दिले आहे. त्यानुसार रुपये ४१,०९,१३१/- इतक्या येणाऱ्या खर्चास तसेच ब्लू स्टार यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

-------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४** **साईटेक प्रोजेक्ट सेंटरचे विद्युतीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे सर्व विभाग संगणकीकृत करुन ते एकमेकांना लॅनव्दारे जोडून संस्थानचा कार्यभार सुरळीत व अधिक सक्षमतेने चालविण्याकरीता साईटेक प्रोजेक्ट राबविण्यात येत आहे. या प्रोजेक्टचे मुख्य केंद्र साई प्रसादालय इमारतीमधील १ ल्या माळयावर उभारणीचे काम चालू आहे.

सदरील साईटेक प्रोजेक्ट सेंटरच्या कंट्रोल रुम, ऑपरेटर रुम व जनरल हॉलचे विद्युतीकरण करावे लागणार आहे. विद्युतीकरणाचे काम विद्युत ठेकेदारांकडून निविदा मागवून करुन घ्यावे लागणार आहे. विद्युतीकरण करणेकामी येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | NON CSR | Point Wiring for Light / Fan / Bell with ISI mark 3 x 1.5 Sq.mm. copper PVC insulate FR Grade wire. | 65 Nos. | 0,380.00 | 0,24,700.00 |
| 02) | 1-8-7 | Supplying and erecting modular type switch one way 16/20A, ISI mark. | 050 Nos. | 0,140.70 | 0,07,035.00 |
| 03) | 1-8-15 | Supplying and Erecting modular type 3 pin 6/16A combined socket unit ISI mark. | 050 Nos. | 0,185.85 | 00,09,292.50 |
| 04) | 1-2-12 | Supplying and laying PVC trunking (PVC casing-n-capping) of size 32mm. | 600 Mtr. | 0,044.10 | 0,26,460.00 |
| 05) | 5-4-11 | Supplying and erecting triple and neutral distribution board (TPNDB) with door surface/flush mounted SP (24 Poles) / TP (8 Poles) MCB of 8 ways. | 003 Nos. | 6,381.90 | 0,19,145.70 |
| 06) | 1-3-3 | Supplying and erecting mains with 2x2.5 sq.mm. F.R. stranded/solid copper PVC insulated wire. | 250 Mtr. | 0,039.90 | 0,09,975.00 |
| 07) | NON CSR | Supplying and Erecting main with 1x2.5 Sq.mm. F.R. Stranded / Solid Copper PVC insulated wire. | 1250 Mtr. | 0,019.95 | 0,24,937.50 |
| 08) | 1-3-5 | Supplying and erecting mains with 2x4 sq.mm. F.R. stranded/solid copper PVC insulated wire. | 1000 Mtr. | 0,056.70 | 0,56,700.00 |
| 09) | 7-1-18 | Supplying and Erecting PVC armoured cable 3 ½ core 25 sq.mm aluminimum conductor. | 100 Mtr. | 0,238.35 | 0,23,835.00 |
| 10) | 5-6-14 | Supplying, fixing and commissioning RCCB + MCB, electro magnetic type 6 kA breaking capacity of 63A 4 pole. | 001 Nos. | 3,381.00 | 0,03,381.00 |
| 11) | 5-6-7 | Providing erecting & commissioning RCCB of electro magnetic type with 20 kA braking capacity of 80A. 4 Pole. | 002 Nos. | 4,442.55 | 0,08,885.10 |
| 12) | 5-3-2 | Suppling,erecting & marking SPMCB 6A to 32A | 072Nos. | 0,162.75 | 0,11,718.00 |
| 13) | 1-8-33 | Supplying and Erecting PVC Surface modular switch box. | 050Nos. | 0,130.20 | 0,06,510.00 |
| 14) | 1-8-27 | Supplying and Erecting modular type electronic step regulator. | 012 Nos. | 0,397.95 | 0,04,775.40 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 15) | 9-1-3 | Supplying and Erecting Galvanised cast iron plate size 60 x 60 x 0.6cms. | 002 Nos. | 1,785.00 | 0,03,570.00 |
| 16) | 9-2-4 | Supplying and Erecting Annealed bare copper wire. | 100 KG. | 0,565.95 | 0,56,595.00 |
| 17) | 2-2-33 | Supplying and erecting approved Crescent recess / surface soft light mirror optic square PL fitting. | 025 Nos. | 3,672.90 | 0,91,822.50 |
| 18) | NON CSR | Supplying and drawing of 3 x 1.5sq.mm. FR grade copper wires. | 035 | 0,325.00 | 0,11,375.00 |
| 19) | 2-6-3 | Supplying and Erecting Crompton make high speed Ceiling fan. | 062Nos. | 1,323.00 | 0,82,026.00 |
| 20) | 2-7-6 | Supplying and erecting 'B' grade G.I.pipe / M.S. pipe down rod. | 400 Mtr. | 0,119.70 | 0,47,880.00 |
| 21) | NON CSR | Supplying, erecting & welding fan clamp on M.S. Gurder of 30 x 5mm flat | 062 | 0,129.15 | 0,08,007.30 |
| 22) | 2-2-38 | Supplying and erecting 1x28W Energy Efficient Retrofit / Stand alone Fluorescent Tube light Fitting. | 018 | 0,978.60 | 0,17,614.80 |
| 23) | 5-1-20 | Supplying & erecting Tripple pole metal clad HRC fuse switch 415/500V 400A | 002 | 16829.40 | 0,33,658.80 |
| 24) | 5-1-18 | Supplying and erecting Triple pole metal / iron clad HRC fuse switch 415/ 500 V. 200 A. | 02 | 9,580.20 | 0,19,160.40 |
| 25) | 6-3-5 | Supplying & erecting KWH meter. | 01 Nos. | 14,588.70 | 0,14,588.70 |
| | | | | Total :- | 6,23,648.70 |
| | | | + Contigency 5% | | 0,31,182.44 |
| | | | Total Amount :- | | 6,54,831.14 |
| | | | **Round up Rs. :-** | | **6,54,831.00** |

उपरोक्तप्रमाणे साईटेक प्रोजेक्ट सेंटरच्या कंट्रोल रुम, ऑपरेटर रुम व जनरल हॉलचे विद्युतीकरण करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ६,५४,८३१/- इतका खर्च अपेक्षित आहे.

प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६५ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साईटेक प्रोजेक्ट सेंटरच्या कंट्रोल रुम, ऑपरेटर रुम व जनरल हॉलचे विद्युतीकरण करणेकामी अंदाजे रक्कम रु. ६,५४,८३१/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. हे काम तातडीचे असल्याने रु.५,००,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली. हे काम विद्युत ठेकेदाराकडून कोटेशन बोलावुन घेणेस, कोटेशन प्राप्त झालेनंतर मा.कार्यकारी अधिकारी यांचेसमोर कोटेशन उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेस, कार्यादेश देणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५ शिर्डी-कनकुरी-डोऱ्हाळे रस्त्यावर उभारण्यात आलेल्या पथदिव्यांना विज पुरवठा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिरडी-कनकुरी-डोऱ्हाळे रस्त्यावर पथदिवे संस्थानमार्फत उभारणीसाठी विनंती करून शिरडी नगरपंचायत, डोऱ्हाळे ग्रामपंचायत, कनकुरी ग्रामपंचायत या सर्वांनी या बसविण्यात येणाऱ्या सदर पथदिव्यांचे लाईट बील तसेच देखभाल व दुरुस्ती त्यांचे संस्थेमार्फत केली जाईल, असे लेखी दिलेले आहे.

यांनतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्या निधीतून खर्च करणेस मान्यता मिळणेबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डीमार्फत महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. महाराष्ट्र शासनाने निर्णय क्रमांक :- सासंवि २००७ / ९९२ / (१७६) / का.सोळा दिनांक :- २० फेब्रुवारी, २००९ अन्वये त्यास मान्यता देताना काही अटी नमूद केलेल्या आहेत.

प्रस्ताव व त्यावर महाराष्ट्र शासनाचा निर्णय पुढीलप्रमाणे :-

श्री साईबाबा संस्थानच्या निधीतून शिर्डी<br>नगरपंचायतीकरीता कनकुरी रस्त्यावर<br>पुढे कनकुरी डो-हाळे गावरस्त्यावर<br>पथदिवे उभारण्याबाबत ...

महाराष्ट्र शासन<br>विधी व न्याय विभाग<br>शासन निर्णय क्रमांक :- सासंवि २००७ / ९९२ / (१७६) / का.सोळा.<br>मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक :- २० फेब्रुवारी, २००९

पहा :- १) कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे पत्र क्रमांक एसएसएस/विद्युत/१५५९६/२००७, दि.२९.९.२००७ व ७२७०/२००८ दि.१७.५.२००८<br>२) श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन समितीच्या दि.११.८.२००७ च्या बैठकीतील विषय क्र.१३ मधील निर्णय क्र.६९५.

**प्रस्ताव :-** शिर्डी हे महाराष्ट्रातील एक महत्वाचे तिर्थक्षेत्र यात्रास्थळ आहे. शिर्डी येथे दररोज हजारो भाविक श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येत असतात. शिर्डी शहरापासून २ ते ३ किं.मी. अंतरावर कनकुरी रस्त्याजवळ श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांची पाणी पुरवठा योजना आहे. तसेच शिर्डी नगरपंचायतीची नविन पाणी पुरवठा योजनेचे काम सुरु आहे. या दोन्ही पाणी पुरवठा केंद्रास जाण्या-येण्यासाठी कनकुरी रस्त्याचा वापर होत असतो. शिर्डी शहरात कनकुरी रस्त्याने दररोज सुमारे ४ ते ५ हजार साईभक्त पालखी घेऊन पायी येत असतात. त्यामुळे सदर रस्ता अत्यंत महत्त्वाचा आहे. या रस्त्यावर पथदिवे नसल्याने रात्रीच्यावेळी साईभक्तांची तसेच नागरीकांची गैरसोय होते. या रस्त्यावर पथदिवे उभारण्याची जबाबदारी

शिर्डी नगरपंचायतीची आहे. नगरपंचायतीची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने त्यांनी कनकुरी रस्त्यावर पथदिवे उभारण्याचे काम हाती घेण्याबाबत संस्थानला विनंती केली आहे. त्याचप्रमाणे डो-हाळे गावाचे अंतर शिर्डी पासून ६.३ कि.मी.इतके आहे. श्री साईबाबा संस्थानमधील कर्मचारी वर्ग तसेच शिर्डी नगरपंचायतीतील कर्मचारी वर्ग कनकुरी, डो-हाळे येथील निवासी आहेत. त्यांची तसेच भाविकांची या रस्त्यावर पथदिवे नसल्यामुळे रात्रीच्यावेळी फार गैरसोय होते. त्यामुळे शिर्डी-कनकुरी-डो-हाळे रस्त्यावर पथदिवे बसविण्याची योजना राबविण्याकरीता येणा-या खर्चास मान्यता देण्याची विनंती कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी शासनास केली आहे. सदर विनंतीचा विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णयः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, ( शिर्डी ) अधिनियम, २००४ च्या कलम १७ (१) मधील तरतूदींनुसार भक्तांना सोयी-सुविधा पुरविणे हे व्यवस्थापन समितीचे कर्तव्य असल्याने, त्यास अनुसरुन शिर्डी नगरपंचायतीकरीता शिर्डी कनकुरी रस्त्यावर व पुढे कनकुरी डो-हाळे गावापर्यंत एकुण ७.६ कि.मी. मुख्य रस्त्यावर पथदिवे बसविण्यास व त्याकरीता येणा-या रुपये ५८,१६,८८८/- (रुपये अठ्ठावन्न लक्ष सोळा हजर अठ्ठयाऐंशी फक्त) इतक्या एक वेळ खर्चास (One time expenditure) पुढील अटीस अधिन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

**अ)** सदर कामाकरीता मोठया प्रमाणात खप असलेल्या वर्तमानपत्रात जाहीरात देऊन, जाहीर निविदा मागवून आणि चांगल्या प्रकारे प्रस्तापित व्यापारी / व्यवसायिक संस्थाकडून आलेल्या निविदांचा विचार करुन समितीने निर्णय घ्यावा.

**ब)** सदर प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या पथदिव्यांचे वीजबिल भरणे, त्याचप्रमाणे त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे याची जबाबदारी संबंधित नगरपंचायत / ग्रामपंचायतीची राहील.

२. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना कळविण्यात येते की, सदर बाबीकरीता येणारा खर्च श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी, यांच्या सन २००८-०९ च्या विश्वस्त निधीतून करावा व या खर्चाबाबतचा कार्यपूर्ती अहवाल शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(अ.म.कवडे)
कार्यासन अधिकारी

या पत्राच्या प्रती शासनामार्फत (१).मा.प्रधान सचिव, मा.मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई, (२).मा.राज्यमंत्री (विधी व न्याय) यांचे खाजगी सचिव, (३).कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी, ता.राहाता, जिल्हा अहमदनगर, (४). अध्यक्ष, शिर्डी नगरपंचायत, ता.राहाता, जिल्हा अहमदनगर, (५).कार्यकारी अधिकारी, शिर्डी नगरपंचायत,ता.राहाता, जिल्हा अहमदनगर, (६).ग्रामसेवक, कनकुरी ग्रामपंचायत, ता.राहाता, जिल्हा अहमदनगर, (७).ग्रामसेवक, डो-हाळे ग्रामपंचायत, ता.राहाता, जिल्हा अहमदनगर, या सर्वांना पाठविण्यात आलेल्या आहेत.

संस्थानने शासनाचे मान्यतेच्या अधिन राहून मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५-०४-२००९ चे सभेतील निर्णयानुसार संस्थानने शिरडी - कनकुरी - डोऱ्हाळे रस्त्यावर पथदिवे उभारणीचे काम पूर्ण केलेले आहे.

शिरडी - कनकुरी - डोऱ्हाळे रस्त्यावर पथदिवे उभारणीचे कांम पूर्ण झाल्याने शिर्डी - कनकुरी - डोऱ्हाळे रस्त्यावर उभारण्यात आलेल्या पथदिव्यांना वीजपुरवठा करणेबाबत संस्थानमार्फत (१) मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी. (२) मा.सरपंच,कनकुरी (३) मा.सरपंच, डोऱ्हाळे यांना (१) संस्थान पत्र क्र. एसएसएस - विद्युत - १३१ -२०१०दि.०१-०१-२०१० व (२) संस्थान पत्र क्र. एसएसएस- विद्युत- ५१०७-२०१० दि. २५-०३-२०१० अन्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार फक्त मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी. यांनी या पथदिव्यांना वीजपुरवठा करून पथदिवे कार्यान्वित केलेले आहेत.

तसेच सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, राहाता, याना या पत्रातच कृपया आपण यात वैयक्तिक लक्ष घालून अक्षय प्रकाश योजनेअंतर्गत सिंगल फेजिंगबाबत आपणामार्फत कार्यवाही होऊन या पथदिव्यांना वीजपुरवठा करणेकामी उपरोक्त दोन्ही ग्रामपंचायतींना सहकार्य करावे व त्याचा पूर्तता अहवाल संस्थानकडे कळविण्याची विनंती करण्यात आलेली होती. मा.सहाय्यक अभियंता यांचेकडे याबाबत चौकशी केली असता त्यांनी या दोन्ही ग्रामपंचायतींनी अद्याप या पथदिव्यांना वीजपुरवठा मिळणेबाबत कोणत्याही प्रकारचा अर्ज केलेला नसल्याने कार्यवाही पूर्ण होऊ शकत नसल्याचे सांगितले.

त्यापैकी मा.सरपंच,कनकुरी हे या पथदिव्यांना वीजपुरवठा देण्यास सतत नकार दर्शवित असून या पथदिव्यांना संस्थानच्या कनकुरी तळयावरील जनरेटरचा सप्लाय जोडून मिळावा तसेच या पथदिव्यांचे वीजबिल संस्थानने भरावे अशा मागणीचे दरवेळेस नविन पत्र पाठवित आहेत.

शिरडी - कनकुरी - डोऱ्हाळे रस्त्यावर पथदिवे संस्थानमार्फत उभारणीसाठी विनंती करून शिरडी नगरपंचायत, डोऱ्हाळे ग्रामपंचायत, कनकुरी ग्रामपंचायत या सर्वांनी या बसविण्यात येणाऱ्या सदर पथदिव्यांचे लाईट बील तसेच देखभाल व दुरुस्ती त्यांचे संस्थेमार्फत केली जाईल, असे लेखी दिलेले आहे व यांनतरच श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्या निधीतून खर्च करणेस मान्यता मिळणेबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डीमार्फत महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

यास महाराष्ट्र शासनाने मान्यता देताना सदर प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या पथदिव्यांचे वीजबिल भरणे, त्याचप्रमाणे त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे याची जबाबदारी संबंधित नगरपंचायत / ग्रामपंचायतीची राहील, या अटीवरच मान्यता दिली आहे.

पण आता पथदिव्याची उभारणी पूर्ण झाल्यानंतर डोऱ्हाळे ग्रामपंचायत, कनकुरी ग्रामपंचायत या दोन्ही ग्रामपंचायतीचे पदाधिकारी या पथदिव्यांना वीजपुरवठा देण्यास नकार दर्शवित असून त्यामुळे अद्याप हे पथदिवे चालू होऊ शकलेले नाहीत. याबाबत खालील बाबीवर निर्णय होणे गरजेचे आहे.

(१) या पथदिव्यांना वीजपुरवठा कोणी करावयाचा ,

(२). या वीजपुरवठ्यासाठी दरमहा येणारे वीजबील कोणी भरावयाचे ,

(३). या पथदिव्यांच्या दुरुस्ती व देखभालीचा खर्च कोणी सहन करावयाचा,

(४) या पथदिव्यांना मा.सरपंच, कनकुरी यांचे मागणीनुसार कनकुरी साठवण तलावावर जनरेटरचा वीजपुरवठा करावयाचा किंवा कसे,

(५). भविष्यात शिरडीच्या सभोवताली असलेल्या सर्व गावांनी संस्थानच्या जनरेटरचा वीजपुरवठा त्यांच्या गांवातील पथदिव्यांना करावा अशी मागणी केल्यास काय निर्णय घ्यावा,

(६). महाराष्ट्र शासनाने मान्यता देताना सदर प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या पथदिव्यांचे वीजबिल भरणे,त्याचप्रमाणे त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे याची जबाबदारी संबंधित नगरपंचायत / ग्रामपंचायतीची राहील, या अटीवरच मान्यता दिल्याने संस्थानने या पथदिव्यांना वीजपुरवठा केला, दरमहाचे वीजबील भरले, दुरुस्ती व देखभालीचा खर्च संस्थानने केला तर महाराष्ट्र शासनाच्या आदेशाचा अवमान होऊन ऑडीट्मध्ये ही बाब नोंदली जाऊ शकते.

प्रस्तावावर विचारविनिमय होऊन निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.६६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ग्रामपंचायत हद्दीतील पथदिव्यांच्या वीजबीलापोटी महाराष्ट्र शासनाकडून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीस १००% अनुदान मिळते. त्यामुळे कनकुरी व डोऱ्हाळे ग्रामपंचायतींना पथदिव्यांसाठी वीजपुरवठा करण्यासाठी कोणताही वेगळा खर्च सहन करावा लागणार नाही. तरीही अद्याप कनकुरी व डोऱ्हाळे गावाच्या मा.सरपंच यांनी या पथदिव्यांना महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा जोडून घेतलेला नाही. याबाबत या दोन्ही गावच्या सरपंचांना पुन्हा महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा पथदिव्यांना जोडून घेणेसाठी पत्र व पथदिव्यांना मिळणाऱ्या शासकीय अनुदानाचे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने काढलेली परीपत्रके पाठवावीत व पुढील सभेत त्यांना चचेसाठी बोलवावे, असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **कनिष्ठ महाविद्यालयाकरीता जनरेटर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाच्या वर्गाचे मा.व्यवस्थापन मंडळाचे दिनांक २०-०५-२००७ चे सभेतील निर्णय क्र.३८१ नुसार जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीतील संस्थानच्या ताब्यात असलेल्या वर्ग खोल्यांमध्ये स्थलांतर करण्यात आलेले आहे. या कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारतीत संस्थानचा जनरेटर सप्लाय जोडलेला नाही. या भागात सतत वीज भारनियमन होते. त्यामुळे वीज प्रवाह खंडीत झाल्यावर संगणकावर होणारे सर्व कामकाज थांबते. त्यामुळे कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण होतो. तसेच ग्रंथालय व स्टाफरुम याठिकाणी पुरेसा प्रकाश मिळत नाही. तरी कृपया कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्यालय, स्टाफरुम तसेच ग्रंथालय येथील संगणक, फॅन व टयुबलाईट चालू शकतील असा अखंडीत वीज प्रवाह उपलब्ध होईल असे जनरेटर/इन्व्हर्टर विद्युत विभागामार्फत बसवून मिळणेकामी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी दिनांक ०२-०७-२००८ चे पत्रान्वये कळविले आहे.

श्रीसाईबाबा संस्थानने जिल्हा परिषद शाळेकरीता नविन इमारत बांधून दिलेली असून या इमारतीमध्ये इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे वर्ग भरत आहेत. तसेच या इमारतीमध्ये संस्थानने या वर्षापासून श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाचे ११ वी व १२ वी चे वर्ग सुरु केलेले असून या महाविद्यालयाचे कार्यालयही या इमारती शेजारी आहे. या महाविद्यालयाचे संगणक लॅब व कार्यालयाकरीता अखंडीत वीज पुरवठयाची आवश्यकता असल्याचे कळविले आहे.

श्री साईबाबा संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयाचे संगणक व पाण्याच्या मोटारी यांना विना खंडीत वीजपुरवठा मिळावा याकरीता खालील वर्णनाचा १० केव्हीए चा ३ फेज जनरेटरसेट खरेदी करुन बसवून द्यावा लागणार आहे. तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr. No. | C.S.R. N0. | Discription | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 11-1-4 | Supplying and erecting and Commissioning of Diesel generating set 10 KVA as per specification No.GEN-DG. | 01 Nos. | Rs. 2,50,000.00 | Rs. 2,50,000.00 |
| 02) | Non C.S.R. | Supplying and erecting and Commissioning of AMF Panel suitable for Diesel Generating set of 10 KVA Capacity. as per specification no. GEN.AMF. | 01 Nos. | Rs. 50,000.00 | Rs. 50,000.00 |
| 03) | 9-1-2 | Supplying and erecting Copper earth plate. 30mm x 30mm x 0.6 cm complete with all materials, testing and recording the results as per specifications EA-EP. | 02 Nos. | Rs. 0,02,625.00 | Rs. 0,05,250.00 |
| 04) | 7-1-18 | Supplying and erecting PVC armoured Cable 3.1/2 core 35 sq.mm. Standared / Solid Aluminimum Conductor as per specification No.CB – LT / AL. | 200 Meter . | Rs. 0,00,249.90 | Rs. 0,49,980.00 |
| 05) | 17-1-2 | Making the trench in hard murun / Tar road of suitable width and depth for laying provided L.T. cable up to 10 Sq.mm. complete as per specification No. CW - EXN - CTR. | 100 Meter . | Rs. 0,00,99.75 | Rs. 0,09,975.00 |
| | | | | Total | Rs. 3,65,205.00 |
| | | | | Contigency 5% | Rs. 0,18,260.25 |
| | | | | Net Total | Rs. 3,83,462.25 |

उपरोक्तप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयास १० केव्हीए जनरेटरसेट खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ३,८३,४६२/- मात्र खर्च व याव्यतिरिक्त जनसेट्साठी शेड व फाउंडेशन तयार करावे लागणार असून त्यासाठी अंदाजे रु. १,१०,०००.०० असा एकुण मिळून रु. ४,९३,४६५/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०८-०३-२००९ रोजी झालेल्या सभेत आयत्या वेळचा विषय क्र. २१ निर्णय क्र. २८९ अन्वये प्रस्तावास व कोटेशन मागविणेस मान्यता मिळालेली होती. तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०८-०३-२००९ रोजी झालेल्या सभेत विषय क्र. १ निर्णय क्र. ३१७ (०३) अन्वये कमिन्स कंपनीचा साऊडप्रुफ जनसेट खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा ( टेंडर) मागविणेस मान्यता मिळालेली होती . त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा ( टेंडर) मागवीण्यात आले होते. हे टेंडर मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १९-०७-२००९ रोजी झालेल्या सभेत उघडण्यात आले.

परंतू मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १९-०७-२००९ रोजी झालेल्या सभेत हा विषय स्थगित ठेवण्यात यावा असा विषय क्र. १० निर्णय क्र. ५९९ अन्वये निर्णय झालेला आहे. त्यानुसार ही प्रक्रिया स्थगित करण्यात आली.

यानंतर श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी जा.क्र. एसएसएस / कनिष्ठ / ११६६ / २०१० दिनांक ०९-०४-२०१० चे पत्र पाठविले या पत्रात मा.प्रशासकीय अधिकारी यांनी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेत, इ.११ वी च्या १५१ व इ.१२ वी च्या वर्गात १३७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांचे माहिती तंत्रज्ञान विषयाचे प्रॅक्टीकल्स घेण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळेत ३५ संगणक, एक लेसरजेट प्रिंटर, एक डॉट मॅट्रीक्स प्रिंटर वापरण्यात येत आहे. वीज भारनियमन कालावधीत, या प्रयोगशाळेत संगणकांसाठी जनरेटर वापरावयाचे असल्यास-(०१). या प्रयोगशाळेसाठी किती क्षमतेचे जनरेटर आवश्यक आहे.(०२). या क्षमतेच्या ब्रॅडेड जनरेटरची अंदाजे किंमत किती आहे. (०३). या जनरेटर वापरासाठी प्रति तास किती डिझेल खर्च येईल. अशी विचारणा करून या विषयाच्या सुरुवातीपासूनच्या सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती मा.प्राचार्य श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांना देणेसाठी कळविले नुसार जा.क्र. .एसएसएस-विद्युत - १३६७-२०१० दि.२२-०४-२०१० अन्वये या विषयाच्या सुरुवातीपासूनच्या सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती मा.प्राचार्य श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांना देऊन ०१). या प्रयोगशाळेसाठी १५ केव्हीए क्षमतेचे जनरेटर आवश्यक आहे.०२). या क्षमतेच्या ब्रॅंडेड जनरेटरची अंदाजे (इतर अनुषंगिक व आवश्यक कामासह)

रक्कम रु.५,६३,१५७/- इतकी आहे.०३). या जनरेटर वापरासाठी प्रति तास ५ लिटर डिझेल खर्च येईल अशी माहिती लेखी कळविली.

यानंतर श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी दिनांक २९-०६-२०१० रोजी एक पत्र पाठविले, या पत्रावर मा.प्रशासकीय अधिकारी यांनी "जुनिअर कॉलेजसाठी किमान गरजेचा जनरेटर खरेदीसाठीचा प्रस्ताव पुन्हा तयार करून सादर करावा" असा आदेश दिलेला आहे.

उपरोक्त आदेशानुसार कनिष्ठ महाविद्यालयास १० केव्हीए जनरेटरसेट खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ३,८३,४६२/- मात्र खर्च व याव्यतिरिक्त जनसेट्साठी शेड व फाउंडेशन तयार करण्यासाठी अंदाजे रु. १,१०,०००.०० असा एकुण मिळून रु. ४,९३,४६५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

प्रस्तावावर विचारविनिमय होऊन निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.६६७ प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयास १० केव्हीए जनरेटरसेट खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ३,८३,४६२/- मात्र खर्च व याव्यतिरिक्त जनसेट्साठी शेड व फाउंडेशन तयार करण्यासाठी अंदाजे रु. १,१०,०००/- अशी एकुण रक्कम रुपये ४,९३,४६२/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७ श्री साई प्रसादालय पश्चिम बाजूचे वाहनतळाचे विद्युतीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयामध्ये प्रसाद भोजन घेणेकरीता येणा-या साईभक्तांचे वाहन पार्कींग करणेकरीता सर्व्हे नं.८७/८८ मध्ये श्री साई प्रसादालयाच्या पश्चिम बाजूस वाहनतळावर रात्रौ चे प्रकाश योजना करुन देणेबाबत बांधकाम विभागाने उपरोक्त संदर्भान्वये कळविले आहे.

त्यानुसार सदरील ठिकाणी पथदिव्यांची उभारणी करणेकरीता विद्युती करणाचे काम करुन घ्यावे लागणार आहे. विद्युतीकरण करणेकरीता कराव्या लागणा-या कामाचा व येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे:-

| Sr.No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | NON CSR | Erecting Sansthan provided steel tubular swaged poles. | 22 Nos. | 00,508.20 | 0,11,180.40 |
| 02) | 17-3-3 | Providing cement foundation including excavation for the poles 60cms.x 60cms.x 1.5 mtr. | 22 Nos. | 02,352.00 | 0,51,744.00 |
| 03) | NON CSR | Supplying transporting & fitting in position lightning fixtures. | 22 Nos. | 05,170.00 | 1,13,740.00 |
| 04) | 5-2-14 | Supplying and erecting mini feeder pillar triple pole with 200A. | 01 Nos. | 29,799.00 | 0,29,799.00 |
| 05) | 7-1-19 | Supplying & erecting PVC armoured cable 3 ½ core 50 sq.mm. aluminium conductor. | 200 Mtr. | 00,319.20 | 0,63,840.00 |
| 06) | 7-1-18 | Supplying & erecting PVC armoured cable 3 ½ core 35 sq.mm. aluminium conductor. | 100 Mtr. | 00,238.35 | 0,23,835.00 |
| 07) | 7-1-15 | Supplying & erecting PVC armoured cable 4 core 10 sq.mm. aluminium conductor. | 400 Mtr. | 00,141.75 | 0,56,700.00 |
| 08) | 7-6-5 | Supplying & laying (including excavation) 15cm dia RCC Hume pipe. | 200 Mtr. | 00,439.95 | 0,87,990.00 |
| 09) | 7-6-2 | Supplying & erecting G.I. pipe 'A' grade 40 mm dia. | 88Mtr | 00,192.15 | 0,15,372.00 |
| 10) | 7-1-2 | Supplying & erecting PVC armoured cable 2 core 4 sq.mm. aluminium conductor. | 350 Mtr. | 00,080.85 | 0,28,297.50 |
| 11) | NON CSR | Erecting at position provided water tight Terminal box. | 22 Nos. | 00,045,00 | 0,00,990.00 |
| 12) | 5-3-2 | Supplying, erecting & marking SPMCB 6A to 32A | 66 Nos. | 00,171.15 | 0,11,295.90 |
| 13) | NON CSR | Supplying and erecting porcelain neutral link. | 22 | 00,030.00 | 0,00,660.00 |
| 14) | NON CSR | Civil work :- Providing and constructing cable chamber. | 05 Nos. | 01,260.00 | 0,06,300.00 |
| 15) | NON CSR | Supplying and erecting PVC unarmoured cable 2 core 2.5 sq.mm. copper conductor complet erected on poles. | 100 Mtr. | 00,075.00 | 0,13,500.00 |
| | | | | Total. | 5,16,781.00 |
| | | | | + Contigency 5% | 0,25,839.05 |
| | | | | Total Amount :- | 5,42,620.05 |
| | | | | **Round up :-** | **5,42,620.00** |

उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालय पश्चिम बाजूचे वाहनतळाचे विद्युतीकरण करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ५,४२,६२०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६८ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्रीसाई प्रसादालय पश्चिम बाजूचे वाहनतळाचे विद्युतीकरण करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५,४२,६२०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८ संस्थानवर आधारित फिल्म तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती पूनम राजकुमार एस., मुंबई यांनी त्यांच्या दिनांक ०२.०८.२०१० रोजीच्या ई-मेल संदेशाव्दारे संस्थानवर आधारीत फिल्म तयार करणेसाठी पर्याय व येणारा खर्च कळविलेला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**पर्याय -१**

**बाबांचे धुन व भजनाचे संगीत असलेले पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन सहशीर्षकासह.**

**निर्मिती मुल्य :-** रुपये ५०,०००/- (जादा सीडी/डीव्हीडी साठी डंपींग कॉस्ट रुपये १०,०००/- पर्यंत)

**कालावधी :-** प्राप्त होणा-या माहिती व साहित्यावर आधारीत.

**तयार करण्याचा कालावधी :-** संस्थानकडून माहिती प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १० ते १२ दिवस.

**पर्याय -२**

**हिंदी/इंग्रजी भाषेतील ऑडीओ व्हिजुअल फिल्म.**

**निर्मिती मुल्य (एका भाषेत) :-** रु.१,२५,०००/-(जादा सीडी/डीव्हीडी साठी डंपींग कॉस्ट रुपये १०,०००/- पर्यंत)

**हिंदी व इंग्रजी या दोन्ही भाषेत :-** रुपये १,६०,०००/-

**कालावधी :-** प्राप्त होणा-या माहिती व साहित्यावर आधारीत.

**तयार करण्याचा कालावधी :-** संस्थानकडून माहिती प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ ते २० दिवस.

(सदरची किंमत ही ३० मिनिटांच्या ऑडीओ व्हिजुअल फिल्मसाठी आहे. यापेक्षा जास्त किंवा कमी कालावधीची फिल्म तयार करावयाची असल्यास यासाठी स्टुडिओ इडीट कॉस्ट रुपये १५,०००/- अतिरिक्त लागेल.)

१० मिनिटापासून ३० मिनिटाच्या कालावधी पर्यंत प्रकाशित करावयाच्या हिंदी/इंग्रजी भाषेतील ऑडीओ व्हिडीओ हे लॅपटॉप, डीव्हीडी व सीडी प्लेअर्सवर चालविणेस अनुरुप राहील.

**पर्याय -३**

**शिर्डीचे दृश्य असलेली एक तास/३० मिनिटे/ १० सेकंद कालावधीची फिल्म निवेदकासह.**

**निर्मिती मुल्य :-** रु.३,५०,०००/- (जादा सीडी/डीव्हीडी साठी डंपींग कॉस्ट रुपये १०,०००/- पर्यंत)

**तयार करण्याचा कालावधी :-** चित्रीकरण केल्यानंतर १५ दिवस.

यासाठी प्रोडक्शन चमु शिर्डीला येऊन मंदिर व परिसराचे एका दिवसात चित्रीकरण करेल. सदर चमुची दोन रात्र राहण्याची व प्रवासाची व्यवस्था संस्थानला करावी लागेल.

श्रीमती पूनम राजकुमार एस.यांनी उपरोक्तप्रमाणे कळविलेनूसार संस्थानच्या विविध उपक्रमांची माहिती असलेली हिंदी व इंग्रजी भाषेतील ३० मिनिटांची फिल्म तयार केली तर तीचा उपयोग शिर्डीला येणा-या भक्तांना योग्य मार्गदर्शन मिळणेस व संस्थान भक्तांसाठी राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती होणेस होईल. तथापि सदर बाबत चर्चा होवून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६६९ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर कारणासाठी कोटेशन मागणी करुन कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी )

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९ श्री.निवृत्ती माधव कांगुणे, मदतनीस, वर्ग-०४ कर्मचारी यांना मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०८/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६२९ व जा.नं.एसएसएस/वशी-०१/४६८/२००७ दि. ०९/०१/२००७ अन्वये श्री निवृत्ती माधव कांगुणे, यांची वर्ग-०४ या पदावर कंत्राटी पध्दतीने प्रथम मदतनीस (वर्ग-०४) या पदावर सहा महिन्यांसाठी प्रतिमहा रु.३०००/- एकत्रित मानधनावर प्रकाशने विभागाकडे नेमणूक करण्यात आलेली असून ते प्रत्यक्ष मा. अध्यक्ष सो यांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम करीत आहेत. त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार खालील प्रमाणे वेळीवेळी मुदतवाढ व मानधन वाढ देण्यात आलेली आहे.

| नेमणूक / मुदतवाढ तपशील | मानधन |
|---|---|
| दि. ११/०१/२००७ ते १०/०७/२००७ ( सहा महिने ) | रु. ३०००/- |
| दि.११/०७/२००७ ते १०/०१/२००८ ( सहा महिने ) | रु. ३०००/- |
| दि. ११/०१/२००८ ते १०/०१/२०१० ( एक वर्ष ) | रु. ४०००/- |
| दि. ११/०१/२०१० ते १०/०७/२०१० ( सहा महिने ) | रु. ४०००/- |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०३/२०१० रोजीचे सभेतील निर्णयानुसार श्री. कांगुणे यांना देण्यात आलेली सहा महिन्यांची मुदतवाढ दि.१०/०७/२०१० अखेर संपुष्ठात आलेली आहे. तरी त्यांचे पुढील मुदतवाढी बाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६७० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.निवृत्ती माधव कांगुणे, मदतनीस, वर्ग-०४ कर्मचारी यांना दिनांक १०.०७.२०१० पासुन पुढे एक वर्ष कालावधीसाठी पूर्वीचेच अटी-शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी. तसेच त्यांना प्रतिमहा रुपये ४०००/- मानधनाऐवजी प्रतिमहा रुपये ६०००/-एकत्रित मानधन देण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **दुसरी सहामाहीसाठी (दि.०९.१०.२०१० ते दि.३१.०३.२०११) गावरान तुप खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** प्रसादालयासाठी सन २०१०-११ साठी ८००० क्विंटल गावरान तुप सहामाही दर पध्दतीने (दि.०१.०४.२०१० ते दि.३०.०९.२०१० व दि.०१.१०.२०१० ते दि.३१.०३.२०११) अशा दोन सहामाहीत विहित पध्दतीने टेंडर व नमुने मागवून खरेदी करणेस व खरेदीकामी येणारे रु.२०,००,००,०००/- चे अंदाजे खर्चास मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२७.०१.२०१० चे सभेतील निर्णय क्र.२७० अन्वये मान्यता आहे.

त्यानुसार पहिली सहामाही (दि.०१.०४.२०१० ते दि.३०.०९.२०१०) करिता ४००० क्विंटल गावरान तुप खरेदीकामी विहित पध्दतीने टेंडर व नमुने मागवून मा.व्यवस्थापन मंडळाचे सदस्या समवेत दि.०३.०४.२०१० रोजी झालेल्यासभेतील समक्ष चर्चेत दिलेली सुट स्विकारुन व दि.२२.०५.२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.४६९ नुसार मे.बाफना बाजार, नाशिक यांचेकडून न्युनतम दर रु.२६५/- प्रती किलो + ५% व्हॅट या दराने ४००० क्विंटल हटसन ब्रॅण्ड गावरान तुप पुरवठा आदेश दिलेपासून दि.३०.०९.२०१० अखेर पुरविणेबाबत इकडील जा.नं. ७५९७/ ०३.०६.२०१० अन्वये पुरवठा आदेश देणेत आला असून आज अखेर १२४० क्विंटल तुपाचा पुरवठा होऊन २७६० क्विंटल तुप घेणे बाकी आहे.

सदर पुरवठा आदेशाची मुदत दि.३०.०९.२०१० अखेर असल्याने दुसरी सहामाही (दि.०१.१०.२०१० ते दि.३१.०३.२०११) करिता ४००० क्विंटल गावरान तुप खरेदीकामी विहित पध्दतीने टेंडर व नमुने मागवावेत अथवा मे.बाफना बाजार, नाशिक यांचेकडून उपरोक्त मंजुर दरानेच हटसन ब्रॅण्ड गावरान तुपाची खरेदी करावी किंवा कसे? याबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दुसऱ्या सहामाहीसाठी (दि.०१.१०.२०१० ते दि.३१.०३.२०११) आवश्यक असणारे ४ हजार क्विंटल हटसन ब्रॅण्ड गावरान तुप मे.बाफना बाजार, नाशिक यांचेकडून पूर्वीचेच मान्य दराने खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **श्री साईसच्चरीत पारायण सोहळा कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुशंगिक व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, अधिकृत व नाट्य रसिक संच, शिर्डी व शिर्डी ग्रामस्थ यांचे सहकार्याने दरवर्षी श्रावण महिन्यात श्री साईसच्चरीत पारायण सोहळा आयोजीत करण्यात येत असतो. यावर्षी दि. ११ ऑगस्ट, २०१० ते दि. १९ ऑगस्ट, २०१० अखेर नऊ दिवस साजरा करण्यात येणार आहे. याकरीता मंडप व इतर व्यवस्था करुन घेणेकामी येणारे अंदाजे रु.१०,००,०००.०० मात्रचे खर्चास प्रशासन शाखा- वशी-५ यांनी दि.१८/०४/२०१० रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ४३८ अन्वये मान्यता घेतली आहे.

श्री साईसच्चरीत पारायण सोहळा कार्यक्रमा करीता, समाधि मंदिराचे पुर्वेकडील (गेट नं. ०३ समोरील) १६ आर जागेत व्यवस्था करणेचे ठरले आहे. त्यासाठी खालील तपशिलानूसार ताडपत्रीचे छत असलेला कापडी मंडप, स्टेज, ग्रीन रुम, पार्टीशन, बॅरेकेटींग इ. व्यवस्था करुन घेणे आवश्यक आहे.

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | साईज | परिमाण / एकक |
|---|---|---|---|
| ०१ | ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडपाची उभारणी करणे. | २००'X८०' | १६०००.०० चौ. फुट |
| ०२ | सदर मंडपाचे कडेने तिन बाजूने पत्र्याचे १२' उंचीचे पार्टीशन करणे व आतिल बाजूने सुशोभित कापड बांधणे. | ३७५.०० रनिंग फुट | ३७५.०० रनिंग फुट |
| ०३ | स्टेज व्यवस्था :-<br>३०'X२०' साईजचे स्टेज, सदरचें स्टेजची जमिनीपासून ३ फुटापर्यंत उंची असलेले भक्कम स्टेज तयार करणे. स्टेजवर मॅटींन टाकणे. | ३०'X२०' | ६००.०० चौ. फुट |
| ०४ | १५'X१०' साईजचे स्टेज तयार करणे सदरचें स्टेजची जमिनीपासून ३ फुटापर्यंत उंची असलेले स्टेज तयार करणे, मॅटीन टाकणे. व बाजूने सुशोभित कापड बांधणे. | १५'X१०' | १५०.०० चौ. फुट |
| ०५ | स्वागत कमानी १'-६" X१'-६" व्यासाच्या ०२ नग कमीत कमी १५ फुट रुंदीच्या बॉक्स टाईप कमानी बांधणे. | ०२ नग | ०२ नग |
| ०६ | संपुर्ण मंडपात मॅटीन व सतरंजी टाकणे | १६०००.०० चौ. फुट | १६०००.०० चौ. फुट |
| ०७ | ग्रीन रुम ०२ नग :- साईडनी पन्हाळी पत्रा व आतिल बाजूस सुशोभित कापड लावून ३०'X२०' साईजच्या दोन ग्रीन रुम तयार करणे. व रुममध्ये मॅटींन टाकणे. | ३०'X२०' X२ | १२००.०० चौ. फुट |
| ०८ | पुरुष व स्त्रिया करीता मंडपाचे मधोमध ३ फुट उंचीचे रेलिंग करुन देणे. | १७५ रनिंग फुट | १७५ रनिंग फुट |
| ०९ | मंडपाचे पश्चिम बाजूस पुर्ण ६ फुट उंचीची कनात लावणे. | २०० रनिंग फुट | २०० रनिंग फुट |

वरिल प्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करुन घेणेकामी अशा प्रकारचे काम करणारे खालील मंडप ठेकेदार यांचेकडून दिनांक ०४.०८.२०१० अखेर पर्यंत सिलबंद दरपत्रके मागविण्यात आली होती.

०१. कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर ०२. बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर
०३. शर्मा मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, वैजापूर ०४. रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर
०५. लोकप्रिय मंडप डेकोरेटर्स, संक्रापूर ०६. प्रकाश डेकोरेटर्स, वैजापूर
०७. जोंधळे मंडप डेकोरेटर्स, कोकणगांव ता. संगमनेर ०८. कातोरे मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, पुणे

उपरोक्त पैकी खालील पाच ठेकेदारांनी कोरे निवीदा फॉर्म घेऊन सिलबंद दरपत्रके सादर केली.

०१. कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर
०२. बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर
०३. रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर
०४. प्रकाश डेकोरेटर्स, वैजापूर
०५. जोंधळे मंडप डेकोरेटर्स, कोकणगांव ता. संगमनेर

वरिल प्रमाणे प्राप्त झालेली एकुण ०५ सिलबंद दरपत्रके दि. ०४.०८.२०१० रोजी उघडणेत येऊन दरपत्रक सादरकर्त्यांनी दरपत्रकामध्ये दिलेले दराबाबत त्यांचेशी चर्चा तथा वाटाघाटी करुन त्यांनी खालील प्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ. नं. | कामाचा तपशिल | परिमाण / एकक | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव / दर | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | | प्रकाश डेकोरेटर्स, वैजापूर | | जोंधळे मंडप डेकोरेटर्स, कोकणगांव ता. संगमनेर | |
| | | | कोटेशन मधील दर | चर्चा नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चा तथा नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चा नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चा नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चा नंतरचे दर |
| ०१ | ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडपाची उभारणी करणे. | १६००० चौ. फुट | १.०० | ०.८० | २.०५ | १.७५ | ०.७५ | ०.५० | २.१० | १.९० | २.०० | १.९० |
| ०२ | मंडपाचे कडेने तिन बाजूने पत्र्याचे १२' उंचीचे पार्टीशन | ३७५ रनिंग फुट | ३.०० | २.५० | १०.०० | ६.०० | ३.०० | ३.०० | ९.०० | ८.०० | ७.०० | ६.०० |
| ०३ | स्टेज व्यवस्था :- ३०'x२०' साईजचे स्टेज, | ६०० चौ. फुट | ५.०० | ४.०० | ८.०० | ६.०० | १.६६ | १.६० | ८.५० | ७.५० | ७.०० | ६.०० |
| ०४ | १५'x१०' साईजचे स्टेज | १५० चौ. फुट | ८.०० | ६.०० | ८.०० | ६.०० | ४.६६ | ४.६६ | ९.०० | ७.५० | ७.०० | ५.०० |
| ०५ | स्वागत कमानी ०२ नग | ०२ नग | ४४४.४४ | ३०० | १००० | ७०० | ३३३.३३ | ३३३ | १००० | ९०० | १००० | ९०० |
| ०६ | संपुर्ण मंडपात मॅटीन व सतरंजी टाकणे | १६००० चौ. फुट | ०.१० | ०.०८ | ०.४५ | ०.३० | ०.१० | ०.१० | ०.५० | ०.४० | ०.५० | ०.४० |
| ०७ | ग्रीन रुम ०२ नग | १२०० चौ. फुट | २.०० | २.०० | १.३० | १.०० | ०.७५ | ०.७५ | १.२५ | १.१० | १.४० | १.३० |
| ०८ | पुरुष व स्त्रिया करीता मंडपाचे मधोमध ३ फुट उंचीचे रेलिंग करणे. | १७५ रनिंग फुट | ४.७६ | ४.०० | ८.०० | ६.०० | २.०० | २.०० | ७.५० | ७.०० | ७.०० | ५.०० |
| ०९ | मंडपाचे पश्चिम बाजूस पुर्ण ६ फुट उंचीची कनात लावणे. | २०० रनिंग फुट | २.०० | २.०० | २.२५ | १.५० | १.०० | १.०० | २.५० | २.०० | २.०० | १.७० |
| एकुण रुपये | | | २०१७५७.५० | | ३९१५००.०० | | **१३०५००.००** | | ४५१५३०.०० | | ४३१७७५.०० | |
| शेरा.. | | | | | | | **निम्नतम** | | | | | |

वरिल प्रमाणे कोटेशन धारकांशी केलेले चर्चा तथा वाटाघाटी अंती मे. रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर यांनी निम्नतम स्वरुपाचे दर दिले असल्याने सदरची मंडप व इतर अनुशंगीक व्यवस्था

त्यांचेकडून त्यांचे निम्नतम स्वरुपाचे दरामध्ये करुन घेणेबाबत ठरले आहे. याकामी रु. १,३०,५००/- मात्र खर्च येईल.

तरी श्री साईसच्चरीत पारायण सोहळा २०१० साठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था मे. रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणारे रु. १,३०,५००/- मात्रचे खर्चास मंजूरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६७२ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईसच्चरीत पारायण सोहळा २०१० साठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था मे. रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणारे रु. १,३०,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२ श्री साईबाबा रुग्णालयाकरीता लागणारे Stent/Valve/Balloon इत्यादींचे चर्चा/वाटाघाटीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात कार्डीयाक रुग्णांसाठी लागणारे विविध प्रकारचे स्टेन्ट/व्हाल्व/बलुन इत्यादी खरेदीकामी दर वर्षीप्रमाणे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून व ती रुग्णालयात On Consignment Basis वर ठेवण्यात येत असतात.

सन २०१०-२०११ या वर्षाकरीता विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदर निविदाधारकांना दि.२७/०५/२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे एकत्रित बोलवून त्यांचेकडून सूट घेण्यात आलेली आहे.

दरवर्षीप्रमाणे संबंधीत वापरणाऱ्या डॉक्टरांचा अभिप्राय घेऊन काही निवडक निविदाधारकांना चर्चा / वाटाघाटीसाठी समितीचे सभेपुढे बोलवून अजून काही सूट मिळेल याबाबत बोलवायचे आहे. मागील वर्षी ज्या निविदाधारकांचे स्टेन्ट/व्हाल्व/बलुन इ. चर्चा / वाटाघाटीकरुन किती स्टेन्ट/ व्हाल्व /बलुन इ. वर किती स्टेन्ट/व्हाल्व/बलुन इ. मोफत देणार अशा पध्दतीने चर्चा / वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देण्यात आले होते. कारण मोफत स्टेन्ट/व्हाल्व/बलुन इ. रुग्णालयात दाखल होणाऱ्या गरीब रुग्णांना त्याचा वापर करता येऊ शकेल. परंतु मागील वर्षाचा अनूभव खालीलप्रमाणे आहे.

१. श्री साईबाबा रुग्णालयात बहुतांशी रुग्ण हे जीवनदायी योजने अंतर्गत मिळणारी आर्थिक मदत घेऊन रुग्णालयात दाखल होत असतात त्यामुळे मोफत स्टेन्ट/व्हाल्व/बलुन इ. वापर करणाऱ्या रुग्णांची संख्या ही खूपच कमी आहे.

२. मोफत स्टेन्ट/व्हाल्व/बलुन इ. चे रेकॉर्ड ठेवणे देखील खूप जिकरीचे असते.

३. जास्तीत जास्त वापर हा जीवनदायी योजनेअंतर्गत असल्याने शासनास शस्त्रक्रिया नंतर परतावा मिळणेकामी जीवनदायीचे प्रस्ताव सादर केल्यानंतर शासनाकडून पॅकेज प्रमाणे संपूर्ण रक्कमेचा परतावा मिळत असतो. गरीब व गरजू रुग्ण असेल तर ती संस्थानला चॅरिटी म्हणून सूट द्यावी लागते पर्यायाने सदर रक्कमेचा संस्थानला तोटा सहन करावा लागतो.

४. जीवनदायी योजने अंतर्गत आपण जितक्या रक्कमेचा स्टेन्ट/व्हाल्व/बलुन इ. खरेदी करु तितकीच रक्कम अधिक शस्त्रक्रियेसाठी व शस्त्रक्रियेनंतर लागणारी कंन्झूमेबल अशी एकत्रित करुन त्यापेक्षा कमी रक्कम शासनाकडून मंजूर होते त्यामुळे शासनाकडून मंजूर झालेली रक्कम वगळता उर्वरीत रक्कम + इन्टेंसीव्ह + प्रयोगशाळा तपासण्या + खाट भाडे (अंदाजे प्रती रुग्ण रु.१६,०००/- प्रमाणे) एका वर्षात सुमारे १६५० रुग्णाकरीता अंदाजे रु.२,६४,००,०००/- इतका खर्च तसेच शासनाकडून उशीरा मिळणारी रक्कमेवरचे व्याज इत्यादी खर्चाचा भार संस्थानला सोसावा लागतो.

याबाबत दि.३१/०७/२०१० रोजी मा. विश्वस्त डॉ. ए.भा. गोंदकर साहेब यांचेशी वैद्यकिय संचालक यांची याबाबत सविस्तर चर्चा झाली असून त्यांनी खालीलप्रमाणे सूचना करुन प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यास सूचविले आहे.

**(A)** पुरवठाधारकांकडून मिळणारी सूट / Qty Discount देणगी म्हणून घ्यावी व बिल पूर्ण रक्कमेचे घ्यावे. जीवनदायी योजने अंतर्गत शासनाकडून मंजूर पॅकेजमध्ये Bare Metal Stent ची किंमत रु.२७,०००.०० + कन्झूमेबल साहित्यावरील खर्च तर Drug Coating Stent ची किंमत रु.६०,०००.०० + कन्झूमेबल साहित्यावरील खर्च याप्रमाणे दिलेली आहे. परंतु संस्थानकडून शासनाने मंजूर केलेल्या रक्कमेपेक्षा कमी रक्कमेचे बीले सादर होतात त्यामुळे आपणास कमी रक्कम मिळते तेंव्हा शासनाचे मंजूर रक्कमे इतके बीले सादर केल्यास पूर्ण रक्कम मंजूर होईल.

**(B)** मोफत वस्तूचा हिशोब ठेवणे जिकरीची होणार नाही.

**(C)** एका वर्षात ॲन्जीओप्लास्टी, Pacemaker,डिव्हाईस क्लोझर, C.A.B.G., M.V.R., D.V.R.इ. मुख्य शस्त्रक्रियांची संख्या हि सुमारे १६५० इतकी असते व त्यासाठी लागणारे स्टेन्ट, बलून, व्हाल्व, पेसमेकर, डिव्हाईस, इत्यादी मागे प्रती इम्पलांट सरासरी १०% सूट मिळाली तरी एका वर्षात या इम्पलांटवर होणाऱ्या एकूण खरेदीची अंदाजे रक्कम रु. सात कोटीच्या जवळपास

असते त्यामुळे एका वर्षात सुमारे ७० ते ८० लाख पर्यंत संस्थानला रक्कम मिळू शकेल असा अंदाज आहे.

**(D)** संस्थानकडून जीवनदायी योजने अंतर्गत मंजूर प्रस्ताव शासनास परतावा मिळणेकामी सादर केलेल्या प्रस्तावात लागणारे इम्पलांट ज्या किंमतीत खरेदी केली जातात त्याच किंमतीचे बीले प्रस्तावासोबत सादर करावे लागतात व तितकीच रक्कम संस्थानला मंजूर होते यामुळे आपण पुरवठा धारकांशी केलेल्या चर्चा / वाटाघाटीतून संस्थानला अथवा रुग्णास याचा प्रत्यक्षात कोणताही फायदा होत नाही त्याचा फायदा शासनास होतो याउलट परिस्थितीत इतर रुग्णालयात असून त्यांना बीला प्रमाणे संपूर्ण रक्कम मंजूर होते.

**(E)** संस्थानकडून परताव्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाची खूपच सुक्ष्म प्रकारे छाणणी होऊन काहीना काही कारणास्तव रक्कम काही प्रमाणात कमी मंजूर करण्यात येते.

**(F)** चर्चा / वाटाघाटी करतांना निविदाधारकांनी देऊ केलेली मुळ किंमत तशीच ठेवून किती टक्के सूट देणार त्याप्रमाणे होणारी रक्कम रुग्णालयाच्या खाती जमा होणार असल्याने रुग्णालयात चॅरिटीच्या रक्कमेची तूट भरुन निघणेस मदत होईल.

**(G)** मागील वर्षी सात कोटी सात लाख रुपयांची स्टेन्ट/व्हाल्व/बलुन इ. ची खरेदी झालेली आहे. सदर रक्कमेचा विचार करीता साहित्य खरेदी ऐवजी देणगी स्वरुपात सूट घेतल्यास त्याचा संस्थनला जास्तीत जास्त फायदा होऊ शकेल.

तरी जीवनदायी योजने अंतर्गत येणाऱ्या रुग्णांची संख्या सर्वात जास्त असल्यामुळे व शासनाकडून कमी रक्कम मंजूर होत असल्यामुळे यावेळेस पुरवठाधारकांशी चर्चा / वाटाघाटी करतांना संबंधीत निविदा धारकांना मोफत स्किम चे साहित्य घेण्याऐवजी त्यांचेकडून स्टेन्ट/व्हाल्व/बलुन इ. यावर त्यांनी निविदेत देऊ केलेली रक्कम तशीच ठेऊन किती स्टेन्ट/व्हाल्व/बलुन इ. वापरल्यावर किती टक्के रक्कम संस्थानला देणगी स्वरुपात चेक / डि.डि. देणार अशा पध्दतीने चर्चा/ वाटाघाटी करण्याचा प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६७३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३ जाहिरात प्रसिध्दीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** दिनांक २९.०७.२०१० रोजी नवीन पिंपळवाडी रस्ता, घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उद्‌घाटन समारंभ,शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पांतर्गत रस्त्यांचे कामाचा व शिर्डी बसस्थानक, यात्रीनिवास इमारतीचा भूमीपूजन समारंभ आदि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर कार्यक्रमाची निमंत्रण वजा जाहिरात स्थानिक वर्तमानपत्रात देणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी निर्देश दिलेले होते.

मा.अध्यक्ष महोदय यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे स्थानिक वर्तमानपत्रात सदर कार्यक्रमाचे कृष्णधवल निमंत्रण वजा जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली असून याकामी येणारे अंदाजे रुपये ३,५०,०००/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४ मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**निर्णय क्र.६७५ मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

०१) श्री साईबाबा हॉस्पिटलचे परिसरात अपोलो फार्मसीमार्फत औषध दुकान सुरु करण्यात आले आहे. सदरचे दुकानापासून संस्थानला दरमहा किती उत्पन्न मिळाले याबाबत सविस्तर माहिती व्यवस्थापन समितीस दरमहा सादर करण्यात यावी. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

०२) संस्थान प्रकाशीत पुस्तके, फोटो, दैनंदिनी, दिनदर्शिका छपाई कामी वापरण्यात येणाऱ्या कागदाचे नमुने गव्हर्नमेंट लॅब, माटूंगा अथवा खादी ग्रामउद्योग, पुणे यांचेकडे तपासणीसाठी पाठवून अहवाल मागविण्यात येऊन खात्री करावी. (कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख)

०३) सस्थानमार्फत मोठ्या प्रमाणावर स्टेशनरी छपाईचे काम करण्यात येते. सदरचे काम संस्थानने प्रिंटींग मशिन खरेदी करुन करावे किंवा कसे याबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावा. (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

०४) श्री साईबाबा दिनदर्शिका २०११ (श्री साईबाबा कॅलेंडर ८ पेजेस, थ्रीडी-डिमेनशनल वॉल व डेस्क कॅलेंडर) संस्थानमार्फत ३ प्रकारचे कॅलेंडर प्रकाशित करणेबाबतचे विषयावर चर्चा झाली चर्चेत संस्थान प्रकाशने छपाईसाठी "साईग्रेस फाऊंडेशन"मुंबई यांचे नांव निवडक प्रेसधारकांचे यादीत समाविष्ठ करुन घेण्यात यावे तसेच त्यांनी दि. ०३.०८.२०१० चे पत्रासोबत सादर केलेले कॅलेंडर्स सभेस पसंत पडले. त्यांनी सदरचे कॅलेंडर्स विशेष तंत्रज्ञान वापरुन तयार करण्यात आले

असल्याने त्यांना खालील दर्शविलेल्या कॅलेंडरचा कार्यादेश देण्यात यावा. संस्थान नियमाप्रमाणे त्यांचेकडून कार्यादेशाच्या रक्कमेच्या ५% रक्कम अनामत म्हणून घेण्यात यावी. कार्यादेशाप्रमाणे पुरवठा मिळाल्यावर त्यांची अनामत रक्कम परत करावी. कॅलेंडरवर संस्थानचे नाव,संस्थान लोगो, देणगी मूल्य छपाई करुन,साईभक्तांना कॅलेंडर काऊंन्टरवर विक्रीस उपलब्ध करुन देण्यात यावेत.

| | तपशिल<br>१ | छपाई संख्या<br>२ | छपाई दर रुपये<br>३ | एकुण खर्च रुपये<br>४ | संस्थान देणगी मुल्य<br>५ |
|---|---|---|---|---|---|
| अ) | श्री साईबाबा दिनदर्शिका २०११ (८ पेजेस )आकार २२"X ३५" | ३०,००० | १८०/- | ५४,००,०००/- | २००/- |
| ब) | श्री साईबाबा थ्रीडी - डिमेनशनल ७ शिटर डेस्क कॅलेंडर २०११ आकार ९.७५"X ०७" | १५,००० | १४०/- | २१,००,०००/- | १५०/- |
| क) | श्री साईबाबा थ्रीडी - डिमेनशनल वॉल कॅलेंडर २०११ आकार १९" X १९" | ३०,००० | २६१/- | ७८,३०,०००/- | २७०/- |
| | | | एकूण रु. | १५३,३०,०००/- | |

वर नमुद केलेनुसार कॅलेंडरची छपाई करुन घ्यावी, त्याकामी येणारे एकूण रु. १५३,३०,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. खरेदी किंमत आधिक स्टेशनरी, कर्मचारी सेवा वगैरे बाबी विचारात घेता साईभक्तांना कॅलेंडरवर अल्प दरात कॉलम नं. ५ मध्ये नमुद केलेप्रमाणे देणगी मूल्य ठेवण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही - अधिक्षक, प्रकाशने विभाग)

०५) दिनांक ०५ ऑगस्ट,२०१० रोजी रात्री १२.३० वाजता जम्मू -काश्मिर मध्ये लेह व लडाख येथे ढगफूटी होऊन मोठ्या प्रमाणावर जिवित हानी व वित्त हानी झालेली आहे. एक सामाजिक संस्था म्हणून संस्थाननेही, या आपत्तीच्या निवारण कार्यामध्ये सहभाग घेणे हे एक महत्वाचे कर्तव्य ठरते. या मदत कार्यास शक्य तितकी आर्थिक मदत करण्याची सर्वच सदस्यांची भावना आहे. त्यामुळे सदर मदत कार्यास एकुण रक्कम रुपये ५० लाख, (रुपये पन्नास लाख मात्र) इतकी आर्थिक मदत चेकसच्या स्वरुपात दयावी असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

०६) पुढील वर्षी संस्थान प्रकाशित दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी थेट कंपनीकडून बल्लारपूर कागद संस्थानने खरेदी करुन छपाईकामाचे कोटेशन्स मागविण्यात यावे असे ठरले.
(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

०७) सध्या मोठ्या प्रमाणावर साथीच्या रोगाचा फैलाव चालू आहे. अतिदक्षता म्हणून संस्थानचे रुग्णालयात आवश्यक तो औषधाचा साठा उपलब्ध करुन ठेवण्यात यावा. आवश्यकतेनुसार संस्थान रुग्णालयामार्फत कॅम्प घेण्यात यावेत. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

०८) संस्थानमध्ये सध्या भक्तनिवास इमारतीत लॉण्ड्री युनिट कार्यान्वीत आहे. ते अपुरे पडत असल्याने अद्यायावत लॉण्ड्री सुरु करणेबाबत मा.विश्वस्त उर्मिला प्रदिप जाधव यांनी आवश्यक जागेची पहाणी करुन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावा.
(कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवासस्थान)

०९) मौजे निमगांव कोऱ्हाळे ता.राहाता गट नं.१९८,१९९,२०० मधील नियोजित साईगार्डन प्रकल्पासाठी लेजर शो उभारणीबाबत चर्चा व विचारविनिमय करणेसाठी Maris International Consulting Pvt.Ltd, Singapore यांचे प्रतिनिधींना दिनांक ३१.०७.२००१० रोजी सकाळी ११.०० वाजता बोलविण्यात आले होते. याबाबत माहिती विश्वस्तांना वेळेवर देण्यात आली नाही. यामूळे विश्वस्त मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी नापसंती व्यक्त केली.

याबाबत मा.उपकार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की मी स्वतः सन्माननीय विश्वस्तांशी बोललो होतो व कन्सल्टंट दि.२६.०७.२०१० रोजी येणार होते. परंतु दि.३१.०७.२०१० रोजी आले आहेत. चर्चेसाठी यावे अशी विनंती केली होती. परंतु सन्माननीय विश्वस्त मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांना पुर्वनियोजित कार्यक्रमामुळे बाहेरगावी जाणे होते. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

१०) एस.राधास्वामी फौंडेशन, सिकंदराबाद या संस्थेने २०० चौ.फुट जागा माहिती सुविधा केंद्रासाठी व ३००० चौ.फुट जागा अतिथीगृहासाठी नाममात्र भाडे पट्टयाने संस्थानला १० वर्षासाठी उपलब्ध करुन दिली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सदर जागेचे नुतणीकरण नुकतेच पुर्ण करण्यात आलेले आहे. मा.मुख्यमंत्री, आंध्रप्रदेश यांचे शुभहस्ते या माहिती सुविधा केंद्र तथा अतिथीगृहाचे उद्घाटन दि.३० ऑगस्ट २०१० रोजी आयोजित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने या माहिती सुविधा केंद्र तथा अतिथीगृहासाठी आवश्यक असणारे फर्निचर (जसे, पलंग, कपाटे, टिपॉय, खुर्च्या, टेबल, आदि.) तसेच, इतर अनुषंगीक साहित्य खरेदीसाठी विहीत पध्दतीने

खरेदी करण्यात यावे. उद्‌घाटन समारंभासाठी (मंडप, निमंत्रण पत्रिका, भोजन व्यवस्था, प्रवास इत्यादी.) तसेच, फर्निचर व इतर साहित्य खरेदीसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

११) प्रसादालय विभागाकडे प्रसाद लाडूची मागणी दर वर्षी २०% ने वाढत आहे. यामूळे जागा कमी पडत आहे. यासाठी जागा, माल ये-जा करण्याची वाहतूकीचा मार्ग, मोठ्या प्रमाणात दाळ दळण्याची मिल, लाडू वाळविण्यासाठी हवेशिर शेड तसेच प्रसादालयासमोरील श्रींचे मूर्तीवर शेड तयार करणेबाबत सविस्तर अहवाल व्यवस्थापन समितीचे सभेपूढे मान्यतेसाठी सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय/बांधकाम विभागप्रमुख)

१२) श्री सोमनाथ वसंत जावळे, मु.पो.चांदा, ता.नेवासा यांचा मुलगा वैभव सोमनाथ जावळे हे जी.बी.एस. विकाराने त्रस्त असून या आजाराचे उपचार ते सहयाद्री हॉस्पिटल, पुणे येथे घेत आहेत. याकामी रुपये २,२४,९१२/- खर्च येणार आहे. या आजाराचे औषधोपचारासाठी आर्थिक अनुदान मिळणेबाबत श्री सोमनाथ वसंत जावळे यांनी विनंती केली आहे.

सदरचे आजारासाठी अर्थिक अनुदान देणेबाबत संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत तरतूद नाही. एक विशेष बाब म्हणून श्री जावळे यांना रुपये २५,०००/- आर्थिक अनुदान देण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका)

१३) लंडन येथे "श्री साईभजन संध्या " हा कार्यक्रम आयोजित करणेकामी स्थानिक विश्वस्तांची सभा आयोजित करुन या कार्यक्रमाचे नियोजन करावे अशी सूचना मा.अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांनी मांडली.

---

वरील निर्णय क्र ६१२ ते ६७५ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (किशोर रा.मोरे) | (जयंत मुरलीधर ससाणे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) | श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) |